# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०६/ २०१८** **दिनांक ०१.०६.२०१८**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी १२.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक ०१.०६.२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात आली असलेबाबत, इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ९२७/२०१८, दिनांक २४ मे,२०१८ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा शुक्रवार दिनांक ०१.०६.२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

| | |
|---|---|
| ०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष | ०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष |
| ०३. मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य | ०४. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य |
| ०५. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य | ०६. मा.सौ.योगिता अभय शेळके पाटील, सदस्या |

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
मुख्यकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, समिती सदस्य मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले व मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंग यांनी दूरध्वनीद्वारे कळविले होते, याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

त्याचप्रमाणे मा.श्री.अमोल कीर्तिकर, सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.०१.०६.२०१८ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाहीत. हया संदर्भात शिवसेना सचिव मा.श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. याबाबत अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

मा.डॉ.मनिषा कायंदे, सदस्या यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.०१.०६.२०१८ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. परंतु या बैठकीस मी हजर रहाणार नाही. हया संदर्भात शिवसेना सचिव मा.श्री.अनिल देसाई व पर्यावरण मंत्री मा.श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. परंतु याबाबत आजतागायत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने, त्याचा खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित रहाण्यास मला स्वारस्य नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

सभेस आवश्यक गणपुर्ती नसल्यामुळे विधी व न्याय विभागाकडील दि.१३ जुलै, २०१७ रोजीचे अधिनियम दुरुस्तीतील कलम ३ (क) पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार तीस मिनीटाकरीता सभेचे कामकाज तहकुब करणेत येऊन, त्यानंतर दुपारी १२.३० वाजता मा.अध्यक्ष महोदय यांनी विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **दिनांक ०२.०५.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३४७** दिनांक ०२.०५.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

१) **निर्णय क्र.२८८/१-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ वर्षासाठी किराणामाल व अनुषंगीक साहित्य खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले अंतीम निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा. सदरहू निविदाप्रक्रियेमध्ये साखरेसाठी प्राप्त झालेले दर खुप जास्त असल्याने साखरेसाठी प्राप्त झालेल्या दरावर उपसमिती सभेत सविस्तर चर्चा झाली, मागील वर्षाच्या दराचा विचार करता चालू वर्षाचे दर कमी आहेत परंतु सध्याच्या बाजारातील साखरेचे दर, तसेच एकंदरीत या वर्षीचे जादा झालेले साखर उत्पादन इ.गोष्टीचा विचार करता भविष्यात साखरेचे दर कमी होण्याची शक्यता असल्याने फक्त प्रथम तिन महिन्यासाठी निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देण्यात यावा व दरम्यानचे काळात वर्षाच्या

पुढील कालावधीसाठी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, तसेच ज्या किराणामाल/ साहित्यांसाठी पुरवठाधारकांचे समान निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत, असा किराणा माल व साहित्याची खरेदी करणेसाठी समप्रमाणात विभागून पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच यापुढे खरेदी प्रक्रियेसाठीच्या निविदांमध्ये प्राप्त निम्नतम दर हा संबधीत साहित्याच्या मागील वर्षीच्या मंजूर पुरवठा आदेशातील दरापेक्षा कमी आल्यास सदर साहित्याच्या खरेदीसाठी नविन दराने उपसमितीच्या पुर्व मान्यतेने तात्काळ पुरवठा आदेश देण्यात यावा. त्यासाठी व्यवस्थापन समितीच्या मान्यतेसाठी वाट पाहु नये, असे ठरले.

तथापी पुरवठा आदेश देण्यापुर्वी निम्नतम दरधारक पुरवठादारांचे तेल, वनस्पती तुप, पेपरकप,ग्लासिन पेपर पिशव्या, कागदी पत्रावळ, द्रोण इत्यादी साहित्याची/नमुन्याची मान्यताप्राप्त संस्थेकडून तपासणी करुन घेण्यात

यावी. तपासणी अहवाल समाधानकारक आल्यानंतर संबधितांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तोपर्यंत पुर्वीच्या निविदेतील पुरवठादाराकडून मागील मंजुर दराने सदर साहित्य खरेदीस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ वर्षासाठी किराणामाल व अनुषंगीक साहित्य खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले अंतीम निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा. सदरहू निविदाप्रक्रियेमध्ये साखरेसाठी प्राप्त झालेले दर खुप जास्त असल्याने साखरेसाठी प्राप्त झालेल्या दरावर उपसमिती सभेत सविस्तर चर्चा झाली, मागील वर्षाच्या दराचा विचार करता चालू वर्षाचे दर कमी आहेत परंतु सध्याच्या बाजारातील साखरेचे दर, तसेच एकंदरीत या वर्षीचे जादा झालेले साखर उप्तादन इ.गोष्टीचा विचार करता भविष्यात साखरेचे दर कमी होण्याची शक्यता असल्याने फक्त प्रथम तिन महिन्यासाठी निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देण्यात यावा व दरम्यानचे काळात वर्षाच्या पुढील कालावधीसाठी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, तसेच ज्या किराणामाल/ साहित्यांसाठी पुरवठाधारकांचे समान निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत, असा किराणा माल व साहित्याची खरेदी करणेसाठी समप्रमाणात विभागून पुरवठा आदेश देण्यात यावा. **लॅमिनेटेड पेपर पिशवी साईज ५"x६" पोस्टर प्रसाद साठी स्टार पॅकेजींग, दमन यांचे दर न्युनतम आहेत, मात्र खरेदी नियमावलीनुसार महाराष्ट्राबाहेरील पुरवठादाराचे दराने महाराष्ट्रातील पुरवठादार श्री प्लॅस्टो फिल्म्स, सिन्नर हे माल पुरविण्यास तयार असल्यास ५०% मालाचा पुरवठा आदेश त्यांना देण्यात यावा.** तसेच यापुढे खरेदी प्रक्रियेसाठीच्या निविदांमध्ये प्राप्त निम्नतम दर हा संबधीत साहित्याच्या मागील वर्षीच्या मंजूर पुरवठा आदेशातील दरापेक्षा कमी आल्यास सदर साहित्याच्या खरेदीसाठी नविन दराने उपसमितीच्या पुर्व मान्यतेने तात्काळ पुरवठा आदेश देण्यात यावा. त्यासाठी व्यवस्थापन समितीच्या मान्यतेसाठी वाट पाहु नये, असे ठरले.

तथापी पुरवठा आदेश देण्यापुर्वी निम्नतम दरधारक पुरवठादारांचे तेल, वनस्पती तुप, पेपरकप,ग्लासिन पेपर पिशव्या, कागदी पत्रावळ, द्रोण इत्यादी साहित्याची/नमुन्याची मान्यताप्राप्त संस्थेकडून तपासणी करुन घेण्यात यावी. तपासणी अहवाल समाधानकारक आल्यानंतर संबधितांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तोपर्यंत पुर्वीच्या निविदेतील पुरवठादाराकडून मागील मंजुर दराने सदर साहित्य खरेदीस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. **(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)**

---

२) **निर्णय क्र.२९६-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त् प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे पिंपळवाडी- एकरुखे- गणेशनगर- वाकडी ते रा.मा.५० पर्यंत रस्ता कि.मी. ०/०० ते २५/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

यावेळी अशीही चर्चा झाली की, अहमदनगर–मनमाड या महामार्गावरील चिंचोली फाटा-देवळाली-टाकळीमिया-आरडगाव-केंदळ-ब्राम्हणी हा रस्ता शनि शिंगणापुर येथे दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांचे सोईचा व नजीकचा आहे. तरी सदर रस्त्याचेही मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)

<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त् प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे पिंपळवाडी- एकरुखे- गणेशनगर-वाकडी ते रा.मा.५० पर्यंत रस्ता कि.मी. ०/०० ते २५/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.१३ कोटी मात्र खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहु प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे पाठविणेत यावा. असे ठरले.**

**यावेळी अशीही चर्चा झाली की, अहमदनगर–मनमाड या महामार्गावरील चिंचोली फाटा-देवळाली-टाकळीमिया-आरडगाव-केंदळ-ब्राम्हणी हा रस्ता शनि शिंगणापुर येथे दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांचे सोईचा व नजीकचा आहे. तरी सदर रस्त्याचेही मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

३) निर्णय क्र.२९८-

यावेळी सदस्यांनी सभेस अशी माहिती दिली की, तिरुपती बालाजी येथील प्रसाद लाडू जादा कालावधीसाठी टिकून राहातात, सदर लाडू निर्मीतीच्या कार्यपध्दतीची माहिती घेऊन पुढील निर्णय घ्यावा.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा विषय स्थगित ठेवणेत आला.

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग/प्र.अधिक्षक, लाडु प्रसाद निर्मीती विभाग)

<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नं.८७, ८८ मधील जागेत प्रसाद लाडू निर्मिती युनिटकरीता इमारतीचे नियोजीत बांधकामासाठी आर्किटेक्ट सुशिल देशमुख यांनी सादर केलेल्या सुधारीत नकाशांना व अंदाजपत्रकीय रु.१५,९९,३६,७१३/-मात्र खर्चास मान्यता देण्यात आली. व सदरहु प्रकल्प हा मोठया खर्चाचा असल्याने मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, तसेच शासन मान्यतेनंतर विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग/प्र.अधिक्षक, लाडु प्रसाद निर्मीती विभाग)**

---

४) निर्णय क्र.३१७-

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्ताव मान्य करण्यात आला. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>

**यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक मटेरीयल खरेदी करणेसाठी अंदाजे रु.१६,२२,५००/- मात्र खर्चास व सदर मटेरीयल खरेदीकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रकिया राबविणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)**

---

५) निर्णय क्र.३१८-

यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्ताव मान्य करण्यात आला. (कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)

<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमधील सीसीटीव्ही विभागाचे प्रस्तावात नमुद "अ" नुसार उपलब्ध असलेले सीसीटीव्ही फुटेज पोलिस यंत्रणा, केंद्र व राज्य शासनाच्या गुप्तचर विभाग यांना तपासकामी त्यांच्या मागणीप्रमाणे देण्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच विभागाच्या प्रस्तावात नमुद "ब" प्रमाणे माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम ८ (१) मधील "छ" व "ञ" मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार खाजगी अर्जदारास सीसीटीव्ही फुटेज देण्याचे नाकारण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)**

---

६) निर्णय क्र.३२१-

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्ताव मान्य करण्यात आला. (कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>

**यावर सविस्तर चर्चा होऊन, M/s Netcore Solutions Pvt Ltd, Mumbai यांना वारंवार सुचित करुनही एसएमएस पुरविणेकामीची सुविधा ते पुर्ववत सुरू करत नसल्यामुळे त्यांना याकामी देण्यात आलेल्या कार्यादेशाप्रमाणेची सेवा बंद करणेत येऊन याकामी संस्थानचे प्रचलीत पद्धतीनुसार नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबवून निम्नत्तम दरधारकाची नेमणूक करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)**

---

७) निर्णय क्र.३२२-

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्ताव मान्य करण्यात आला.

(कार्यवाही- वैद्यकीय अधिक्षीका,साईनाथ रुग्णालय)

<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमीत्त दि.०२.०६.२०१८ ते दि.०८.०६.२०१८ या कालावधीत श्री साईनाथ रुग्णालयात कान, नाक, घसा इ.चे मोफत शस्त्रक्रिया शिबीर तसेच कर्णबधीर रुग्णांना मोफत श्रवणयंत्र वाटप शिबीराचे आयोजन करणेस व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु.१२,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकीय अधिक्षीका,साईनाथ रुग्णालय)**

---

८) निर्णय क्र.३२४-

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्ताव मान्य करण्यात आला. (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>

**यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन- १९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे, उपरोक्त तक्त्यामधील १६ कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम रु.७,५८,१५०/- मात्र त्यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)**

---

९) निर्णय क्र.३२९-

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्‍ प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५-१६ मधील (Annual Rate Countract) वार्षिक खरेदीमधील मंजूर दराने सन २०१७-१८ मध्ये करण्यात आलेल्या औषधे, सर्जिकल, लॅबोरेटरी साहित्य खरेदीस व त्यासाठी आलेल्या रक्कम रु.१६,४४,१३७/-मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)**

---

१०) निर्णय क्र.३३५-

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक,सामान्य प्रशासन विभाग)

<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा प्रशासकीय प्रबोधनी (SSIAC) सुरु करणेबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील क्र.सासंवि-१०१७/ १९९२/प्र.क्र.२२५/ का.१६ दि.१५.०२.२०१८ रोजीचे पत्रान्वये मागणी केलेल्या मुद्दयांबाबत उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे अहवाल/अभिप्राय शासनास सादर करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,सामान्य प्रशासन विभाग)**

---

११) निर्णय क्र.३३८-

रुग्णवाहीकांसाठी साई रुग्णवाहीका प्रकल्पाबाबत सभेत सविस्तर चर्चा झाली, सदर प्रकल्पासाठी भाविकांकडून जमा केलेल्या निधीचा विनियोग कसा करावा, याबाबत संस्थानचे कर सल्लागार श्री. केळकर व सनदी लेखापाल श्री.चितळे यांचा सल्ला घेण्यात आला. भाविकांनी रुग्णवाहीकांसाठी देणगी स्वरुपात दिलेली रक्कम

कोणत्याही परिस्थितीत त्यांना परत करता येणार नाही, असे दोन्ही सल्लागारांनी सुचित केले आहे. त्याएवेजी सदर निधिचा विनियोग संस्थाननेच करावा असे त्यांची सुचविले आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर निधी भाविकांना परत करु नये, असे ठरले. तसेच सदर निधीमधुन संस्थानने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन रुग्णवाहीका खरेदी कराव्यात, सदर रुग्णवाहीकेवर साई रुग्णवाहीका व संस्थानचे नाव टाकावे. सदर रुग्णवाहीका राज्यभरातील आरोग्य क्षेत्रात कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्था/ ट्रस्ट यांना करारपध्दतीने वापरण्यासाठी देण्यात याव्या, त्यासाठी सदर संस्थाकडून रु.१ लाख मात्र एवढी रक्कम नापरतावा अनामत रक्कम म्हणून संस्थानकडे जमा करुन घ्यावी. सदर रुग्णवाहीकांची मालकी संस्थानची राहील. तथापी सदर रुगणवाहीकेवरील वाहन चालक त्यासाठी येणार इंधन, दुरुस्ती देखभाल व इतर अनुषंगीक खर्च करण्याची जबाबदारी वापरकर्त्या सस्थांची राहील. तसेच सदर रुग्णवाहीकेचा वापर करतांना अपघात किंवा तत्सम प्रसंगातुन उद्भवणाऱ्या कायदेशीर बाबींची जबाबदारी देखील संबधीत वापरकर्त्या सस्थांची राहील, असे ठरले.

याबाबत सेवाभावी संस्था/ ट्रस्ट यांचेकडून अर्ज मागविणे, त्यांची निवड करण्याची पध्दती पात्रतेचे निकष तसेच संस्थेची निवड झाल्यानंतर त्यांचेशी करावयाच्या करारनाम्यातील अटी व शर्ती याचा समावेश असलेल्या नियमावलीसह सविसतर प्रस्ताव सभेसमोर सादर करावा, असे ठरले.

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक/ प्र.अधिक्षक,वाहन विभाग)

याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.

**रुग्णवाहीकांसाठी साई रुग्णवाहीका प्रकल्पाबाबत सभेत सविस्तर चर्चा झाली, सदर प्रकल्पासाठी भाविकांकडून जमा केलेल्या निधीचा विनियोग कसा करावा, याबाबत संस्थानचे कर सल्लागार श्री. केळकर व सनदी लेखापाल श्री.चितळे यांचा सल्ला घेण्यात आला. भाविकांनी रुग्णवाहीकांसाठी देणगी स्वरुपात दिलेली रक्कम कोणत्याही परिसिथतीत त्यांना परत करता येणार नाही, असे दोन्ही सल्लागारांनी सुचित केले आहे. त्याएवेजी सदर निधिचा विनियोग संस्थाननेच करावा असे त्यांची सुचविले आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर निधी भाविकांना परत करु नये, असे ठरले. तसेच सदर निधीमधुन विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन १०० रुग्णवाहीका खरेदी कराव्यात, सदर रुग्णवाहीकेवर साई रुग्णवाहीका व संस्थानचे तसेच देणगीदार साईभक्ताचे नाव टाकावे. सदर रुग्णवाहीका राज्यभरातील आरोग्य क्षेत्रात कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्था/ ट्रस्ट यांना करारपध्दतीने वापरण्यासाठी देण्यात याव्या, त्यासाठी सदर संस्थाकडून रु.१ लाख मात्र एवढी रक्कम नापरतावा अनामत रक्कम म्हणून संस्थानकडे जमा करुन घ्यावी. सदर रुग्णवाहीकांची मालकी संस्थानची राहील. तथापी सदर रुगणवाहीकेवरील वाहन चालक त्यासाठी येणार इंधन, दुरुस्ती देखभाल व इतर अनुषंगीक खर्च करण्याची जबाबदारी वापरकर्त्या सस्थांची राहील. तसेच सदर रुग्णवाहीकेचा वापर करतांना अपघात किंवा तत्सम प्रसंगातुन उद्भवणाऱ्या कायदेशीर बाबींची जबाबदारी देखील संबधीत वापरकर्त्या सस्थांची राहील, असे ठरले. त्याप्रमाणे प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यास मान्यता देण्यात आली.**

**याबाबत सेवाभावी संस्था/ ट्रस्ट यांचेकडून अर्ज मागविणे, त्यांची निवड करण्याची पध्दती पात्रतेचे निकष तसेच संस्थेची निवड झाल्यानंतर त्यांचेशी करावयाच्या करारनाम्यातील अटी व शर्ती याचा समावेश असलेल्या नियमावलीसह सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- वैद्यकीय संचालक/ प्र.अधिक्षक,वाहन विभाग)**

---

१२) निर्णय क्र.३४०-

यावर सविस्तर चर्चा होऊन, जपान, कोची येथे पादुका **दर्शन सोहळ्यासाठी दि.३ सप्टेंबर,२०१८ ते दि.१० सप्टेंबर,२०१८ याकालावधीत चांदीचे पादुका उपलब्ध करून देण्यात याव्यात, असे ठरले.** तसेच उपरोक्त पादुका दर्शन सोहळयासाठी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपजिल्हाधिकारी व इतर अधिकारी, कर्मचारी असे एकूण जास्तीत जास्त ६ ते ८ व्यक्तींना उपस्थित राहण्यास व या सर्वांचा प्रवासखर्च, व्हिजा खर्च व निवास, भोजन खर्च जपान येथील आयोजक मंडळास करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच यासाठी शासनाची आवश्यक पुर्व परवानगी घेण्यात यावी,

तसेच सदर पादुका दर्शन सोहळयासाठी जे विश्वस्त जाऊ इच्छीत असतील त्यांनी स्वत:च्या खर्चाने जावे, असे ठरले. **(कार्यवाही - समाधी शताब्दी कक्षप्रमुख)**

याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, जपान, कोची येथे पादुका दर्शन सोहळयासाठी दि.३ सप्टेंबर,२०१८ ते दि.१० सप्टेंबर,२०१८ याकालावधीत चांदीचे पादुका उपलब्ध करून देण्यात याव्यात, असे ठरले. तसेच उपरोक्त पादुका दर्शन सोहळयासाठी संस्थानचे विश्वस्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, उपजिल्हाधिकारी व इतर अधिकारी, कर्मचारी**

**असे कमीत कमी ९ व्यक्तींना उपस्थित राहण्यास व या सर्वांचा प्रवासखर्च,व्हिजा खर्च व निवास, भोजन खर्च जपान येथील आयोजक मंडळास करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच यासाठी शासनाची आवश्यक पुर्व परवानगी घेण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)**

---

१३) **निर्णय क्र.३४२**

श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल मधील सर्व कामकाज संगणकीकृत करणेसाठी आजचे सभेसमोर Hospital Management System या सॉफ्टवेअरचे सादरीकरण करण्यात आले. सदरचे सॉफ्टवेअर संस्थानला मोफत देणार असून १० वर्ष देखभाल दुरुस्तीची सेवा मोफत देणार आहेत. यासाठी येणारा खर्च संबधीत कंपनीला देगणी स्वरुपात उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगीतले. तसेच कार्यादेश दिल्यानंतर सदर System कार्यरत करणेसाठी ६ महिन्याचा कालावधी लागेल असे त्यांनी सांगीतले. त्यासाठीचे Hardware संस्थानला खरेदी करावे लागणार आहे.

यावेळी संस्थान स्वत: देणगीदाराशी संपर्क करुन देणगी स्वरुपात रक्कम / वस्तु/ साहित्य/साफ्टवेअर इत्यादी प्राप्त घेत असते. त्यासाठी एखादी कंपनी/संस्था यांना त्यांचे स्तरावर देणगीदार शोधण्यास व देणगी स्विकारण्यास मान्यता दिल्यास गैरप्रकार होऊन संस्थानच्या नावाने फसवणूक/ पैसे गोळा करण्याचे प्रकार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी संस्थानने देणगीदार शोधून त्यांचेमार्फत उपरोक्त साफ्टवेअर खरेदी करणे संस्थानच्या हिताचे राहील, असे मत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बैठकीत मांडले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहु कामी कंपनीस देगणी स्वरुपातील मिळणारी रक्कम कोणाकडून मिळणार आहे व त्याचा विनियोग कशा प्रकारे करण्यात येईल, याची माहिती संस्थानला देण्यात यावी, सदरहू सॉफ्टवेअर एक वर्षासाठी प्रायोगिक तत्वावर चालविण्यात यावे. असे ठरले. तसचे सदर सॉफ्टवेअर घेण्यापुर्वी सध्या सदर सॉफ्टवेअर ज्या रुग्णालयात कार्यान्वीत आहे. त्या रुग्णालयास संस्थानच्या डॉक्टर, संबधीत अधिकारी व कर्मचारी यांच्या पथकाने पाहणी करुन सदर सॉफ्टवेअरच्या उपयुक्ततेबाबत खात्री करुन घ्यावी, असे ठरले. तसेच सदर सॉफ्टवेअरच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक हार्डवेअर खरेदीसाठी रु.५० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. **(कार्यवाही-** वैद्यकीय संचालक)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल मधील सर्व कामकाज संगणकीकृत करणेसाठी आजचे सभेसमोर Ncord Health Card Ltd, Pune यांचे प्रतिनिधी यांनी Hospital Management System या सॉफ्टवेअरचे सादरीकरण करण्यात आले. सदरचे सॉफ्टवेअर संस्थानला मोफत देणार असून १० वर्ष देखभाल दुरुस्तीची सेवा मोफत देणार आहेत. यासाठी येणारा खर्चसंबधीत कंपनीला देगणी स्वरुपात उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगीतले. तसेच कार्यादेश दिल्यानंतर सदर System कार्यरत करणेसाठी ६ महिन्याचा कालावधी लागेल असे त्यांनी सांगीतले. त्यासाठीचे Hardware संस्थानला खरेदी करावे लागणार आहे.**

**यावेळी संस्थान स्वत: देणगीदाराशी संपर्क करुन देणगी स्वरुपात रक्कम / वस्तु/ साहित्य/साफ्टवेअर इत्यादी प्राप्त घेत असते. त्यासाठी एखादी कंपनी/संस्था यांना त्यांचे स्तरावर देणगीदार शोधण्यास व देणगी स्विकारण्यास मान्यता दिल्यास गैरप्रकार होऊन संस्थानच्या नावाने फसवणूक/ पैसे गोळा करण्याचे प्रकार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी संस्थानने देणगीदार शोधून त्यांचेमार्फत उपरोक्त साफ्टवेअर खरेदी करणे संस्थानच्या हिताचे राहील, असे मत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बैठकीत मांडले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहु कामी Ncord Health Card Ltd, Pune या कंपनीस देगणी स्वरुपातील मिळणारी रक्कम कोणाकडून मिळणार आहे व त्याचा विनियोग कशा प्रकारे करण्यात येईल, याची माहिती संस्थानला देण्यात यावी, सदरहू सॉफ्टवेअर एक वर्षासाठी प्रायोगिक तत्वावर चालविण्यात यावे. असे ठरले. तसचे सदर सॉफ्टवेअर घेण्यापुर्वी सध्या सदर सॉफ्टवेअर ज्या रुग्णालयात कार्यान्वीत आहे. त्या रुग्णालयास संस्थानच्या डॉक्टर, संबधीत अधिकारी व कर्मचारी यांच्या पथकाने पाहणी करुन सदर सॉफ्टवेअरच्या उपयुक्ततेबाबत खात्री करुन घ्यावी, असे ठरले. तसेच सदर सॉफ्टवेअरच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक हार्डवेअर खरेदीसाठी रु.५० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पिटल / वैद्यकीय अधिक्षीका,साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.०२** **दिनांक १९.०५.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३४८** दिनांक १९.०५.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष सन २०१७ -२०१८ चे कालावधीत माहे जुन-२०१८ मध्ये रांची येथील आयोजीत करण्यात आलेल्या श्रींचे पादुका दर्शन सोहळयाची दिनांक बदल करणेबाबत.**

श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. यासाठी संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून, त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रासह संपूर्ण देशभरातील विविध राज्यांमध्ये श्री साईबाबा पादुका दर्शन सोहळा याकार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८७ अन्वये श्रींचा पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेकामी प्राप्त झालेले प्रस्ताव हे पादुका दर्शन सोहळयाच्या अर्ज छाननी करणेकामी गठीत करण्यात आलेल्या समिती समोर सादर करावेत व या समितीने पादुका दर्शन सोहळयाची रूपरेषा ठरवून त्याचा प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करावा असे ठरलेले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरून दि.१७/०३/२०१८ रोजी मा. पादुका अर्ज छाननी समितीचे बैठक पार पडलेली आहे. या बैठकीत सादर करण्यात आलेले प्रस्तावांची छाननी करण्यात आलेली असून, मा. पादुका अर्ज छाननी समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन समितीचे सभेपूढे मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेत यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र.२२६ अन्वये दि.०९/०६/२०१८ ते दि.१०/०६/२०१८ पर्यंत रॉची येथे श्रींचे पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेस मान्यता देण्यात आलेली असून, जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम-शताब्दी/२०४//२०१८ दि.११/०४/२०१८ रोजीचे पत्राद्वारे संबंधीत आयोजकांना कळविण्यात आलेले आहे. तसेच सदरहू बैठकीमध्ये छाननी समितीने निश्चित केलेल्या पादुका दर्शन सोहळयाचे ठिकाणांची पूर्व पहाणी दौ-यामध्ये अथवा प्रत्यक्ष किंवा अपरिहार्य कारणांमुळे दौ-याची तारीख बदलण्याची गरज भासल्यास दौर रद्द करण्याचे किंवा तारखांबद्दल करण्याचे अधिकारी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांना देण्यात आलेले आहे.

तथापी श्री. प्रसन्न कुमार, साईधाम सेवा ट्रस्ट, पुनदाग यांनी मा. अध्यक्ष महोदय यांना अग्रेषीत केलेल्या पत्र नमूद केलेले आहे की, आपण श्री साईचे पादुका रांची झारखंड येथील साईभक्तांना उपलब्ध करून दिलेल्या आहेत त्याबद्दल मी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांचे आभार प्रकट करीत आहे.

महोदय, मी आपणास विनंती करतो की, दि.०९/०६/२०१८ ते १०/०६/२०१८ रोजी रांची येथे श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करण्यात येणार आहे. परंतू वर्तमान स्थिती रांची मध्ये भंयकर उन्हाळा आणि गरम हवा असनू या ठिकाणी ४४ ते ४६ डिग्री तापमान आहे. ही स्थिती दि.१५ जून पर्यंत अशीच राहणार असल्याची संभावना आहे. तरी या वस्तूस्थिती व तापमानचा विचार करता कृपया दि.०९/०६/२०१८ ते १०/०६/२०१८ ऐवजी दि.२५/०८/२०१८ ते दि.२६/०८/२०१८ रोजी श्रींचे पादुका साईभक्तांचे दर्शनासाठी उपलब्ध करून दयाव्यात, असे कळविलेले आहेत.

विभागाचा अभिप्रायः- माहे ऑगस्ट-२०१८ मध्ये दि.१६/०८/२०१८ ते दि.२३/०८/२०१८ पर्यंत श्रींचे पादुका प.पू गंगागीर महाराज सप्ताहा कालावधीत शिर्डी येथे भाविकांचे दर्शनासाठी उपलब्ध करण्यात येणार आहे. श्री. प्रसन्न कुमार, रांची यांचे विनंती पत्रानुसार दि.२५/०८/२०१८ ते दि.२६/०८/२०१८ रोजी श्रींचे पादुका रांची येथील साईभक्तांचे दर्शनसाठी उपलब्ध करता येईल, असे नम्र मत आहे.

प्रस्तावः- तरी श्री. प्रसन्न कुमार यांचे उपरोक्त प्राप्त पत्राचे अनुषंगाने दि.२५/०८/२०१८ ते दि.२६/०८/२०१८ रोजी रांची येथे श्रींचे पादुका साईभक्तांचे दर्शनासाठी उपलब्ध करून देणेकामी सदरहु प्रस्ताव मा. स्थानिक उपसमितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. प्रसन्न कुमार, रांची यांचे विनंती पत्रानुसार दि.२५/०८/२०१८ ते दि.२६/०८/२०१८ रोजी श्रींचे पादुका रांची येथील साईभक्तांचे दर्शनासाठी उपलब्ध करुन देण्यात याव्यात, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** **(कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

०२ **श्रीमती रुबी शर्मा, मुख्य संपादक, साई श्रध्दा सबुरी मासिक पत्रिका, नवी दिल्ली यांना दि. २ व ३ ऑक्टोबर २०१८ रोजी श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप येथे सामान्य तसेच दिव्यांग लहान मुलांचा समावेश असलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमास तसेच साई कॉम्प्लेक्स येथे पेंटींग व रांगोळी प्रदर्शनास परवानगी देणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड) श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

मा. व्यवस्थापन समिती ठरावः- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.७५० अन्वये, “श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-१८ या कालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम व पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमांबाबत सविस्तर चर्चा होऊन, त्यास अंतिम स्वरुप देण्यात आले.”

प्रस्तावनाः- श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करण्यात येत आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभरात वेगवेगळया धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल यादृष्टीने कामकाज चालू आहे.

प्रस्ताव:- श्रीमती रूबी शर्मा, मुख्य संपादक, साई श्रद्धा सबुरी मासिक पत्रिका, नवी दिल्ली यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांना अग्रेषीत केलेल्या दि.१९/०४/२०१८ व दि.०८/०५/२०१८ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी दिव्यांग मुले सहभागी असलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी परवानगी मागीतली आहे. यामध्ये खालील कार्यक्रमांचा समावेश आहे.

१) साईध्वज परिक्रमा – शताब्दी ध्वजाची सामान्य व दिव्यांग मुलांद्वारे शिर्डी शहरातून मिरवणूक (साईध्वज परिक्रमा गेट नं.३ येथून दुपारी १२ वाजता निघून शिर्डी शहरातील सर्व मुख्य रस्तेमार्गे गेट नं.५ येथे पोहचणार आहे)

२) शिर्डीतील वेगवेगळया ठिकाणी श्रीसाईबाबांच्या जीवनावर व शिकवणुकीवर आधारित नृत्य आणि लघु नाटीका

३) श्री साईबाबा व त्यांची शिकवण यावर आधारित भक्तीगीत

४) एकुण २५० मुलांचा सहभाग असणार आहे

५) जे भक्त या कार्यक्रमासाठी साईसेवा देत आहेत अशा लोकांप्रती कृतज्ञता समारंभ

साई श्रध्दा सबुरी, नवी दिल्ली हे लहान मुलांसाठी नृत्य, गायन व पेंटींग स्पर्धा आयोजित करणार आहेत. यामध्ये भारतभरातून स्पर्धक सहभागी होणार आहेत. प्रत्येक स्पर्धकाला साई श्रध्दा सबुरी, नवी दिल्ली यांचेमार्फत प्रमाणपत्र व भेटवस्तू देण्यात येणार आहेत. यासाठी श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप येथे दि. व ३ ऑक्टोबर किंवा दि. ६ व ७ ऑक्टोबर २०१८ रोजी सायं. ४ ते रात्री १० या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रम घेणेस तसेच साई कॉम्प्लेक्स इमारतीतील संस्थानचा हॉल पेन्टींग व रांगोळीचे प्रदर्शन भरवणेकरीता दोन दिवस उपलब्ध करुन देणेस, त्याचप्रमाणे ५० मुलांचे निवासाची मोफत व्यवस्था करण्याची विनंती केली आहे.

विभागाचा अभिप्राय:- सदरहु कार्यक्रम ठेवणेबाबत मा.उपाध्यक्ष, श्री कदम साहेब यांनी निर्देश दिलेले आहेत. यापुर्वी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात दि.०८/१२/२०१७ रोजी श्रीमती रूबी शर्मा, मुख्य संपादक, साई श्रद्धा सबुरी मासिक पत्रिका, नवी दिल्ली यांचा “Sai Kids Carnival” हा ६० दिव्यांग मुले सहभागी असलेला कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप येथे आयोजित करण्यात आला होता.

पत्रात मागणी केलेल्या साई कॉम्प्लेक्समधील हॉलसाठी संस्थान इतरांकडून प्रतीदिन रु. ५,०००/- इतका सेवा आकार घेत आहे. या दरानुसार २ दिवसाकरीता हॉलचा सेवा आकार रुपये १०,०००/- मात्र होत आहे.

श्रीमती रुबी शर्मा यांनी कार्यक्रमासाठी प्राधान्याने दि.२ व ३ ऑक्टोबर किंवा दि.६ व ७ ऑक्टोबर २०१८ या कालावधीची मागणी केली आहे. उपरोक्त नमूद तारखेस या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले नाही.

तरी याकामी खालील बाबींवर निर्णय होणे आवश्यक आहे :-

१) श्रीमती रुबी शर्मा यांना श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप येथे दि.२ व ३ ऑक्टोबर २०१८ रोजी सायं. ४ ते रात्री १० या वेळेत (धुपारतीची वेळ सोडून) सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणेस तसेच साई कॉम्प्लेक्स इमारतीतील संस्थानचा हॉल पेंटींग व रांगोळीचे प्रदर्शन भरवणेकरीता उपलब्ध करुन देणेस परवानगी देणेबाबत.

२) साईध्वज परिक्रमा काढणेस परवानगी देणेबाबत. (अशा प्रकारच्या कार्यक्रमास परवानगी देऊ नये असे नम्र मत आहे. यापुर्वी अशाच शिर्डी परिक्रमाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१४/११/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.९४७ अन्वये अमान्य करण्यात आलेला आहे.)

३) साई कॉम्प्लेक्स येथील संस्थानचा हॉल २ दिवस मोफत देणेबाबत.

४) ५० मुलांकरीता १० खोल्यांची २ दिवस साईआश्रम भक्तनिवास येथे मोफत निवासाची व्यवस्था करणेबाबत

तरी श्रीमती रुबी शर्मा यांनी दिलेला प्रस्ताव मा.स्थानिक उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती रुबी शर्मा, मुख्य संपादक, साई श्रध्दा सबुरी मासिक पत्रिका, नवी दिल्ली यांना दि. २ व ३ ऑक्टोबर २०१८ रोजी श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप येथे सामान्य तसेच दिव्यांग लहान मुलांचा समावेश असलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमास तसेच साई कॉम्प्लेक्स येथे पेंटींग व रांगोळी प्रदर्शनास परवानगी देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

**०३ ॐ श्री साई स्वाध्याय समिती, कराड यांनी ॐ कार साधना संमेलन शिर्डी येथे आयोजित करणेकामी केलेल्या विनंती बाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-

१. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

मा. व्यवस्थापन समिती सभा निर्णय- दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १७१

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने दि. ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि. ३१ ऑक्टोबर, २०१८ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजिक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे", असे ठरले आहे.

प्रस्तावना- श्री साईबाबा यांच्या महासमाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये साजरे केले जात आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

प्रस्ताव- दि.२४/०१/२०१८ रोजीचे पत्रान्वये ॐ श्री साई स्वाध्याय समिती, कराड यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अग्रेषित केलेल्या पत्रात ॐ श्री साई स्वाध्याय समिती, कराड या नावाची आमची संस्था गेली ५० वर्षे कराड येथे कार्य करीत आहे. आमच्या संस्थेमार्फत गोरगरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य घेणेसाठी आर्थिक सहाय्य,मूक बधीर मुलांच्या निवासी शाळेला आर्थिक मत देते. आजारी व्यक्तींना वैद्यकीय मदत देते तसेच भक्तांसाठी ॐ कार साधना वर्ग तसेच साधना संमेलन घेणे इत्यादी विविध उपक्रम रबविले जातात. आम्हाला शिर्डी येथे श्री साईनाथ महाराज यांच्या पावनभूमीत चार दिवसांचे ॐ कार साधना संमेलन

यावर्षी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात घ्यावयाचे आहे. सदर साधना संमेलन ऑक्टोबर २०१८ मध्ये घेणेचा मानस आहे. या साधना संमेलनास आमच्या संस्थेचे सुमारे १००० भक्तभाविक सभासद सहभागी होणार आहेत.

तसेच साधना संमेलनाचा दैनंदिन कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | वेळ | कार्यक्रम | अ.नं. | वेळ | कार्यक्रम |
|---|---|---|---|---|---|
| १ | स ८ ते ८.४५ | ॐ कार साधना | २ | स ९ ते ९.३० | साईंची आरती |
| ३ | स ९.४५ ते १०.१५ | अल्पोपहार | ४ | स १०.३० ते १.३० | प्रवचन (मुलाखत भजन ) |
| ५ | दु १.३० ते ३.०० | भोजन व विश्रांती | ६ | दु ३.१५ ते ६.४५ | प्रवचन व किर्तन |
| ७ | संध्या ७ ते ८ | साईलीला भजन व आरती | ८ | रात्रौ ८.१५ ते ९.३० | भोजन |
| ९ | रा.१०.०० | विश्रांती | | | |

तसेच आम्हास प्रवचन, भजन, किर्तन इत्यादी कार्यक्रमासाठी चार दिवस संस्थेचे सभागृह उपलब्ध करुन द्यावे तसेच सभासदांच्या निवासासाठी साई आश्रम क्र.१ किंवा २ मध्ये ३०० रुम्स भाडयाने मिळाव्यात तसेच चार दिवस अल्पोपहार व दोन वेळचे भोजनाची व्यवस्था व्हावी व त्यांचे चार्जेस आम्ही द्यावयास तयार आहोत. ॐ कार साधना, आरती, भजन किर्तन इत्यादी कार्यक्रमासाठी संस्थानमार्फत सभागृह देणेत अडचण असेल तर आम्ही श्री साई आश्रम क्र.१ किंवा २ येथे संस्थानच्या मोकळ्या जागेत स्वखर्चाने मंडप टाकणेस तयार आहोत. तरी मा.महोदयांनी आमच्या संस्थेचे साईभक्त संमेलन घेण्यास परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

दि.०२/०४/२०१८ रोजीचे पत्रान्वये ॐ श्री साई स्वाध्याय समिती कराड या संस्थेस प.पू.बाबाचे समाधी शताब्दी वर्षात शिर्डी येथे बाबांच्या भक्तांचे साधना संमेलन ऑक्टो.१८ मध्ये घ्यायचे आहे. त्यासंबंधी पत्र १०/०१/२०१८ मध्ये पाठविले आहे. त्याप्रमाणे आपल्या शताब्दी कक्षाशी आम्ही आपणास संमेलनासाठी पुढील तारखा मिळाल्यास आम्हाला नियोजन करता येईल. आम्हाला ३०/०९/२०१८ ते ०५/१०/२०१८ या तारखा मिळाव्यात व १००० भक्त बसू शकतील असा सभागृह हॉल उपलब्ध व्हावा. या दरम्यान भक्तांना राहण्याची व्यवस्था सायंकाळच्या भजन, किर्तन व प्रवचनासाठी शताब्दी व्यासपीठाची व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात यावी, असे कळविले आहे.

दि.०३/०५/२०१८ रोजीचे ई-मेलव्दारे ॐ श्री साई स्वाध्याय समिती कराड यांनी साधना संमेलनासाठी दि.०१/१०/२०१८ ते ०४/१०/२०१८ रोजी साऊंड सिस्टीम व माईक सिस्टीमची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी, असे कळविले आहे.

विभागाचा अभिप्राय- मा.उपाध्यक्ष महोदय यांनी ॐ कार साधना संमेलनाचे आयोजन करणेकामी प्रस्ताव व्यवस्थापन समिती समोर सादर करणेस शताब्दी कक्षास निर्देश दिलेले आहेत.

श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्यानुसार अर्जदाराने सादर केलेल्या धार्मिक प्रस्तावासाठी संस्थानमार्फत कोणत्याही प्रकाराचा खर्च करावयाचा नसल्याने असे संमेलन संस्थानचे परिसरात अर्जदारांना आयोजित करणेसाठी परवानगी देता येईल असे मत आहे.

ॐ श्री साई स्वाध्याय समिती, कराड यांचे दि.०१/१०/२०१८ ते ०४/१०/२०१८ अखेर १००० व्यक्तींचे चार दिवसांचे ॐ कार साधना, आरती, भजन किर्तन इत्यादी कार्यक्रम आयोजित करणेसाठी परवानगी देणेकामी खालील बाबींवर निर्णय होणे गरजेचे आहे.

१. ॐ श्री साई स्वाध्याय समिती, कराड यांना दि.०१/१०/२०१८ ते ०४/१०/२०१८ अखेर चार दिवसांचे ॐ कार साधना संमेलन आयोजन करणेसाठी परवानगी द्यावी किंवा कसे? याबाबत निश्चिती करणे.

२. ॐ कार साधना संमेलनाचे आयोजन करावयाचे झाल्यास साईआश्रम समाधी शताब्दी मंडप मोफत वापरास परवानगी देणेबाबत.

३. ॐ श्री साई स्वाध्याय समिती, कराड यांचे विनंतीप्रमाणे ॐ कार साधना संमेलन आयोजन करावयाचे झाल्यास १००० व्यक्तींची निवासासाठी साई आश्रममध्ये ३०० रुम्स ०६ दिवस (दि.३०/०९/२०१८ ते ०५/१०/२०१८) व अल्पोपहार सशुल्क देणेबाबत.

४. ॐ कार साधना संमेलनाचे आयोजन करणेसाठी परवानगी दिल्यास साईआश्रम समाधी शताब्दी मंडपामध्ये दि.०१/१०/२०१८ ते ०४/१०/२०१८ रोजी साऊंड सिस्टीम व माईक सिस्टीमची सुविधा संस्थानमार्फत उपलब्ध करुन देणेबाबत.

ॐ श्री साई स्वाध्याय समिती, कराड यांचे ॐ कार साधना संमेलन ०४ दिवसांचे निवासी शिबीर आयोजन करणेसाठी परवानगी द्यावी किंवा कसे? याबाबत उपरोक्त मुद्यांवर निर्णय होणेसाठी प्रस्ताव निर्णयार्थ सादर

**यावर सविस्तर चर्चा होऊन, ॐ श्री साई स्वाध्याय समिती, कराड यांना दि. ०१/१०/२०१८ ते ०४/१०/२०१८ अखेर चार दिवसांचे ॐ कार साधना संमेलन आयोजन करणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

०४ **शिर्डी सिटी सर्व्हे नं.११९ मधील संस्थान मालकीचे सेवाधाम इमारतीची दुरुस्ती व नुतनीकरण करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारका समवेत चर्चा वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| १) | कामाचे नांव | शिर्डी सिटी सर्व्हे नं.११९ मधील संस्थान मालकीचे सेवाधाम इमारतीची दुरुस्ती व नुतनीकरण करणे. |
| २) | प्रशासकिय मान्यता | मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१०१६ |
| ३) | अंदाजपत्रकीय रक्कम | रु. ३२,२३,५९४/- |
| ४) | प्रस्तावित कामाबाबत माहिती | शिर्डी सिटी सर्व्हे नं.११९ मधील संस्थान मालकीचे सेवाधाम इमारतीची दुरुस्ती व नुतनीकरण करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु. ४०,२९,४९२/- मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१८ रोजीचेसभेत निर्णय क्र.१०१६ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.<br>शिर्डी सिटी सर्व्हे नं.११९ मधील संस्थान मालकीचे सेवाधाम इमारतीची दुरुस्ती व नुतनीकरण करणेकामी प्रथम मागणीनुसार दि.२१/०२/२०१८ पर्यंत ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर मुदतीत एकूण ०२ ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केलेल्या आहेत. याकामी कमीत कमी ०३ निविदा प्राप्त होणे आवश्यक असल्याने सदर निविदा प्रक्रीया रद्द करणेत आल्या.<br>अहमदनगर जिल्हा दरसुची सन २०१६-१७ मधील दरानुसार रु.४०,२९,४९२/- मात्र खर्च अपेक्षित आहे. शासन निर्णय सां.बां. विभाग शुध्दीपत्रक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा२ मंत्रालय, मुंबई दि.२९/०६/२०१७ रोजीचे आदेशान्वये रु.१.५० कोटी पर्यंतच्या रकमेच्या निविदा बी-१ नमुन्यात मागविण्यात याव्यात असे निर्देश आहेत. त्यानुसार रु.४०,२९,४९२/- इतक्या रकमेची बी-१ निविदा कॉल करावी लागेल. मात्र संस्थानचे जा.नं.३६२१ दि.०६/०१/२०१७ रोजीचे परीपत्रकात येणा-या अंदाजपत्रकीय रक्कम २० ते ३० टक्के कमी करणेत यावी असे नमुद केले आहे. त्यानुसार २० टक्के कपात करुन रु. ३२,२३,५९४/- मात्र इतकी येते. त्यामुळे बी-१ निविदा न मागविता बी-२ पध्दतीने (अॅटम रेट) निविदा मागविणेकामी दि.१४/०३/२०१८ ते दि.२६/०३/२०१८ अखेर ई-निविदा संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आल्या होत्या. |
| ५) | निविदा तपशिल | दि.१३/०३/२०१८ रोजी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर ई-निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. दि.२६/०३/२०१८ पर्यंतचे अंतिम मुदतीत १) ग्राफीक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., औरंगाबाद २) कालिका इंजिनियर्स अॅण्ड कॉन्ट्रक्टर्स, औरंगाबाद ३) शलाका इन्फ्रा-टेक (इंडिया) प्रा.लि., पुणे या ०३ ठेकेदारांनी ई-निविदा जमा केलेली आहे. |
| अ) | निविदा कालावधी | ०६ महिने |
| ब) | तांत्रिक लिफाफा उघडणेची दिनांक व वेळ | दि.२८/०३/२०१८, सकाळी ११.०० वाजता |
| क) | निविदा प्रक्रीयेत भाग घेणा-या ठेकेदारांची संख्या | ०३ (तीन) |

| | | |
|---|---|---|
| ड) | सर्व निविदा धारकांनी संकेत स्थळावर कागदपत्र जमा केले आहेत काय ? | होय. |
| इ) | सर्व निविदाधारकांनी सुरक्षा अनामत रक्कम (ईएमडी) जमा केली आहेत काय ? | होय. रु.३२,३००/- अनुक्रमे खालीलप्रमाणे -<br>1) UTR NO. UBINH-18081541088. Dtd- 22/03/2018<br>2) UTR NO. BARBT-18081136993. Dtd- 22/03/2018<br>3) UTR NO. MAHBH-18081339160. Dtd- 22/03/2018 |
| ई) | निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम | रु. ३२,२३,५९४/- |

तांत्रिक दृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यीक देकाराचा तपशिल –

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव | निविदा रक्कम | निविदा टक्केवारी कमी/अधिक |
|---|---|---|---|
| १) | **ग्राफीक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., औरंगाबाद** | **३९,७२,६४२.२५** | **+ २३.२३६%** |
| ३) | शलाका इन्फ्रा-टेक (इंडिया) प्रा.लि., पुणे | ४३,०५,४८२.८९ | + ३३.५६१% |
| २) | कालिका इंजिनियर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स, औरंगाबाद | ४७,८६,८२१.५१ | + ४८.४९३% |

७) निम्नतम निविदा धारकाचा तपशिल –

| | | |
|---|---|---|
| अ) | ठेकेदाराचे नाव | **ग्राफीक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., औरंगाबाद** |
| ब) | निविदा रक्कम | **रु. ३९,७२,६४२.२५** |
| क) | निविदा टक्केवारी कमी/अधिक | **+ २३.२३६% (अधिक)** |

| | | |
|---|---|---|
| ८) | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था , शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदीनुसार निविदा स्विकारणेचे अधिकार | मा.व्यवस्थापन समिती,<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी |

९. शिर्डी सिटी सर्व्हे नं.११९ मधील संस्थान मालकीचे सेवाधाम इमारतीची दुरुस्ती व नुतनीकरण करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु. ४०,२९,४९२/- मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्र.१०१६ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. मात्र संस्थानचे जा.नं.३६२१ दि.०६/०१/२०१७ रोजीचे परीपत्रकात येणा-या अंदाजपत्रकीय रक्कम २० ते ३० टक्के कमी करणेत यावी असे नमुद केले आहे. त्यानुसार २० टक्के कपात करुन रु. ३२,२३,५९४/- मात्र इतकी येते.

१०. उपरोक्त नमूद तपशिलानुसार मुदतीत प्राप्त निविदाधारकांचे उघडण्यात आलेल्या वाणिज्यीक लिफाफाचे तुलनात्मक तक्त्यानुसार ठेकेदार ग्राफीक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., औरंगाबाद यांचे निम्नतम दर रक्कम रु. ३९,७२,६४२.२५ (२३.२३६% अधिक ) आहे. सदरहू ठेकेदार यांना मा.उपसमिती सभेपुढे वाटाघाटीसाठी बोलावून दर कमी करणेबाबत चर्चा करणे व सुसहमती न दिल्यास याकामी फेर ई-निविदा मागविणेबाबत निर्णय घेता येईल, असे मत आहे.

तरी निम्नतम दराचे ठेकेदार ग्राफीक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., औरंगाबाद यांना मा.उपसमितीचे सभेपुढे चर्चा तथा वाटाघाटी करुन त्यावर निर्णय होणेकामी मा.व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेसाठी सविनय सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक ग्राफीक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., औरंगाबाद हे आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**सदरच्या कामाचे अंदाजपत्रक दरसूची २०१६-१७ वर आधारीत असून त्याची किंमत रु.४०,२९,४९२/- इतकी आहे. जिल्हा दर सुचीमध्ये दरवर्षी साधारणत अंदाजे १० ते १२ टक्के वाढ होते. त्यानुसार दरसुची २०१७-१८ मध्ये अंदाजे १० टक्के वाढ झालेली आहे. ठेकेदार यांनी भरलेले निम्नतम दर रु.३९,७२,६४२.२५ इतकी असून अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा कमी आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी सिटी सर्व्हे नं.११९ मधील संस्थान मालकीचे सेवाधाम इमारतीची दुरुस्ती व नुतनीकरण करणेकामी निम्नतम दरधारक ग्राफीक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,औरंगाबाद यांचे रक्कम रु. ३९,७२,६४२.२५ (२३.२३६% अधिक) निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

## ०५ शिर्डी शहरातील अहमदनगर–मनमाड महामार्गावर गेट नं. ०१ जवळ स्कायवॉक (पादचारी पुल) "डिझाईन व बिल्ड" तत्वावर उभारणेकामी प्राप्त झालेले दरावर निर्णय होणेबाबत.

| | | |
|---|---|---|
| १) | कामाचे नाव | शिर्डी शहरातील अहमदनगर-मनमाड महामार्गावर गेट न.०१ जवळ स्कायवॉक (पादचारी पूल) "डिझाईन व बिल्ड" तत्वावर उभारणे |
| २) | प्रशासकीय मान्यता | मा. व्यवस्थापन समिति निर्णय : १. निर्णय क्र.८९३ दि.३०/११/२०१६<br>२. निर्णय क्र.१४७ दि.२५/०२/२०१७ |
| ३ | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | १,०३,१९,९०२/- |
| ३) | प्रस्तावीत कामाबाबत माहिती | शिर्डी शहरात नगर-मनमाड रस्त्यावर गेट नं.१ जवळ रु.१,०३,१९,९०२/- खर्चाचा स्कायवॉक Design and build या तत्वावर उभारणीसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस उपरोक्त निर्णयांन्वये मान्यता देण्यात आली आहे.<br>कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प (सा.बां.) विभाग, अहमदनगर यांचेकडील जा.क्र.नाहदा/रेशा/६८२/सन२०१७ दि.०५/०५/२०१७ रोजीचे पत्रान्वये काही अटी व शर्तीस अधिन राहून परवानगी दिलेली आहे.<br>शासनाचे विधी व न्याय विभागाने निर्णय क्र.सा.सं.वि.-२०१७/९२४/ प्र.क्र. १००/का.१६ दि.३१/०८/२०१७ रोजीचे पत्रान्वये काही अटी व शर्तीस अधिन राहून परवानगी दिलेली आहे.<br>शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि.१७/१०/२०१७ रोजीचे पत्रान्वये सदरहु प्रकल्पास मान्यता दिलेली आहे. नगरपंचायतीचे पत्रातील अट क्र.१ व २ मध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.<br>" १) कोपरगांव-अहमदनगर रस्ता प्र.रा.मा. क्र.८ (नविन रा.म. मा.१६०) (सा. क्र.९०/ २००) हा मा. कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प (सा.बा.) विभाग यांचे अखत्यारीत असल्याने राष्ट्रीय महामार्गाचे नियमानुसार त्यांचे कार्यालयाकडून स्कायवॉक (पादचारी पूल) पुलाचे आराखड्यास मंजूरी घेऊन बांधकाम करण्यात यावे. त्यात काही फेरबदल करावयाचे झाल्यास त्यास पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.<br>२) बांधकाम करताना कोणाचेही हक्कावर,जागेवर अतिक्रमण करता येणार नाही."<br>शिर्डी शहरातून जाणा-या अवजड वाहतुकीसाठी मौजे निघोज ते पिंपरी निर्मळ या भागात सुमारे २३ कि.मी. लांबीचा बाह्यवळण रस्ता वापरासाठी खुला करण्यात आलेला आहे. तसेच शिर्डी शहरातील अंतर्गत वाहतुकीसाठी पश्चिमेकडील रिंगरोड क्र.०५(लक्ष्मीनगर वसाहतीचे पश्चिमेकडील नाला रस्ता- कनकुरी रस्ता– नांदूर्खीरस्ता –अहमदनगर मनमाड महामार्ग ते रस्ता क्र.०६) चे उर्वरीत ९०० मी. लांबीतील रस्त्याचे काम संस्थानमार्फत ठेकेदार यांचेमार्फत प्रगतीत असलेले डांबरीकरण मे २०१८ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे. त्यामुळे सदरहु रस्त्यावरील वाहतुकीची वर्दळ कमी होण्याची शक्यता आहे.<br>सदरहु स्कायवॉक नगर-मनमाड रस्त्यावर गेट नं.१ जवळ पिंपळवाडी रस्त्यालगत उत्तरेकडील बाजूस प्रस्तावीत आहे. जागतिक बँक प्रकल्प, अहमदनगर यांचे पत्रातील अट क्र.०१ नुसार रस्त्याचे मध्यापासून दोन्ही बाजूने १५ मीटरचे आत बांधकाम करता येणार नाही असे नमूद केले आहे. सदर कामासाठी पुर्वेकडील बाजूस संस्थानची जागा (जूने साईप्रसाद इमारतींची जागा) आहे. या ठिकाणी दर्शनरांग इमारत प्रस्तावीत आहे. सदरचा स्कायवॉक उभारणेचे प्रस्तावित जागेच्या पश्चिम बाजूने खाजगी मालमत्ता असल्याने रस्त्याचे पश्चिम बाजूने जागा उपलब्ध करणे आवश्यक आहे.<br>या कामासाठी प्रथम निविदा मागणीचे वेळी दि.०८/१२/२०१८ अखेर फक्त एक व द्वितीय निविदा मागणीचे वेळी दि.२९/०१/२०१८ अखेर एकही ई-निविदा प्राप्त झाली नाही. |
| ८) | निविदा तपशिल | दि.०२/०४२०१/८ ते दि.१२/०४/२०१८ अखेर तिस-यांदा फेरनिविदा मागविण्यात आल्या असून सदरचे मुदतीत खालील ०८ ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केल्या. |

| Sr.No. | Name of Tenders |
|---|---|
| 01. | Bright Infra System Pvt.Ltd, Virar |
| 02. | Construction Catalysers Private Limited, Pune |
| 03. | D M Construcion, Sangamner |

<table>
<tr><td></td><td></td><td><table>
<tr><td>04.</td><td>Dinesh Jadhav, Sangamner</td></tr>
<tr><td>05.</td><td>M.R.Mutha, Ahmednagar</td></tr>
<tr><td>06.</td><td>Oracle Construcion & Infrastructure Co., Pune</td></tr>
<tr><td>07.</td><td>R L Bhutada,Kopargaon</td></tr>
<tr><td>08.</td><td>RE Infra Pvt. Ltd., Mumbai</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>अ)</td><td>निविदा कालावधी</td><td>६ महिने</td></tr>
<tr><td>ब)</td><td>तांत्रिक लिफाफा उघडणेची दिनांक व वेळ</td><td>दिनांक १९/०४/२०१८ सकाळी ११ वा.</td></tr>
<tr><td>क)</td><td>निविदा प्रकियेत भाग घेणा-या ठेकेदारांची संख्या</td><td>०८ (आठ)</td></tr>
<tr><td>ड)</td><td>सर्व निविदाधारकांनी संकेतस्थळावर कागदपत्र जमा केले आहेत काय ?</td><td><table>
<tr><td>अ.क्र.</td><td>ठेकेदाराचे नाव</td><td>कागदपत्रातील अपुर्तता</td></tr>
<tr><td>01.</td><td>Bright Infra System Pvt.Ltd, Virar</td><td>Work done, PWD Registration, Turnover certificates & undertaking of not blacklisted is not attached & EMD not received.</td></tr>
<tr><td>02.</td><td>Construction Catalysers Private Limited, Pune</td><td>--</td></tr>
<tr><td>03.</td><td>D M Construcion, Sangamner</td><td>Work done certificates & undertaking of not blacklisted is not attached.</td></tr>
<tr><td>04.</td><td>Dinesh Jadhav, Sangamner</td><td>--</td></tr>
<tr><td>05.</td><td>M.R.Mutha,Ahmednagar</td><td>Arbitration/litigation record & undertaking of not blacklisted is not attached.</td></tr>
<tr><td>06.</td><td>Oracle Construcion & Infrastructure Co., Pune</td><td>--</td></tr>
<tr><td>07.</td><td>R L Bhutada, Kopargaon</td><td>--</td></tr>
<tr><td>08.</td><td>RE Infra Pvt. Ltd., Mumbai</td><td>--</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>इ)</td><td>सर्व निविदाधारकांनी सुरक्षा अनामत (ईएमडी) जमा केली आहे काय ?</td><td><table>
<tr><td>अ.क्र.</td><td>ठेकेदाराचे नाव</td><td>सुरक्षा अनामत (ईएमडी) तपशिल</td></tr>
<tr><td>01.</td><td>Bright Infra System Pvt.Ltd, Virar</td><td>EMD not received in Sansthan Account</td></tr>
<tr><td>02.</td><td>Construction Catalysers Private Limited, Pune</td><td>EMD not received in Sansthan Account</td></tr>
<tr><td>03.</td><td>D M Construcion, Sangamner</td><td>Deposited.</td></tr>
<tr><td>04.</td><td>Dinesh Jadhav, Sangamner</td><td>Deposited.</td></tr>
<tr><td>05.</td><td>M.R.Mutha, Ahmednagar</td><td>Deposited.</td></tr>
<tr><td>06.</td><td>Oracle Construcion &</td><td>EMD not received in</td></tr>
</table></td></tr>
</table>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | Infrastructure Co., Pune | Sansthan Account |
| | | 07. | R L Bhutada,Kopargaon | Deposited. |
| | | 08. | RE Infra Pvt. Ltd., Mumbai | Deposited. |

| | | |
|---|---|---|
| ई) | निविदेची अंदजपत्रकीय रक्कम रु. | १,०३,१९,९०२/- |
| ६) | तांत्रिकदृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यिक देकारांचा तपशिल | |

| Sr.No. | Name of Tenders | Quoted Amount | Remark |
|---|---|---|---|
| 01. | R L Bhutada, Kopargaon | Rs.1,21,71,600/- | L-1 |
| 02. | RE Infra Pvt. Ltd., Mumbai | Rs.1,63,93,671/- | |
| 03. | Dinesh Jadhav, Sangamner | Rs.1,34,19,00/- | |

| | | |
|---|---|---|
| ७) | निम्नतम निविदाधारकाचा तपशिल | |
| अ) | ठेकेदाराचे नाव | आर.एल.भुतडा, कोपरगाव |
| ब) | निविदा रक्कम रु. | १,२१,७१,६००/- |
| क) | निविदा टक्केवारी कमी/अधिक | १७.९४३% अधिक |
| ८) | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदीनुसार निविदा स्विकारणेचे अधिकार | मा.व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी |

९) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासननिर्णय क्र.सीएटी२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.१२/०४/२०१७चे अनुषंगाने शासकीय परिपत्रक क्र.Sankirna-2017/C.R121(Part-II)/Building-2 दि.१९/०९/२०१७ मधील पृष्ठ क्र.३ कलम ३.१.१ मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे.

"If only single technically qualified bid is received again on second call. The tender sahall be processed as per usual procedure. There is no need to recall the tender in such cases."

| अ.नं. | वस्तूचे नाव | मागील खरेदी दर | सध्याचे दर | फरक | % ने कमी/जास्त |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | संगणक | ४२,८३४/- | ३८,५८६/- | ४,२४८/- | ९.९१ % ने कमी |
| ०२ | लॅपटॉप | ३९,५३०/- | ४७,२००/- | ७,६७०/- | १९.४० % ने जास्त |
| ०३ | टॅबलेट | -- | १८,०००/- | -- | -- |
| ०४ | प्रोजेक्टर | ४०,८३२/- | ३८,०००/- | २,८३२/- | ६.९३ % ने कमी |
| ०५ | पासबुक प्रिंटर | -- | १९,८८३/- | -- | -- |
| ०६ | युएसबी हार्ड डिस्क | ६,१५०/- | ३,७७६/- | २,३७४/- | ३८.६० % ने कमी |
| ०७ | युपीएस(600 VA) | १,५०५/- | २,४७८/- | ९७३/- | ६४.६५ % ने जास्त |
| ०८ | लेझर प्रिंटर्स (LBP2900) | ९,५००/- | ८,३००/- | १,२००/- | १२.६३ % ने कमी |

२४. संक्षिप्त टिप :-

1. राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत मागणी केलेले संगणके व इतर संगणकीय साहित्यांची तांत्रिक क्षमता व यापुर्वी खरेदी केलेले संगणके व संगणकीय साहित्यांची तांत्रिक क्षमता यामध्ये बदल आहेत.
2. मागणी केलेल्या साहित्यांचे अंदाजीत दर व निम्नत्तम दर यात पुढीलप्रमाणे तफावत आहे.

| अ.नं. | वर्णन | आयटीआयने नमुद केलेले अंदाजे दर | सिनीयर कॉलेजने नमुद केलेले अंदाजे दर | निम्नत्तम दर | आयटीआय ने नमुद केलेले अंदाजे दर व निम्नत्तम दर यातील तफावत | सिनीयर कॉलेज ने नमुद केलेले अंदाजे दर व निम्नत्तम दर यातील तफावत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | संगणक | ३६,०००/- | ३८,०००/- | ३८,५८६/- | ७.१८ | १.५४ |
| ०२ | लॅपटॉप | ४४,०००/- | | ४७,२००/- | ७.२७ | |
| ०३ | टॅबलेट | १५,०००/- | | १८,०००/- | २०.०० | |
| ०४ | प्रोजेक्टर | २७,०००/- | ५०,०००/- | ३८,०००/- | ४०.७४ | -२४.०० |
| ०५ | पासबुक प्रिंटर | १०,०००/- | | १९,८८३/- | ९८.८३ | |
| ०६ | युएसबी हार्ड डिस्क | ३,०००/- | | ३,७७६/- | २५.८७ | |
| ०७ | युपीएस(600 VA) | ५००/- | ३,०००/- | २,४७८/- | ३९५.६० | -१७.४० |
| ०८ | लेझर प्रिंटर्स (LBP2900) | १०,०००/- | | ८,३००/- | -१७.०० | |

3. श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठीव प्रस्तावित वरिष्ठ महाविद्यालयासाठी संगणके व संगणकीय साहित्य खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत ०५ निविदाकारांनी भाग घेतलेला असून त्यांच्या तांत्रिक व व्यावसायीक निविदा उघडणेत आलेल्या आहेत. त्यामध्ये मे.आर.डी.डाटा सिस्टीम्स,नाशिक यांनी देऊ केलेले संगणके, लॅपटॉप, पासबुक प्रिंटर, युएसबी हार्ड डिस्क, युपीएस(600 VA) इ. साठीचे दर,मे.सायबरनेट प्रा.लि.पुणे यांनी देऊ केलेले प्रोजेक्टर साठीचे दर व मे.हायटेक कॉम्प्युटर प्रा.लि. यांनी देऊ केलेले टॅबलेट साठीचे दर तसेच मे.मॅक्कन इन्फो सोल्युशन्स यांनी देऊ केलेले लेझर प्रिंटर्स (LBP2900) साठीचे दर हे निम्नत्तम आहेत.तसेच अ.नं. ०४ चे दर अंदाजे ३५,०००/- ते ४०,०००/- दरम्यान आहेत तसेच अ.न. ०७ चे द २३००/- ते २८००/- दरम्यान आहेत.

सबब, नमुद केलेप्रमाणे निम्नत्तम निविदाकारांबरोबर दरांबाबत चर्चा व वाटाघाटी होऊन निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.उपसमितीचे सभेत शिफारशीसाठी सविनय सादर.

**AIO Commercial Series Brand HP/Lenovo/Dell-110 नग यासाठीचे निम्नतम दरधारक** मे.आर.डी.डाटा सिस्टीम्स,नाशिक **यांनी देऊ केलेले स्पेशिफिकेशन हे निविदेमध्ये नमुद केलेल्या स्पेशिफिकेशन नुसार नाही.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी व प्रस्तावित वरिष्ठ महाविद्यालयासाठी ११० नग संगणक, युपीएस, प्रिंटर्स आदी साहित्य खरेदीकामी निम्नतम निविदाधारक यांचे ई-निविदेतील निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, तथापी** मे.आर.डी.डाटा सिस्टीम्स,नाशिक **हे AIO Commercial Series Brand HP/Lenovo/Dell-110 नग निविदेमध्ये नमुद केलेल्या स्पेशिफिकेशननुसार देण्यास तयार असतील तरच त्यांना सदरकामी पुरवठा आदेश देण्यात यावा अन्यथा सदर प्रकरणी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)**

---

३४ **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष सन २०१७ -२०१८ चे कालावधीत माहे मे- २०१८ हैद्राबाद येथे आयोजीत करण्यात आलेल्या श्रींचे पादुका दर्शन सोहळयाची दिनांक बदल करणेबाबत.**

श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. यासाठी संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून, त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रासह संपूर्ण देशभरातील विविध राज्यांमध्ये श्री साईबाबा पादुका दर्शन सोहळा याकार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८७ अन्वये श्रींचा पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेकामी प्राप्त झालेले प्रस्ताव हे पादुका दर्शन सोहळयाच्या अर्ज छाननी करणेकामी गठीत करण्यात आलेल्या समिती समोर सादर करावेत व या समितीने पादुका दर्शन सोहळयाची रूपरेषा ठरवून त्याचा प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करावा असे ठरलेले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरून दि.१७/०३/२०१८ रोजी मा. पादुका अर्ज छाननी समितीचे बैठक पार पडलेली आहे. या बैठकीत सादर करण्यात आलेले प्रस्तावांची छाननी करण्यात आलेली असून, मा. पादुका अर्ज छाननी समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन समितीचे सभेपूढे मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेत यावर सविस्तर चर्चा होऊन दि.१४/०५/२०१८ रोजी हैदाबाद येथे श्रींचे पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेस मान्यता देण्यात आलेली असून,जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम-शताब्दी/४२३/२०१८ दि.२५/०४/२०१८ रोजीचे पत्राद्वारे संबंधीत आयोजकांना कळविण्यात आलेले आहे.

तसेच सदरहू बैठकीमध्ये छाननी समितीने निश्चित केलेल्या पादुका दर्शन सोहळयाचे ठिकाणांची पूर्व पहाणी दौ-यामध्ये अथवा प्रत्यक्ष किंवा अपरिहार्य कारणांमुळे दौ-याची तारीख बदलण्याची गरज भासल्यास दौर रद्द करण्याचे किंवा तारखांबद्दल करण्याचे अधिकारी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांना देण्यात आलेले आहे.

तथापी श्री साईबाबा चेगेंटी, व श्रीनिवास डी.जे. टेलिव्हजन, हैद्राबाद यांनी मा. अध्यक्ष महोदय तसेच सर्व समिती सदस्य व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ई-मेलद्वारे अग्रेषीत केलेल्या पत्रामध्ये नमूद केलेले आहे की, सोमवर, दि. १४/०५/२०१८ रोजी या दिवशी ०१ लाख साईभक्त साईबाबा पादुका दर्शन व धूपआरतीस येऊ शकणार नाही. तरी कृपया आपणास विनंती करीत आहोत की, आम्हाला कार्यक्रमांचे आयोजनासाठी दुसरी दिनांक मिळावी.

आम्ही आपणास विनंती करतो की, गुरूपौर्णिमा नंतर माहे ऑगस्ट-२०१८ चे पहिल्या आठवडयात हैदाबाद येथे ०१ लाख साईभक्तांचे उपस्थित धूपआरती व श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करता येईल, असे कळविलेले आहे.

विभागाचा अभिप्रायः- माहे ऑगस्ट-२०१८ मध्ये दि.१६/०८/२०१८ ते दि.२३/०८/२०१८ रोजी पर्यंत श्रींचे पादुका प.पू गंगागीर महाराज सप्ताहा कालावधीत शिर्डी येथे भाविकांचे दर्शनासाठी उपलब्ध करण्यात येणार आहे. तथापी श्री साईबाबा चेगेंटी, व श्रीनिवास डी.जे. टेलिव्हजन ॲण्ड मार्केटींग प्रा.लि. हैद्राबाद यांचे विनंती पत्रानुसार पहिल्या आठवडयात रविवार, दि.०५/०८/२०१८ रोजी श्रींचे पादुका हैद्राबाद येथील साईभक्तांचे दर्शनासाठी उपलब्ध करता येईल, असे नम्र मत आहे.

प्रस्तावः- तरी श्री साईबाबा चेगेंटी, व श्रीनिवास डी.जे. टेलिव्हजन, हैद्राबाद यांचे प्राप्त पत्राचे अनुषंगाने दि.०५/०८/२०१८ रोजी हैद्राबाद येथे श्रींचे पादुका साईभक्तांचे दर्शनासाठी उपलब्ध करून देणेकामी सदरहु प्रस्ताव मा. स्थानिक उपसमितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा चेगेंटी, व श्रीनिवास डी.जे. टेलिव्हजन, हैद्राबाद यांना दि.०५/०८/२०१८ रोजी हैद्राबाद येथे श्रींचे पादुका साईभक्तांचे दर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- शताब्दी कक्षप्रमुख)

---

**३५ संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल,कुशल कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रक्टर्सची नेमणूक करणेबाबत.**

संस्थानचे विविध विभागांना लागणारे अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेबाबत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १ | खरेदी करावयाचे साहित्य / वस्तुचा तपशिल. | **अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्स नेमणूकीबाबत** |
| २ | मागणी | अकुशल- ११६२ व कुशल- ६१८, एकूण- १७८० |
| ३ | ई-निविदा प्रसिध्दी | दि.२६.०४.२०१८ ते दि.११.०५.२०१८ |
| ४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते ? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट |
| ५ | तर तसे, कोणाला पाठविले ? | -- |
| ६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दि.२६.०४.२०१८ रोजी सकाळी- ११.०० वा. |
| ७ | प्राप्त निविदाकारांची संख्या. | **०५ ( पाच )** |
| ८ | पात्र निविदाकारांची संख्या. | **०५ (पाच)** |
| ९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | निविदेत नमुने मागविलेले नाहीत. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का. | होय. |
| ११ | जर नमूने दिले नाही, तर का. | निविदेत नमुने मागविलेले नाहीत. |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर- | |

| अ.क्र | निविदाकाराचे नाव | सादर केलेले दर प्रती नग रु | स्थिती |
|---|---|---|---|
| १. | मे.बी.व्ही.जी.इंडिया.लि.पुणे | ०.००००००००१ | L - 1 |
| २. | मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हिस,मुंबई | २.९९००००००० | L - 5 |
| ३. | मे.स्पीक एन स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई | ०.७८९००००० | L - 4 |
| ४. | मे.एम.पी.एंटरप्रायझेस ॲण्ड असोसिएट्स लि.पुणे | ०.००००१००० | L - 2 |
| ५. | मे.टॉप सिक्युरिटी लि.मुंबई | ०.०१००००००० | L - 3 |

१३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर -

| अ.क्र. | वर्ष | परिमाण | दर प्रती सेट रु. |
|---|---|---|---|
| १ | सन २०१७ – १८ करीता | -- | सर्व्हिस चार्जेस दर ०.०००००१ % |

१४ मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल -

| अ.क्र | तपशील | वर्ष | खर्च परिमाण |
|---|---|---|---|
| १ | अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी | २०१७-१८ | -- |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | -- |
| १६ | मागील खरेदी दर | सर्व्हिस चार्जेस दर ०.०००००१ % |
| १७ | मागील पुरवठादार | १)मे.एम.पी.एंटरप्रायझेस, पुणे २)मे.बी.व्ही.जी.इंडिया,लि.पुणे |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | ०.००००००००१ |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | **१)मे.बी.व्ही.जी.इंडिया, लि.पुणे** |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी (१ व २ ), मा.उपकार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अंदाजे रु. प्रति सेट मार्केट रेट रु. | |

| | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी / जास्त |
|---|---|---|---|---|
| २३ | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी / जास्त |
| | रु.०.०००००१% | रु.०.००००००००१ | रु.०.००० | -- |

संक्षिप्त टीप- मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०७.०३.२०१८ निर्णय क्र.२०५ अन्वये सन २०१८-१९ कालावधीसाठी संस्थानला कंत्राटी अकुशल, कुशल कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेकामी व निविदा मागविणेस व तसेच जाहिरात प्रसिध्द करणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार www.mahatenders.gov.in, व संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करणेत आलेली होती.

सदर ई-निविदेमध्ये ०५ निविदा धारकांनी भाग घेतला होता. प्राप्त निविदा (तांत्रिक निविदा/बीड) दि.१७.०५.२०१८ रोजी खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात आले असून याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या ०५ निविदाधारकांच्या कमर्शिअल (वाणिज्यीक) निविदा दि.१९.०५.२०१८ रोजी खरेदी समिती सभेसमोर उघडणेत आलेल्या आहेत. उघडण्यात आलेले कमर्शिअल (वाणिज्यीक) बिड निविदेमध्ये मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे यांचे सर्व्हिस चार्जेस दर ०.०००००००१ इतके न्युनतम असुन, सदर दरांबाबत चर्चा वाटाघाटी होऊन निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.उपसमिती सभेत शिफारससाठी सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल,कुशल कर्मचारी पुरविणेकामी निम्नतम निविदाधारक मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे यांचे सर्व्हिस चार्जेस दर ०.०००००००१ इतके न्युनतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- कामगार अधिकारी,कामगार विभाग)**

---

**३६ संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा व माजी सैनिक कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रक्टर्सची नेमणूक करणेबाबत**

संस्थानचे विविध विभागांना लागणारे सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेबाबत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १ | खरेदी करावयाचे साहित्य / वस्तुचा तपशिल. | सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्स नेमणूकीबाबत |
| २ | मागणी | सुरक्षा अकुशल- ८१९ व सुरक्षा कुशल- ७२ एकूण-८९१ |
| ३ | ई-निविदा प्रसिध्दी | दि.२६.०४.२०१८ ते दि.११.०५.२०१८ |
| ४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते ? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट |
| ५ | तर तसे, कोणाला पाठविले ? | -- |
| ६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दि.२६.०४.२०१८ रोजी सकाळी- ११.०० वा. |
| ७ | प्राप्त निविदाकारांची संख्या. | **०६ ( सहा )** |
| ८ | पात्र निविदाकारांची संख्या. | **०५ (पाच)** |
| ९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | निविदेत नमुने मागविलेले नाहीत. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का. | होय. |
| ११ | जर नमूने दिले नाही, तर का. | निविदेत नमुने मागविलेले नाहीत. |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर- | |

| अ.क्र | निविदाकाराचे नाव | सादर केलेले दर प्रती नग रु | स्थिती |
|---|---|---|---|
| १ | सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीस, मुंबई | ०.०००००००१० | L - 1 |
| २ | ईगल एसपीएस, इंडिया मुंबई | ४.७१०००००० | L - 5 |
| ३ | मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हीसेस ॲण्ड सिस्टीम प्रा.लि.पुणे | ३.००००००००० | L - 4 |
| ४ | ईगल हंटर सोलुशन लि.दिल्ली | ०.०००१०००० | L - 2 |
| ५ | मे.टॉप सिक्युरिटी लि.मुंबई | ०.०१०००००० | L - 3 |

**१३** यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर -

| अ.क्र. | वर्ष | परिमाण | दर प्रती सेट रु. |
|---|---|---|---|
| १ | सन २०१७ – १८ करीता | -- | सर्व्हिस चार्जेस दर ०.००००१ % |

**१४** मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशील -

| अ.क्र | तपशील | वर्ष | खर्च परिमाण |
|---|---|---|---|
| १ | -- | -- | -- |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | -- |
| १६ | मागील खरेदी दर | सर्व्हिस चार्जेस दर ०.०००0१ % |
| १७ | मागील पुरवठादार | १) मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस, पुणे. २)मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिक्युरिटी ॲण्ड सर्व्हिसेस, मुंबई. |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | ०.००००००१० |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | मे. सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीस, मुंबई |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का? | होय. |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी (१ व २ ), मा.उपकार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अंदाजे रु. प्रति सेट मार्केट रेट रु. | |
| २३ | मागील खरेदी सध्याचे प्राप्त दर फरक % ने कमी / जास्त | |
| | रु.- ०.०००0१% रु. ०.००००००१० रु.०.००-- | |

संक्षिप्त टीप- मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०७.०३.२०१८ निर्णय क्र.२०५ अन्वये सन २०१८-१९ कालावधीसाठी संस्थानला कंत्राटी सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेकामी व निविदा मागविणेस व तसेच जाहिरात प्रसिध्द करणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार www.mahatenders.gov.in, व संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करणेत आलेली होती.

सदर ई-निविदेमध्ये ०६ निविदा धारकांनी भाग घेतला होता. प्राप्त निविदा (तांत्रिक निविदा/बीड) दि.१७.०५.२०१८ रोजी खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात आले असून त्यापैकी मे.सुपर प्रोटक्शन सर्व्हीसेस, प्रा.लि. मुंबई यांची निविदा कामाचा अनुभव तसेच कर्मचारी संख्याबाबत कागदपत्रे सादर न केल्यामुळे त्यांना अपात्र ठरविणेत आलेले आहे. याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या ०५ निविदाधारकांच्या कमर्शिअल (वाणिज्यीक) निविदा दि.१९.०५.२०१८ रोजी खरेदी समिती सभेसमोर उघडणेत आलेल्या आहेत.

उघडण्यात आलेले कमर्शिअल (वाणिज्यीक) बिड निविदेमध्ये मे. सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्वहीस, मुंबई यांचे सर्व्हिस चार्जेस दर- ०.००००००१० इतके न्युनतम असुन, सदर दरांबाबत चर्चा वाटाघाटी होऊन निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.उपसमिती सभेत शिफारससाठी सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा व माजी सैनिक कर्मचारी पुरविणेकामी निम्नतम दरधारक मे. सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीस, मुंबई यांचे सर्व्हिस चार्जेस दर- ०.००००००१० इतके न्युनतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- कामगार अधिकारी,कामगार विभाग)**

---

**३७. मा.सदस्यांच्या सुचनांबाबत.**

**आजचे स्थानिक उपसमिती सभेमध्ये विविध चर्चेच्या अनुषंगाने मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने खालीलप्रमाणे शिफारस करणेत आली.**

**१. श्री साई दर्शन मंडळ, मुंबई यांना दि.२६/०५/२०१८ रोजी सायंकाळी ७ ते ९ व दि.२७/०५/२०१८ रोजी सकाळी ८ ते रात्रौ ८ वाजेपर्यंत श्रींच्या मुळ पादुका उपलब्ध करुन देण्यात याव्यात, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

**विषय नं.०३ अधिनियम-२००४ मधील तरतुदीनुसार ३० दिवसांपेक्षा जास्त कालावधीनंतर झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभांबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मधील कलम ११(१) समिती, आपले कामकाज चालविण्यासाठी, वेळोवेळी, ती ठरवील अशा कालांतराने, अशा वेळी सभा भरवील, तथापि, दोन सभांमध्ये तीस दिवसांपेक्षा अधिक काळ जाणार नाही. अशी तरतुद आहे.

संस्थानचे लेखापरीक्षण करणेकामी २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता मे.मुकुंद एम.चितळे ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांची शासनामार्फत नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी वैधानिक लेखापरीक्षण पुर्ण केले असून वैधानिक लेखापरीक्षण करीत असतांना सभाकामकाज विभागासंबधी खालील त्रुटी/अपुर्तता दर्शविण्यात आलेल्या आहे.

| अ. नं. | सभेचा दिनांक | सभेचा दिवस | एकुण सदस्य संख्या | हजर सदस्य | सभेचा प्रकार | मागील सभेपासून दिवस | त्रुटी/अपुर्ततेबाबत खुलासा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०६.०५.२०१६ | शुक्रवार | ३ | ३ | सर्व साधारण सभा | ३४ | सदर कालावधीत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी नियुक्त केलेली त्रिसदस्य समिती कार्यरत होती. |
| २ | ३०.११.२०१६ | बुधवार | १२ | ६ | सर्व साधारण सभा | ५२ | दरम्यानचे कालावधीत निर्धारीत वेळेत दि.२५.१०.२०१६ व दि.०५.११.२०१६ रोजी सभा आयोजित करण्यात आलेल्या होत्या. परंतु दोन्हीही सभा काही अपरिहार्य कारणास्तव रद्द करण्यात आलेल्या होत्या व त्यांनतर दि. ३०.११.२०१६ रोजी सभा घेण्यात आली. |
| ३ | २५.०२.२०१७ | शनिवार | १२ | ७ | सर्व साधारण सभा | ६५ | राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र राज्य यांचेकडील क्रमांक-रानिआ/जिपपस-२०१६/प्र.क्र.५१/का-७, दि. ११.०१.२०१७ रोजीचे पत्रान्वये दि.११.०१.२०१७ ते दि.२३.०२.२०१७ या कालावधीत महानगरपालिका व शिर्डी नगरपंचायत निवडणूकांची आचारसंहिता लागु असल्याने दरम्यानचे कालावधीत मा.व्यवस्थापन समितीची सभा झालेली नाही. |

संस्थानचे लेखापरीक्षक मे.मुकुंद एम.चितळे ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांनी अधिनियमात दोन सभांमध्ये तीस दिवसांपेक्षा अधिक काळ जाणार नाही,अशी तरतुद असून उपरोक्त सभांमधील कालावधी ३० दिवसापेक्षा जास्त असल्याने सदर सभेच्या इतिवृत्तास शासनाची मान्यता घ्यावी. असे चर्चे दरम्यान सुचित केले आहे.

त्यानुसार मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांना इकडील जा.नं.एसएसएस/ वशी/ ०४/ ६६५० / २०१८, दि.१२.०३.२०१८ रोजीचे पत्रान्वये उपरोक्त सभांच्या इतिवृत्तास शासन मान्यता मिळणेकामी त्रुटी/अपुर्तता यांचे खुलाशासह कळविण्यात आले होते.

मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांनी क्र.सासंवि-१०१८/५१६/प्र.क.४१/का.१६, दि.१३ एप्रिल,२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था येथील व्यवस्थापन समितीच्या ज्या दोन बैठकांमधील कालावधी हा ३० दिवसांपेक्षा अधिक झाला आहे, अशा बैठकांना आणि त्या त्या बैठकीमधील कार्यवाहीला शासन स्तरावरुन मान्यता देण्याची तरतुद श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मध्ये नाही. सबब प्रस्तुत प्रकरणी संस्थान अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक व उचित अशी कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती. "

अवलोकनार्थ व पुढील निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन करुन शासन पत्र क्र.सासंवि-१०१८/५१६/ प्र.क्र.४१/ का.१६, दि.१३ एप्रिल,२०१८ ची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-प्र.अधिक्षक,सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.०४** **आवश्यक गणपुर्ती नसलेल्या मा.व्यवस्थापन समिती सभांबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मधील कलम ११(२) समितीच्या सभेची गणपूर्ती आठ सदस्यांनी होईल. अशी तरतुद आहे.

संस्थानचे लेखापरीक्षण करणेकामी २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता मे.मुकुंद एम.चितळे ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांची शासनामार्फत नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी वैधानिक लेखापरीक्षण पुर्ण

केले असून वैधानिक लेखापरीक्षण करीत असतांना सभाकामकाज विभागासंबधी खालील त्रुटी/अपुर्तता दर्शविण्यात आलेल्या असुन त्याबाबत खुलासा सोबत सादर केला आहे.

| अ. नं. | सभेचा दिनांक | सभेचा दिवस | एकुण सदस्य संख्या | हजर सदस्य | सभेचा प्रकार | गणपूर्ती | त्रुटी/अपुर्ततेबाबत खुलासा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०७.०८.२०१६ | रविवार | १२ | ७ | विशेष सभा | नाही | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम ११(२) नुसार व्यवस्थापन समितीचे सभेसाठी असलेली गणपुर्तीची अट शिथील होणेबाबत मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांना इकडील जा.नं.एसएसएस/ वशी०४ / ३७४८/२०१६ दि.१७/११/२०१६ रोजीचे पत्रान्वये विनंती करण्यात आलेली होती, त्यास अनुसरुन सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश अन्वये-<br>मुख्य अधिनियमाच्या कलम ११ मध्ये –<br>(क) पोट-कलम (२) मध्ये पुढील परंतुक जादा दाखल करण्यात आलेले आहे.<br>"परंतु जेव्हा गणपूर्ती आवश्यक असेल, मात्र गणपूर्ती होण्याइतके सदस्य उपस्थित नसतील तेव्हा, पिठासीन प्राधिकारी ती सभा तीस मिनिटांकरीता तहकूब करील आणि मुळ सभेची गणपूर्ती झाली असती तर तिच्यापुढे जे कामकाज चालविण्यात आले असते ते कामकाज , अशा तहकुबीनंतर पुन्हा सुरु झालेल्या सभेपुढे चालविण्यात येईल आणि ते, अशा पुन्हा सुरु झालेल्या सभेमध्ये – मग तिची गणपूर्ती झालेली असो किंवा नसो, निकालात काढण्यात येईल. |
| २ | १९.०९.२०१६ | सोमवार | १२ | ७ | सर्वसाधारण | नाही | |
| ३ | ३०.११.२०१६ | बुधवार | १२ | ६ | सर्वसाधारण | नाही | |
| ४ | २५.०२.२०१७ | शनिवार | १२ | ७ | सर्वसाधारण | नाही | |

उपरोक्त सभा अधिनियमातील दुरुस्तीपूर्वीच्या आहेत.

संस्थानचे लेखापरीक्षक मे.मुकुंद एम.चितळे ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांनी अधिनियमात समितीच्या सभेची गणपूर्ती आठ सदस्यांनी होईल, अशी तरतुद असून उपरोक्त सभांसाठी सदस्यांची गणपुर्ती नसल्याने सदर सभांना शासनाची मान्यता घ्यावी. असे चर्चेदरम्यान सुचित केले आहे.

त्यानुसार मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांना इकडील जा.नं.एसएसएस/वशी/०४/ ६६६७/ २०१८, दि.१३.०३.२०१८ रोजीचे पत्रान्वये उपरोक्त सभांच्या इतिवृत्तास शासन मान्यता मिळणेकामी त्रुटी/ अपुर्तता यांचे खुलाशासह कळविण्यात आले होते.

मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांनी क्र.सासंवि-१०१८/५१७/प्र.क.४२/का.१६, दि.१३ एप्रिल,२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था येथील व्यवस्थापन समितीच्या ज्या सभांना आवश्यक गणपूर्ती नव्हती, अशा सभांना आणि त्या त्या सभांमध्ये झालेल्या कामकाजाला शासनाने मान्यता देण्याची तरतुद श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मध्ये नाही. सदर वस्तुस्थिती विचारात घेता प्रस्तुत प्रकरणी संस्थान अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक व उचित अशी कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती. "

अवलोकनार्थ व पुढील निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन करुन शासन पत्र क्र.सासंवि-१०१८/५१७/ प्र.क्र.४२/ का.१६, दि.१३ एप्रिल,२०१८ नोंद घेण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक,सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.०५** **श्री गुरुपौर्णिमा उत्सवातील वीणा, पोथी, फोटो, पाद्यपुजा, रुद्राभिषेक इ. साठी मा.व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नावे निश्चीत करणे.**

**प्रस्ताव-** संस्थानमार्फत श्री रामनवमी उत्सव, श्री गुरुपौर्णिमा उत्सव व श्री पुण्यतिथी उत्सव पुर्व परंपरेनुसार पार पाडले जातात. सदरच्या प्रत्येक उत्सवात पहाटे व्दारकामाईत अखंड पारायणास सुरुवात होते तत्पूर्वी श्रींचा फोटो /पोथी /वीणा मिरवणूकीने गुरुस्थानमार्गे व्दारकामाईत येतात व मा. व्यवस्थापन समितीचे सदस्यांच्या हस्ते अंखड साईसच्चरित पारायणास व्दारकामाईत सुरवात होते. तसेच श्रींचे स्नान झाल्यानंतर समाधि मंदिरात मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य यांचे हस्ते पाद्यपुजा पार पाडली जाते.

श्री पुण्यतिथी उत्सव २०१६ पासून सदरच्या कार्यक्रमात भाग घेतलेल्या मा. व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची माहिती खालीलप्रमाणे..

**श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१६ पाद्यपुजा व इतर कार्यक्रम.**

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| १०/१०/२०१६. सोमवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा प्रथम दिवस** |
| | | **वीणा**- मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य<br>**पोथी**– मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष<br>**प्रतिमा** - मा. ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य / *मा.डॉ. संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी* |
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन** –<br>**अध्याय क्र.१** - मा.श्री.प्रताप सखाहरी भोसले – सदस्य<br>**अध्याय क्र.२** - मा. सौ.अनिताताई विजय जगताप – पदसिध्द सदस्य<br>**अध्याय क्र.३** - मा.सौ.सरस्वती भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य<br>**अध्याय क्र.४**- मा.ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>**अध्याय क्र.५** - मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा** – मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम – उपाध्यक्ष |
| ११/१०/२०१६. मंगळवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा मुख्य दिवस** |
| | | **वीणा** - मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम – उपाध्यक्ष<br>**पोथी** – मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे – सदस्य |
| | | **प्रतिमा**- १) मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य, २) मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा**- १) मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष २) मा.ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य ३) मा.डॉ. संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी |
| | सकाळी ९.०० वाजता | **भिक्षा झोळी कार्यक्रम** – १) मा. श्री सुरेश हावरे, अध्यक्ष २)चंद्रशेखर कदम , उपाध्यक्ष ३) श्री. भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य ३) श्री.सचिन तांबे, सदस्य ४) मा.ॲड.मोहन जयकर, सदस्य<br>५) मा.डॉ. संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी |
| | सकाळी १०.४५ वाजता | **आराधना विधी कार्यक्रम**- मा.अध्यक्ष व उपस्थित सदस्य |
| १२/१०/२०१६. बुधवार | | **तृतीय दिवस** |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा**- मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे – सदस्य व श्री.सचिन तांबे, सदस्य |
| १३.१०.२०१६ गुरुवार | | **उत्सवाचा सांगता दिवस** |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा**- मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| | सकाळी ६.४५ वाजता | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक – मा.श्री.बाजीराव शिंदे , कार्यकारी अधिकारी** |

**श्री रामनवमी उत्सव २०१७ पाद्यपुजा व इतर कार्यक्रम.**

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| ०३/०४/२०१७. सोमवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा प्रथम दिवस** |
| | | **वीणा**- मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम , उपाध्यक्ष<br>**पोथी**– मा.सौ. योगिता अभय शेळके पाटील, सदस्य<br>**प्रतिमा**-०१)मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे , सदस्य ०२) मा.श्री.सचिन |

| | | |
|---|---|---|
| | | भागवत तांबे, सदस्य |
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन – अध्याय क्र.१ -** मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम , उपाध्यक्ष<br>**अध्याय क्र.२ -** मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य<br>**अध्याय क्र.३ -** मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>**अध्याय क्र.४ -** मा.अॅड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>**अध्याय क्र.५ -** मा.सौ. योगिता अभय शेळके पाटील , सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा** – मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.- कार्यकारी अधिकारी |
| ०४/०४/२०१७.<br>मंगळवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा मुख्य दिवस** |
| | | **वीणा -** मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>**पोथी –** मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| | | **प्रतिमा-** १) मा.श्री.प्रताप सखाहरी भोसले २) मा.डॉ.राजेंद्र राजाबली सिंग , सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष |
| ०५.०४.२०१७<br>बुधवार | <br>सकाळी ६.०० वाजता | **उत्सवाचा सांगता दिवस**<br>**श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम , उपाध्यक्ष |
| | सकाळी ६.३० वाजता | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक** – मा.डॉ. संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी |

**श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१७ पाद्यपुजा व इतर कार्यक्रम.**

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| ०८/०७/२०१७.<br>शनिवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा प्रथम दिवस** |
| | | **वीणा-** मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम – उपाध्यक्ष<br>**पोथी**– मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे – सदस्य<br>**प्रतिमा** - मा. अॅड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य व मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य |
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन** –<br>**अध्याय क्र.१ -** मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम – उपाध्यक्ष<br>**अध्याय क्र.२** मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे – सदस्य<br>**अध्याय क्र.३ -** मा.सौ.योगिता शेळके पाटील सदस्या<br>**अध्याय क्र.४ -** मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य<br>**अध्याय क्र.५ -** मा. अॅड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा** – मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.- कार्यकारी अधिकारी |
| ०९/०७/२०१७.<br>रविवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा मुख्य दिवस** |
| | | **वीणा -** मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>**पोथी –** मा. श्री सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष |
| | | **प्रतिमा-** १) मा.श्री.प्रताप सखाहरी भोसले व मा. अॅड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष |
| १०.०७.२०१७<br>सोमवार | <br>सकाळी ६.०० वाजता | **उत्सवाचा सांगता दिवस**<br>**श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष |
| | सकाळी ६.१५ वाजता | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक** – मा.डॉ.संदीप आहेर - उपकार्यकारी अधिकारी |

**श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१७ पाद्यपुजा व इतर कार्यक्रम**

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| २९/०९/२०१७<br>शुक्रवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा प्रथम दिवस** |
| | | **वीणा-** मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>**पोथी-** मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | | **प्रतिमा-** मा.ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य व मा.श्री. धंनजय निकम, उपजिल्हाधिकारी |
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन-**<br>**अध्याय क्र.१** - १.मा. सौ. सरस्वती वाकचौरे व मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे–सदस्य<br>**अध्याय क्र.२** ते ४ - २. मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>**अध्याय क्र.५** - ३.मा. सौ. शेळके पाटील |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा -** मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष |
| ३०/०९/२०१७. शनिवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा मुख्य दिवस** |
| | | **वीणा -** मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>**पोथी -** मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य |
| | | **प्रतिमा-** १) मा. ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य २) मा.श्री.प्रताप सखाहरी भोसले, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष |
| | सकाळी ९.०० वाजता | **भिक्षा झोळी कार्यक्रम -** १) मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष व २)चंद्रशेखर कदम , उपाध्यक्ष ३) श्री. भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य ४) मा.श्री.प्रताप सखाहरी भोसले, सदस्य ५)मा. सौ.योगिताताई शेळके पाटील, सदस्य ६) मा.श्री. धंनजय निकम,उपजिल्हाधिकारी ७) मा.श्री. मनोज घोडेपाटील – उपजिल्हाधिकारी. |
| | सकाळी १०.३० वाजता | **आराधना विधी कार्यक्रम-** मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष व उपस्थित सदस्य |
| ०१/१०/२०१७. रविवार | | **तृतीय दिवस** |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा-** मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से. मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ०२.१०.२०१७ सोमवार | | **उत्सवाचा सांगता दिवस** |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| | सकाळी ६.४५ वाजता | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक -** मा.श्री. मनोज घोडेपाटील, उपजिल्हाधिकारी |

**श्री रामनवमी उत्सव २०१८ पाद्यपुजा व इतर कार्यक्रम**

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी होणा-या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| २४/०३/२०१८ शनिवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा प्रथम दिवस** |
| | | **श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक**<br>**वीणा-** मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>**पोथी–** मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>**प्रतिमा** -१) मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>२) मा.श्री. मनोज घोडेपाटील, उपजिल्हाधिकारी |
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन - अध्याय क्र.१ -** मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>**अध्याय क्र.२ -** मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>**अध्याय क्र.३ -** मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य |
| | | **अध्याय क्र.४ -** मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>**अध्याय क्र.५ -** मा. सौ. योगिताताई शेळके पाटील, सदस्या |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा** – मा.श्रीमती. रुबल अग्रवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | सांय. ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा** – मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य |
| २५/०३/२०१८ रविवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा मुख्य दिवस** |
| | | **श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक**<br>**वीणा - मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य** |

| | | |
|---|---|---|
| | | पोथी – मा. सौ. योगिताताई शेळके पाटील, सदस्या<br>प्रतिमा- १) मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>२) मा.श्री. धंनजय निकम, उपजिल्हाधिकारी |
| | सकाळी ६.०० वाजता | श्रींची पाद्यपूजा- मा.श्री. प्रताप भोसले, सदस्य |
| | सांय. ६.०० वाजता | श्रींची पाद्यपूजा – मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| २६/०३/२०१८.<br>सोमवार | | उत्सवाचा सांगता दिवस |
| | सकाळी ६.०० वाजता | श्रींची पाद्यपूजा- मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष |
| | सकाळी ६.३० वाजता | गुरुस्थान येथे रुद्राभिषेक – मा.श्री. धंनजय निकम, उपजिल्हाधिकारी |
| | सांय. ६.०० वाजता | श्रींची पाद्यपूजा- मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष |

आता श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१८ मध्ये पाद्यपुजा व इतर कार्यक्रमासाठी मान्यवरांची निश्चिती करणे आहे. तरी वीणा, पोथी, श्रींचा फोटो, अध्यायाचे वाचन, श्रींची पाद्यपुजा, रुद्राभिषेक कोणी करावा याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे.

तरी खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे मान्यवरांची नावे निश्चित होणेस मान्यतेसाठी सादर.

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| २६/०७/२०१८.<br>गुरुवार | पहाटे ५.०० वाजता | उत्सवाचा प्रथम दिवस |
| | | वीणा -<br>पोथी -<br>प्रतिमा - |
| | पहाटे ५.१५ वाजता | अध्याय वाचन - अध्याय क्र.१ –<br>अध्याय क्र.२ -<br>अध्याय क्र.३ –<br>अध्याय क्र.४ -<br>अध्याय क्र.५ - |
| | सकाळी ६.०० वाजता | श्रींची पाद्यपूजा – सकाळी-<br>सायंकाळी- |
| २७/०७/२०१८.<br>शुक्रवार | पहाटे ५.०० वाजता | उत्सवाचा मुख्य दिवस |
| | | वीणा –<br>पोथी - |
| | | प्रतिमा - |
| | सकाळी ६.०० वाजता | श्रींची पाद्यपूजा - |
| २८/०७/२०१८<br>शनिवार | <br>सकाळी ६.०० वाजता | उत्सवाचा सांगता दिवस<br>श्रींची पाद्यपूजा - |
| | सकाळी ६.१५ वाजता | गुरुस्थान येथे रुद्राभिषेक - |

**निर्णय क्र.३५१** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपौर्णिमा उत्सवातील वीणा, पोथी, फोटो, पाद्यपुजा, रुद्राभिषेक इत्यादी साठी खालीलप्रमाणे मा. समितीच्या सदस्यांची नावे निश्चीत करण्यात आली.

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| २६/०७/२०१८. | पहाटे ५.०० वाजता | उत्सवाचा प्रथम दिवस |

| | | |
|---|---|---|
| गुरुवार | | वीणा - मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>पोथी - मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>प्रतिमा - मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य व<br>मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य |
| | पहाटे ५.१५ वाजता | अध्याय वाचन - अध्याय क्र.१ – मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>अध्याय क्र.२ - मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>अध्याय क्र.३ – मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>अध्याय क्र.४ - मा. सौ. योगितताई शेळके पाटील, सदस्या<br>अध्याय क्र.५ - मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता<br>सायंकाळी | श्रींची पाद्यपूजा – सकाळी- मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>सायंकाळी- मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य |
| २७/०७/२०१८.<br>शुक्रवार | पहाटे ५.०० वाजता | <u>उत्सवाचा मुख्य दिवस</u> |
| | | वीणा – मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>पोथी - मा. सौ. योगितताई शेळके पाटील, सदस्या |
| | | प्रतिमा - मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष व<br>मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता<br>सायंकाळी | श्रींची पाद्यपूजा - मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष<br>मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| २८/०७/२०१८<br>शनिवार | <br>सकाळी ६.०० वाजता | <u>उत्सवाचा सांगता दिवस</u><br>श्रींची पाद्यपूजा - मा. मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | सकाळी ६.१५ वाजता | गुरुस्थान येथे रुद्राभिषेक - मा. मुख्य कार्यकारी अधिकारी |

**(कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

**विषय नं.०६** **दि. १२ ते २४ ऑगष्ट २०१८ या कालावधीत आयोजित योगीराज सदगुरु गंगागिरीजी महाराज यांच्या १७१ वा अखंड हरिनाम सप्ताहासाठी सप्ताह समितीला श्री साई आश्रम धर्मशाळा इमारत तसेच इतर सुविधा उपलब्ध करुन देणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम १(ड) श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

४. अधिनियमाचे कलम २१ (२) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर आणि विश्वस्त व्यवस्थेच्या उद्देशासाठी आणि मंदिराच्या नजीकच्या भविष्यातील गरजा, आवश्यकता व सुधारणा यासाठी तत्सम तरतूद केल्यानंतर जर विश्वस्तव्यवस्था निधीमध्ये, जादा शिल्लक राहीली तर, त्या जादा शिलकीच्या काही भागाचा समितीस, वेळोवेळी, पुढीलप्रमाणे सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी विनियोग करता येईल.

५. २१ (२) पोटकलम (१) (ग) मध्ये राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रीडा अकादमी अथवा संस्था, सार्वजनिक ग्रंथालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रीत अथवा शारीरीकदृष्टया विकलांग व्यक्तीसाठी आधारगृह किंवा धर्मादाय अथवा धार्मिक संस्था किंवा सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी केलेली, कला व साहित्य या क्षेत्राशी संबंधीत असलेली कोणतीही अन्य बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटना अथवा सोसायटी स्थापन करणे व त्याची देखभाल करणे किंवा स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी अशा संस्थाना अथवा व्यक्तींना किंवा शिर्डी नगरपंचायतीला वित्तसहाय्य देणे.

शासन निर्णय- महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०१३/ प्र.क्र.०१/का.१६ दि.२२/१०/२०१३ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाकरीता रु.३,०२३.१७ कोटी इतक्या रकमेच्या कृती आराखड्यास दि.३१/०३/२०१७ रोजी मान्यता दिली आहे. सदर आराखडयात संस्थानचे प्रथम व व्दितीय प्राधान्य गटात असे एकुण रु.१,८२८.३१ कोटी इतक्या रकमेचे प्रकल्प प्रस्तावीत असून वरीलपैकी व्दितीय प्राधान्य गटातील रु.१,२५२.८५ कोटी निधीची मागणी करणारा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडून केंद्र शासनास सादर करणेत आला आहे. तसेच प्रथम प्राधान्य गटातील अ.नं. १२ मध्ये विविध धार्मिकव सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनासाठी रु.२५ कोटी मात्र अंदाजित खर्चास मान्यता मिळालेली आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय –

१. मा. व्यवस्थापन समितीचे दि. २३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ३५८ खालीलप्रमाणे पारित झालेला आहे.

समाधी शताब्दी वर्षामध्ये सादर करावयाच्या कार्यक्रमांची रुपरेषा (ऑगष्ट २०१८ मध्ये अखंड हरिनाम सप्ताह) ठरविणेत येऊन, झालेल्या चर्चेप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

२. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६५४ खालीलप्रमाणे पारित झालेला आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामधील धार्मिक कार्यक्रमांमध्ये प. पू. गंगागिरीजी महाराज अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करणेत यावे व या सप्ताहासाठी देहू, आळंदी, पंढरपूर अशा ठिकाणच्या वारकरी सांप्रदायांनाही बोलविणेत यावे.

३. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ७५० खालीलप्रमाणे पारित झालेला आहे.

माहे ऑगष्ट २०१८ मध्ये आयोजित करावयाच्या सदगुरु श्री गंगागिरीजी महाराज सप्ताहासाठी आवश्यक असलेल्याजागेची निश्चिती शिर्डी ग्रामस्थांनी करावी व त्या जागेची लेव्हल करुन मंडप उभारणी, प्रसादाची आमटी तयार करणे, उपवासाच्यादिवशी खिचडीची व्यवस्था करणे ही कामे संस्थानमार्फत करणेत यावी अथवा या सप्ताहासाठी संस्थानमार्फत ठराविक रक्कम देण्यात यावी. यासाठी समिती सदस्य मा. श्री भाऊसाहेब वाकचौरे यांनी शिर्डी ग्रामस्थांशी चर्चा करुन, यासाठीचा खर्च व संस्थानचा सहयोग याबाबत समितीस अवगत करावेव सदर निर्णयानुसार पुढील कार्यवाही करावी.

४. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २२८ खालीलप्रमाणे पारित झालेला आहे.

योगीराज सदगुरु गंगागिरीजी महाराज यांच्या अखंड हरिनाम सप्ताहासाठी राज्यभरातून मोठ-मोठया देणग्या प्राप्त होत असतात, याकरीता अध्यक्ष, योगीराज श्री गंगागिरिजी महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताह समिती शिर्डी यांचे उपरोक्त पत्रातील व यानंतरही प्राप्त होणाऱ्या पत्रामधील मागण्या अमान्य करणेत आल्या. तसेच सदरहू सप्ताहासाठी संस्थानमार्फत रु.७५/- लाख मात्र खर्चाची रक्कम छाननी समिती व शासन मान्यतेने सप्ताह समितीस देण्यात यावी. संस्थानचा सहभाग केवळ सदर निधी देणेपुरताच मर्यादित राहील.

तसेच योगीराजसदगुरु गंगागिरीजी महाराज यांच्या अखंड हरिनाम सप्ताहासाठी येणाऱ्या भाविकांच्या दर्शनासाठी सदरहू ठिकाणी श्रींच्या मुळ पादुका उपलब्ध करुन द्यावयाच्या असल्याने, श्रींच्या पादुकांसाठी स्वतंत्र वेगळे स्टेज तयार करणेत यावे व पादुकांजवळ संस्थानच्या दक्षिणा पेटया ठेवण्यात याव्यात. त्याचप्रमाणे सप्ताह समितीमध्ये सर्व व्यवस्थापन समिती सदस्यांचा समावेश करणेबाबत अध्यक्ष, सप्ताह समिती यांना कळविणेत यावे.

**प्रस्ताव-** श्री तुकाराम शंकरराव गोंदकर, अध्यक्ष, योगीराजश्री गंगागिरिजी महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताहसमिती, शिर्डी यांनी-

१) मा. अध्यक्ष सो. यांना अग्रेशित केलेल्या दिनांक नसलेले पत्रात, "योगिराज गंगागिरिजी महाराज यांच्या १७१ व्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या नियोजनाला सुरुवात झाली आहे. सप्ताह कालावधीत आपल्याकडे अनेक भजनी मंडळे, टाळकरी मंडळी येणार आहे. ही सर्व मंडळी बाहेरगावची असल्याने

आपल्याला त्यांची निवासव्यवस्था करावी लागणार आहे. आपल्या सप्ताहास्थळाजवळ असलेल्या साई आश्रम भक्त निवास क्रं. दोनची संपूर्ण इमारत याकाळात निवासस्थान म्हणून लागणार आहे असे नमूद करुन कृपया आपण संबंधीत विभागाला याबाबत सूचना करुन सदर इमारती १२ ते २४ ऑगष्ट २०१८ पर्यंत सप्ताह समितीला उपलब्ध करुन द्याव्यात, ही विनंती, असे कळविलेले आहे.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी सो. यांना अग्रेषित केलेल्या दि.१०/०५/२०१८ रोजीच्या -

**क्रं. ०१ चे पत्रात-**

१. साईआश्रम क्रं. ०२ मधील सर्व हॉल विना मोबदला व्हावे.

२. सप्ताहाचा स्वयंपाक शिजविण्यासाठी, भाविकांना पिण्यासाठी व इतर वापरासाठी पाण्याची आवश्यकता भासणार आहे. साईबाबा संस्थानच्या पाणीपुरवठा योजनेतून यासाठी विनामोबदला पाणी पुरवठयाची सुविधा उपलब्ध करुन द्यावी.

३. श्री साईबाबा संस्थानकडे उपलब्ध असलेले सर्व फिरते शौचालय व प्रसादालयाच्या मागे सप्ताह स्थळाला लागून असलेले पश्चिमेचे गेट उघडून देऊन तेथील सर्व शौचलय विना मोबदला उपलब्ध करुन द्यावे.

४. सप्ताहासाठी येणारे भाविक व साईभक्त यांच्या मुक्कामासाठी साईआश्रम क्र.२ येथे तात्पुरत्या स्वरुपात मंडप उभारून मिळावा.

**क्रं. ०२ चे पत्रात –**

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडून सप्ताहासाठी दि.१६ ऑगष्ट ते २३ ऑगष्ट २०१८ दरम्यान त्यांच्या मालकिच्या प्रसादालयाच्या नजीकची सर्व जागा उपलब्ध व्हावी तसेच सदर जागेतील वेडया बाभळी व इतर झुडपे काढून जागेची स्वच्छता करून मिळावी व जागेच्या उपलब्धतेबाबत शेती महामंडळाला पत्र द्यावे.

**क्रं. ०३ चे पत्रात-**

सप्ताहासाठी एकूण अंदाजे रु.३,१३,५०,०००/- मात्र इतका खर्च येणार असून याखर्चात श्री साईबाबा संस्थान कडून रु.७५/- लक्ष रुपयांचे आर्थिक योगदान अपेक्षित आहे, उर्वरित रक्कम आम्ही भाविकांच्या आर्थिक सहयोगातून उभारणार आहोत.

**प्रस्तावना-** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करणेकामी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत वेळोवेळी वर नमूद केलेप्रमाणे निर्णय झालेले आहेत.

शिर्डी ग्रामस्थ व नाटय ससिक संच, शिर्डी यांनी शताब्दी महोत्सवी वर्षाचे अनुषंगाने अखंड हरिनाम सप्ताह व श्री साईचरित्र पारायण सोहळा एकाच वेळी आयोजित करणेचे निर्धारित केले आहे.

आता, श्री तुकाराम गोंदकर, अध्यक्ष, अखंड हरिनाम सप्ताह समिती यांनी उपरोक्त नमूद केलेप्रमाणे दि.१२ ते २४ ऑगष्ट या कालावधीत साईआश्रम धर्मशाळेची संपूर्ण इमारत तसेच इतर सुविधा सप्ताह समितीला उपलब्ध द्याव्यात अशी विनंती केलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय-** अखंड हरिनाम सप्ताह समिती यांनी केलेल्या विविध मागण्यांबाबत खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

(१) साईआश्रम धर्मशाळेची इमारत (अर्थातच संस्थानकडे भक्तांचे निवासासाठी उपलब्ध असलेले हॉल्स) १३ दिवसांसाठी सप्ताह समितीला उपलब्ध करुन दिल्यास खाली नमूद केलेप्रमाणे संस्थानला सुमारे रु.६,२४,०००/- मात्र इतका आर्थिक भार सोसावा लागणार आहे.

साईआश्रम धर्मशाळेत निवासासाठी उपलब्ध असलेल्या हॉल्सची संख्या- ९६

एका हॉलमध्ये जास्तीत जास्त होणा-या व्यक्तिंची सोय - २५

एका दिवसासाठी माणसी सेवा आकार - २०

एकूण कालावधी (दिवस) - १३

(९६ X २५ X २०X १३ = ६,२४,०००/-)

(मागील तीन वर्षाचे श्रीसाईचरीत्र पारायण सोहळयाचे कालावधीत श्रीसाईआश्रम धर्मशाळेच्या एकुण निवासव्यवस्थेपैकी साधारणपणे ५०% निवासव्यवस्थेचा साईभक्तांनी वापर केला आहे. तर ५०% निवासव्यवस्था रिक्त होती.)

शताब्दी वर्षानिमित्त यावर्षी साईचरित्र पारायण सोहळयास सुमारे १५ ते २० हजार पारायणार्थी पारायणासाठी बसण्याचा अंदाज आहे. त्यानुषंगाने बाहेरगावाहून येणा-या पारायणार्थीसाठी संस्थानमार्फत निवासव्यवस्था करणे अपेक्षित आहे.

(२) अखंड हरिनाम सप्ताहाचा स्वयंपाक शिजविण्यासाठी,भाविकांना पिण्यासाठी व इतर वापरासाठी संस्थानकडून मोफत पाणी उपलब्ध करुन देता येईल.

(३) श्री साईप्रसादालयाचे पाठीमागील बाजूस असलेल्या शौचालयांची संख्या मर्यादित असल्याने सदरची शौचालये प्रसाद भोजन घेण्यासाठी आलेल्या साईभक्तांनाच अपूरी पडतात. तसेच संस्थानकडे उपलब्ध असलेले फिरते शौचालय हे श्रीसाईचरित्र पारायणार्थीसाठी उपलब्ध करुन द्यावे लागतील.

(४) साईआश्रम धर्मशाळा येथे मंडप उभारावयाचा झाल्यास सदरचा कालावधी हा पावसाळ्याचा असलयाने तेथे पत्राशेड मंडप उभारावा लागेल.

तथापि मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेत योगिराजश्री गंगागिरीजी महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताह समितीच्या सर्व मागण्या अमान्य करुन सप्ताह समितीला छाननी समिती व शासन मान्यतेनंतर रु. ७५/- लक्ष मात्र इतके रक्कम देण्याचे ठरले असून यापुढे येणा-या पत्रांतील मागण्या अमान्य करणेबाबत ठरले आहे. तरी अखंड हरिनाम सप्ताह समितीने मागणी केलेल्या खालील बाबींवर निर्णय होणे आवश्यक आहे.

१. साईआश्रम धर्मशाळेकडील हॉल मोफत उपलब्ध करुन देणेबाबत.

२. अखंड हरिनाम सप्ताहाचा स्वयंपाक शिजविण्यासाठी, भाविकांना पिण्यासाठी व इतर वापरासाठी संस्थानकडून मोफत पाणी उपलब्ध करुन देणेबाबत.

३. संस्थानचे प्रसादालयाच्या मागे सप्ताह स्थळाला लागून असलेले पश्चिमेचे गेट उघडून देऊन तेथील सर्व शौचलय विना मोबदला उपलब्ध करुन देणेबाबत.

४. साईआश्रम धर्मशाळा येथे मंडप उभारावयाचा झाल्यास सदरचा कालावधी हा पावसाळ्याचा असल्याने तेथे पत्राशेड मंडप उभारणेबाबत. (मान्यता मिळाल्यास याकामीचे अंदाजपत्रक तयार करुन पुढील सभेपुढे मान्यतेसाठी सादर करता येईल.)

५. महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या जागेतील वेडया बाभळी व इतर झुडपे काढून जागेची स्वच्छता करून देणेबाबत.(मान्यता मिळाल्यास याकामीचे अंदाजपत्रक तयार करुन पुढील सभेपुढे मान्यतेसाठी सादर करता येईल.)

६. अखंड हरिनाम सप्ताहासाठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची जागा मिळणेसाठी संस्थानमार्फत पत्र देणेबाबत. (संस्थानने पत्र दिल्यास सदर जमिनीचे वापरमुल्य संस्थानला आदा करावे लागेल. यापुर्वी कुंभमेळा कालावधीत संस्थानने प्रती दिन प्रती एकर रु. १०००/- याप्रमाणे शेती महामंडळास भाडेपट्टा आदा केलेला आहे. )

तरी श्री तुकाराम शंकरराव गोंदकर, अध्यक्ष, योगीराजश्री गंगागिरिजी महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताहसमिती, शिर्डी यांचे मागणीप्रमाणे दि.१२ ते २४ ऑगष्ट या कालावधीत साईआश्रम धर्मशाळेची संपूर्ण इमारत व इतर सोयी सप्ताह समितीला उपलब्ध करुन द्याव्यात किंवा कसे याबाबत सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३५२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि. १२ ते २४ ऑगष्ट,२०१८ या कालावधीत आयोजित योगीराज सदगुरु गंगागिरीजी महाराज यांच्या १७१ वा अखंड हरिनाम सप्ताहासाठी सप्ताह समितीला श्री साई आश्रम धर्मशाळा इमारतीमधील ५० हॉल ७ दिवसाकरीता विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावेत, तसेच पाणी पुरवठयासाठी संस्थानमार्फत तात्पुरत्या स्वरुपात पाईपलाईन करुन पाणी उपलब्ध करुन द्यावे, मात्र पाणी वितरणाची व्यवस्था आयोजकांनीच करावी, असे ठरले. (कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

विषय नं.०७ **झिरो बजेट नैसर्गिक व अध्यात्मिक शेती तसेच विषमुक्त अन्न यासाठी शेतक-यांचे २८ ऑगस्ट ते २ सप्टेंबर,२०१८ ६ दिवसांचे निशुल्क निवासी शिबीराचे आयोजनाकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :**

१. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ढ) अन्वये, सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ण) अन्वये, मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

मा. व्यवस्थापन समिती सभा निर्णय-

१. दि. ०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १७१ खालीलप्रमाणे पारीत झालेला आहे.

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने दि. ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि. ३१ ऑक्टोबर, २०१८अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजिक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे", असे ठरले आहे.

२. दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णयक्र.२८२खालीलप्रमाणे पारीत झालेला आहे.

"पद्मश्री कृषीऋषी मा.सुभाष पाळेकर यांना झिरो बजेट नैसर्गिक व अध्यात्मिक शेती तसेच विषमुक्त अन्न यासाठी शेतकऱ्यांचे १२ दिवसांचे निःशुल्क निवासी शिबीर आयोजित करणेस तत्वत: मान्यता देण्यात आली. तथापि, सदरहू कार्यक्रमाचे आयोजनासाठी येणारा खर्च जास्त असल्याने याबाबतचा सविस्तर प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा" असे ठरले.

**प्रस्तावना**-श्री साईबाबा यांच्या महासमाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये साजरे केले जात आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

**प्रस्ताव**- दि.२६/०३/२०१८ रोजीचे अर्जान्वये मा.अध्यक्ष महोदय यांना अग्रेषित केलेल्या पत्रामध्ये, महाराष्ट्र व देशभरातून अंदाजे २ ते ३ हजार शेतकरी बंधूसाठी १२ दिवस झिरो बजेट नैसर्गिक व अध्यात्मिक शेती व विषमुक्त अन्न निवासी शिबीर माहे- ऑगस्ट किंवा डिसेंबर २०१८ मध्ये आयोजित करणेस तसेच शिबीरासाठी राहण्याची, भोजनाची व परिसंवादाची व्यवस्था विनामूल्य करावी,असे नमूद केले आहे.

दि.०३/०४/२०१८ रोजीचे ई-मेलव्दारे मा.अध्यक्ष महोदय यांना अग्रेषित केलेल्या पत्रामध्ये, राष्ट्रपती सन्मानित पद्मश्री कृषीऋषी मा.सुभाष पाळेकर यांचे झिरो बजेट नैसर्गिक शेती शेतकरी प्रशिक्षण शिबीर दिनांक २६ सप्टेंबर- २०१८ ते ०७ ऑक्टोबर २०१८ रोजी शिर्डी संस्थान, शिर्डी येथे करण्याचे आयोजन आहे. शिबीरासाठी येणा-या तीन ते चार हजार शिबीरार्थीसाठी आपल्या संस्थानकडून चर्चासाठी हॉल, तसेच निवास, भोजन व्यवस्था व इतर सुविधा विनामुल्य करण्यात यावी , असे नमूद केले आहे.

दि.०५-०६ व ११/०४/२०१८ रोजीचे अर्जान्वये मा.अध्यक्ष महोदय यांना अग्रेषित केलेल्या पत्रामध्ये, पद्मश्री मा.सुभाष पाळेकर यांचे झिरो बजेट नैसर्गिक व अध्यात्मिक शेती व विषमुक्त अन्न या विषयावर जनजागृतीचे व्रत घेतले असून शेतक-यांमध्ये सदर विचार सुयोग्य प्रकारे पोहचविण्याकरीता ते शिबीर घेत असतात.

एका देशी गायीचे शेण व गोमित्रापासून ३० एकर शेतीरासायनिक खते व औषधे न वापरता लाभप्रत कशी करावयाची या विषयी सखोल मार्गदर्शन पाळेकर गुरजी करतात. या उपक्रमाच्या अंमलबजावणीने देशभरातील शेतकरी कर्ज मुक्त होऊ शकतात, शेती व्यवसाय नफ्यात चालू शकतो, तसेच उपभोक्त्यांना विषमुक्त अन्न उपलब्ध होऊ शकते. असे विचार व त्या मागची भूमिका, अंमलबजावणीची सुत्रे इ. विषयांवर शिर्डी येथेही आपल्या परिसरातील व महाराष्ट्रातून शेतकरी बांधवाकरीता शिबीर आयोजित करीत आहोत. हा उपक्रम हा निव्वळ शेतकरी बांधवांच्याच नव्हे तर सर्व देशवासियांच्या दृष्टीने महत्वपूर्ण व उपकारक असाच आहे.

शिर्डी येथे आयोजित करीत असलेल्या या शिबीराचा कालावधी दिनांक २७ ऑगस्ट- २०१८ ते ०७ सप्टेंबर-२०१८ असा १२ दिवसांचा राहणार असून शिबीरात अंदाजे ३००० निवासी शेतकरी बांधव सहभागी होतील.

श्री साईबाबांचे पवित्र भूमीमध्ये, त्यातही हे वर्ष श्री साई शताब्दी महोत्सवाचे असल्याने, शताब्दी महोत्सवातील एक लोकोपयोगी उपक्रम राबविण्याकामी पुढाकार घ्यावा व या उपक्रमाकरीता संस्थानमार्फत ३००० व्यक्ती यांचेकरीता निवास, दोन वेळचे भोजन, दोन वेळेस चहा, सकाळी नाष्टा व परिसंवादासाठी स्थळ व त्या ठिकाणी व्यासपीठ, ३००० व्यक्ती समावेश होऊ शकतील असा हॉल, अगर वॉटरप्रुफ तंबू/ मंडप, ध्वनीवर्धक, बैठक व्यवस्था (३००० खुर्च्या) गाद्या, फॅन, सुरक्षा व्यवस्था, पिण्याचे पाणी व विज पुरवठा, पार्किंगची सुविधा, ५०० व्यक्तींकरीता एक स्क्रीन या प्रकारे ६ स्क्रीन इ. १२ दिवसांकरीता व्यवस्था व्हावी, असे नमूद केले आहे.

**विभागाचा अभिप्राय-** सदर कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे झाल्यास खालील बाबी व नमूद केलेला खर्च विचारात घेऊन निर्णय होणे गरजेचे आहे.

१. **निवास-** शिबिरार्थींची निवासव्यवस्था साईआश्रम धर्मशाळेत करता येईल.

२. **भोजन-** शिबिरार्थींची श्रीसाईप्रसादालयात मोफत भोजनव्यवस्था करता येईल.

३. **चहा, नाष्टा -** सदरहू व्यवस्था सशुल्क स्वरुपात उपलब्ध करुन देता येईल.

४. **स्थळ, मंडप, व्यासपीठ** – या कार्यक्रमाचे आयोजन नव्याने होत असलेल्या श्री साईआश्रम समाधी शताब्दी मंडपात करता येईल.

५. **ध्वनिक्षेपण व्यवस्था -** संस्थानच्या ध्वनिक्षेपण विभागामार्फत विहीत पध्दतीने निविदा मागवून करता येईल.

६. **बैठक व्यवस्था (खुर्च्या व गाद्या)-** खुर्च्यांची व्यवस्था संस्थानमार्फत करता येईल. मात्र गाद्यासेवाआकार घेऊन पुरविता येतील.

७. **सुरक्षा व्यवस्था-** सदरहू शिबिर संस्थान परिसरात होत असल्याने संस्थानची नियमीत सुरक्षा व्यवस्था वापरता येईल.

८. **पिण्याचे पाणी-** संस्थानचे पाणीपुरवठा विभागामार्फत अतिरिक्त कर्मचारी नेमून त्यांचेमार्फत पिण्याचे पाण्याची व्यवस्थाकरता येईल.

९. **विजपुरवठा -** संस्थानच्या विद्युत विभागामार्फत विहीत पध्दतीने निविदा मागवून करता येईल.

१०. **एलईडी स्क्रीन** –याकामी रु. ११/- लक्ष इतका खर्च येत असल्याने एलईडी स्क्रीनचा खर्च संस्थानने करणे उचित ठरणार नाही.

तरी शिबीरासाठी लागणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | कालावधी | एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | साऊंड सिस्टीम – ३००० व्यक्तींकरिता | १२ दिवसांकरीता | ४,९५,६००/- |
| २ | लाईट व फॅन व्यवस्था | १२ दिवसांकरीता | ३,३९,०००/- |
| ३ | निवास व्यवस्था-३००० व्यक्ती रु.२० प्रती व्यक्ती x १२० हॉल = ३००० व्यक्ती | १२ दिवसांकरीता | ७,२०,०००/- |
| ४ | पाणी पुरवठा व्यवस्था | १२ दिवसांकरीता | २५,०००/- |
| | | **एकूण रक्कम रु.** | **१५,७९,६००/-** |

दि.२७ ऑगस्ट २०१८ ते दि.०७ सप्टेंबर २०१८ या कालावधीत झिरो बजेट नैसर्गिक व अध्यात्मिक शेती तसेच विषमुक्त अन्न यासाठी शेतक-यांचे १२ दिवसांचे निःशुल्क निवासी शिबीर आयोजित करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०४/०४/२०१८ रोजीचे सभेत तत्वतः मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार दि.२७ ऑगस्ट २०१८ ते दि.०७ सप्टेंबर २०१८ या कालावधीत झिरो बजेट नैसर्गिक व अध्यात्मिक शेती तसेच विषमुक्त अन्न यासाठी शेतक-यांचे १२ दिवसांचे निःशुल्क निवासी शिबीरासाठी उपरोक्तप्रमाणे रक्कम रु.१५,७९,६००/-(अक्षरी रक्कम रुपये पंधरा लाख एकोणऐंशी हजार सहाशे मात्र) मात्र इतक्या खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करणेससाठी सभाकामकाज विभागाकडे सपुर्द करणेत आला होता.

आता श्री माधवराव देशमुख व इतर यांनी मा. अध्यक्ष सो. यांना अग्रेशित केलेल्या दि. १५/०५/२०१८ रोजीचे पत्रान्वये झिरो बजेट, नैसिर्गिक, अध्यात्मिक शेती व विषमुक्त अन्नशिबिर कार्यक्रमाचे सर्वेसर्वा पद्मश्री सुभाषजी पाळेकर गुरुजी यांची तब्येत बरोबर नसल्याने सदर शिबिर १२ दिवसाचे आयोजित करणेऐवजी दि.२८/०८/२०१८ ते ०२/०९/२०१८ या ०६ दिवसाचे कालावधीत करणेबाबत विंनती केली आहे. सदर पत्रावर मा. अध्यक्ष सो. यांनी ०६ दिवसाचे निवासी शिबिर आयोजित करावे, असे मौख्यिक निर्देश दिलेले आहेत.

झिरो बजेट, नैसिर्गिक, अध्यात्मिक शेती व विषमुक्त अन्नशिबिराचे १२ दिवसाचे आयोजनासाठी सुमारे रु.१५,७९,६००/- मात्र इतका खर्च नमूद केला आहे. आता अर्जदार यांचे विनंतीनुसार सदर ०६ दिवसांचे निःशुल्क निवासी शिबीरासाठी ५०% खर्च वजा धरता सुमारे रु.७,८९,८००/- ( अक्षरी रक्कम रुपये सात लक्ष एकोननव्वद हजार आठशे) मात्र इतका खर्च गृहीत धरावा लागणार आहे.

तरी दि.२८ ऑगस्ट २०१८ ते दि.०२ सप्टेंबर २०१८ या कालावधीत झिरो बजेट नैसर्गिक व अध्यात्मिक शेती तसेच विषमुक्त अन्न यासाठी शेतक-यांचे ०६ दिवसांचे निःशुल्क निवासी शिबीरासाठी

उपरोक्तप्रमाणे रक्कम रु.७,८९,८००/-( अक्षरी रक्कम रुपये सात लक्ष एकोननव्वद हजार आठशे) मात्र इतक्या खर्चास मान्यता मिळणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.३५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२८ ऑगस्ट २०१८ ते दि.०२ सप्टेंबर २०१८ या कालावधीत झिरो बजेट नैसर्गिक व अध्यात्मिक शेती तसेच विषमुक्त अन्न यासाठी शेतक-यांचे ०६ दिवसांचे निःशुल्क निवासी शिबीर साईआश्रम-१ येथील सभामंडपात आयोजित करणेस व त्याकामी येणाऱ्या एकत्रीत अंदाजे खर्च रक्कम रु.१० लक्ष मात्र खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदर शिबीरास प्रसिध्द जलतज्ञ डॉ.राजेंद्र सिंह उपस्थित राहिल्यास अर्धा दिवसाची पाणी परिषद घ्यावी, असे आयोजकांना कळवावे, असे ठरले.**

**सदर निवासी शिबीराकरीता उपस्थित राहाणाऱ्या प्रतिनिधींची निवासव्यवस्था साईआश्रम धर्मशाळेतील हॉलमध्ये व भोजन तसेच चहा, नाष्टयाची मोफत व्यवस्था साईआश्रम-१ येथे करावी. मात्र LED स्क्रीनसाठी संस्थानने खर्च करु नये, असे ठरले.**

**(कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख/ प्र.अधिक्षक,प्रसादालय विभाग/ प्र.अधिक्षक,कॅन्टीन विभाग)**

---

**विषय नं.०८** **श्री समाधी मंदिर परिसराचे पुर्वेकडील जागेत टेंसाईल फॅब्रीकचे छत असलेले शेड उभारणे कामाचे ठेकेदार वेस्टर्न आऊटडोअर स्ट्रक्चर्स प्रा.लि., ठाणे यांचे चौथे व अंतिम देयक रु. ८९,७९,३४८/- मात्र अदा करणेस मंजुरी देणे.**

**प्रस्ताव-** श्री समाधी मंदिर परिसराचे पूर्वेकडील जागेत टेंसाईल फॅब्रीकचे छत असलेले शेड उभारणेचे काम ठेकेदार वेस्टर्न आऊटडोअर स्ट्रक्चर्स प्रा.लि., ठाणे यांनी पूर्ण केले असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या चौथे व अंतिम बिलाची सविस्तर तपासणी करणेत आली आहे. सदरहू अंतिम बिलाचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

**कामाचे नावः- श्री समाधी मंदिर परिसराचे पूर्वेकडील जागेत टेंसाईल फॅब्रीक शेड उभारणे.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | वेस्टर्न आऊटडोअर स्ट्रक्चर्स प्रा. लि., ठाणे |
| कार्यादेश क्रमांक व दिनांक | जा.क्र.एसएसएसटी/बांध/१०१९/२०१७, दि.२९/०५/२०१७ |
| मंजुर निविदा रक्कम | रु.१,२२,९२,८८१/- |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.३२२ (२१), दि.२८/०४/२०१७ |
| अंतिम बिलाची रक्कम | रु.८९,७९,३४८/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु.८७,१४,७३४/- |
| उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम | रु.२,६४,६१४/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.३३,१३,५३३/- ( ३६.९०१७ % कमी) |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | ०८ महिने, दि.११/०२/२०१८ अखेर. |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.३०/०९/२०१७ |

ठेकेदार वेस्टर्न आऊटडोअर स्ट्रक्चर्स प्रा.लि., ठाणे यांनी दि.३०/०९/२०१७ अखेर ठरलेल्या मुदतीपुर्वी सदरचे काम पूर्ण केले आहे. ठेकेदार यांनी दि.१२/०३/२०१८ रोजीचे पत्रान्वये रु.८९,७९,३४८/- मात्र इतक्या रकमेचे अंतिम बील सादर केले आहे.

सदर कामाचे स्कोपमधील जुने प्रसादालय परिसरातील लाडू काऊंटर व गेट नं.०१ जवळील पिंपळवाडी रोड येथिल शेड उभारणेचे काम रद्द करण्यात आल्याने कार्यादेशातील मंजूर निविदा रकमेत रु.३३,१३,५३३/- मात्र इतकी बचत झालेली आहे.

ठेकेदार यांना प्रत्यक्ष झालेल्या कामाचे मोजमापानुसार चौथे अंतिम बिलापोटी एकूण रक्कम रु.८९,७९,३४८/- मात्र इतकी रक्कम देय होत आहे. तरी ठेकेदार वेस्टर्न आऊटडोअर स्ट्रक्चर्स प्रा.लि., ठाणे यांना अंतिम बील रक्कम रु.८९,७९,३४८/- मात्र अदा करणेसाठी मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री समाधी मंदिर परिसराचे पुर्वेकडील जागेत टेंसाईल फॅब्रीकचे छत असलेले शेड उभारणे कामाचे अंतिम बिलाची रक्कम रु.८९,७९,३४८/- मात्र मंजुर करण्यात येऊन उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम रु.२,६४,६१४/- मात्र ठेकेदार वेस्टर्न आऊटडोअर स्ट्रक्चर्स प्रा.लि., ठाणे यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०९** **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) परिसरातील रस्ते व पार्किंगचे डांबरीकरण करणे कामाचे अंतिम बिल रक्कम रु. ३१,८२,०६२/- मंजुर करुन अदा करणेस मान्यता देणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) परिसरातील रस्ते व पार्कींग डांबरीकरणाचे काम ठेकेदार श्री.सी.टी. दिघे , संगमनेर यांनी पूर्ण केले असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या पहिले व अंतिम बिलाची सविस्तर तपासणी

करणेत आली आहे. ठेकेदार यांना अंतीम बिल अदा करणेकामी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव तक्ता स्वरूपात खालील प्रमाणे सादर करणेत येत आहे.

कामाचे नांव- श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५००रुम ) परिसरात रस्ते व पार्कींगचे डांबरीकरण करणे

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री.सी.टी.दिघे, संगमनेर |
| कार्यादेश क्रमांक व दिनांक | जा.क्र. एसएसएसटी/बांधकाम/ ५८८५/२०१८ दि.०१/०२/२०१८ |
| मंजूर निविदा रक्कम | **रु. ३८,००,०००/-** |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.०३ (०२) दि.०८/०१/२०१८ |
| अंतिम बिलाची रक्कम | रु.३१,८२,०६२/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु.२३,३७,५००/- |
| उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम | रु.८,४४,५६२/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.६,१७,९३८/- (कमी) |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | दि.०६/०४/२०१८ |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.१५/०३/२०१८ |

ठेकेदार सी.टी. दिघे, संगमनेर यांनी दि.१५/०३/२०१८ अखेर सदरचे काम पूर्ण केलेले आहे. ठेकेदार यांनी दि.१५/०३/२०१८ रोजीचे पत्रान्वये रु.३१,८२,०६२/- मात्र इतक्या रकमेचे बील सादर केले आहे.

ठेकेदार यांना प्रत्यक्ष झालेल्या कामाचे मोजमापानुसार अंतिम बिलापोटी एकूण रक्कम रु.३१,८२,०६२/- मात्र इतकी रक्कम देय आहे.

तरी ठेकेदार श्री. सी.टी. दिघे, संगमनेर यांना अंतिम बील रक्कम रु.३१,८२,०६२/- मात्र अदा करणेकामी सदरहु प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३५५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) परिसरातील रस्ते व पार्किंगचे डांबरीकरण करणे कामाचे अंतिम बिल रक्कम रु. रु.३१,८२,०६२/- मात्र मंजुर करण्यात येऊन उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम रक्कम रु.८,४४,५६२/-मात्र श्री.सी.टी. दिघे , संगमनेर यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

विषय नं.१० **मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं. १९८, १९९, २०० व २०१ मधील जागेत साई नॉलेज पार्क प्रकल्प "Design, Build, Finance, Operate & Transfer (DBFOT)" तत्वावर राबविणेकामी येणारे एकुण रु.१६६.३९ कोटी इतके सुधारीत खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** खालील प्रमाणे आहे.

अ) कलम १७ (समितीची कर्तव्ये व अधिकार) -पोटकलम(२)खंड(ठ)- समिती श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्यालीला व शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील;

ब) समितीकडून कलम २१ (विश्वस्त निधीचा विनियोग) -

१ पोटकलम(१) खंड (ङ) - श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे;

२ पोटकलम(१) खंड (झ)-विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे;

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय** : ०१. दिनांक ०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२२२. ०२. दिनांक ०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२७१.

**प्रस्तावना:** मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.१९८,१९९, २०० व २०१ मधील जागेत साई नॉलेज पार्क प्रकल्प प्रस्तावीत आहे. त्यासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून संदीप शिक्रे ॲन्ड असोशिएट्स, मुंबई यांची इकडील दि.०९/१०/२०१७ रोजीचे पत्राने नेमणूक करणेत आलेली आहे. सल्लागार यांचे प्रतिनीधी यांनी वेळोवेळी तसेच दिनांक ०७/०३/२०१८ रोजीचे सभेत सदर प्रकल्पाचे सादरीकरण केले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२२२ खालीलप्रमाणेआहे.

"साईसृष्टी, प्लॅनेटोरियम व वॅक्स म्युझियम(Sai Knowledge Park) प्रकल्पासाठी सल्लागार संदीप शिक्रे ॲन्ड असोशिएट्स, मुंबई यांचे प्रतिनीधीनी आजचे सभेत सदरहु प्रकल्पाचे सादरीकरण केले.

यावर चर्चा होवून असे ठरले की, सल्लागार संदीप शिक्रे ॲन्ड असोशिएट्स, मुंबई यांनी शिर्डी येथे येवून, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेसमोर सदर प्रकल्पाचे सविस्तर सादरीकरण करावे व त्यानंतर या प्रकल्पासाठी विहीत पद्धतीने ई-निविदा मागविणेबाबत पुढील कार्यवाही करणेत यावी."

त्यानुसार सल्लागार संदीप शिक्रे ॲन्ड असोशिएट्स, मुंबई यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे दि.२७/०३/२०१८ रोजी१२.०० वाजता समक्ष उपस्थित राहून सादरीकरण केले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२७१ अन्वये, सदरहू प्रकल्पास येणारे अंदाजे रु.१४१ कोटीचे कामास शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस तसेच शासन मान्यतेनंतर Design Build Finance Operate & Transfer (DBFOT) तत्वावर ई-निविदा मागविणेच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

त्यानंतर सदर प्रकल्पाचे सल्लागार संदीप शिक्रे ॲन्ड असोशिएट्स, मुंबई यांनी दिनांक ०९/०५/२०१८ रोजी प्रकल्पाचा DPR केला असून, त्यामध्ये खालीलप्रमाणे कामांचा अतर्भाव करणेत आला आहे.

| Sr. No. | Discripation | Amount |
|---|---|---|
| 1. | For Soil Tests BOQ | 3,53,750.00 |
| 2. | For Civil &Sturctural BOQ | 60,34,13,999.00 |
| 3. | For Electrical BOQ | 14,64,14,357.00 |
| 4. | For Fire Fightting BOQ | 1,18,66,995.00 |
| 5. | For HAVC Work BOQ | 8,65,83,226.00 |
| 6. | For Plumbing & Sanitary Work BOQ | 68,97,582.00 |
| 7. | BOQ For Statuas And 16 Incidences | 27,08,38,000.00 |
| 8. | For Planetorium& Telescope BOQ | 23,36,92,970.00 |
| 9. | Botanical Item BOQ | 5,00,00,000.00 |
| | Total | **1,41,00,60,879.00** |
| 10. | Workcharge Establishment 3% | 2,82,01,218.00 |
| 11. | Contingenicies 5% | 7,05,03,044.00 |
| 12. | For Increse in Rates in next 2 Years 8% | 11,28,04,870.00 |
| 13. | Consultancey Charges for Architectural, Civil And Structural, MEP Landscping etc. = 3% | 4,23,01,826.00 |
| | Grand Total | **1,66,38,71,837.00** |

सल्लागार संदीप शिक्रे ॲन्ड असोशिएट्स, मुंबई यांनीसाई नॉलेज पार्क प्रकल्प उभारणीसाठी वरीलप्रमाणे रु.१६६.३९ कोटी खर्च अपेक्षित असुन सदरहु प्रकल्प "Design Build Finance Operate & Transfer (DBFOT)" तत्वावर राबविणे प्रस्तावीत केले असून याबाबतचा प्रकल्प अहवाल सादर केला आहे.

सदरहु प्रकल्पशतक महोत्सवी वर्षानिमीत्त तयार करणेत आलेल्या प्रारुप कृती आराखड्यामधील प्रथम प्राधान्य गट (संस्थान निधीतून विकसीत करावयाचे प्रकल्प) मधील अ.नं.०२ मध्ये साई नॉलेज पार्कसाठी रु.१४१ कोटी रकमेची तरतुद करणेत आलेली आहे. करीता सदर प्रकल्पाचे किमतीमध्ये रु.२५,३८,७१,८३७/- मात्र इतक्या रकमेची वाढ होत आहे.

प्रस्ताव: तरी मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.१९८,१९९, २०० व २०१ मधीलजागेत साई नॉलेज पार्क प्रकल्प "Design,Build, Finance,Operate& Transfer (DBFOT)" तत्वावर राबविणेस सल्लागार संदिप शिक्रे ॲण्ड असोशिएटस्, मुंबई यांनी सादर केलेल्या प्रकल्प अहवालानुसार येणारे सुधारीत रु.१६६.३९ कोटी खर्चास व सदरचा प्रकल्प हा रु.१ कोटी पेक्षा जास्त रकमेचा असल्याने याकामी शासन मान्यता मिळणेसाठी शासनाचे विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव सादर करणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेसाठी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं. १९८, १९९, २०० व २०१ मधील जागेत साई नॉलेज पार्क प्रकल्प "Design, Build, Finance, Operate & Transfer (DBFOT)" तत्वावर राबविणेकामी एकुण रक्कम रु.१६६.३९ कोटी इतके सुधारीत प्रकल्प अहवालास मान्यता देण्यात आली. व सदरचा प्रकल्प अहवाल मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.११** **व्दारावती भक्तनिवासस्थान इमारतीसमोरील गार्डनमध्ये पेव्हींग ब्लॉक बसवून रस्ता (पाथवे) करणे कामांचे अंतिम देयक रु. ८,६१,९१५/- मंजूर करणेस व उर्वरीत शिल्लक देय रु. २,५१,४१५/- अदा करणेस मान्यता देणे.**

**प्रस्ताव-** द्वारावती भक्तनिवासस्थान इमारतीसमोरील गार्डनमध्ये पेव्हींग ब्लॉक बसवून रस्ता (पाथवे) करणेचे काम ठेकेदार डी.बी.फोफसे, वैजापूर यांनी पूर्ण केले असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या पहिले व अंतिम बिलाची सविस्तर तपासणी करणेत आली आहे. ठेकेदार यांना अंतीम बिल अदा करणेकामी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव तक्ता स्वरूपात खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

**कामाचे नांव - द्वारावती भक्तनिवासस्थान इमारतीसमोरील गार्डनमध्ये पेव्हींग ब्लॉक बसवून रस्ता (पाथवे) करणे**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री.डी.बी. फोफसे, वैजापूर |
| कार्यादेश क्रमांक व दिनांक | जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/४९४३/२०१६ दि.१९/१२/२०१७ |
| मंजूर निविदा रक्कम | रु. ९,५८,०९२/- |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र९१५ दि. १४/११/२०१८ |
| अंतिम बिलाची रक्कम | रु. ८,६१,९१५/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु. ६,१०,५००/- |
| उर्वरीतठेशिल्लक देय्य रक्कम | २,५१,४१५/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु. ९६,१७७/- (कमी) |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | दि. ०३/०२/२०१८ |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि. २३/०३/२०१८ |

ठेकेदार डी. बी. फोफसे, वैजापूर यांनी दि.२३/०३/२०१८ अखेर सदरचे काम पूर्ण केलेले आहे. ठेकेदार यांनी दि.०३/०४/२०१८ रोजीचे पत्रान्वये रु.८,६१,९१५/- मात्र इतक्या रकमेचे बील सादर केले आहे. ठेकेदार यांनी विलंबाने काम पूर्ण केले आहे. त्यामुळे त्यांचे बिलातून ४८ दिवस विलंबापोटी निविदा शर्त क्र.९ पृष्ठ क्र.४५ मध्ये नमूद केल्यानुसार प्रतिदिन रु.५००/- दराने रु.२४,०००/- मात्र दंड आकारणी करणेत आली आहे.

ठेकेदार यांना प्रत्यक्ष झालेल्या कामाचे मोजमापानुसार अंतिम बिलापोटी एकूण रक्कम रु.८,६१,९१५/- मात्र इतकी रक्कम देय आहे.

तरी ठेकेदार, श्री. डी. बी. फोफसे, वैजापूर यांना द्वारावती भक्तनिवासस्थान इमारतीसमोरील गार्डनमध्ये पेव्हींग ब्लॉक बसवून रस्ता (पाथवे)करणे कामांचेअंतिम देयक रु.८,६१,९१५/- मंजूर करणेस व उर्वरीत शिल्लक देय रु.२,५१,४१५/- अदा करणेस मान्यता मिळावा ही विनंती.

**निर्णय क्र.३५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवासस्थान इमारतीसमोरील गार्डनमध्ये पेव्हींग ब्लॉक बसवून रस्ता (पाथवे) करणे कामांचे अंतिम बिलाची रक्कम रु. ८,६१,९१५/- मात्र मंजूर करण्यात येऊन, उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु. २,५१,४१५/- मात्र ठेकेदार, श्री. डी. बी. फोफसे, वैजापूर यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१२** **श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरिंग नुतनीकरण करणे (पहीला टप्पा) कामाचे ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक यांचे ३ रे व अंतिम देयक रु. ६६,८०,३२६/- मंजूर करणेस व उर्वरीत शिल्लक देय रु. ३,६७,०३८/- अदा करणेस मान्यता देणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींग नूतनीकरणाचे पहिल्या टप्प्याचे काम ठेकेदार आर.के. सावंत, नाशिक यांनी पूर्ण केले असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या तिसरे व अंतिम बिलाची सविस्तर तपासणी करणेत आली आहे. ठेकेदार यांना अंतीम बिल अदा करणेकामी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेसाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

**कामाचे नांव - श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींग नूतनीकरण करणे (पहिला टप्पा).**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | आर. के. सावंत, नाशिक. |
| कार्यादेश क्रमांक व दिनांक | जा.क्र.एसएसएसटी/बांध/११०४/२०१७, दि.०२/०६/२०१७. |
| मंजूर निविदा रक्कम | रु.७४,८२,०००/-. |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.३६१ दि.२३-२४/०५/२०१७ |
| ३ रे व अंतिम बिलानुसार झालेल्या कामाची किमंत | रु.६६,८०,३२६/- . |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु. ६३,१३,२८८/-. |
| उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम | रु.३,६७,०३८/-. |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.८,०१,६७४/- कमी (१०.७१४७ % कमी). |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | ०४ महिने,दि.०२/१०/२०१७ अखेर. |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.२७/०९/२०१७. |

ठेकेदार आर.के. सावंत, नाशिक यांनी दि.२७/०९/२०१७ अखेर सदरचे काम पूर्ण केलेले आहे. ठेकेदार यांनी दि.३०/१०/२०१७ रोजीचे पत्रान्वये रु.७०,१५,४९३/- मात्र इतक्या रकमेचे बील सादर केले आहे. तसेच VAT व GST मधील फरक (१३%) रु.९,१२,०१४/- मात्रसह एकूण रक्कम रु.७९,२७,५०७/- मात्रचे बिल मिळणेची विनंती केली आहे.

ठेकेदार यांना प्रत्यक्ष झालेल्या कामाचे मोजमापानुसार अंतिम बिलापोटी एकूण रक्कम रु.६६,८०,३२६/- मात्र इतकी रक्कम देय आहे.

ठेकेदार यांना दि.०२/०६/२०१७ रोजी सदर कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आलेला होता. ठेकेदार यांना देण्यात आलेला कार्यादेश सर्व करांसह आहे. त्यावेळी VAT कर अंमलात होता. तद् नंतर दि.०१/०७/२०१७ पासून GST लागू झालेला असल्याने निविदेतील पृष्ठ क्र.४२, अट क्र.१२.३ Change in law नुसार VAT व GST मधील फरकाची १३% रक्कम रु.८,६८,४४२/- मात्र मिळणेबाबत ठेकेदार यांनी दि. ०७/०२/२०१८ रोजीचे पत्राव्दारे मागणी केलेली आहे. ठेकेदार यांचे सदर मागणीबाबत लेखाशाखा विभागाकडून अभिप्राय मागविलेला आहे. सदर अभिप्राय प्राप्त झालेनंतर सदर फरकाची रक्कम अदा करणेबाबत स्वतंत्र प्रस्ताव सादर करणेत येईल.

तरी ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांना श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींग नूतनीकरण करणे (पहिला टप्पा) कामाचे ३ रे व अंतिम देयक रु.६६,८०,३२६/-मंजूर करणेस व उर्वरीत शिल्लक देय रु.३,६७,०३८/- अदा करणेस मान्यता देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरिंग नुतनीकरण करणे (पहीला टप्पा) कामाचे अंतिम बिलानुसार झालेल्या कामाची रक्कम रु.६६,८०,३२६/- मात्र मंजूर करण्यात आली. तसेच खराब झालेल्या टाईल्स बदलुन घेण्यात याव्यात व त्यांनतर उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु. ३,६७,०३८/-मात्र ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली. तथापी मंदिर परिसरातील जागोजागी तुटलेले फ्लोरींग दुरुस्त करुन घेतल्यानंतर अंतिम बिल अदा करावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१३** **श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व टॉयलेट ब्लॉकचे नुतनीकरण करणेकामी येणारे रक्कम रु.१,३१,२५,१७३/- मात्रचे खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :**

अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्स्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम कलम २१ (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना:** शिर्डी शहरातील सर्व्हेनं.१४८ पैकी मधील संस्थान मालकीचे जागेत धर्मशाळा क्र.०१ व ०२ इमारतीं सन २००० पासुन साईभक्तांचे निवासाकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. सदर इमारतीमध्ये श्री साईनाथ रुग्णालय सन २००३ मध्ये सुरु करणेत आले आहे. श्री साईनाथ हॉस्पीटलची २०० बेडची क्षमता असुन त्याहून अधिक क्षमतेने या ठिकाणी रुग्णांची सेवा करण्यात येते. साईनाथ रुग्णालयात एकूण १२ टॉयलेट ब्लॉकस् असुन सततच्या वापरामुळे सदरचे टॉयलेट ब्लॉक मध्ये ब-याच ठिकाणी संडासभांडे फुटलेले आहेत

तसेच काही ठिकाणी फ्लोरींग व ड्यॅडो टाईल्स खराब झालेल्या आहेत. याशिवाय काही टॅायलेट ब्लॅाक मध्ये लिकेज आढळून आलेले आहेत त्यामुळे सर्वच टॅायलेट ब्लॅाकचे नुतनीकरण करावे लागणार आहेत. त्यात प्रामुख्याने संडासभांडे बसविणे, वॅाटरप्रुफींग करणे, संडास, बाथरूम मध्ये फ्लोरींग व डॅडो टाईल्स बसविणे, पॅसेजमध्ये व्हीट्रीफाईड मॅट फिनिश टाईल्स बसविणे, ग्रॅनाईट डोअरफ्रेम बसविणे व अनुषंगिक प्लंबिंगची कामे करावी लागणार आहेत.

श्री साईनाथ रुग्णालयातील एकूण १२ टॅायलेट ब्लॅाक आहेत त्यापैकी दोन टॅायलेट ब्लॅाक मधील भिंती काढून त्याठिकाणी स्टोअर बनविणेबाबत साईनाथ रुग्णालय विभागाने दि.१९/०१/२०१८ रोजीचे पत्राने कळविले असून १० टॅायलेट ब्लॅाकचे नुतनीकरण करावयाचे आहे. सदरहू ठिकाणचे टॅायलेट ब्लॅाक मधील पुरूष व महीलांकरीता असणा-या संडास, बाथरुम व मुता-यांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | इमारत | मजला | स्थळ | मुता-यांची संख्या | | संडासची संख्या | | बाथरुमची संख्या | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुरूष | महीला | पुरूष | महीला | पुरूष | महीला | |
| १ | इमारत क्रं ०१ | तळमजला | पश्चिम बाजू | ०४ | ०३ | ०९ | ०९ | ०६ | ०६ | संडासभांडे बसविणे, वॅाटरप्रुफींग करणे, संडास, बाथरूम मध्ये फ्लोरींग व डॅडो टाईल्स बसविणे, पॅसेजमध्ये व्हीट्रीफाईड मॅट फिनिश टाईल्स बसविणे, ग्रॅनाईट डोअरफ्रेम बसविणे व अनुषंगिक प्लंबिंगची कामे करणे. |
| २ | इमारत क्रं ०१ | पहिला मजला | पूर्व बाजू | ०४ | ०३ | ०९ | ०९ | ०६ | ०६ | |
| ३ | इमारत क्रं ०१ | दूसरा मजला | पश्चिम बाजू | ०४ | ०३ | ०९ | ०९ | ०६ | ०६ | |
| ४ | इमारत क्रं ०१ | दूसरा मजला | पूर्व बाजू | ०४ | ०३ | ०९ | ०९ | ०६ | ०६ | |
| ५ | इमारत क्रं ०२ | तळमजला | पश्चिम बाजू | ०४ | ०३ | ०९ | ०९ | ०६ | ०६ | |
| ६ | इमारत क्रं ०२ | तळमजला | पूर्व बाजू | ०४ | ०३ | ०९ | ०९ | ०६ | ०६ | |
| ७ | इमारत क्रं ०२ | पहिला मजला | पश्चिम बाजू | ०४ | ०३ | ०९ | ०९ | ०६ | ०६ | |
| ८ | इमारत क्रं ०२ | पहिला मजला | पूर्व बाजू | ०४ | ०३ | ०९ | ०९ | ०६ | ०६ | |
| ९ | इमारत क्रं ०२ | दूसरा मजला | पश्चिम बाजू | ०४ | ०३ | ०९ | ०९ | ०६ | ०६ | |
| १० | इमारत क्रं ०२ | दूसरा मजला | पूर्व बाजू | ०४ | ०३ | ०९ | ०९ | ०६ | ०६ | |
| | | | एकूण: | ४० | ३० | ९० | ९० | ६० | ६० | |

सदरहूकामी सोबतचे अंदाजपत्रकानुसार रक्कम रु.१,६४,०६,४६६/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरहू अंदाजपत्रकात २०% कपात करून रक्कम रु. १,३१,२५,१७३/- मात्र रक्कमेच्या ई-निवीदा मागवाव्या लागतील.

प्रस्ताव:-तरी संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालय १० टॅायलेट ब्लॅाकचे नुतनीकरण करणेकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१,३१,२५,१७३/- खर्चास व सदरहूकामी ई निविदा मागविणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व टॅायलेट ब्लॅाकचे नुतनीकरण करणेकामी आर्कीटेक्टची नियुक्ती करणेत येऊन याकामी येणाऱ्या खर्चाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करणेत यावे. व यासह सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. असे ठरले. (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१४** **संस्थानचे साईनगर कर्मचारी निवासस्थान वसाहती लगतचे सर्व्हे नं.१२५ पै. व १२६ पै. चे बाजुने संरक्षक भिंतीचे बांधकाम करणेकामी येणारे खर्चास व याकामी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४मधिल तरतुद**:-अधिनियमाच्या कलम २१मधिल पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय** :- मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेत नि. क्र. ७६(११)

**प्रस्तावना** :- शिर्डी येथील स.नं.१२४ पैकीव स.नं. १२६पैकीमधीलसंस्थानचे क्षेत्रास चैनलींकजाळीचे फेन्सिंग ऐवजी संरक्षक भिंत बांधकामासाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेत नि. क्र. ७६(११) खालीलप्रमाणे झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे शिर्डी येथील स.नं.१२४ (पैकी) व १२६ (पैकी) चे बाजुने चेनलिंक फेन्सिंग करणेकामी प्राप्त झालेले निम्नतम दर हे अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा २१% जादा असल्यामुळे सदरहू ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेत यावी व संस्थानचे मौजे शिर्डी येथील स.नं.१२४ (पैकी) व१२६ (पैकी) चे जागांना भिंतीचे कपांऊड तयार करणेत यावे. तसेच याकामी येणाऱ्या खर्चास व विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."

वरीलपैकी शिर्डी येथिल स.नं. १२४ /११ व १२ या क्षेत्राचा समावेश प्रिकास्ट कंपाउंड बसविणेचे कामात असल्याने सदरचे क्षेत्र वगळणेत आले आहे. तसेच प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग यांनी दि.०३/०४/२०१८ रोजीचे पत्राने कळविलेनुसार शिर्डी विकास योजनेतील आरक्षणक्र.३४ मधील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकरीता रुग्णालय विस्तारीकरणासाठी निवाडा एलक्युएसआर/१४/२००१ दि.२४/०४/२०१५ मधील एकूण ६३०९ चौ.मी. इतके भूसंपादीत क्षेत्राचा ताबा मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचेकडून दि.०७/०३/२०१८ रोजी संस्थानने घेतलेला आहे. मालमत्ता विभागाचे मागणीनुसार संरक्षणाचे दृष्टीने सर्व्हे नं.१२५मधील या क्षेत्रास तारकंपाउंड करणेऐवजी संरक्षक भिंत बांधकामाचा समावेश या कामात करणेत आला आहे.

प्रस्ताव: संस्थानचे वरील क्षेत्रास (लांबी -५३८ मी.) दगडी बांधकामातील पायावर ६' उंचीचे संरक्षक भिंतीचे विटबांधकाम करणे व गेट बसविणेसाठी राज्य दरसूची सन २०१७-१८ मधील दराने तयार करणेत आलेल्या अंदाजपत्रकानुसार ४% कॉन्टींजन्सी व १८% जी.एस.टी.सह रु.५४,१७,७२१/- इतका खर्च अपेक्षित आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेत नि.क्र.१२९ अन्वये "...यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार अंदाजपत्रकीय रकमेत २०% कपात करून B-2 म्हणजे Item Rate पद्धतीने यापुढे ई-निविदा मागवाव्यात असे ठरले."

तरी सर्व्हे नं.१२५ व १२६ पैकी संस्थानचे क्षेत्रास संरक्षक भिंतीचे बांधकाम करणेस व त्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु.५४,१७,७२१/-मधून२०% कपात केल्यानंतर येणा-या रु.४३,३४,१७५/- मात्र रकमेची Item Rate ई-निविदा मागविणेबाबतनिर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे साईनगर कर्मचारी निवासस्थान वसाहती लगतचे सर्व्हे नं.१२५ पै. व १२६ पै. चे बाजुने संरक्षक भिंतीचे बांधकाम करणेकामी विहीत पध्दतीने Item Rate ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.४३,३४,१७५/- मात्र खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१५** **प्रबोधिनी ट्रस्ट, नाशिक यांना मानसिक अपंग विद्यार्थ्यांच्या शाळेसाठी रक्कम रु. २० लाख अर्थिक सहाय्य मिळणेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावावर निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** प्रबोधिनी ट्रस्ट नाशिक ही संस्था गेली ४० वर्षापासून अपंग (दिव्यांग) विद्यार्थ्यांसाठी कार्यरत आहे. ट्रस्टचे विविध विभाग आहेत. महाराष्ट्र शासनातर्फे प्रबोधिनी ट्रस्टला २०१५ साली शाहू, आंबेडकर, फुले पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेले आहे. ट्रस्टच्या संस्थापिका मा. सौ. रजनी लिमये हयांना १९८६ साली राष्ट्रपती पुरस्कार, दलित मित्र पुरस्कार असे अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. सौ. लिमये यांचे १६.०१.२०१८ रोजी निधन झालेले आहे. त्यामुळे संस्थेचा सर्व कारभार प्रबोधिनी परिवार सांभाळत आहे. शाळेचा पहिला विद्यार्थी गौतम हयाला २०१४ साली महाराष्ट्र शासनाचा आदर्श अपंग कामगार पुरस्कार मिळालेला आहे. या संस्थेचे विभाग खालीलप्रमाणे आहेत.

| अ. न. | विभाग | वयोगट | विद्यार्थी |
|---|---|---|---|
| १ | प्रबोधिनी विद्यामंदिर | ६ ते १८ | १५० |
| २ | श्रीमती सुनंदा केले विद्यामंदीर | ३ ते १८ | १०० |
| ३ | प्रबोधिनी कार्यशाळा | १८ वर्षापुढील मुले मुली | १२० |
| ४ | प्रबोधिनी वस्तीगृह | १८ वर्षापुढील मुले मुली | ३० |
| | | **एकूण** | ४०० |

अपंग विद्यार्थ्यांसाठी विशेष शिक्षकाची गरज असते, त्याकरिता प्रबोधिनी शिक्षण प्रशिक्षण केंद्र आहे. तेथे २ वर्षाचा डिप्लोमा कोर्स चालतो. वरील पैकी प्रबोधिनी विद्यामंदीर व कार्यशाळा येथे काही प्रमाणात सरकारी अनुदान मिळते. बाकी सर्व विभागाचा खर्च प्रबोधिनी ट्रस्टला करावा लागतो. शाळेत माध्यान्ह भोजन ट्रस्टमार्फत देण्यात येते. शाळेत येणारे विद्यार्थी हे जास्तकरून श्रमिक वर्गातील आहेत. त्यामुळे ते शाळेची फी व बस फी पण भरू शकत नाहीत. ट्रस्टने मुलांना आण ने करण्यासाठी ५ बसेस उपलब्ध केलेल्या आहेत. संस्थेला त्याचा खर्च करणे फार जड जात आहे. तसेच संस्थेचा सेवक वर्ग हा अल्पशा मानधनावर काम करत आहे. प्रबोधिनी वस्तीगृह येथे मुलामुलींसाठी कायमस्वरुपी वस्तीगृहाची सोय करणे गरजेचे आहे. कारण बरीच मुले ५० वर्षापुढील आहेत त्यांचे पालक वयोवृद्ध झालेले आहेत तर काहींचे हयात नाहीत. त्यासाठी वस्तीगृहात बाढीव बांधकाम करावे लागणार आहे. त्यासाठी ट्रस्टला खालीलप्रमाणे निधीची आवश्यकता आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | कायमस्वरुपी निवासस्थान | १० लक्ष |
| २ | कर्मचारी मासिक मानधन खर्च | ४ लक्ष |
| ३ | बस देखभाल | ५ लक्ष |
| ४ | पौष्टीक आहार | १ लक्ष |
| | एकूण | २० लक्ष |

अशी एकूण रक्कम २० लक्ष रुपयांची मागणी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचेकडून मिळणेची विनंती प्रबोधिनी ट्रस्ट नाशिक यांनी आपल्या प्रस्तावात केली आहे.

**अर्थसहाय्य करणेबाबत संस्थान अधिनियमातील तरतुदः-**

अधिनियम कलम २१ (२) पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, किंवा क्रिडा अकादमी वा संस्था सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, **निरीश्रित** अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तीसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे." मात्र यासाठी प्रथम शासन नियुक्त छाननी समितीची शिफारस घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय** :-

१) सदर संस्थेला १३० अनिवासी अनुदानित विद्यार्थी संख्येकरिता अनुदान मिळत आहे.

२) प्रबोधिनी ट्रस्ट नाशिक यांना आयकर विभागाचे 80 – जी प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. त्यामुळे त्यांना इतर अनेक संस्था दानशून व्यक्ती यांचेकडूनही देणगी मिळत असल्याचे दिसते.

३) सदर देणगीच्या माध्यमातून ट्रस्टला वर्षाला १५ ते २० लाख रुपये प्राप्त होत असल्याचे त्यांचे २०१३ - १४ ते २०१५ – १६ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाचे अवलोकनावरून दिसते.

४) संस्थेच्या मुदतठेवी १ कोटी पेक्षा जास्त असल्याचे दिसून येते.

५) आक्टोंबर २०१७ ते आक्टोंबर २०१८ या कालावधीत श्री साई समाधी शताब्दी वर्ष साजरे करण्याचा निर्णय व्यवस्थापन समितीने घेतलेला आहे. त्यासाठी विविध विकास कामांकरिता रु.३०२३ कोटी रुपयांचा कृतीआराखडयास शासनाने मान्यता दिलेली आहे. परंतु निधी प्राप्त नाही त्यामुळे संस्थानचा स्वतःचा निधीही खर्च होणार असल्याने सबंधीतांना मदत देणे योग्य होणार नाही, असे वाटते.

उपरोक्त बाबींवर विचार होऊन सबंधीतांना अनुदान देणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रबोधिनी ट्रस्ट, नाशिक यांना मानसिक अपंग विद्यार्थ्यांच्या शाळेसाठी रक्कम रु.२० लाख आर्थिक सहाय्य मिळणेसाठीचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

**विषय नं.१६** **रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय, माटुंगा मुंबई या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणेसाठी आर्थिक मदत मिळणेच्या अर्जावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** मुंबईच्या माटुंगा येथील रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना International Genetically Engineered (iGEM) या बोस्टन, अमेरिका येथे होणा-या आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये भाग घेणेसाठी, येणारा खर्च भागविण्यासाठी देणगी मिळणेबाबत प्रस्ताव श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे सादर केलेला आहे.

प्रस्तावात नमूद केलेनुसार ही स्पर्धा सिंथेटिक जीवशास्त्र या विषयाला प्रोत्साहन देणेसाठी आयोजित करण्यात येते या स्पर्धेत ५ खंडातील ४० देशामधील २६० महाविद्यालयाचे, ज्यामध्ये हॉवर्ड, एमआयटी, युनिव्हरसिटी ऑफ हेडलबर्ग यासारख्या संस्था व विद्यापीठातील विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होणार आहे. रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय प्रथमच या स्पर्धेत सहभागी होत आहे. महाविद्यालयातील SYB S C या वर्गातील विद्यार्थ्यांनी ऐश्वर्या राजूरकर, अंजली वैद्य, कोमल परब, मैथिली सावंत, मिताली पाटील, निशिथा पांगे, सानिका आम्रे श्रुतिका सावंत या विद्यार्थ्यांनी तसेच डॉ मयूरी रेंगे, श्री सचिन राजगोपालन, श्रीमती मुग्धा कुलकर्णी, डॉ अनुश्री लोकूर हे प्राध्यापकही सहभागी होणार आहे.

रामनारायण रुईया महाविद्यालयाला राष्ट्रीय स्तरावर हा सन्मान प्राप्त झाला आहे सार्वजनिक ठिकाणी पान खाऊन थुंकण्यामुळे पडणारे डाग काढू शकेल अशी प्रभावी प्रणाली तयार करणे हे या टीमचे ध्येय आहे. बोस्टन या शहरात प्रयोगाचा पुर्ण प्रकल्प सादर करणेसाठी येणारा खर्च आणि प्रवासखर्च यासाठी अंदाजे २५ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चात नोंदणी फी, प्रतिविद्यार्थी Attendance fee, प्रवास, व्हिसा, निवास व इतर अनुषांगिक खर्च अपेक्षित आहे.

रामनारायण रुईया या संस्थेची शिक्षण प्रसारक मंडळ ही ट्रस्ट असून 80 – जी प्रमाणपत्र प्राप्त झाल्याचे व सदर ट्रस्टला देणगी देण्याचे अवाहन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना केले आहे .

अर्थसहाय्य करणेबाबत संस्थान अधिनियमातील तरतुद:-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

विभागाचा अभिप्राय :-

१) श्री साईबाबा संस्थान (शिर्डी) अधिनियम २००४ अन्वये अशाप्रकारे वैयक्तीक स्वरुपाची आर्थिक मदत देणेबाबत तरतूद नाही.

२) मा. व्यवस्थापन समितीने प्रस्तावास मान्यता दिल्यास शासनाचे मान्यतेनंतर निधी वर्ग करता येईल.

तरी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय, माटुंगा मुंबई या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणेसाठी आर्थिक मदत मिळणेचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

**विषय नं.१७** **माहे नोव्हेंबर -२०१७ ते मार्च- २०१८ या कालावधीत रु. २५,०००/- व त्यापेक्षा अधिक रकमेची देणगी देणा-या साईभक्तास श्री साईच्या चांदीच्या पादुका व इतर साहित्य प्रसादरुपाने भेट देण्यात आलेले आहे, त्याची नोंद घेणे.**

**प्रस्ताव-** दिनांक ३० नोव्हेबर २०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.८७२ अन्वये, “रक्कम रु.२५,०००/- व त्यापुढील रकमेची/वस्तु, साहित्याची देणगी देणा-या साईभक्तास २० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या श्री साई पादुका तसेच श्री साईचरित्र ग्रंथ व एक श्रीडी फोटो प्रसादरुपाने देण्यात यावा, असे ठरले.”

उपरोक्त निर्णयानुसार दि.०९ जुलै,२०१७ रोजी झालेल्या गुरुपौर्णिमा उत्सवाच्या मुख्य दिवसापासून प्रत्यक्ष कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. दि.०९ जुलै ते दि.३१ ऑक्टोबर २०१७ अखेर एकूण २७१७ नग चांदीच्या पादुकांचे प्रसादरुपाने वाटप करण्यात आले आहे.

तसेच, माहे नोव्हेंबर २०१७ ते मार्च २०१८ मध्ये अशा देणगीदार भक्तांना संस्थानतर्फे सप्रेम भेट देण्यात आलेल्या चांदीच्या पादुका व इतर साहित्याचा तपशिल पुढीलप्रमाणे –

| अ.नं | महिना | चांदीच्या पादुका नग | श्री साईसतचरित्र | | | | | | | श्री डी फोटो |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मराठी | हिंदी | इंग्रजी | तेलगू | तामीळ | गुजराथी | कन्नड | |
| ०१. | नोव्हेबर २०१७ | ६८२ | ५० | -- | ३६० | १८० | ४० | २७ | २३ | ६८२ |
| ०२. | डिसेंबर २०१७ | १११३ | ७२ | -- | ६०८ | २९६ | ७६ | ३० | २७ | १११३ |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०३. | जानेवारी २०१८ | ११०३ | ९० | ५१ | ५३९ | २७४ | ८५ | ५७ | -- | १०९४ |
| ०४. | फेब्रुवारी २०१८ | ७४४ | ४४ | ११४ | २७८ | १९७ | ६८ | ४३ | -- | ७४४ |
| ०५. | मार्च २०१८ | ९७९ | ८९ | ९४ | ४५२ | २१९ | ७६ | ३१ | १६ | ९७७ |
| | **एकूण ...** | **४६२१** | **३४५** | **२५९** | **२२३७** | **११६६** | **३४५** | **१८८** | **६६** | **४६१०** |

(जे साईभक्त नेहमीचे देणगीदार आहेत व त्यांचेकडे पूर्वीचे श्री साईसत्चरित्र असल्याने ते श्री साईसत्चरित्र/थ्री डी फोटो सप्रेम भेट घेत नाहीत)

तरी नोव्हेंबर २०१७ ते मार्च २०१८ या कालावधीत, रक्कम रु.२५,०००/- व त्यापुढील रकमेची देणगी देणाऱ्या साईभक्तांस उपरोक्तप्रमाणे चांदीच्या पादुका व इतर साहित्य सप्रेम भेट देण्यात आले असून, त्याची नोंद घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.३६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे नोव्हेंबर २०१७ ते मार्च २०१८ या कालावधीत रक्कम रु.२५,०००/- व त्यापुढील रकमेची देणगी देणाऱ्या साईभक्तांना सप्रेम भेट देण्यात आलेल्या चांदीच्या पादुका व इतर साहित्याच्या तपशीलाचे अवलोकन करण्यात येऊन त्याची नोंद घेण्यात आली.**

**तसेच रु.५००/- व त्यापेक्षा जादा रकमेची देगणी देणाऱ्या साईभक्तांना प्रकाशने विभागाकडे सन २०१८ च्या शिल्लक असलेली रु.१५/- मात्र किंमतीची दिनदर्शिका मोफत देण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.१८** **आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये केलेल्या गुंतवणूकीचा अहवाल व आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये कमाल व्याजदर देणाऱ्या राष्ट्रीयकृत बँकामध्ये १ वर्षाच्या मुदत ठेवीच्या स्वरुपात गुंतवणूकीस मान्यता मिळणेबाबत व राष्ट्रीयकृत बँकांची एनपीए बाबतची स्थिती अवलोकनार्थ सादर.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम २००४ कलम २०(३) अन्वये विश्वस्तव्यवस्था निधीच्या मालकीचा सर्व पैसा व इतर मौल्यवान वस्तु केवळ राष्ट्रीयकृत बँकेत किंवा बँकामध्ये ठेव म्हणुन ठेवण्यात येतील किंवा जमा करण्यात येतील किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम २ च्या खंड(१२) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे सार्वजनिक रोख्यांमध्ये गुंतविण्यात येतील, अशी तरतुद आहे.

मा.व्यवस्थापन समिती निर्णय क्र.९५२, दि.०६.११.२०१४ अन्वये बचत खाते असलेल्या राष्ट्रीयकृत बँकाची आर्थिक स्थिती विचारात घेऊन, त्यांचेकडुन व्याजदर मागवुन, जास्तीत जास्त व्याजदर देणा-या बँकांकडे टप्पाटप्पाने गुंतवणुक करण्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेऊन गुंतवणुक करावी व त्याचा वार्षिक अहवाल आर्थिक वर्षाच्या शेवटी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर सादर करण्यात यावा असा निर्णय संमत झाला आहे.

त्यास अनुसरून राष्ट्रीयीकृत बँकाची आर्थिक स्थिती पाहून केलेल्या गुंतवणुकांची मुदतपूर्ती झाल्यानंतर, उपलब्ध् होणारा निधी व बचत खात्यामध्ये दैनदिन खर्च वजा जाता उपलब्ध् होणारा निधी, याची विहित पध्दतीने संस्थानचे बचत खाते असलेल्या राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने गुंतवणुक करण्यात आली आहे.

**दि.३१ मार्च २०१८ अखेर आर्थिक वर्षात केलेल्या गुंतवणुकीचा अहवाल व एनपीए स्थिती खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | बँकेचे नाव | % of Gross NPAs | दि. ३१ मार्च २०१८ अखेर असलेली गुंतवणुक |
|---|---|---|---|
| १ | आंध्र बँक, शिर्डी | १४.२६ | २,२९,७५,३६,६२४/- |
| २ | बँक ऑफ बरोडा, नाशिक | ११.३१ | १,०१,०१,००,०००/- |
| ३ | कॅनरा बँक, शिर्डी | १०.३८ | ९४,००,००,०००/- |
| ४ | सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शिर्डी | १८.०८ | १७,२५,५०३/- |
| ५ | देना बँक, शिर्डी | १९.५६ | ७२,००,००,०००/- |
| ६ | इंडियन बँक, शिर्डी | ६.२७ | १,०३,५०,००,०००/- |
| ७ | ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स, शिर्डी | १६.९५ | २,४८,००,००,०००/- |
| ८ | पंजाब नॅशनल बँक, शिर्डी | १२.११ | ७८,००,००,०००/- |
| ९ | सिंडीकेट बँक, शिर्डी | ९.६२ | २,६०,००,००,०००/- |
| १० | युको बँक, शिर्डी | २०.६४ | १७,००,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | युनियन बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी | १३.०३ | ५१,०७,००,०००/- |
| १२ | विजया बॅंक, शिर्डी | ६.१७ | ८,३६,००,००,०००/- |
| स१३ | स्टेट बॅंक ऑफ इंडिया | १०.३५ | - |
| स१४ | कॉर्पोरेशन बॅंक | १५.९२ | - |
| १५ | बॅंक ऑफ इंडिया | १६.९३ | - |
| १६ | बॅंक ऑफ महाराष्ट्र | १९.०५ | - |
| | **एकूण** | | २०,९०,५०,६२,१२७/- |

सदरची Gross NPA ची यादी ACE Equity या स्त्रोतातून प्राप्त झालेली आहे.

उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये राष्ट्रीयकृत बॅंकाकडुन व्याजदर मागवुन उच्चतम दराने दि.३१ मार्च २०१८ अखेर रू.२०,९०,५०,६२,१२७/- मात्र ची गुंतवणुक करण्यात आलेली आहे.

आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये केलेल्या गुंतवणुकीचा वार्षिक अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यास व आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये मुदतपूर्ती होणा-या व बचत खात्यात दैनदिन खर्च वजा जाता गुंतवणुकीसाठी उपलब्ध होणा-या रकमेची विहित पध्दतीने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने राष्ट्रीयीकृत बॅंकांकडून वेळोवेळी तुलनात्मक व्याजदर मागवुन जास्तीत जास्त व्याजदराने गुंतवणुक करण्यास मान्यता मिळणेकामी व राष्ट्रीयकृत बॅंकाची एनपीए स्थिती मा. व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे अवलोकनार्थ सादर.

निर्णय क्र.३६४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.३१ मार्च २०१८ अखेर आर्थिक वर्षात केलेल्या गुंतवणुकीचा अहवाल व एनपीए स्थितीचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली. तसेच जास्त एनपीए असलेल्या बॅंकामध्ये गुंतवणूक करावी किंवा कसे, याबाबत विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांचे मागदर्शन घेण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

**विषय नं.१९ संस्थान व रुग्णालये विभागाचा मालमत्ता विमापॉलिसी व श्री साईभक्तांचा अपघाती विमापॉलीसीचे नुतनीकरणाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालमत्तेचे विमा संरक्षण व श्री साईभक्तांना अपघाती विमा संरक्षण मिळणेसाठी संस्थानने राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून दरपत्रके मागवून न्युनतम दराच्या दरपत्रके स्विकारून विमा संरक्षण घेतले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

(अ) संस्थान मालमत्ता विमा- संस्थानच्या मालमत्तेचा विमा दि.११ जुलै,२०१७ ते दि.१० जुलै, २०१८ या एका वर्षासाठी न्युनतम दराने विमा कंपन्यांकडुन निविदा मागविण्यात आल्या होत्या, त्यातील युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी, शिर्डी यांची निम्नत्तम दराची म्हणजेच रक्कम रू.१४,००,०००/- मात्रची निविदा स्विकारण्यात आली होती. या विमापॉलिसीची मुदत दि.१० जुलै, २०१८ रोजी संपत आहे, पुढील एक वर्ष कालावधीकरीता संस्थान मालमत्ता विमा नुतनीकरण तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr.No. | Particulars | Insured Sum (in Crore) |
|---|---|---|
| 1 | Cash in Transit Insurance | 4.11 |
| 2 | Fidelity Guarantee Insurance | 4.84 |
| 3 | Burglary & Housebreaking Policy | 191.50 |
| 4 | Cash in Safe, Drawers | 0.84 |
| 5 | Comprehensive Fire Policy (Including STFI, Terrorism & Earthquake Cover) | 452.35 |
| | **Total -** | **653.64** |
| 6 | Group Insurance Under Provisions of Workmen Compensation Act,1923 Monthly staff salary is Rs.4.30 Crores. | (Approx 1500 Personnel) |

**(ब) रुग्णालये विभाग मालमत्ता विमा-** रुग्णालये विभागाच्या मालमत्तेचा विमा दि.१० जुलै, २०१७ ते दि.०९ जुलै, २०१८ या एका कालावधीकरीता न्युनतम दराने विमा राष्ट्रीयकत विमा कंपन्यांकडुन नविदा/दर मागविण्यात येवून, त्यातील युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी, शिर्डी यांची निम्नत्तम दराची म्हणजेच रक्कम रू.३,७८,२४७/- मात्रची निविदा स्विकारण्यात आली होती. या विमापॉलिसीची मुदत दि.०९ जुलै, २०१८ रोजी संपत आहे, पुढील एक वर्ष कालावधीकरीता रुग्णालये विभागाचा मालमत्ता विमा नुतनीकरण तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Particulars | Insured Sum (in Crore) |
|---|---|---|
| 1 | Cash in Transit Insurance | 00.11 |
| 2 | Fidelity Guarantee Insurance | 00.55 |
| 3 | Burglary & Housebreaking Policy | 73.50 |
| 4 | Cash in Safe, Drawers | 00.27 |
| 5 | Comprehensive Fire Policy (Including STFI, Terrorism & Earthquake Cover) | 86.90 |
| | **Total-** | **161.53** |
| 6 | Group Insurance Under Provisions of Workmen Compensation Act,1923 Monthly staff salary is Rs.1.80 Crores. | (Approx 600 Personnel) |

(क) श्री साईभक्तांचा अपघात विमा- संस्थान परिसरामध्ये श्री साईभक्तांना काही अपघात झाल्यास एका वेळेस २५ साईभक्तांना विमा संरक्षण मिळावे, यासाठी संस्थानने त्यांची अपघाती विमापॉलिसी घेतली आहे. हा विमा, आलेल्या निविदेतील न्युनतम दराप्रमाणे दि ओरीएंटल इंन्शुरन्स कंपनी लि. शिर्डी यांचेकडून २५ भक्तांना विमा संरक्षण देणेसाठी रक्कम रू.४६,८०५/- ची विमापॉलिसी घेण्यात आली आहे. त्याचा कालावधी दि.१२ऑगस्ट,२०१७ पासून दि. ११ ऑगस्ट, २०१८ पर्यंत असल्याने सदर विमापॉलिसीची मुदत दि.११ ऑगस्ट,२०१८ ला संपत आहे, सदर विमा पॉलिसीमध्ये शिर्डी येथे "श्रीं" चे दर्शनार्थ येणाऱ्या भक्तांचे सुरक्षिततेसाठी अपघाती वा घातपाती विमा संरक्षण असावे म्हणून विमा पॉलिसी घेणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. सदरहु दुर्दैवी घटना संस्थान मालकीचे सर्व इमारती व त्यांचा परिसर, निवासस्थाने, रुग्णालये व गर्दीच्या काळात फुटपाथवर जिथपर्यंत भक्तांची दर्शन लाईन जाईल तिथपर्यंत तसेच मंदिर परिसर (चावडी, व्दारकामाई, गुरुस्थान व त्यांच्या परिसरात) पालखी/रथ मिरवणूकीच्या दिवशी शिर्डी गावातील पालखी रोड, श्री रामनवमी उत्सवाच्या वेळेस बाबांच्या स्नानासाठी कावडीने पाणी आणणारे साईभक्त, खंडोबा मंदिर ते साई समाधी मंदिरापर्यंत पालखी घेऊन येणारे साईभक्त यांचा एका वर्षासाठी २५ साईभक्तांसाठी, कोणत्याही वयाचे स्त्री-पुरुष भक्तास एखाद्या दुर्घटनेत अपघाती वा घातपाती मृत्यु झाल्यास रक्कम रु. ०५ लाख, शरीराचे दोन अवयव (हात,पाय किंवा डोळे) कायम स्वरुपी निकामी झाल्यास रु.०१ लाख, शरीराचे एक अवयव कायम स्वरुपी निकामी झाल्यास रु. ५० हजार, जबर जखमी झाल्यास किंवा अपघात झाल्यामुळे होणारा दवाखाना खर्च रु. २५ हजार विमा संरक्षण मिळू शकेल.

दरवर्षी फक्त २५ भक्तांसाठी विमा संरक्षण घेण्यात येत असते. परंतू, सन २०१८-१९ हे वर्ष श्रींचे महासमाधी शताब्दी वर्ष सुरु असल्याने, बाबांच्या दर्शनासाठी साईभक्तांची संख्या वाढत आहे. त्यास अनुसरुन समाधी शताब्दी वर्षानिमित्त विशेष बाब म्हणून दरवर्षीच्या तुलनेत या वर्षाकरीता जास्त भक्तांसाठी विमा संरक्षण घेणे आवश्यक आहे असे मत आहे.

उपरोक्त विवेचन केल्याप्रमाणे सन २०१८-१९ या कालावधीसाठी संस्थानची मालमत्ता व श्री साईभक्त विमा पॉलिसीचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. नुतनीकरण करण्यासाठी राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांकडूनच बंद लिफाफ्यामध्ये निविदा मागविणे आवश्यक आहे कारण ई-निविदा प्रक्रिया राबविल्यास त्यास सर्व राष्ट्रीयकृत विमा कंपन्या प्रतिसाद देत नसल्याने संस्थानला विमा पॉलिसीचे स्पर्धात्मक दर प्राप्त होत नाहीत तसेच विमा कंपन्यामध्ये स्पर्धाही होत नाही. हा अनुभव संस्थानच्या वाहनांचा विमा नुतनीकरण मार्च-२०१७ मध्ये करताना आलेला आहे. तसेच विमा नुतनीकरण ही खरेदीची प्रक्रिया नसून सेवा प्रक्रियामध्ये मोडत असल्याने ई-निविदा प्रक्रिया राबविण्याची आवश्यकता नाही. तसेच यासाठी पुरेशी अंदाजपत्रकीय तरतुद करण्यात आली आहे.

तरी, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये संस्थान व रुग्णालये विभागाच्या मालमत्तेचा तसेच श्री साईभक्तांचा विमा नुतनीकरण प्रक्रिया फक्त राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांकडून त्यांचे दर बंद लिफाफ्यामध्ये मागवून विमा नुतनीकरणास व त्यावर येणाऱ्या खर्चाच्या मान्यतेसाठी तसेच सध्या शताब्दी वर्ष सुरु असल्याने किती

साईभक्तांचा विमा उतरविण्यात यावा याबाबतच्या निर्णयार्थ सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर सविनय सादर.

निर्णय क्र.३६५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमुद संस्थान व रुग्णालये विभागाच्या मालमत्तेचा तसेच २५ साईभक्तांचा विमा नुतनीकरण करणेकामी राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांकडून त्यांचे दर बंद लिफाफयामध्ये मागविणेस व त्यासाठी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

विषय नं.२० **माहे फेब्रुवारी २०१८ जमा– खर्च तक्ताची नोंद घेणेबाबत.**

प्रस्ताव- लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडुन खर्च होणा-या रकमांचा एकत्रित जमा खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे फेब्रुवारी- २०१८ या कालावधीतील मासिक जमा-खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. जमा- खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे –

| महिना | जमा | खर्च |
|---|---|---|
| फेब्रुवारी २०१८ | ४३,६६,७२,४१२ | १८,५९,९०,१५१ |

तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे फेब्रुवारी २०१८ या कालावधीतील जमा खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

निर्णय क्र.३६६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, फेब्रुवारी २०१८ या कालावधीतील जमा-खर्च तक्त्याचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.** **(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

विषय नं.२१ **संस्थानचे विविध विभागांमध्ये कार्यान्वीत करण्यात आलेल्या युपीएससाठी आवश्यक बॅट-या खरेदी करणेकामी दरकरार करणेकामी ई -निविदा प्रक्रिया राबविणे.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद:**कलम१७ (१) भक्तगणांना आवश्यक तया सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.:** मा.व्यवस्थापन समितीचे दि. ३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ७८१

**प्रास्ताविक:** माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे विविध विभागांमध्ये आवश्यकतेप्रमाणे संगणके, संगणकीय साहित्य व युपीएस कार्यान्वीत करण्यात येतात. सद्यस्थितीत विविध विभागांमध्ये कार्यारत असलेले युपीएससाठी वापरात असलेल्या बॅट-यांची तपशिलवार माहिती पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | कंपनीचे नाव | बॅटरी क्षमता | युपीएस संख्या | बॅटरी संख्या | मागील वर्षी दरकराराने निश्चित केलेले दर (प्रती नग) | बॅटरीचे प्रती नग आजचे अंदाजे दर |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | Exide Luminous Quanta SF sonic | 100AH | 02 | 60 | 6,256/- | 6,650/- |
| 02 | | 65AH | 10 | 65 | 4,106/- | 4,450/- |
| 03 | | 42AH | 03 | 77 | 2,944/- | 3,450/- |
| 04 | | 26AH | 11 | 85 | 1,849/- | 2,250/- |
| 05 | | 18AH | 08 | 160 | 1,575/- | 1,650/- |
| 06 | | 7AH | 50 | 50 | 1,050/- | 650/- |
| | | **एकुण संख्या** | 84 | 497 | | |

उपरोक्त नमुद बॅट-या सततच्या वापराने नादुरुस्त झाल्याने अथवा कालबाहय झाल्यामुळे बदलणे आवश्यक असते. यापुर्व, सदरच्या बॅट-या खरेदी करणेकामी वार्षिक दरकरार करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि. ३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ७८१ अन्वये संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार ई-निविदा प्रक्रिया

राबवुन त्यातील निम्मत्तम दरधारक M/s Microtronics, Aurangabad यांना जा.नं. ५९२/२०१७ दि. ०३/०५/२०१७, अन्वये एक वर्षासाठी कार्यादेश देणेत आलेला आहे. सदरच्या कालावधीमध्ये M/s Microtronics, Aurangabad यांचेकडुन आवश्यकतेप्रमाणे निश्चित दरानुसार एकुण रक्कम रु. १,८०,२१४/- च्या बॅट-या खरेदी करणेत आलेल्या आहेत. सदर दरकराराची मुदत दि. ०२/०५/२०१८ रोजी संपुष्टात आलेली आहे.

विविध विभागामध्ये कार्यरत असलेले युपीएससाठी आवश्यक असलेल्या उपरोक्त नमुद तपशिलातील बॅट-या आवश्यकतेप्रमाणे खरेदी करणेकामी करणेत आलेल्या दरकराराची मुदत दि. ०२/०५/२०१८ रोजी संपुष्टात आलेला आहे. सध्या वापरात अलेल्या जास्त क्षमतेच्या युपीएस मधील 100AH व 65AH बॅट-यांचा कार्यकाल ०५ वर्षाचे पुढे झालेला आहे. येणारे कालावधीत जास्त बॅट-या खरेदी कराव्या लागण्याची शक्यता असुन त्यासाठी येणारा खर्च रक्कम रु. ३,००,०००/- च्या पुढे जाण्याची शक्यता आहे. सबब,पुढील एक वर्षाकरीता सदर बॅट-या खरेदी करणेसाठी दरकरार करणेकामी संस्थानचे प्रचलित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी:** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे विविध विभागांमध्ये कार्यरत असलेल्या युपीएससाठी वापरण्यात येणा-या बॅट-या आवश्यकतेप्रमाणे खरेदी करणेकामी या क्षेत्रातील नामवंत पुरवठाधारकांबरोबर पुढील एक वर्षाकरीता दरकरार करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि विनंती.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** प्रशायकीय व आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:** नमुद केलेप्रमाणे विविध विभागांमध्ये कार्यरत असलेल्या युपीएससाठी वापरण्यात येणा-या बॅट-या आवश्यकतेप्रमाणे खरेदी करणेकामी या क्षेत्रातील नामवंत पुरवठाधारकांबरोबर पुढील एक वर्षाकरीता दरकरार करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.३६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभागांमध्ये कार्यान्वीत करण्यात आलेल्या युपीएससाठी आवश्यक नामांकिंत कंपन्यांच्या बॅट-या खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्यासाठी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२२** **Oracle Software Licenses Purchase & Support Renewal खरेदी करणेकामी Oracle Corp. यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशाची नोंद घेऊन याकामी येणाऱ्या रक्कम रु.१,५३,८९,०४९.९६ चे खर्चास व सदरची रक्कम Oracle यांना अदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद: कलम१७ (१) भक्तगणांना आवश्यक तया सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २७५

प्रास्ताविक: मे.टाटा सन्स यांनी संस्थानचे प्रस्तावीत साईटेक-०२ प्रकल्पा अंतर्गतची कार्यवाही मोफत स्वरुपात करुन देण्याची ईच्छा व्यक्त केलेली होती. त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीच्या दि. ०४/०४/२०१८ रोजीचे सभेमध्ये M/s Tata Sonsयांचे प्रतिनीधी श्री. भीमाशेखर यांनी त्यांचेमार्फत करणेत येणा-या प्रस्तावित कार्यवाहीचे व याकामी त्यांना संस्थानमार्फत उपलब्ध करुन द्यावयाच्या सुविधा संदर्भातील सादरीकरण सभेसमोर केले होते. यावर सविस्तर चर्चेअंती निर्णय क्रं. २७५ अन्वये मे. टाटा सन्स यांनी तयारी दर्शविलेप्रमाणे प्रकल्पाअंतर्गत त्यांचेमार्फत Application बाबतची सर्व कार्यवाही तसेच Data Centre, Cloud Based Services, Hardware & Networkबाबत सल्ला व व्यवस्थापनाबाबतची कार्यवाही विनामुल्य स्वरुपात करुन घेणेस मान्यता देणेत आली तसेच याकामी सादरीकरणात त्यांनी मागणी केलेप्रमाणे संस्थानमार्फत मोफत स्वरुपात पुरविणेचे मान्य करणेत आले.

साईटेक प्रकल्प कार्यान्वीत करणेकरीता मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेबरोबर करणेत आलेल्या करारनाम्याप्रमाणे प्रकल्प कार्यान्वीत करणेकरीता आवश्यक हार्डवेअर, नेटवर्क साहित्य सॉफ्टवेअर लायसेंस आदी खरेदी करणे व प्रकल्प कालावधीसाठी देखभाल करणेची जबाबदारी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांची होती. करारनाम्यानुसार प्रकल्प देखभालीचा मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा कालावधी माहे एप्रिल-२०१७

अखेर संपुष्टात आलेला आहे. साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करणेत आलेल्या कार्यप्रणालींमध्ये Oracle Database व Oracle ERP या कार्यप्रणालींचा समावेश आहे.

Oracle यांनी दि. ०९/०५/२०१८रोजीचे ई-मेलद्वारे Oracle Licenses चे दि. ०१/०५/२०१७ पासून नुतनीकरण करणेबाबत कळविलेले आहे.सदर ई-मेलमध्ये Oracle यांनी त्यांचे अर्थिक वर्ष मे अखेर असल्याने तसेच सद्यस्थितीत डॉलरचे दर हे मार्चचे ग्राह्य धरण्यात येणार असल्याने संस्थानने २०/०५/२०१८ पुर्वी पुरवठा आदेश दिल्यास संस्थानचा अधिकचा अर्थिक फायदा होईल असेही नमुद केलेले आहे.

Oracle यांचेमार्फत प्राप्त झालेल्या ई-मेल प्रमाणे Oracle Licenses बाबत चर्चा करणेकामी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया, मा.उपजिल्हाधिकारी सो., मा.उपकार्यकारी अधिकारी सो. यांचे उपस्थितीत Oracle, Cognizant व TCS यांचे प्रतिनीधीं व आयटी विभाग यांची दि. १७/०५/२०१८ रोजी शिर्डी येथे बैठक आयोजीत करणेत आलेली होती. सदर बैठकीचे दरम्यान Oracle कंपनीचे प्रतिनिधीने असे नमुद केले की संस्थानमध्ये Oracle ERP हि कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकरीता Oracle Database Standard Edition खरेदी करणेत आलेले असुन प्रत्यक्षात Oracle Enterprise Edition चा वापर करणेत येत आहे. याबाबत TCS यांनीही Oracle Enterprise Edition वापरात असल्याचे नमुद केलेले आहे. याबाबत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना विचारणा केली असता त्यांनी आवश्यकतेप्रमाणे Oracle Licenses खरेदी केलेले असुन Oracle यांनी नमुद केलेप्रमाणे Oracle Licenses खरेदी करण्याची आवश्यकता नसल्याचे नमुद केलेले आहे. यावेळी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना Oracle Licenses बाबत Oracle कंपनीकडुन पुर्तता अहवाल व ना हरकत प्रमाणपत्र मिळवुन दोन दिवसात सादर करणेस कळविणेत आलेले आहे. याबाबत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना दि. १७/०५/२०१८ रोजीचे ई-मेलव्दारेही कळविण्यात आलेले आहे. सदर ई-मेलमध्ये कॉग्नीझंट यांचेमार्फत Oracle Licenses बाबत Oracle यांचा पुर्तता अहवाल सादर न झाल्यास संस्थानला खरेदी कराव्या लागणा-या Oracle Licenses ची रक्कम कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी यांचेकडून वसूल करणेत येईल, असे नमुद करणेत आलेले आहे.

TCS यांनी दि. १८/०५/२०१८ रोजीचे ई-मेलव्दारे संस्थान, Oracle व कॉग्नीझंट यांचेबरोबर वेळोवेळी झालेल्या चर्चेनुसार Oracle Database Standard Edition (10 Proc) चा मुळ पुरवठा आदेशात समावेश नसल्याने खरेदी करणे आवश्यक असुन कार्यप्रणाली विकसित करणेकामी नव्याने Oracle Developer Suite Licenses-5 खरेदी करणे आवश्यक आहे, असे कळविलेले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेसमोर सादर करणेत आलेल्या प्रस्तावानुसार साईटेक प्रकल्पाअंतर्गत आवश्यक Oracle Licenses बाबतची कार्यवाही संस्थानला करावी लागणार आहे. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०२/०५/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ३४१ अन्वये पुढील प्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत. "ओरॅकल प्रणालीच्या ज्या  लायसन्सचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. त्या सर्व लायसन्सचे त्वरीत नुतनीकरण करुन घेण्यात यावे. तसेच करारनाम्यानुसार मे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी Oracle प्रणाली ज्या Licensesचे नुतनीकरण करणे आवश्यक होते. त्या Licenses चे नुतनीकरण करण्यासाठी येणारा खर्च मे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांच्या प्रंलबीत देयकातुन वसुल करण्यात यावेत".

सबब, सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेल्या Oracle Licenses चे नुतनीकरण तसेच नव्याने Oracle Database Standard Edition (10 Pros) व Oracle Developer Suite Licenses-5 खरेदी करणे आवश्यक असल्याने नव्याने खरेदी करावयाचे Oracle Licenses चे दर कळविणेबाबत तसेच यासंदर्भात चर्चा करणेकरीता दि.२३.०५.२०१८ रोजी शिर्डी येथे उपस्थित राहणेबाबत Oracle Corporation (Manufacturer) यांना दि. १८/०५/२०१८ रोजीचे ई-मेलव्दारे कळविणेत आलेले होते.

त्यानुसार Oracle Corporation चे प्रतिनिधी श्री रोहन मेनन, सिनीयर सेल्स डायरेक्टर व श्री कौस्तुभ देशपांडे, बिझनेस मॅनेजर हे दि.२३.०५.२०१८ रोजी शिर्डी येथे चर्चेसाठी उपस्थित होते. यावेळी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया, मा.उपजिल्हाधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी व माहिती तंत्रज्ञान विभाग यांचे समवेत झालेल्या चर्चेअंती Oracle Corporation यांनी लायसेन्स नुतनीकरण व खरेदीकरीता पुढीलप्रमाणे दर देऊ केलेले असून, सदरचे दर ई-मेलद्वारे कळविलेले आहेत.

| Sr. No | Item | List Price | Quotation Offer (20% Discount) | Quote offered during meeting held on 23/05/2018 | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Initial 52% Disc. On Sr.No. 1 & 2 | Revised 67% Disc. On Sr.No. 1 & 2 | Final 70% Disc. On Sr.No. 1 & 2 |
| 01 | Oracle Database Enterprise Edition – Processor Perpetual Qty-10 | 3,76,67,560 | 3,00,83,004 | 18080428.8 | 12409239 | 11281126.50 |
| 02 | Oracle Internet Developer Suite- Named User Plus Perpetual Qty-05 | 22,99,700 | 18,36,647 | 1103856 | 757617 | 688742.46 |
| 03 | Oracle Database licenses renewal | 30,50,997.26 | 30,50,997 | 2225485 | 2225485 | 2225485 |
| 04 | Oracle application licenses renewal | 16,42,752 | 16,42,752 | 1193696 | 1193696 | 1193696 |
| | **Total** | **4,46,61,009** | **3,66,13,400** | **2,26,03,465.8** | **1,65,86,037** | **1,53,89,049.96** |

उपरोक्त तक्त्यामध्ये नमुद केलेप्रमाणे आवश्यक Oracle Licenses नुतनीकरण व खरेदी करणेकामी एकूण रक्कम रुपये १,५३,८९,०४९.९६ मात्र इतका खर्च येणार आहे.

Oracle यांनी ई-मेल मध्ये नमुद केलेप्रमाणे सदरचे लाईसन्सेस खरेदीकामी मे-२०१८ पुर्वी पुरवठा आदेश देणे आवश्यक असल्याने, मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०२/०५/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ३४१ अन्वये देण्यात आलेल्या निर्देशान्वये उपरोक्त आवश्यक Oracle Licenses नुतनीकरण करणे व खरदी करणेकामी Oracle यांना पुरवठा आदेश् वेळेत देणे आवश्यक असल्याने इकडील विभागाचे दि. २३/०५/२०१८ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये Oracle Corporation यांना याकामी पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. Oracle Corporation यांना Oracle Licenses चे नुतनीकरण व खरेदी करणेकामी देण्यात आलेल्या पुरवठा आदेशाची नोंद घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल,असे नम्र मत आहे.

मागणी: प्रस्ताविकेत नमुद केलेप्रमाणे साईटेक प्रकल्पाअंतर्गत आवश्यक Oracle Licenses चे नुतनीकरण तसेच Oracle Database Standard Edition (10 Pros)व Oracle Developer Suite Licenses-5ची खरेदी Oracle Corporation (Manufacturer) यांचेकडुन करणेकामी त्यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेश (एकुण रक्कम रुपये १,५३,८९,०४९.९६ मात्र) ची नोंद घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छानन्नी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छानन्नी करुन अनुमान: प्रशासकीय व आर्थिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत: साईटेक प्रकल्पाअंतर्गत आवश्यक Oracle Licenses चे नुतनीकरण तसेच Oracle Database Standard Edition (10 Pros) व Oracle Developer Suite Licenses-5 ची खरेदी Oracle Corporation (Manufacturer) यांचेकडुन करणेकामी त्यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेश (एकुण रक्कम रुपये १,५३,८९,०४९.९६ मात्र) ची नोंद घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३६८** **या विषयावरील चर्चेच्या वेळी सदर सॉफ्टवेअर लायन्ससेस रु.१.२८ कोटी इतक्या कमी किंमतीपर्यंत मिळू शकतात, असे समिती सदस्य श्री.प्रताप भोसले यांचे मत असल्याचे मा.अध्यक्षांनी नमूद केले.**

**यावेळी Oracle Corporation चे प्रतिनिधी श्री.कौस्तुभ देशपांडे यांचेशी दर कमी करणेबाबत भ्रमणध्वनीव्दारे चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, Oracle Software Licenses Purchase & Support Renewal खरेदी करणेकामी Oracle Corp. यांना देण्यात आलेला पुरवठा आदेश रद्द करणेत यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)**

---

**विषय नं.२३** **संस्थान आस्थापनेवरील लिपीक-टंकलेखक, वरिष्ठ लिपीक, अधिक्षक या पदांचे सेवाप्रवेश नियमास मान्यता मिळणेबाबत**

**प्रस्ताव-** अ) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ च्या कलम १३ (४) मधील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती यांच्या आस्थापनेवर आवश्यक कर्मचा-यांच्या आकृतीबंधास शासनाने दि.०७/०८/२००९ रोजी एकूण ४८२६ (स्थायी २९०८+कंत्राटी १९१८) पदांस काही अटी-शर्तीच्या अधीन राहुन मान्यता दिलेली आहे.

त्यात प्रामुख्याने शासनाने अट-शर्त क्र.०१ "समितीने पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासनाची मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना सेवाप्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील" असे नमुद केले आहे.

त्यानंतर अधिनियमातील तरतुदीनुसार शासनाने नियम, विनियम व सेवाप्रवेश नियम अंतिम करणेकामी शासन निर्णय क्र.सासंवि २००८/१७७/(८१)/का.सोळा, मंत्रालय, मुंबई-३२ दि.०३/१२/२००८ व निर्णय क्र.सासंवि-२००८/१७७/(८१)/का.सोळा मंत्रालय, मुंबई-३२ दि.१४/०२/२०११ अन्वये मा.सह सचिव, कार्यासन सोळा, विधि व न्याय विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने वेळोवेळी बैठका घेऊन विनियम तसेच सेवाप्रवेश नियमांचे प्रारुप तयार करुन शासनास सादर केले होते.

त्यावर शासनाने निर्णय क्र.सासंवि-२०१२/प्र.क्र.१९/पुर्नबांधणी-७/का.सोळा, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२८ ऑक्टोबर, २०१३ अन्वये शासनाने विनियमांना मान्यता दिलेली आहे. सदरचे विनियम संस्थानसाठी दि.०१/०१/२०१५ पासून लागू केलेले आहे. परंतु शासनाने सेवाप्रवेश नियमाबाबत श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवरील विविध संवर्ग, त्यांची शैक्षणिक पात्रता, नियुक्ती, वेतनश्रेणी व पदोन्नती इत्यादीबाबत छाननी करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्या आस्थापनेवरील कमर्चा-यांच्या नियुक्ती व पदोन्नतीच्या विनियमाचे प्रारुप पदांच्या तपशिलांच्या परिशिष्टासह शासनास सादर करणेबाबत कळविले.

शासन निर्देशानुसार संस्थान आस्थापनेवरील विविध पदे, त्यांची शैक्षणिक पात्रता, नियुक्ती, वेतनश्रेणी व पदोन्नतीची छाननी करुन, आवश्यक त्या दुरूस्त्या करुन मा.व्यवस्थापन समिती दि.१२/०६/२०१४ रोजीचे सभेतील निर्णयान्वये जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४७०/२०१४ दि.२६/०६/२०१४ चे पत्रान्वये सेवाप्रवेश नियम शासनास मान्यतेसाठी सादर करणेत आलेले होते.

त्यानंतर शासनाने पत्र क्र.सासंवि २०१५/५१९/प्र.क्र.३२/का.१६ विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.३० जून २०१५ चे पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ च्या कलम २५(३) मधील तरतुदीनुसार अधिनियमांतर्गत तयार केलेले विनियमांना पूर्वप्रसिध्दी देणे आवश्यक असल्याचे कळविले होते. त्यामुळे यापुर्वी जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४७०/२०१४ दि.२६/०६/२०१४ नुसार शासनास मान्यतेसाठी सादर करणेत आलेले सेवाप्रवेश नियम पूर्व प्रसिध्द करुन, कर्मचा-यांच्या हरकती मागवून अंतिम प्रस्ताव पुनःश्च शासनास सादर करणेचा विषय मा.व्यवस्थापन समिती दि.२७/०७/२०१५ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता. त्यावर समितीने निर्णय क्र.२२३ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"मंजुर आकृतीबंधानुसार तयार कलेले सेवाप्रवेश नियम (Recruitment Rule) अधिनियमातील तरतुदीनुसार पुर्व प्रसिध्द करुन, हरकती मागविणेच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली."

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरून जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/१७२८/ २०१५ चे परिपत्रकानुसार सेवाप्रवेश नियम पूर्व प्रसिध्द करुन ३० दिवसाचे आत हरकती सादर करणेबाबत कळविणेत आले आहे. त्यानंतर सदर कालावधीत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सेवाप्रवेश नियमाविषयी आलेल्या हरकती निकाली काढणेकामी आस्थापना विभागाकडून दि.१९/१०/२०१५ रोजी टिपणी सादर करणेत आली होती. सदर टिपणीवरील निर्देशास अनुसरून आलेल्या सर्व हरकती सर्व प्रशासकीय अधिकारी यांचेकडे समप्रमाणात वाटप करुन, संबंधीत कर्मचा-यांनी घेतलेल्या हरकती निकाली काढून अहवाल मा.उप कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत मा.कार्यकारी महोदय यांचेकडे सादर करणेबाबत कळविणेत आलेले होते. त्यावर प्रशासकीय अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर संबंधीत कर्मचा-यांच्या सुनावणी घेऊन सर्व हरकती निकाली काढलेल्या आहेत.

दरम्यानचे कालावधीत आस्थापना विषयक कामे करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने श्री.त्र्यं.अं.खैरे, सल्लागार तथा सेवानिवृत्त लेखाधिकारी, महाराष्ट्र शासन यांची नेमणूक करणेत आली. त्याचबरोबर मागासवर्ग कक्षामार्फत आस्थापना विषयक कामे पूर्ण करुन घेणेकामी जा.नं.एसएसएस/वशी-मावक/२९६२/२०१६ दि.१२/११/२०१६ अन्वये समितीचे गठन करणेत आले. सदर समितीच्या वेळोवेळी बैठका घेण्यात आलेल्या आहेत.

निमंत्रित सल्लागार यांनी दि.२८/०४/२०१७ रोजी संस्थानचे सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरणाचा प्रारुप मसुदा संस्थानला सादर केले. सदर सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरणाचे मसुदे जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/१२६६/२०१७ दि.०७/०६/२०१७ नुसार पुनःश्च प्रसिध्द करणेत आलेले आहेत. तसेच सदरचे सेवाप्रवेश नियम अंतिम करणेकामी उपजिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/३९५१/२०१७ दि.१२/०१/२०१८ चे आदेशान्वये समितीचे गठन करणेत आले असून समितीच्या वेळोवेळी बैठका घेण्यात आलेल्या आहेत, अशी वस्तुस्थिती आहे.

ब) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवर एकूण ४० विभाग कार्यरत आहेत. या सर्व विभागामार्फत शिर्डीत येणा-या साईभक्तांना विविध पायाभूत सेवा-सुविधा पुरविण्याचे काम केले जाते. परंतु संस्थानचे मंजुर आकृतीबंधानुसार कार्यालयीन व प्रशासकीय कामकाजाची बहुतांश पदे रिक्त आहेत. खालच्या पदावरील कर्मचा-यांकडून वरच्या पदाचे कामकाज करुन घ्यावे लागत आहे. याबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे -

लिपीक-टंकलेखक, वरिष्ठ लिपीक व अधिक्षक या पदांची सध्यस्थिती

| अ.नं. | पदनाम | मंजुर वेतनश्रेणी | मंजुर स्थायी पदसंख्या | भरलेली पदसंख्या | रिक्त पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | अधिक्षक | ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे ४४०० | १७ | ०१ | १६ |
| ०२ | उप अधिक्षक | ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे ४२०० | १५ | ०० | १५ |
| ०३ | वरिष्ठ लिपीक व कनिष्ठ पर्यवेक्षक | ५२००-२०२०० अधिक ग्रेड पे २४०० | ८३ | २३ | ६० |
| ०४ | लिपीक-टंकलेखक | ५२००-२०२०० अधिक ग्रेड पे १९०० | २७० | १५० | १२० |

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन करता असे निदर्शनास येते की, कार्यालयीन व प्रशासकीय कामकाज करणारे बहुतांश पदे रिक्त आहेत. अधिक्षक संवर्गातील १ पद भरलेले असून १६ पदे रिक्त आहेत. अधिक्षक या रिक्त पदांवर वरिष्ठ लिपीक संवर्गातील २० कर्मचा-यांकडे प्रभारी कार्यभार देऊन दैनंदिन प्रशासकीय कामकाज करुन घेण्यात येत आहे. संस्थानचा दैनंदिन वाढता व्याप विचारात घेता व प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता येणे कामी या पदांचे सेवाप्रवेश नियम अंतिम करुन शासन मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे. तसेच जी पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. अशा पदांवर दैनंदिन कामकाज करुन घेणेकामी शासन धोरणानुसार सेवाप्रवेश नियम, सेवाज्येष्ठता व गुणवत्ता विचारात घेऊन पात्र कर्मचा-यांना तदर्थ पदोन्नती (Adoc Promotion) देता येईल, असे मत आहे.

श्री साईबाबा संस्थानमधील स्थायी पदावरील कर्मचा-यांना सन-१९९९ मध्ये अधिक्षक, वरिष्ठ लिपीक या पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे. सदरचे कर्मचारी हे सुमारे २० ते २५ वर्षापासून एकाच पदावर कार्यरत आहेत. त्यांना शासनाचे धोरणानुसार वेळोवेळी सुधारीत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी लागू केलेली आहे. वरिष्ठ पदावर पदोन्नती दिल्यास संस्थानवर फारसा आर्थिक भार पडणार नाही. उलट कर्मचा-यांचे मनोबल वाढून दैनंदिन प्रशासकीय कामकाजात त्याची निश्चित भर पडेल, असे मत आहे.

तसेच दैनंदिन प्रशासकीय संचिका लिपीक-टंकलेखक यांचेमार्फत तयार होऊन वरिष्ठ लिपीक, अधिक्षक, प्रशासकीय अधिकारी, उप कार्यकारी अधिकारी, उप जिल्हाधिकारी व त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी याप्रमाणे सादर होत असतात.

शासन परिपत्रक क्र.२०१७/प्र.क्र.४६/८-अे, मंत्रालय, मुंबई-३२ दि.०८/०१/२०१८ नुसार शासनाने शासकीय कार्यालयामध्ये अधिकाराचे प्रदान सादरीकरणाचे टप्पे कमी करणेबाबत आदेश पारीत केलेला आहे. संस्थान आस्थापनेवरील उप अधिक्षक-१५ पदे मंजुर असून सर्व पदे रिक्त आहेत. उपअधिक्षक या पदाला प्रशासकीय संरचनेत कोणतीही स्वतंत्र जबाबदारी नाही. सदर पदामुळे सादरीकरणाचे टप्पे वाढतात तसेच प्रशासकीय उतरणही (Administrative Heirarchy) वाढते त्यामुळे सदरची पदे व्यपगत करुन ती वरिष्ठ लिपीक संवर्गात वाढविल्यास त्याचा दैनंदिन प्रशासकीय कामकाजात निश्चित उपयोग होईल, त्यास मान्यता असावी.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता व दैनंदिन प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता येणेकामी उपरोक्त कार्यालयीन व प्रशासकीय पदांची कार्यवाही तातडीने करणे आवश्यक आहे. यासाठी या पदांचे सेवाप्रवेश नियम तयार करणेत आलेले असून ते सोबत परिशिष्ट"अ" जोडले आहे. सदरचे सेवाप्रवेश नियमास मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने शासनास सादर करणेचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

सदरचे कर्मचारी हे सुमारे २० ते २५ वर्षापासून एकाच पदावर कार्यरत आहेत. त्यांना शासनाचे धोरणानुसार वेळोवेळी सुधारीत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी लागू केलेली आहे. वरिष्ठ पदावर पदोन्नती दिल्यास संस्थानवर फारसा आर्थिक भार पडणार नाही.असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले.

निर्णय क्र.३६९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता व दैनंदिन प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता येणेकामी उपरोक्त कार्यालयीन व प्रशासकीय पदांची कार्यवाही तातडीने करणे आवश्यक आहे. याकरीता संस्थान आस्थापनेवरील लिपीक-टंकलेखक, वरिष्ठ लिपीक, अधिक्षक या पदांचे सेवाप्रवेश नियमास मान्यता देण्यात आली. तसेच शासन परिपत्रक क्र.२०१७/प्र.क्र.४६/८-अे, मंत्रालय, मुंबई-३२ दि.०८/०१/२०१८ नुसार संचिका सादरीकरणाचे टप्पे कमी करणेबाबत आदेश पारीत केलेला आहे. संस्थान आस्थापनेवरील उप अधिक्षक-१५ पदे मंजुर असून उपअधिक्षक या पदाला प्रशासकीय संरचनेत कोणतीही स्वतंत्र जबाबदारी नाही. त्यामुळे सदरची पदे व्यपगत करुन ती वरिष्ठ लिपीक संवर्गात वाढविण्यास मान्यता देण्यात आली.**

**शासन धोरणानुसार सेवाप्रवेश नियमास अधिन राहुन, सेवाज्येष्ठता व गुणवत्ता विचारात घेऊन लिपीक-टंकलेखक, वरिष्ठ लिपीक, अधिक्षक या पदावरील कर्मचा-यांना तदर्थ पदोन्नती (Adoc Promotion) देण्यात यावी. तसेच संस्थान आस्थापनेवरील उर्वरीत सर्व पदांचे सेवाप्रवेश नियम बाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२४ नविन वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रवेश प्रक्रिया व शुल्क आकारणी.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३-२४.०५.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.४४४ अन्वये संस्थानचे कला, वाणिज्य, विज्ञान शाखेचे वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेस तसेच त्यासाठी राहाता तालुक्याचा बृह्द आराखडयात समावेश करणेकामी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडे पाठपुरावा करण्यात येऊन, पुढील शैक्षणिक वर्षामध्ये शासन मान्यता मिळवून वरिष्ठ महाविद्यालय सुरु करता येईल, अशी कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश दिलेले आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०९.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.८४६ नुसार महाविद्यालयाचे नाव श्री साईबाबा कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय असे ठरविणेत आले. सदर प्रस्तावीत महाविद्यालयासाठी इमारत/जागा म्हणून तात्पुरत्या स्वरुपात साई धर्मशाळा येथील २ इमारती नमुद करणेत याव्यात तसेच प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे व शासन निर्णय क्र.१५.०९.२०१७ नुसार कार्यवाही करणेकामी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अधिकार प्रदान करणेत येऊन, वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेसाठी आवश्यक असलेल्या आकृतीबंधाबाबतचा सविस्तर प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्रमांक – मान्यता – २०१८/(३०/१८)/माशि-४, दि.२८ फेब्रुवारी, २०१८ चे आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देणेबाबत मान्यता दिलेली आहे. त्यामुळे माहे मे-२०१८ अखेर नवीन वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेस अंतिम मान्यता मिळणे अपेक्षित आहे.

(अ) त्यामुळे इ.१२ वी.चा निकाल लागल्यानंतर प्रवेश प्रक्रिया राबविणे गरजेचे आहे. सदर प्रवेश प्रक्रिया राबवितांना विद्यापीठाचे मार्गदर्शक तत्वानुसार खालील बाबींचा विचार होऊन निर्णय होणे गरजेचे आहे.

१. संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयातील इ.१२ वी मधून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्याने प्रवेश देण्यात यावा.

२. संस्थानमध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांच्या (कायम/कंत्राटी/आऊटसोर्स) पाल्यांना प्राधान्य देण्यात यावा.

३. त्यानंतर शिर्डी व पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना प्राधान्य राहील.

४. या बरोबरच विद्यापीठाचे मार्गदर्शक तत्वानुसार व नियमावलीनुसार प्रवेश प्रक्रिया राबविता येईल.

**(ब)** तसेच विद्यार्थ्यांकडून आकारावयाचे शैक्षणिक शुल्काबाबत विद्यापीठ आदेश क्र.२२५ दि.१५.०१.२०१० नुसार शैक्षणिक शुल्क व इतर शुल्क घेणेबाबत निर्देश आहेत. शुल्कासबंधी आदेश पी.जी.एस.७८५२ दि.२३.१२.२००९ हा विद्यापीठाचे संकेतस्थळावर उपलबध आहे, त्याची प्रत सोबत जोडलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | शुल्काचा तपिशल | अनुदानित | | | विना अनुदानित | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | B.A. | B.Com | B.Sc. | B.A. | B.Com | B.Sc. |
| 01. | Admission Fee | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 02. | Tuition Fee | 800 | 800 | 800 | 1600 | 1600 | 1600 |
| 03. | Student Activities | 300 | 300 | 300 | 300 | 300 | 300 |
| 04. | Library Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 05. | Gymkhana Fee | 80 | 80 | 80 | 80 | 80 | 80 |
| 06. | Student Aid. Fund | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 07. | Eligibility Fee | 300 | 300 | 300 | 300 | 300 | 300 |
| 08. | Ashwhamegh Fee | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 09. | Student Welfare Fund | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 |
| 10. | Disaster Management | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 11. | Medical Fee | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 12. | NSS Fee | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 13. | Library Deposit | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 |
| 14. | Laboratory Fee | 125 | 40 | 125 | 200 | 60 | 400 |
| 15. | Laboratory Deposit | - | - | 300 | - | - | 300 |
| 16. | Computerisation Fee | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 17. | Development Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 18. | Tutorial/ Seminar / Workshop Test Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 20. | Comp.Lab.Dev.Fee | 300 | 300 | 300 | 300 | 300 | 300 |
| 21. | Student Insurance | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 22. | Magazine Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 23. | Registration Fee | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| Total Fee | | 2690 | 2605 | 2990 | 3565 | 3425 | 4065 |

विद्यापीठाचे मार्गदर्शक तत्त्वानुसार अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांसाठी शुल्क आकरणी करण्यात येत असते. यापैकी प्रति विद्यार्थी सरासरी रु.४००/- मात्र (अ.क्र.५ -रु.२०/-, अ.क्र.७ -रु.३००/-, अ.क्र.८ -रु.५/-, अ.क्र.९ -रु.२०/-, अ.क्र.१०- रु.१०/-, अ.क्र.११- रु.१०/-, अ.क्र.१६- रु.५/-,अ.क्र.१७- रु.२५/-, अ.क्र.२१ – रु.२/- ) विद्यापीठास अदा करावी लागते.

संस्थानमार्फत सुरु करण्यात येणारे महाविद्यालय हे कामय विनाअनुदानित तत्त्वावर चालविण्यात येणार आहे. त्यामुळे सदर महाविद्यालयासाठी नव्याने प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांकडून विनाअनुदानित महाविद्यालयासाठी प्रस्तावित केलेले शुल्क आकरणी करता येईल, असे नम्र मत आहे. तसेच त्यामध्ये वेळोवेळी विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार सुधारीत शुल्क आकारणी करता येईल.

तरी उपरोक्त परिच्छेद "अ" व "ब" मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.३७० **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, नविन वरिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश प्रक्रिया राबवितांना विद्यापीठाचे मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करुन पुढील निकषांप्रमाणे प्रवेश देण्याचे ठरले.**

१. संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयातील इ.१२ वी मधून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्याने प्रवेश देण्यात यावा.
२. संस्थानमध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांच्या (कायम/कंत्राटी/आऊटसोर्स) पाल्यांना त्यानंतर प्राधान्य देण्यात यावे.
३. शिर्डी व पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना त्यानंतरचे प्राधान्य देण्यात यावे.
४. विद्यापीठाचे मार्गदर्शक तत्वानुसार व नियमावलीनुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

विद्यापीठाचे मार्गदर्शक तत्वानुसार विनाअनुदानीत महाविद्यालयांसाठी प्रस्तावीत केलेले B.A.करीता रक्कम रु.३५६५/-मात्र, बी.कॉम.करीता रक्कम रु.३४२५/-मात्र,व बी.एस्सी.करीता रक्कम रु.४०६५/- मात्र शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारण्यात यावे, तसेच वेळोवेळी विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार सुधारीत शुल्क आकारणी करण्यात यावी.

तथापी शासन मान्यता येईपर्यंत विद्यार्थ्यांची नाव नोंदणी करण्यात येऊ नये, असे ठरले.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक,सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.२५** **मा. शासनाने दि. २१ सप्टेंबर, २०१७ रोजी पारित केलेली अनुकंपा कारणास्तव नेमणूक देणेबाबतची नियमावली मा. विधी व न्याय विभागाचे मान्यतेने संस्थान व्यवस्थापनासाठी लागू करणे.**

**प्रस्ताव-** शासकीय सेवेत असतांना मृत पावणा-या कर्मचा-यांच्या कुटुंबातील एका पात्र वारसदारास मा.शासन निर्णयातील अनुकंपा तरतुदीचे अनुषंगाने सरळ सेवेने भरल्या जाणा-या गट-क व गट-ड चे पदांवर नेमणूक देणेची कार्यपध्दती आहे. त्यानुसार वेळोवेळी संस्थान सेवेत असतांना मृत पावणा-या कर्मचा-यांच्या एका वारसदाराची प्रचलित अटी-शर्तीस अनुसरुन मा.व्यवस्थपन समितीचे मान्यतेने नेमणूक करण्यात आलेली आहे.

मा.शासनाकडून सन १९७६ साली प्रथमतः अनुकंपा नियुक्तीची योजना लागू करण्यात आली. या योजनेमध्ये सन १९९४ चे शासन निर्णयान्वये सुधारित नियमावली विहीत करुन त्यामध्ये वेळोवेळी विविध शासन निर्णयान्वये दुरुस्त्या करण्यात येऊन व नवीन तरतुदी समाविष्ट करण्यात आल्या. सदर तरतुदी एकत्रित स्वरुपात नसल्यामुळे अनुकंपा तत्वावर नियुक्तीबाबतची कार्यवाही करताना नियुक्ती प्राधिकारी यांना अडचण येत होती व योग्य निर्णय घेतांना विसंगती होण्याची शक्यता असल्याने मा.शासनाकडून वेळोवेळी पारित केले गेलेल्या विविध शासन निर्णय / परिपत्रकांमधील सर्व महत्वाच्या तरतूदी एकत्रित करुन त्या एकाच आदेशात नमूद करण्याचे शासनाचे विचाराधीन होते. त्यानुसार मा.शासनाने सन-१९९४ व त्यानंतर पारित केलेल्या शासन निर्णयांचे एकत्रीकरण करुन महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक, अंकपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ/ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दि.२१ सप्टेंबर, २०१७ अन्वये सर्वसमावेशक आदेश पारित केलेला आहे. त्यामध्ये खालील प्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे.

१. महाराष्ट्र राज्य शासनाच्या सर्व कार्यालयात अनुकंपा कारणास्तव करावयाच्या नेमणूकांना हे नियम लागू राहतील.
२. अनुकंपा नियुक्ती योजनेसंदर्भातील तरतुदी ह्या केवळ शासकीय कर्मचा-यांपूरत्याच सीमीत आहेत. सदर तरतुदी ह्या जिल्हा परिषदा / नगरपालिका / महामंडळे / प्राधिकरणे / व्यापारी उपक्रम व इतर तत्सम आस्थापनावरील कर्मचा-यांना थेट लागू होणार नाहीत. त्यासाठी संबधीत प्रशासकीय विभागाने स्वतंत्रपणे निर्णय घेणे आवश्यक राहील.

उपरोक्त अं.क्र.०२ मध्ये नमूद केलेप्रमाणे मा.शासनाने दि.२१ सप्टेंबर, २०१७ पारित केलेल्या आदेशातील खालील प्रमाणे (संस्थान कामकाजाशी संबधी)अनुकंपा तरतूदी लागू करणेसाठी मा.विधी व न्याय विभाग यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करता येईल.

| अं.क्र | तरतूद | शासन निर्णयाचा संदर्भ |
|---|---|---|
| ०१ | **अनुकंपा नियुक्ती योजनेचा लाभ खालील शासकीय कर्मचा-यांच्या पात्र कुटूंबियांना अनुज्ञय राहील.** | |
| (अ) | शासकीय कर्मचा-यांना (रुपांतरीत स्थायी व अस्थायी आस्थापनेवरील शासकीय कर्मचारी धरुन) | दि.२६.१०.१९९४ |
| (आ) | सेवा नियमित केलेल्या परंतु अधिसंख्य पदावर कार्यरत असलेले कर्मचारी. | दि.१०.०७.२००९ |
| ०२ | **शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या पात्र नातेवाईकांना खालील नमूद परिस्थितीत अनुकंपा तत्वावर नियुक्ती लागू राहील.** | |
| (अ) | शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या गट 'क' व गट 'ड' संवर्गातील कर्मचा-यांच्या पात्र | दि.२२.०८.२००५ |

| | | |
|---|---|---|
| | कुटूंबियानाच अनुकंपा तत्वावर नियुक्ती अनुज्ञेय राहील. | |
| (आ) | गट अ/ब/क/ड मधील शासकीय अधिकारी अथवा कर्मचा-यास नक्षलवादी / आतंकवादी / दरोडेखोर / समाज विघातक यांच्या हल्ल्यात/ कारवाईत मृत्यू आल्यास अथवा शासन सेवेत कार्यरत असतांना स्वतःचा जीव धोक्यात घालून प्रत्यक्ष कर्तव्य बजावत असताना मृत्यूमुखी पडल्यास अशा अधिका-यांच्या व कर्मचा-यांच्या कुटूंबियातील पात्र व्यक्तीस, अनुकंपा तत्वावर नियुक्ती देताना, त्यांचे नाव अनुकंपाधारकांच्या सामान्य प्रतिक्षासूचीमध्ये न घेता, त्यांची वेगळी यादी करुन पद उपलब्ध असल्यास, रिक्त पदांच्या ०५ टक्के मर्यादेची (सध्याची १० %) अट शिथील करुन त्यांना सर्व प्राथम्याने अनुकंपा नियुक्ती देण्यात यावी. | दि.१७.०९.२०१२ |
| (इ) | गट अ/ब/क/ड मधील शासकीय अधिकारी अथवा कर्मचारी नक्षलवादी / आतंकवादी / दरोडेखोर / समाज विघातक यांच्या हल्ल्यात / कारवाईमध्ये कायमस्वरुपी जायबंदी झाले आहेत व त्यांनी स्वतःहून शासकीय सेवा सोडून देण्याची लेखी अनुमती दिली आहे अशा अधिकार/ कर्मचा-यांच्या पात्र कुटूंबियातील एका व्यक्तीस अनुकंपा नियुक्तीसाठी विहीत केलेल्या ५ टक्के (सध्याची १० %) मर्यादेमध्ये प्राध्यान्याने नियुक्ती देण्यात यावी. | दि.१७.०७.२००७ |
| **०३** | **खालील दर्जाच्या पदावर अनुकंपा नियुक्ती देय राहील -** | |
| (अ) | राज्य शासनांतर्गत कोणत्याही गट 'क' व गट 'ड' मधील सरळ सेवेच्या पदांवर त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमातील विहीत शैक्षणिक अर्हता असल्यास अशी नियुक्ती देता येईल. | दि.२६.१०.१९९४<br>दि.२८.०३.२००१ |
| (आ) | ह्या नियमानुसार नियुक्ती मिळण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेस बसण्याची आवश्यकता नाही तसेच सदर पदावर अनुकंपा नियुक्ती करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा सल्ला घेण्याची आवश्यकता असणार नाही. | दि.२६.१०.१९९४<br>दि.२१.११.१९९७ |
| (इ) | लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदाखेरीज अन्य गट-क मधील कार्यकारी पदांवर नियुक्ती देण्यात यावी मात्र अशी नियुक्ती ही त्या पदांसाठी सेवा प्रवेश नियमानुसार सरळ सेवा भरतीची तरतूद आहे अशाच पदांवर देण्यात यावी. | दि.२०.१२.१९९६ |
| **०४** | **अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र कुटूंबिय -** | |
| (अ) | अनुकंपा नियुक्तीसाठी खालील नातेवाईक पात्र राहतील व त्यापैकी एका पात्र नातेवाईकास नियुक्ती अनुज्ञेय राहील.<br>०१. **पती/पत्नी** ०२. **मुलगा/मुलगी** (अविवाहीत/विवाहीत), **मृत्यूपूर्वी कायदेशीररित्या दत्तक घेतलेला मुलगा/मुलगी** (अविवाहीत/विवाहीत) ०३. **दिवंगत शासकीय कर्मचा-याचा मुलगा हयात नसेल किंवा तो नियुक्तीसाठी पात्र नसेल तर त्याची सून** ०४. **घटस्फोटित मुलगी किंवा बहीण, परित्यक्ता मुलगी किंवा बहीण, विधवा मुलगी किंवा बहीण** ०५. केवळ दिवंगत अविवाहीत शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत **त्याच्यावर सर्वस्वी अवलंबून असणारा भाऊ किंवा बहीण** | दि.२६.१०.१९९४<br>दि.१७.११.२०१६ |
| (आ) | मृत अधिकारी / कर्मचा-यांच्या पति / पत्नीने कोणाची अनुकंपा तत्वावर नियुक्ती करावी याबाबत नामांकन देणे आवश्यक राहील. मृत अधिकारी / कर्मचा-यांचे पती / पत्नी हयात नसल्यास त्याच्या / तिच्या सर्व पात्र कुटुंबियांनी एकत्रित येऊन कोणाची नियुक्ती करावी याबाबत नामांकन करावे. | दि.१७.०७.२००७ |
| **०५.** | **कुटूंबाची हलाखीची परिस्थिती -** | |
| (अ) | अनुकंपा तत्वावर नियुक्तीकरीता मासिक उत्पन्नाची तसेच ठोक रकमेची मर्यादा यापुढे राहणार नाही. | दि.२६.१०.१९९४ |
| (आ) | अनुकंपा तत्वावर नियुक्ती देताना असे प्रस्ताव शासन सेवेतील रोजगारावर असलेली मर्यादा, या योजनेच्या मागील भूमिका लक्षात घेऊन जो कर्मचारी मृत झाला आहे त्याच्या कुटुंबियांना तात्काळ उदभवणा-या आर्थिक पेचप्रसंगावर मात करण्याच्या उद्देशाने विचारात घ्यावेत. | दि.२६.१०.१९९४ |
| (इ) | दिवंगत शासकीय कर्मचा-याचा नातेवाईक पूर्वीच सेवेत असेल तथापि तो त्याच्या कुटूंबातील अन्य सदस्यांना आधार देत नसेल तर अशा प्रकरणात त्या कुटूंबाची आर्थिक परिस्थिती हलाकीची आहे किंवा कसे हे ठरविताना नियुक्ती प्राधिका-यांनी अत्याधिक दक्षता घ्यावी, जेणेकरुन सेवेत असलेला सदस्य कुटूंबाचा उदरनिर्वाह करत नाही या नांवाखाली अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा दुरुपयोग केला जाणार नाही.<br>यासंदर्भात नियुक्ती प्राधिका-याने मिळणा-या निवृत्तीवेतनाची रक्कम, कुटूंबातील व्यक्तींची संख्या, त्यांची मालमत्ता/दायित्व, गंभीर आजारामुळे अथवा अपघातामुळे मृत झाला असल्यास त्यासाठी करण्यात आलेला वैद्यकीय खर्च, कुटुंबातील मिळवत्या व्यक्ती इत्यादी बाबी विचारात घेणे | दि.२६.१०.१९९४ |

| | | |
|---|---|---|
| | अपेक्षित आहे. | |
| ०६ | **लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र -** | |
| | दिनांक ३१ डिसेंबर २००१ नंतर तिसरे अपत्य झालेल्या कर्मचा-यांच्या कुटूंबियास अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी पात्र समजले जाणार नाही. | दि.२८/०३/२००१ |
| ०७ | **योजनेची माहिती देण्याची जबाबदारी -** | |
| (अ) | आस्थापना अधिका-याने अनुकंपा तत्वावर नियुक्तीच्या योजनेची माहिती (योजनेचा उद्देश, पात्र नातेवाईक, अर्ज करण्याची मुदत, शैक्षणिक अर्हता, टंकलेखक प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत, अर्ज विहीत नमून्यात भरणे इ.माहिती) शासकीय कर्मचा-यांच्या कुटूंबियांना त्वरीत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच सदर माहिती मिळाल्याबद्दल कुटूंबाकडून पोच घेणे आवश्यक आहे. | दि.२३.०८.१९९६<br>दि.०५.०२.२०१० |
| (ब) | दिवंगत शासकीय कर्मचा-याचा पात्र वारसदार सज्ञान नसेल तर तो सज्ञान झाल्यानंतर एक वर्षाच्या आत अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी अर्ज करु शकेल मात्र तो सज्ञान झाल्यावर त्याने असा अर्ज करणे अपेक्षित आहे हे देखील कुटूंबनिवृत्तीवेतन धारकाला कुटूंब निवृत्तीवेतनविषयक कागदपत्रांची पूर्तता करतेवेळी लेखी कळविणे संबंधित आस्थापना अधिका-यावर बंधनकारक राहील. | दि.२०.०५.२०१५ |
| ०८ | **कुटूंबातील अन्य सदस्यांचा सांभाळ करण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र** | |
| (अ) | अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यापूर्वी संबंधितांकडून कुटूंबातील अन्य व्यक्तींचा सांभाळ करण्याबाबत प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे. | दि.२३.०८.१९९६ |
| (आ) | अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यापूर्वी संबंधिताकडून दिवंगत कर्मचा-यावर अवलंबून असलेल्या कुटूंबातील अन्य व्यक्तींचा सांभाळ करण्याबाबत प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे. भविष्यामध्ये सदर तक्रारीची चौकशी संबधित नियुक्ती प्राधिकारी / शिस्तभंगविषयक प्राधिका-याने करावी. चौकशीअंती अनुकंपा नियुक्तीधारकाने प्रतिज्ञापत्राचे उल्लंघन केल्याचे निष्पन्न झाल्यास त्याला सेवेतून काढून टाकण्याची देखील शिक्षा देता येईल. | दि.१७.११.२०१६ |
| ०९ | **कुटूंबातील इतर सदस्यांचे संमतीपत्र -** | |
| (अ) | अनुकंपा तत्वावर नियुक्ती ही कुटूंबातील एकाच पात्र नातेवाईकास अनुज्ञेय असल्याने कुटूंबातील इतर सदस्यांचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. | २६/१०/१९९४ |
| (आ) | ज्या शासकीय कर्मचा-यांना वैयक्तिक कायद्यानुसार एकापेक्षा जास्त लग्न करण्यास प्रतिबंध नसेल अशा कर्मचा-याच्या एकापेक्षा जास्त पत्नी हयात असल्यास, ज्या पत्नीला किंवा तिच्या मुलाला/ मुलीला अनुकंपा तत्वावर नियुक्ती द्यायची आहे त्या व्यतिरिक्त अन्य पत्नीचे देखील ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. | २३/०८/१९९६ |
| १० | **अर्ज करण्यासाठी मुदत -** | |
| (अ) | अनुकंपा नियुक्तीसाठी दिवंगत शासकीय कर्मचा-यांच्या कुटूंबातील पात्र नातेवाईकाने शासकीय अधिकारी/कर्मचारी दिवंगत झाल्याच्या दिनांकापासून **एक** वर्षाच्या मुदतीत संबधीत नियुक्ती प्राधिका-याकडे विहीत नमून्यात परिपूर्ण अर्ज सादर करणे आवश्यक आहे. | दि.२२/०८/२००५<br>दि.०५.०२.२०१० |
| (आ) | सेवेत असताना दिवंगत शासकीय कर्मचा-यांच्या कुटूंबातील अज्ञान वारसदाराच्या बाबतीत एकाने सज्ञान म्हणजे १८ वर्षाचा झाल्यावर एक वर्षाच्या आत अनुकंपा नियुक्तीसाठी परिपूर्ण अर्ज सादर करणे आवश्यक आहे. | दि.११/०९/१९९६<br>दि.०५/०२/२०१० |
| (इ) | पात्र वारसदारास विहीत एक वर्षाच्या मुदतीनंतर दोन वर्ष इतक्या कालावधीपर्यंत (मृत्युच्या दिनांकापासुन तीन वर्षापर्यंत) तसेच दिवंगत शासकीय कर्मचा-याच्या अज्ञान वारासदाराच्या बाबतीत तो उमेदवार सज्ञान झाल्यानंतर विहीत एक  वर्षानंतर मुदतीनंतर दोन वर्षापर्यंत (संज्ञान झाल्यानंतर तीन वर्षापर्यंत) अर्ज सादर करण्यास विलंब झाल्यास असा विलंब क्षमापित करण्याचे अधिकार संबंधीत मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या विभाग प्रमुखाना देण्यात येत आहे. अनुकंपा नियुक्ती धोरणातील याशिवाय अन्य कोणतेही अटी व शर्ती शिथील करण्याचे अधिकार संबंधीत मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना राहणार नाहीत. | दि.२०.०५.२०१५ |
| (ई) | जोपर्यंत अनुकंपा नियुक्ती करता आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे उमेदवाराकडून प्राप्त होत नाहीत तोपर्यंत त्याचे नाव प्रतिक्षासूचीमध्ये समाविष्ट करता येणार नाही. ज्या दिवशी संपूर्ण कागदपत्रे प्राप्त होतील त्या दिवशीच त्याचे नाव प्रतिक्षासूचीमध्ये समाविष्ट करावे. | दि.०५.०२.२०१० |
| ११ | **अनुकंपा नियुक्तीसाठी वयोमर्यादा** | |
| (अ) | किमान वयोमर्यादा – १८ वर्ष | दि.११.०९.१९९६ |

| | | |
|---|---|---|
| (आ) | कमाल वयोमर्यादा – वयाच्या ४५ वर्षापर्यंतच्याच उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय असेल. त्यामुळे प्रतिक्षासूचीतील उमेदवारांना वयाच्या ४५ वर्षापर्यंत नियुक्ती न मिळाल्यास त्यांची नावे वयाची ४५ वर्ष पूर्ण होताच आवश्यक ती नोंद घेऊन प्रतिक्षासूचीतून काढून टाकण्यात यावीत. | दि.२२.०८.२००५<br>दि.०६.१२.२०१० |
| **१२** | **अनुकंपा नियुक्तीसाठी शैक्षणिक अर्हता -** | |
| (अ) | पात्र नातेवाईकाची शैक्षणिक अर्हता व निम्न वयोमर्यादेनुसार त्याला गट क किंवा गट-ड मधील पदावर अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय राहील. | दि.२६.१०.१९९४ |
| (आ) | संबधीत पदांसाठी विहित शैक्षणिक पात्रता आणि निम्न वयोमर्यादा याबाबतच्या अटी या नेमणूकीसाठी कटाक्षाने पाळण्यात येतील. | दि.२६.१०.१९९४ |
| (इ) | तथापी दिवंगत शासकीय कर्मचा-याची पत्नी शैक्षणिक पात्रते व्यतिरिक्त इतर अटी पूर्ण करत असल्यास तिच्या बाबतीत गट-ड मध्ये नेमणूकीसाठी शैक्षणिक अर्हतेची अट शथील करण्याची अधिकार संबधीत नियुक्ती प्राधिका-याला असतील. | दि.२६.१०.१९९४ |
| **१३** | **गट-क मधील लिपीक-टंकलेखक पदावर अनुकंपा नियुक्तीसाठी टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत -** | |
| (अ) | अनुकंपा तत्वावर लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्त झालेल्या उमेदवारांना विहीत वेगमर्यादेचे टंकलेखन अर्हता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी शासन निर्णय दि.०६.१२.२०१० अन्वये ०६ महिने असलेली मुदत वाढवून ती ०२ वर्ष इतकी करण्यात येत आहे.<br>अनुकंपा तत्वावर लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्ती दिलेल्या व शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत नियुक्तीपासून ०२ वर्ष पूर्ण न झालेल्या उमेदवारांनाही सदर प्रमाणपत्र सादर करण्यासाठी उमेदवारांच्या नियुक्तीपासून ०२ वर्ष इतकी मुदत देण्यात येत आहे. | दि.२०.०५.२०१५ |
| (आ) | कोणत्याही कारणास्तव दोन वर्षापेक्षा अधिक मुदतवाढ अनुज्ञेय असणार नाही. हा कालावधी संपताच नियुक्ती संपृष्टात आणावी. | दि.२३.०८.१९९६ |
| **१४** | **अनुकंपा तत्वावर गट-क मधील लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाल्यानंतर विहीत मुदतीत टंकलेखन प्रमाणपत्र सादर न केल्यास अनुसरावयाची कार्यपध्दती -** | |
| | अनुकंपा तत्वावर गट-क मधील लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाल्यानंतर टंकलेखनाची विहीत वेगमर्यादेची परिक्षा पास होऊ शकले नाहीत म्हणून त्यांच्या सेवा संपृष्टात आणल्या आहेत, अशा उमेदवारांचा गट-ड मधील नियुक्तीसाठी पदांची उपलब्धता विचारात घेऊन नव्याने नियुक्ती देण्याबाबत विचार करण्यात यावा. मात्र अशा रीतीने गट-ड मधील पदावर नियुक्ती स्विकारल्यानंतर कुठल्याही परिस्थितीत गट-क मधील पदासाठी त्याचा विचार करता येणार नाही, ही बाब त्यांना नियुक्तीपूर्वी स्पष्ट करावी. | दि.०८.०९.१९९७ |
| **१५** | **गट-क मधील लिपीक-टंकलेखक पदावर अनुकंपा नियुक्तीसाठी संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करणे -** | |
| | **अ)** D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत ‘C.C.C’ किंवा ‘O’ स्तर किंवा ‘A’ किंवा‘B’ किंवा ‘C’ स्तर पैकी कोणतेही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा,<br>**ब)** परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र | दि.२४.०९.२००१ |
| | संगणक ज्ञानाची वरील किमान अर्हता अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या वेळी धारण करीत नसलेल्या उमेदवारांना सदर अर्हता गट-क मधील पदावर (वाहन चालक वगळून) अनुकंपा तत्वावर नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. या दोन वर्षाच्या कालावधीत संबंधितांनी विहीत संगणक अर्हता प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र नियुक्ती अधिका-यांना सादर करावे, अन्यथा हा कालावधी संपताच उमेदवारांची अनुकंपा तत्वावरील नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल, अशी स्पष्ट तरतूद उमेदवारांच्या नियुक्तीच्या आदेशात नियुक्ती प्राधिका-यांनी नमूद करावी. | |
| **१६** | **पद उपलब्धते अभावी गट-क मधील पदाऐवजी गट-ड मधील पदावर नियुक्ती देताना अनुसरावयाची कार्यपध्दती-** | |
| | गट-क मधील पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र असणा-या कर्मचा-याला पदाच्या उपलब्धतेअभावी गट-ड मधील पदांवर नियुक्ती दिल्यास पद उपलब्ध होताच गट-क मधील पदावर त्याला प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी. अशी नियुक्ती सरळसेवो नियुक्तीने भरण्यात येणा-या पदांवरील समजण्यात यावी. मात्र गट-ड मधील पदावर अनुकंपा योजनेन्वये नियुक्ती देण्याच्या आदेशात तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा, तसे करण्यात आले तरच गट-क मधील पदावर नियुक्ती देता येईल. | दि.२३/०८/१९९६ |
| **१७** | **अनुकंपा तत्वावर प्रतिक्षासूची ठेवण्याबाबतची कार्यवाही -** | |

| | | |
|---|---|---|
| | अनुकंपा नियुक्तीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय / सा.प्र.वि.१४-अ यांच्याकडील सामायिक प्रतीक्षासूचीबरोबरच संबधित नियुक्ती प्राधिका-यांनी त्यांच्या कार्यक्षेत्राकरीता गट-क व गट-ड करीता प्रतिक्षासूची ठेवण्याची दुहेरी प्रतीक्षासूचीची कार्यपध्दतीन अंमला आणावी. | दि.२२.०८.२००५ |
| **१८** | **अनुकंपा नियुक्तीकरीता ठेवण्यात येणारी प्रतीक्षासूची वेबसाईटवर (संकेतस्थळावर) प्रसिध्द करण्याबाबत -** | |
| | सर्व जिल्हाधिकारी / नियुक्ती प्राधिकारी व सामान्य प्रशासन विभाग, का.१४ अ, यांनी त्यांच्या कार्यालयातील अनुकंपा नियुक्तीसाठी प्रतीक्षासूचीवर (सामायिक / स्वतंत्र) असलेल्या उमेदवारांची नावे व इतर माहिती कार्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी व सदर माहिती ही प्रत्येक महिन्यास अद्ययावत करावी. | दि.१५.०५.२०१० |
| **१९** | **अनुकंपा नियुक्तीसाठी विहीत पदांची मर्यादा -** | |
| (अ) | शासन निर्णय दि.२२.०८.२००५ अन्वये विहीत करण्यात आलेल्या अनुकंपा नियुक्तीसाठी गट-क आणि गट-ड मध्ये प्रती वर्षी रिक्त होणा-या ५ % मर्यादेमध्ये वाढ करुन ती गट-क व गट-ड मधील प्रती वर्षी रिक्त होणा-या पदांच्या १० % इतकी करण्यात आली आहे. | दि.०१.०३.२०१४ |
| (आ) | अनुकंपा तत्वावरील पदे सन २०१२ या भरती वर्षापासून गट-क आणि गट-ड मधील प्रती वर्षी रिक्त होणा-या पदांच्या १० % मर्यादेत भरण्याची कार्यवाही सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी तात्काळ करावी. | शासन पूरक पत्र, दि.०२.०५.२०१४ |
| (इ) | शासन निर्णय, दि.०१.०३.२०१४ अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी प्रतीवर्षी रिक्त होणा-या पदांच्या १० % ची असलेली मर्यादा दि.०१.०३.२०१५ पासून पुढे ०२ वर्ष (दिनांक २८.०२.२०१७ पर्यंत) चालू होती. सदर १० % च्या मर्यादेस दि.०१.०३.२०१७ पासून पुढे दोन वर्ष (दि.२८.०२.२०१९ पर्यंत) मुदतवाढ देण्यात आली आहे.<br>तथापी शासन निर्णय, वित्ता विभाग दि.०२.०६.२०१५ व दि.२३.०९.२०१५ अन्वये पदभरतीवर असलेले निर्बंध विचारात घेता, प्रस्तुत निर्बंध असेपर्यंत गट-क व गट-ड संवर्गातील एका वर्षात भरण्यास मान्यता असलेल्या रिक्त पदांच्या १० % (दि.१८ फेब्रुवारी २०१८ रोजीचे शासन निर्णयानुसार २० %) पदे ही अनुकंपा नियुक्तीने भरण्यात यावीत. | दि.२८.१०.२०१५<br>दि.०३.०५.२०१७<br>दि.१८.०२.२०१८ |
| **२०** | **मागासवर्गीयांसाठी आरक्षित ठेवलेल्या पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्ती देताना करावयाच्या कार्यवाहीबाबत -** | |
| | अनुकंपा नियुक्ती देण्यासाठी वर्षभरात रिक्त होणा-या पदांच्या ५ % (१०% - शासन निर्णय, ०१.०३.२०१४) पदे अनुज्ञेय असून, शासनाच्या दि.१३.०६.२००३ च्या शासन निर्णयान्वये अनुकंपा नियुक्ती करतांना मागासवर्ग / अमागासवर्ग अशा भेदाभेद न करता प्रतिक्षासूचीवरील ज्येष्ठतेनुसार नियुक्ती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२३.०४.२००८ च्या शासन निर्णयान्वये दि.२२.०८.२००५ पूर्वीच्या प्रतिक्षासूचीवरील उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती देणेसाठी ५ % (१०% - शासन निर्णय, ०१.०३.२०१४) अट नसल्याने, रिक्त पदांची माहिती पाठविणा-या कार्यालयास, जिल्हाधिका-यांकडून प्रतीक्षासूचीवर उमेदवार उपलब्ध असल्यास रिक्त पदांइतक्याच उमेदवारांची शिफारस केली जाते. नियुक्ती प्राधिका-याकडून उपलब्ध सर्व रिक्त पदांची संख्या कळविली जात असल्याने त्यामध्ये काही पदे मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असण्याची शक्यता असते व अशा पदांसाठी जिल्हाधिका-यांकडून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची शिफारस केली गेल्यास नियुक्ती प्राधिका-यांपुढे आरक्षित पदावर खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची नियुक्ती करणे नियमानुकूल होईल किंवा कसे, असा प्रश्न उदभवत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. यासंदर्भात महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित – जाती / अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षण अधिनियम, २००१ मधील कलम ४ (१) मध्ये, " अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी राखून ठेवलेल्या जागा अशा जातीतील, जमातीतील, प्रवर्गातील किंवा वर्गातील नसलेल्या उमेदवारांव्दारे भरण्यात येणार नाहीत." अशी स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे.<br>त्यामुळे वरील अधिनियमातील तरतूद तसेच अनुकंपा नियुक्ती देताना ती प्रतीक्षासूचीवरील जेष्ठताक्रमानुसारच देण्याची प्रचलित कार्यपध्दती इ.सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन आता अनुकंपा नियुक्तीसाठी असलेल्या प्रतीक्षासूचीवरील अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासाठी उमेदवारांची शिफारस करताना जिल्हाधिका-यांनी तसेच नियुक्ती प्राधिका-यांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावी, असे सूचित करण्यात येत आहे – | |

| | | |
|---|---|---|
| | अ) मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या पदावर खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांची नियुक्ती करता येत नसल्याने, जिल्हाधिका-यांनी त्यांच्या अधिकार क्षेत्रातील नियुक्ती प्राधिका-याकडून रिक्त पदांची माहिती घेताना प्रत्येक रिक्त पद कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षित आहे / अनारक्षित आहे याचीही माहिती घ्यावी. तदनंतर संबधिकत जिल्हाधिका-यांनी / शिफारस करणा-या सक्षम प्राधिका-यांनी अशा पदावर अनुकंपा उमेदवारांची शिफारस करतांना मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या रिक्त पदावर खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांची शिफारस केली जाणार नाही, याची दक्षता घ्यावी व असे आरक्षित पद आरक्षित प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध होईपर्यंन्त रिक्त ठेवावे.<br>आ) प्रतीक्षासूचीत कनिष्ठ क्रमांकावर मागास प्रवर्गाचा उमेदवार असला तरी त्यास जेष्ठता क्रम डावलून खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्ती दिल्यानंतर जेव्हा आरक्षित प्रवर्गाच्या उमेदवाराचा प्रतीक्षासूचीतील जेष्ठतेनुसार नियुक्तीसाठी क्रम येईल तेव्हाच त्याची नियुक्ती आरक्षित पदावर करणे आवश्यक आहे. तथापी, मागासवर्गीय उमेदवारास प्रतीक्षासूचीवरील जेष्ठताक्रमानुसार अनुकंपा नियुक्ती देण्याच्यावेळी त्या उमेदवारांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे पद उपलब्ध नसले तरी त्यांना खुल्या प्रवर्गाच्या उपलब्ध पदावर नियुक्ती देण्यात यावी. | |
| २१ | **अनुकंपा तत्वावरील प्रतीक्षासूचीवरील उमेदवाराचे निधन झाल्यास त्याऐवजी कुटुंबातील अन्य पात्र वारसदाराचा समावेश अनुकंपा नियुक्तीच्या प्रतीक्षासूचीत करणे -** | |
| | कर्मचा-याच्या मृत्यूनंतर त्याच्या पात्र कुटूंबियांचे नाव अनुकंपाधारकांच्या प्रतिक्षासूचीमध्ये समाविष्ठ केलेनंतर त्याचे निधन झाल्यास प्रतीक्षासूचीतील उमेदवाराऐवजी त्याच्या कुटूंबातील अन्य पात्र वारसदाराची नाव अनुकंपाधारकांच्या प्रतीक्षासूचीमध्ये मूळ उमेदवाराच्या प्रतीक्षासूचीतील दिनांकाला घेतले जाईल. मात्र नव्या उमेदवाराचे वय सदर दिनांकाला १८ वर्षापेक्षा जास्त असावे. जर नव्या उमेदवाराचे वय मूळ उमेदवाराच्य प्रतीक्षासूचीतील दिनांकास १८ वर्षापेक्षा कमी असेल, नव्या उमेदवाराचे नाव त्याला ज्या दिवशी १८ वर्ष पूर्ण होतील त्या दिनांकास घेण्यात यावे. | दि.२०.०५.२०१५ |
| २२ | **अनुकंपा नियुक्ती हा कर्मचा-यांच्या कुटूंबाचा "वारसा हक्क"नाही -** | |
| | मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या विविध निर्णयानुसार अनुकंपा तत्वावरील नियुक्ती हा कर्मचा-यांच्या कुटूंबाचा "वारसा हक्क" होत नाही. तसेच विशिष्ट कालावधी उलटून गेल्यावर अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय होत नाही. | |
| २३ | **अनुकंपा नियुक्तीबाबतच्या अटी व शर्ती शिथील करण्याबाबत -** | |
| | शासन निर्णय, दि.२६.१०.१९९४ अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी दिवंगत शासकीय कर्मचा-यांच्या विधवांना केवळ गट-ड मधील पदावर नियुक्ती करावयाची असल्यास शैक्षणिक अर्हता शिथील करण्याबाबतची तरतूद आहे. याव्यतिरिक्त अन्य कोणतीही अट शिथील करण्यास शासन सक्षम नाही असा स्पष्ट उल्लेख शासन निर्णय, दि.२६/१०/१९९४ मध्ये करण्यात आला आहे.<br>अनुकंपा नियुक्तीबाबतच्या तरतूदी सुस्पष्ट असताना देखील ब-याच विभागांकडून कर्मचा-यांच्या कुटूंबियांना अनुकंपा नियुक्तीकरीता अटी शिथील करण्याकरीता सातत्याने प्रस्ताव प्राप्त होत असतात. अटी व शर्ती शिथील करण्याचे अधिकार शासनाला नसताना देखील अशा स्वरुपाचे प्रस्ताव विचारात घेण्यामुळे शासनाच्या आदेशांचे उल्लंघन होते आणि अनुकंपाच्या अटी शिथीलक्षम आहेत असा गैरसमज पसरतो. परंतु या अटी व शर्ती शिथीलक्षम नसल्याने ही सर्व प्रकरणे सामान्य प्रशासन विभागात अमान्य केली जातात. यास्तव नियमांना धरुन नसलेली प्रकरणे / शासन सक्षम नसलेली प्रकरणे विभागांनी सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करु नयेत. केवळ गट-ड मधील नियुक्तीसाठी कर्मचा-यांच्या विधवांना शैक्षणिक अर्हतेत जी शिथीलता दिली जाते ती वगळता अन्य कोणत्याही अटी व शर्ती शिथिल करण्याचे प्रस्ताव विभागांनी विचारात घेऊ नयेत.<br>अनुकंपा नियुक्तीबाबतचे प्रस्ताव विभाग / कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्यांची संपूर्ण शहानिशा संबंधित कार्यालयांनी करुन जर अटी व शर्तींची पूर्तता होत असेल तरच तो प्रस्ताव विचारात घ्यावेत अन्यथा ते प्रस्ताव त्यांच्या स्तरावर उचित उत्तर देऊन निकालात काढवेत. त्याकरीता प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग / शासनास सादर करण्याची आवश्यकता नाही. सर्व नियुक्ती अधिकारी / विभाग / कार्यालयांनी या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. | |

तरी मा.शासनाने पारित केलेल्या दि.२१ सप्टेंबर, २०१७ रोजीचे शासन निर्णयातील उपरोक्त अनुकंपा कारणास्तव नेमणूक देणेबाबतच्या विद्यमान तरतूदी संस्थान व्यवस्थापनासाठी लागू करणेससाठी व त्याप्रमाणे कार्यवाही करणेसाठी मा.विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.३७१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, अनुकंपा कारणास्तव नेमणूक देणेबाबतच्या नियमावलीचे मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य यांनी अवलोकन करावे, व व्यवस्थापन समितीच्या पुढील बैठकीत त्यांचे अभिप्राय सादर करावेत. त्यानंतर पुढील निर्णय घ्यावा, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक,सामान्य प्रशासन विभाग)**

---

विषय नं.२६ **महिन्द्रा ॲण्ड महिन्द्रा कंपनीची बोलेरो पिकअप FB MH PS या प्रकारचे ८ फुट लांबीची ०२ तसेच ९ फुट लांबीची ०३ अशी एकुण ०५ मालवाहतूक वाहने खरेदी करणेकामी येणा-या वाढीव खर्चास मान्यता मिळणे.**

प्रस्ताव- **महाराष्ट्र शासन २००४ ची अधिनियमन तरतुदः- कलम १७ (१)** मध्ये " राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे. आणि या अधिनीमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उदीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील." असे नमुद केलेले आहे.

२. कलम २१ ( १) मध्ये विश्वस्तव्यवस्थेचा निधी आयकर अधिनियम १९६१ च्या तरतुदींना अधिन राहुन समितीकडुन पुढील पैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल.

(ख) रुढी व प्रथानुसार मंदिरातील धार्मिक विधी व पुजा- अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

(ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

(ड) श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**प्रस्तावनाः**- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०१.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २६ अन्वये "प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे संस्थानमधील विविध विभागाच्या कामाकरीता महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीची पिकअप् FB MH PS या प्रकारची ८ फुट लांबीची २ व ९ फुट लांबीची ३ अशी एकुण ०५ मालवाहतुक वाहने विहित पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे ".

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी / शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थीक विषय इ छाननी करुन**

**अनुमान-** महाराष्ट्र शासनाचे सुधारीत खरेदी नियम पुस्तीकेतील ३.२.३ (दरपत्रकाच्या आधारे खरेदी) मध्ये, "कोणत्याही वाहनाचे दरकरार DGS&D कडे उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक / वितरक यांच्या दरपत्रकामार्फत देखील करता येईल. तथापि , मोटार वाहन (कार) खरेदी रु.१ कोटीपेक्षा जास्त असल्यास, ती ई-निवीदा प्रक्रियेमार्फतच करण्यात यावी." असे तरतूद आहे.

दि.०६.०२.२०१८ रोजीचे प्रशासकीय मान्यते नुसार जा.नं.एसएसएस/वाहन/६०५५/२०१८ दि.१०.०२.२०१८ चे दर मागणीचे पत्रान्वये महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीची पिकअप् FB MH PS या प्रकारची ८ फुट लांबीची २ व ९ फुट लांबीची ३ अशी एकुण ०५ मालवाहतुक वाहने खरेदी करणे कामी दि.२७.०२.२०१८ अखेर दरपत्रके मागविण्यात आली होती. तसेच अधिक स्पर्धात्मक दर प्राप्त होणे करीता सदरचे दरमागणी पत्र संस्थानचे संकेतस्थाळावर प्रसिध्द करण्यात आलेले होते. महिन्द्रा ॲण्ड महिन्द्रा कंपनीडून व या कंपनीचे विविध पुरवठादारांना फोन / ई-मेलव्दारे दरपत्रके मागविण्यात आलेले होते. परंतू दिनांक २७.०२.२०१८ पर्यंत एकच पुरवठादार यांचेकडून दरपत्रक प्राप्त झालेले होते.

दि.२८.०२.२०१८ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनीकडूनच फेर सुधारित दरमागणी पत्रास मुदतवाढ देणे कामी मान्यता देण्यात आलेली होती.

यानुसार जा.नं.एसएसएस/वाहन/६४१०/२०१८ दिनांक २८/०२/२०१८ अन्वये महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनी व कंपनीचे अधिकृत पुरवठादारांकडून दिनांक १०/०३/२०१८ अखेर फेर सुधारित मागणीदरपत्रके मागविण्यात आली होती. याकामी मुदतीत प्राप्त झालेली महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनीकडूनच सुधारित फेर मागणी दरपत्रके खरेदी समितीचे दिनांक १२/०३/२०१८ रोजीचे सभेत उघडण्यात आलेली असून त्यांनी दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ नं. | तपशिल | पुरवठादाराचे नांव | |
|---|---|---|---|
| | | **कॉर्नरस्टोन ॲटोमोबाईल्स, अधिकृत डिलर, साकुरी ता.राहाता.** | **महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि., ॲटोमोटिव्हे सेक्टर, मार्केटींग डिपार्टमेंट,** |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | कोदिवली , मुंबई. | | | |
| | | बोलेरो पिकअप FB MH PS या प्रकारातील ८ फुट हौदा असलेली | | बोलेरो बिग पिकअप FB MH PS या प्रकारातील ९ फुट हौदा असलेली | | बोलेरो पिकअप FB MH PS या प्रकारातील ८ फुट हौदा असलेली | | बोलेरो बिग पिकअप FB MH PS या प्रकारातील ९ फुट हौदा असलेली | |
| | | प्रति नग किंमत | २ नग किंमत | प्रति नग | ३ नग किंमत | प्रति नग किंमत | २ नग किंमत | प्रति नग | ३ नग किंमत |
| 1 | वाहनाची किंमत | ६,५८,२३७/- | | ६,६६,६४१/- | | ४,६८,४७७/- | ९,३६,९५४/- | ४,७३,९२९/- | १४,२१,७८७/- |
| 2 | CGST | | | | | १,३२,५७४/- | २,६५,१४८/- | १,३४,१००/- | ४,०२,३००/- |
| 3 | CRTM | ९००.०० | | ९००.०० | | | | | |
| 4 | R.S.A. | १,२२०/- | | १,२२०/- | | | | | |
| 5 | Logistic/ Transportation | २,३६०/- | | २,३६०/- | | ५,०००/- | १०,०००/- | ५,०००/- | १५,०००/- |
| 6 | Insurance | ३४,२७३/- | | ३४,४८९/- | | १७,६९३/- | ३५,३८६/- | १७,८५६ | ५३,५६८/- |
| 7 | Grand Total (1+7) | ६,९६,९९०/- | १३,९३,९८०-/ | ७,०५,६१०/- | २१,१६,८३०/- | ६,२३,७४४/- | १२,४७,४८८/- | ६,३०,८८५/- | १८,९२,६५५/- |
| | Remark | | | | | | L1 | | L1 |

**<u>विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-</u>** महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनीचे नियमानुसार जिल्हा निहाय डिलर त्या–त्या जिल्हात नवीन वाहनांचा पुरवठा करतात. त्यामुळे नगर जिल्हाचे डिलर कॉर्नरस्टोन यांचे दरपत्रक प्राप्त आहे. अधिक स्पर्धात्मक दर प्राप्त होणे करीता सदरचे पत्र संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले होते. तसेच महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा या उत्पादक कंपनीकडून थेट दरपत्रके मागविण्यात आलेली होती. तसेच महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनीचे कार्यालयातून दरपत्रक प्राप्त झालेले होते. उत्पादक कंपनीचे दर डिलरचे दरापेक्षा कमी आहे.तथापि कंपनीचे दरपत्रकात दिलेल्या दराव्यतिरीक्त वेअरहाऊस ते डिलीव्हरी पॉईटचा ट्रान्सपोर्ट चार्जेस वेगळा द्यावा लागेल अशी अट होती.

दि.१२.०३.२०१८ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उपरोक्त प्रमाणे महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनी लि.ॲटोमोटिव्ह सेक्टर मार्केटींग डिपार्टमेंट, कांदीवली – मुंबई यांचे दर स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरचा विषय दि.२२/०३/२०१८ रोजीचे मा.उपसमितीचे सभेपुढे विषय क्रमांक ०४ नुसार महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनी लि.ॲटोमोटिव्ह सेक्टर मार्केटींग डिपार्टमेंट, कांदीवली – मुंबई यांचे निम्नतम दर स्विकारणेत येवून महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनीची बोलेरो पिकअप् FB MH PS या प्रकारचे ८ फुट लांबीची ०२ नग तसेच ९ फुट लांबीची ०३ नग अशी एकुण ०५ नग मालवाहतूक वाहने खरेदी करणे कामी रक्कम रु.३१,४०,१४३/- ( जी.एस.टी व विमा सह ) मान्यता देण्यात आली होती.

त्यानुसार महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा लि.ॲटोमोटिव्ह सेक्टर मार्केटींग डिपार्टमेंट, कांदीवली – मुंबई यांना जा.नं.एसएसएस/वाहन/६९३५/ २०१८ दि.२४.०३.२०१८ नुसार महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनीची बोलेरो पिकअप् FB MH PS या प्रकारचे ८ फुट लांबीची ०२ नग तसेच ९ फुट लांबीची ०३ नग अशी एकुण ०५ नग मालवाहतूक वाहने खरेदी करणे कामी कार्यादेश देण्यात आलेला होता. त्याची तपशिलवार तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.न. | प्रकार | एका वाहनाची किंमत | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वाहन किंमत | GST | Logistic/ Transportation | Insurance | एकुण | खरेदी नग | एकुण किमंत |
| 1 | बोलेरो पिकअप FB MH PS BS - IV या प्रकारातील ८ फुट हौदा असलेली | ४,६८,४७७/- | १,३२,५७४/- | ५,०००/- | १७,६९३/- | ६,२३,७४४/- | ०२ | १२,४७,४८८/- |
| 2 | बोलेरो बिग पिकअप FB MH PS BS - | ४,७३,९२९/- | १,३४,१००/- | ५०००/- | १७,८५६/- | ६,३०,८८५/- | ०३ | १८,९२,६५५/- |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | IV या प्रकारातील ९ फुट हौदा असलेली (१.२५ टन क्षमतेची) | | | | | | | |
| | एकुण ( ०५ मालवाहतुक खरेदी किमंत ) | | | | | | | ३१,४०,१४३/- |

त्यानुसार जितेंद्र मोटर्स प्रा.लि.नाशिक यांनी महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनीची बोलेरो पिकअप् FB MH PS या प्रकारचे ८ फुट लांबीची ०२ नग तसेच ९ फुट लांबीची ०३ नग अशी एकुण ०५ नग मालवाहतूक वाहने त्यांचेकडे उत्पादीत कंपनीने पाठविले असलेचा निरोप आलेने दि.१२.०५.२०१८ रोजी नाशिक येथे समक्ष गेलो असता, त्यांचेकडे महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनीची प्राप्त ईनव्हाईस नुसार बोलेरो पिकअप् FB MH PS या प्रकारचे ८ फुट लांबीची ०२ नग करीता प्रति वाहन रु.६,०२७/- तसेच ९ फुट लांबीची ०३ नग मालवाहतूक खरेदी कामी प्रति वाहन रु.६,२७९/- मात्र इतकी वाहनांची उत्पादीत किंमतीत वाढ झालेचे निर्देशनास आलेले आहे.

महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनीचे वाहनांमध्ये वाढ झालेल्या किमंतीची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.न. | प्रकार | कार्यादेशातील किमंत जीएसटी + मुळ किमंत ) व ट्रान्सपोर्टेशनसह | वाढीव किमंत ( मुळ किमंत जीएसटी सह) | प्रति वाहन फरक | वाहन संख्या | एकुण फरक सह किमंत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | बोलेरो पिकअप FB MH PS BS - IV या प्रकारातील | ६,०६०५१/- | ६,१२,०७८/- | ६,०२७- | ०२ | १२,०५४/- |
| २. | बोलेरो बिग पिकअप FB MH PS BS - IV या प्रकारातील ९ फुट हौदा | ६,१३,०२९/- | ६,१९,३०८/- | ६,२७९/- | ०३ | १८,८३७/- |
| | **०५ वाहनाची एकुण वाढीव फरकाची किमंत** | | | | | ३०,८९१/- |

तथापि उपरोक्त ०५ महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनी मालवाहतूक खरेदी करणे कामी संबंधीत वाहनाचे विमा काढणे कामी प्राप्त ईनव्हाईस बीलामध्ये स्वतंत्र रक्कम आदा करावी लागेल. याबाबत महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा इन्शूरंन्स ब्रोकरर्स यांनी दि.१५.०५.२०१८ रोजी चे मेल नुसार वाहनाचे किमंतीतील वाढ व थर्ड पार्टी प्रिमियम मधील घट विचारता घेऊन सुधारित विमा दर दिलेले आहेत. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| कार्यादेशातील रक्कम | | | | | सुधारित दरानुसार रक्कम | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.न. | प्रकार | प्रति वाहन | नग | एकुण | प्रति वाहन | नग | एकुण |
| १. | बोलेरो पिकअप FB MH PS BS - IV या प्रकारातील ८ फुट हौदा असलेली | १७,६९३/- | ०२ | ३५,३८६/- | १७,०७४.०० | ०२ | ३४,१४८/- |
| २. | बोलेरो बिग पिकअप FB MH PS BS - IV या प्रकारातील ९ फुट हौदा असलेलीटन २५.१ ) क्षमतेची) | १७,८५६/- | ०३ | ५३,५६८/- | १७,१७२.०० | ०३ | ५१,५१६/- |
| | | **एकुण** | ०५ | ८८,९५४/- | | ०५ | ८५,६६४/- |

सदरचे दरांचा विचार करता कार्यादेशात विम्याकरीता रु.८८,९५४.०० रक्कम होती. सुधारित दरात घट होऊन ती रक्कम रु.८५,६६४.०० मात्र झालेली आहे. म्हणजेच ती रक्कम रु.३,२९०.०० मात्रने कमी झालेली आहे. नवीन दरानुसार महिंन्द्रा इन्शुरंन्स ब्रोकरर्स, लि.महिंन्द्रा ग्रुप कंपनी मुंबई यांना विम्याची रक्कम रु.८५,६६४.०० मात्र RTGS व्दारे अग्रीम स्वरुपात द्यावी लागेल. विमा पॉलिसी मिळालेनंतर सदर रक्कम जमा नांवे करण्यात येतील.

तरी याकामी खालील प्रमाणे कार्यवाही करावी लागेल.

१. उपरोक्त प्रमाणे कार्यादेशातील नमुद केलेली एकुण रक्कम रु.३१,४०,१४३.०० मधुन विमा करणे कामी रु.८८,९५४.०० वजा करुन उर्वरित रक्कम रु.३०,५१,१८९.०० मधील महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा लि.ॲटोमोटिव्ह सेक्टर मार्केटींग डिपार्टमेंट, कांदीवली – मुंबई यांना RTGS व्दारे आदा करावी लागेल.

२. सदर वाहनांचे विम्या करीता महिंन्द्रा इन्शुरंन्स ब्रोकरर्स, लि.महिंन्द्रा ग्रुप कंपनी मुंबई यांचे मागणी नुसार Future Generali India Insurance Company Ltd. यांना सुधारित दरानुसार आलेली रक्कम रु.८५,६६४.०० मात्र RTGS व्दारे आदा करावी लागेल.

३. उपरोक्त वाहनांचे वाढीव किमंत रु.३०,८९१.०० मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा लि.ॲटोमोटिव्ह सेक्टर मार्केटींग डिपार्टमेंट, कांदीवली – मुंबई यांना RTGS व्दारे आदा करावी लागेल

**मागणीः-** उपरोक्त प्रमाणे ५ मालवाहतुक वाहने खरेदी करणे कामी वाहनाची वाढीव रकमेसह एकूण किंमत रु ३०, ८२, ०८०/- व विम्याकरीता रु.८५६६४/- असा एकूण ३१,६७,७४४/-खर्च होणार आहे.

वरील संस्थानकरीता ०५ मालवाहतूक वाहने खरेदी करीता कार्यादेशातील वाहनाची किमंत विम्या व्यतीरीक्त रु.३०,५१,१८९.०० अशी होती. तदंनतर वाहनांचे उत्पादीत किमंतीत वाढ झालेने कंपनीचे ईनव्हाईस नुसार सदर रकमेत रु ३०,८९१.०० ने वाढ होऊन ती एकुण रु. ३०,८२,०८०.०० अशी झालेली आहे.

सदरचे वाढीव झालेल्या खर्चास रक्कम रु ३०८९१.०० व सदर रक्कम महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा लि.ॲटोमोटिव्ह सेक्टर मार्केटींग डिपार्टमेंट, कांदीवली – मुंबई यांना RTGS व्दारे आदा करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.३७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, महिन्द्रा ॲण्ड महिन्द्रा कंपनीची बोलेरो पिकअप FB MH PS या प्रकारचे ८ फुट लांबीची ०२ तसेच ९ फुट लांबीची ०३ अशी एकुण ०५ मालवाहतूक वाहने खरेदी करणेकामी येणाऱ्या वाढीव रक्कम रु.३०८९१/-मात्र सह एकूण खर्च रु. ३०,८२,०८०/- व विम्याकरीता रक्कम रु. ८५,६६४/- असे एकूण रक्कम रु. ३१,६७,७४४/- मात्र खर्चास व सदरची रक्कम महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा लि. ॲटोमोटिव्ह सेक्टर मार्केटींग डिपार्टमेंट, कांदीवली–मुंबई यांना RTGS व्दारे अदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,वाहन विभाग)**

---

**विषय नं.२७** **प्लॅस्टिक खुर्च्या खरेदी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे विविध विभागांकरीता प्लॅस्टिक खुर्च्या खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | PVC/Plastic Molded Chair with arms rest (As per Technical Specifications given in the Tender Document Page No.2) |
| ०२ | मागणी | 1350 नग |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | १०.०४.२०१८ ते २४.०४.२०१८ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट, ई-मेल व पुरवठाधारकांना दुरध्वनीव्दारे. |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | संस्थानकडे उपलब्ध असलेल्या ०७ ई-मेल आय डी वर |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दिनांक – १०.०४.२०१८<br>टेक्निकल बीड – ०५.०५.२०१८<br>कमर्शियल बीड – १५.०५.२०१८ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०७ (सात) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०७ (सात) |

| | | |
|---|---|---|
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | होय. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का. | होय. |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर – | |

| अ.नं. | निविदाकाराचे नाव | सादर केलेले दर प्रती नग रु. | स्थिती |
|---|---|---|---|
| १ | **सह्याद्री स्वयं रोजगार सेवा संस्था, अकोले** | 484.00 | L1 |
| २ | प्रायमा प्लॅस्टिक्स, लि., मुंबई | 499.14 | L2 |
| ३ | मुईब्लेस स्टुडीओ, जळगाव | 569.00 | L3 |
| ४ | निलकमल लिमीटेड, मुंबई | 610.00 | L4 |
| ५ | समर्थ एंटरप्रायजेस, नाशिक | 698.00 | L5 |
| ६ | टेक्नोक्राफ्ट असोसिएट्स, मुंबई | 930.00 | L6 |
| ७ | हॉलीवुड फर्निचर गॅलरी, कशेली, ता.भिवंडी | 980.00 | L7 |

१३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर –

| अ.नं. | वर्ष | परिमाण | दर प्रती सेट रु. |
|---|---|---|---|
| १ | सदर स्पेसिफिकेशन्सप्रमाणे खुर्च्या प्रथमच खरेदी करण्यात येत आहेत. | -- | -- |

१४ मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल –

| अ.नं. | वर्ष | खर्च परिमाण |
|---|---|---|
| -- | - | - |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | - |
| १६ | मागील खरेदी दर | -- |
| १७ | मागील पुरवठादार | -- |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | रू.४८४ प्रती नग |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | सह्याद्री स्वयंरोजगार सेवा संस्था, अकोले |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का. | होय. |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी, मा. उपकार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अंदाजे रू.५७८/- प्रती नग (रू.४८४ प्रती नग निविदा दर) | |

| | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी/जास्त |
|---|---|---|---|---|
| २३ | रु. -- | रु. -- | रु. -- | -- |

२४. संक्षिप्त टीप –बांधकाम, साईआश्रम भक्तनिवास व सिनीयर कॉलेज या विभागांचे मागणीप्रमाणे १३५० नग प्लॅस्टिक खुर्च्या मागणीसाठी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. याकामी Gem Portal वरुन टेक्निकल स्पेसिफिकेशन तयार करण्यात आले होते.

सदर ई-निविदेमध्ये ७ निविदाधारकांनी भाग घेतला होता याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या सात निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा दि. १५.०५.२०१८ रोजी उघडण्यात आल्या होत्या. यामध्ये सह्याद्री स्वयंरोजगार सेवा संस्था, अकोले यांचे दर न्युनतम आहेत.

तरी न्युनतम निविदाधारक मे. सह्याद्री स्वयंरोजगार सेवा संस्था, अकोले यांचेशी निविदेत दिलेल्या न्युनतम दरांबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.३७३ **यावेळी निम्नतम दरधारक मे. सह्याद्री स्वयंरोजगार सेवा संस्था, अकोले यांचे प्रतिनिधी चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभागांकरीता प्लॅस्टिक खुर्च्या खरेदीकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे.सह्याद्री स्वयंरोजगार सेवा संस्था, अकोले यांचे निम्नतम दर रक्कम रू.४८४/- मात्र प्रती नग स्विकारणेत येऊन त्यांना १३५० नग खुर्च्यांसाठी पुरवठा आदेश देण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.२८** **संस्थान कर्मचारी गणवेष सुटींग, शर्टींग, पेटीकोट कापड खरेदी ई-निविदा प्राप्त निम्नतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे कर्मचा-यांना गणवेश सुटींग, शर्टिंग, पेटीकोट कापड खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | संस्थान कर्मचारी गणवेश सुटींग, शर्टिंग, पेटीकोट कापड |
| ०२ | मागणी | खाली अ.नं.१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | १२.०४.२०१८ ते ०३.०५.२०१८ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट, ई-मेल. |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | संस्थानकडे उपलब्ध असलेल्या ०८ ई-मेल आय डी वर |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक | दिनांक – १२.०४.२०१८<br>टेक्निकल बीड – १५.०५.२०१८<br>कमर्शियल बीड – २३.०५.२०१८ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०४ (चार) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०२ (दोन) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | नमुने मागविलेले नाहीत. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का. | ०३ निविदाधारकांनी भरलेली आहे. तर ०१ निविदाधारकांना खरेदी नियमावलीतील तरतुदीनुसार सवलत आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का. | -- |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर – | |

| Sr.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | DAMODARLAL TOSHNIWAL | | MAHARSHTRA STATE POWERLOOMS CORPORATION LTD. | | स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Amount | Rate | Amount | |
| 1.00 | सुटिंग कापड (हाफ सफारी) - (उपकार्यकारी अभियंता, विद्युत पर्यवेक्षक, सहाय्यक अभियंता, जनसंपर्क अधिकारी, कृषी अधिकारी, प्र.लेखाधिकारी, अधिक्षक, प्र.अधिक्षक व व.लिपीक, वरिष्ठ लेखापाल, साईलीला सहाय्यक संपादक, तांत्रीक सहाय्यक, कनिष्ठ अभियंता, उप अभियंता इ.) Total Number Of | 390 | Metres | 227.00 | 88530.00 | 215.00 | 83850.00 | L1 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Employees- 52 | | | | | | | |
| 2.00 | सुटिंग कापड - (लिपीक टंकलेखक) Total Number Of Employees-175 | 438 | Metres | 227.00 | 99426.00 | 215.00 | 94170.00 | L1 |
| 3.00 | शर्टिंग कापड - (लिपिक टंकलेखक) Total Number Of Employees-175 | 875 | Metres | 92.00 | 80500.00 | 80.00 | 70000.00 | L1 |
| 4.00 | सुटिंग कापड - रेग्युलर खाकी (सुरक्षा निरीक्षक व पहारेकरी) Total Number Of Employees-128 | 960 | Metres | 227.00 | 217920.00 | 215.00 | 206400.00 | L1 |
| 5.00 | सुटिंग कापड - हाफ सफारी (मदतनीस/शिपाई) Total Number Of Employees-721 | 5408 | Metres | 227.00 | 1227616.00 | 215.00 | 1162720.00 | L1 |
| 6.00 | सुटिंग कापड - हाफ सफारी (सफाई कर्मचारी) Total Number Of Employees -133 | 998 | Metres | 227.00 | 226546.00 | 215.00 | 214570.00 | L1 |
| 7.00 | सुटिंग कापड - हाफ सफारी (वॉर्डबॉय / मदतनीस) Total Number Of Employees-71 | 533 | Metres | 227.00 | 120991.00 | 215.00 | 114595.00 | L1 |
| 8.00 | सुटिंग कापड (तांत्रीक कर्मचारी व नवीन आलेले फायर सेप्टी कर्मचारी) Total Number Of Employees-15 | 38 | Metres | 227.00 | 8626.00 | 215.00 | 8170.00 | L1 |
| 9.00 | शर्टिंग कापड (तांत्रीक कर्मचारी व नवीन आलेले फायर सेप्टी कर्मचारी) Total Number Of Employees-15 | 75 | Metres | 92.00 | 6900.00 | 80.00 | 6000.00 | L1 |
| 10.00 | पेटीकोट (परकर) कापड १०० % कॉटन पॉपलीन Total Number Of Employees-119 | 595 | Metres | 92.00 | 54740.00 | 65.00 | 38675.00 | L1 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकुण | | 2131795.00 | | 1999150.00 | |

| | |
|---|---|
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर – |

| **अ.नं.** | **वर्ष** | **परिमाण** | **दर प्रती सेट रु.** |
|---|---|---|---|
| १ | सदर तांत्रिक स्पेसिफिकेशन्सप्रमाणे गणवेश कापड प्रथमच खरेदी करण्यात येत आहेत. | -- | -- |

| | |
|---|---|
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल – |

| अ.नं. | वर्ष | खर्च परिमाण |
|---|---|---|
| -- | - | - |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | - |
| १६ | मागील खरेदी दर | -- |
| १७ | मागील पुरवठादार | -- |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | **वरील अ.नं.१२ मध्ये नमूद केलेप्रमाणे** |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | महाराष्ट्र स्टेट पॉवरलूम कार्पोरेशन लि., मुंबई |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का. | होय. |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी, मा. उपकार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील -------- | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३ | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी/जास्त |
| | रु. -- | रु. -- | रु. -- | -- |

२४. संक्षिप्त टीप– संस्थानचे अधिकारी व कर्मचा-यांकरीता गणवेश सुटींग, शर्टींग व पेटीकोट कापड खरेदीकामी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. याकामी ई-निविदेमध्ये गणवेश कापडासाठी टेक्निकल स्पेसिफिकेशन देण्यात आले होते. यामध्ये न्युनतम दरधारकाकडून संस्थानने ई-निविदेमध्ये नमूद केलेले स्पेसिफिकेशन्सप्रमाणे कापडाचे नमुने लॅब रिपोर्टसह घ्यावयाचे आहेत व सदर नमुने अंतिम केलेनंतर पुरवठा आदेश दयावयाचा आहे.

सदर ई-निविदेमध्ये ०४ निविदाधारकांनी भाग घेतला होता. याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या २ निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा दि. २३.०५.२०१८ रोजी उघडण्यात आल्या होत्या. यामध्ये महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे दर वर नमूद केलेप्रमाणे १० आयटेम्ससाठी न्युनतम आहेत. सदर न्युनतम दराप्रमाणे गणवेश सुटींग, शर्टींग व पेटीकोट कापड खरेदी करण्यासाठी एकुण रू.१९,९९,१५०/- मात्र खर्च येईल.

तरी न्युनतम निविदाधारक मे.महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेकडून गणवेश सुटींग, शर्टींग व पेटीकोट कापड खरेदीकामी ऑनलाईन निविदेत दिलेल्या वरील नमूद न्युनतम दराबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३७४** **यावेळी निम्नतम दरधारक मे.महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे प्रतिनिधी चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे कर्मचा-यांना गणवेश सुटींग, शर्टींग, पेटीकोट कापड खरेदीकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे.महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दर स्विकारणेत यावेत तसेच ई-निविदेमध्ये नमूद केलेले स्पेसिफिकेशन्स प्रमाणे कापडाचे नमुने लॅब रिपोर्टसह घेण्यात यावेत व सदर नमुने अंतिम केल्यानंतर त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक,खरेदी विभाग)**

---

**विषय नं.२९ २ सीटर बँचेस खरेदी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे शैक्षणिक संकुल व नवीन सिनीयर कॉलेज करीता २ सिटर बेंचेस खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | २ सिटर बेचेस |
| ०२ | मागणी | १०९० नग |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | १३.०४.२०१८ ते ०९.०५.२०१८ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट, ई-मेल. |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | संस्थानकडे उपलब्ध असलेल्या ०६ ई-मेल आय डी वर |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक | दिनांक – १३.०४.२०१८<br>टेक्निकल बीड – १५.०५.२०१८<br>कमर्शियल बीड – २३.०५.२०१८ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | १५ (पंधरा) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | १४ (चौदा) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | नमुने मागविलेले नाही. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का. | १० निविदाधारकांनी भरलेली आहे. तर ०४ निविदाधारकांना खरेदी नियमावलीतील तरतुदीनुसार सवलत आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का. | -- |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर – | |

| अ.नं. | निविदाकाराचे नाव | सादर केलेले दर प्रती नग रु. | स्थिती |
|---|---|---|---|
| १ | **आकाश फर्निटेक प्रा.लि., हिंगणा, नागपुर** | **३,९२५.००** | L1 |
| २ | फायनेक्स किचन प्रा.लि., नाशिक | ४,३९९.०० | L2 |
| ३ | स्टिल फॅक्ट प्रा.लि., पुणे | ४,६५७.०० | L3 |
| ४ | सागर फॅब्रिकेशन ॲण्ड स्प्रे प्रिंटीग., बीड | ५,४५०.०० | L4 |
| ५ | गौरी आर्ट्स, मालेगांव | ५,४९०.०० | L5 |
| ६ | समर स्टील इंडस्ट्रीज, जळगांव | ५,९९९.०० | L6 |
| ७ | निलकमल लि., मुंबई | ६,१९१.०० | L7 |
| ८ | आय.व्ही एंटरप्रायजेस, कोल्हापुर | ६,२७६.०० | L8 |
| ९ | टेक्नोक्राफ्ट असोसिएट्स, मुंबई | ६,८४५.०० | L9 |
| १० | इरॉस इंडस्ट्रीज, हिंगणा, नागपुर | ६,९०३.०० | L10 |
| ११ | साई इंजिनिअरींग वर्क्स, वैजापुर | ७,७५१.०० | L11 |
| १२ | समता किचन इंटिरिअर प्रॉडक्ट, धुळे | ८,१९६.०० | L12 |
| १३ | स्वस्तिक इंडस्ट्रीअल कार्पोरेशन, औरगांबाद | ८,३७०.०० | L13 |
| १४ | श्री स्वामी समर्थ इंडस्ट्रीज, नाशिक | ८,४५०.०० | L14 |

१३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर –

| अ.नं. | वर्ष | परिमाण | दर प्रती सेट रु. |
|---|---|---|---|
| १ | सदर स्पेसिफिकेशन्सप्रमाणे २ सिटर बेंचेस प्रथमच खरेदी करण्यात येत आहेत. | -- | -- |

१४ मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल –

| अ.नं. | वर्ष | खर्च परिमाण |
|---|---|---|
| -- | - | - |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | - |
| १६ | मागील खरेदी दर | -- |
| १७ | मागील पुरवठादार | -- |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | **रू.३,९२५/- प्रती नग** |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | आकाश फर्निटेक प्रा.लि., |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का. | होय. |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी, मा. उपकार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील -------- | |
| २३ | मागील खरेदी सध्याचे प्राप्त दर फरक % ने कमी/जास्त | |
| | रु. -- रु. -- रु. -- -- | |

२४. संक्षिप्त टीप – शैक्षणिक संकुल व नवीन सिनीयर कॉलेजकरीता १०९० नग २ सिटर बेंचेस मागणीसाठी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. याकामी आय.टी.आय विभागाने टेक्निकल स्पेसिफिकेशन दिले होते. त्याचा ई-निविदेमध्ये समावेश केलेला होता. यामध्ये न्युनतम दरधारकाकडून संस्थानने ठरवुन दिलेले मटेरिअल व स्पेसिफिकेशन्स प्रमाणे २ बेंच प्रथम तयार करून घ्यावयाचे आहेत व सदर नमुना बेंच आय.टी.आय विभागाकडून मान्य केलेनंतर पुरवठा आदेश दयावयाचा आहे.

सदर ई-निविदेमध्ये १५ निविदाधारकांनी भाग घेतला होता याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या चौदा निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा दि. २३.०५.२०१८ रोजी उघडण्यात आल्या होत्या. यामध्ये आकाश फर्निटेक प्रा.लि., हिंगणा, नागपुर यांचे दर न्युनतम आहेत. २ सिटर बेंचेस न्युनतम दर प्रती नग रू.३,९२५/- प्रमाणे एकुण १,०९० नग बेंचेस खरेदीकामी एकुण रू.४२,७८,२५०/- मात्र खर्च येईल.

तरी न्युनतम निविदाधारक मे. आकाश फर्निटेक प्रा.लि., हिंगणा, नागपुर यांचे २ सिटर बेंच प्रती नग **रू.३,९२५/-** या ऑनलाईन निविदेत दिलेल्या न्युनतम दराबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.३७५ **यावेळी निम्नतम दरधारक आकाश फर्निटेक प्रा.लि., हिंगणा, नागपुर यांचे प्रतिनिधी चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे शैक्षणिक संकुल व नवीन सिनीयर कॉलेज करीता २ सिटर बेंचेस खरेदीकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक आकाश फर्निटेक प्रा.लि., हिंगणा, नागपुर यांचे निम्नतम दर रक्कम रू.३,९२५/-मात्र प्रती नग स्विकारणेत यावेत, तसेच संस्थानने ठरवुन दिलेले मटेरिअल व स्पेसिफिकेशन्स प्रमाणे २ बेंच प्रथम त्यांचेकडून तयार करून घेण्यात यावे व सदर नमुना बेंच आय.टी.आय विभागाकडून मान्य केल्यानंतर संबधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,खरेदी विभाग)**

---

विषय नं.३० **संस्थान कर्मचा-यांसाठी समुह जनता अपघात विमा योजना लागू करणे.**

प्रस्ताव- गुंतागुंतीची दिनचर्या, वेगवान प्रवास व त्यामुळे वाढते अपघात यामुळे सर्वसाधारणतः जीवन असुरक्षित होत आहे. त्यातच एकत्रीत कुटुंब पध्दतीचे विघटन होत असुन कमवत्या व्यक्तीचे व पर्यायाने संस्थान कर्मचा-यांचे कुटुंब प्रमुख म्हणुन वैयक्तीक जबाबदारी अधिकाधिक वाढत आहे. वाढत्या जबाबदा-या पूर्ण करण्यासाठी होणा-या धावपळीमुळे या कर्मचा-यांची जोखीम ही वाढत आहे. कर्मचा-यांचे कुटुंबामध्ये कुटुंबप्रमुख व कमवताघटक बहुतेक तो स्वतः आहे. त्यामुळे कर्मचा-याला व्यक्तीगत कुटुंबाच्या भविष्याची मोठी काळजी असतांना ती पुरेशा तन्मयतेने व उत्साह एकाग्रतेने त्याला नेमून दिलेल्या कामामध्ये सहभागी होऊ शकणार नाही. त्यामुळे त्याच्या कुटुंबाच्या भविष्यकालीन आर्थिक सुरक्षिततेविषयी काही योजना राबविणेआवश्यक ठरते.

याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.३.२०१५ रोजीच्या सभेतील निर्णयान्वये युनायटेड इंडिया इन्शुरेन्स कं.लि., शाखा राहुरी यांचेकडे २१८४ संस्थान कायम कर्मचा-यांसाठी दि.१८.५.२०१८ ते दि.१७.५.२०१८ या ३ वर्षे कालावधीसाठी प्रत्येकी रु. एक लाख विमा संरक्षणसाठी समुह जनता अपघात विमा

उतरविलेला आहे, त्यापोटी एकुण रु. २,०९,६५५/- इतका विमा हप्ता भरण्यात आलेला होता, त्याची मुदत दि.१७.०५.२०१८ रोजी संपुष्टात येत आहे.

आता २०३३ संस्थान कायम कर्मचा-यांसाठी दि.१८.०५.२०१८ ते दि.१७.०५.२०१८ या ३ वर्षे कालावधीसाठी प्रत्येकी रु. एक लाख विमा संरक्षणसाठी समुह जनता अपघात विमा लेखाशाखा विभागामार्फत उतरविता येईल.

त्यानुसार त्यास राष्ट्रीयकृत विमा कंपन्यानी त्यांचे न्युनतम दर सिलबंद लिफाफयामध्ये विहित मुदतीत संस्थानला सादर केलेले होते. सादर केलेली दरपत्रकांची सिलबंदपाकीटे दि.०५.०५.२०१८ रोजीच्या मा. उपजिल्हाधिकारी सो. यांचे समक्ष उघडण्यात आली. राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांनी त्यांचे न्युनत्तम दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला असुन त्याचा तपशिल पुढील प्रमाणे.

| अ.नं. | विषय | राष्ट्रीयकृत विमा कंपनी | प्रति व्यक्ती वार्षिक विमा रक्कम | वार्षक विमा प्रिमीयम रक्कम | पॉलिसीप्रकार (कालावधी) |
|---|---|---|---|---|---|
| १ | संस्थान कर्मचा-यांसाठी समूह जनता अपघात विमा योजना लागू करणेबाबत | दि. न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी लि. शाखा श्रीरामपूर-१ | ३०/- L - 1 | १,००,०००/- | १ वर्ष (प्रत्येक व्यक्ती ) विमा क्लेम रु. १ लाख |
| २ | | नेशनल इन्श्योरेन्स कंपनी लि. शाखा – कोपरगांव | १५०/- L - 2 | १,००,०००/- | ३ वर्षे (प्रत्येक व्यक्ती ) विमा क्लेम रु. १ लाख |
| ३ | | दि. ओरीएंटलइ इन्शुरन्स कंपनी , शाखा – कोपरगांव | १६२/- L - 3 | १,००,०००/- | ३ वर्षे (प्रत्येक व्यक्ती ) विमा क्लेम रु. १ लाख |
| ४ | | दि. न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी लि. शाखा श्रीरामपूर-२ | ६०/- | १,००,०००/- | १ वर्ष (प्रत्येक व्यक्ती ) विमा क्लेम रु. १ लाख |

संस्थान कायम कर्मचा-यांसाठी समुह जनता अपघात विमा योजना लेखाशाखा विभागामार्फत उतरविता येईल.

उपरोक्त दरपत्रकांचा तुलनात्मक विचार करता संस्थान कर्मचा-यांसाठी समुह जनता अपघात विमा उतरविणेकामी दि. न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी लि.शाखा श्रीरामपूर-१ यांचे दर न्युनतम असून २०३३ कर्मचा-यांचे तीन वर्षासाठी दि.१८/५/२०१८ ते दि. १७/५/२०२१ या कालावधी करीता एकुण रु.१,८२,९७०/- इतका खर्च येईल.

तरी दि.न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी लि.शाखा श्रीरामपूर-१ यांचे कडून कर्मचारी समुह जनता अपघात विमा उतरविणे व याकामी येणारे रु. १,८२,९७०/- चे खर्चास मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी लि.शाखा श्रीरामपूर-१ यांचे कडून कर्मचारी समुह जनता अपघात विमा उतरविणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.१,८२,९७०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- कामगार अधिकारी,कामगार विभाग)**

---

**विषय नं.३१** **माहे एप्रिल-२०१७ ते मार्च-२०१८ अखेर लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

**प्रस्ताव-** संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत पुरविण्यात आलेल्या कुशल ,अकुशल व सुरक्षा कामगारांचा प्रतिदीन व श्रमदिन संख्येचे विभागनिहाय तपशिलवार तक्ते प्रत्येक महिन्यास मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेसाठी सादर करणेत यावेत व आर्थिक वर्षाचे शेवटी उपरोक्त विषयांचा एकत्रित अहवाल मा.व्यवस्थापन समिती समोर नोंद घेण्यासाठी सादर करणेत यावा बाबत मा.विश्वस्तांचे सूचनेनुसार उपरोक्त संदर्भीय ठरावान्वये मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त मा.विश्वस्तांचे सूचनेनुसार **माहे एप्रिल-२०१७ ते माहे मार्च-२०१८** अखेर या आर्थिक वर्षात दरमहा संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत पुरविण्यात आलेल्या कुशल ,अकुशल व सुरक्षा कामगारांचा प्रतिदीन व श्रमदिन संख्येचा तपशिल खालीलप्रमाणे देत आहोत.

| **अ.नं** | **कालावधी** | **अकुशल** | | **कुशल** | | **एकूण** | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रतिदिन संख्या | श्रमदिन संख्या | प्रतिदिन संख्या | श्रमदिन संख्या | प्रतिदिन संख्या | श्रमदिन संख्या |
| ०१ | **एप्रिल- २०१७** लेबर | ११९६ | २७८४२ | ६४० | १३७५५ | १८३६ | ४१५९७ |
| | सिक्युरीटी | ७३६ | १९४९५ | ७२ | ११९० | ८०८ | २०६८५ |
| ०२ | **मे-२०१७** लेबर | १२०१ | २७९४७ | ६४० | १३४७७ | १८४१ | ४१४२४ |
| | सिक्युरीटी | ७५६ | १८८८४ | ७२ | १२५९ | ८२८ | २०१४३ |
| ०३ | **जून- २०१७** लेबर | १२०२ | २७८७४ | ६४० | १३२०७ | १८४२ | ४१०८१ |
| | सिक्युरीटी | ७५६ | १८७२१ | ७२ | १३३० | ८२८ | १९९५१ |
| ०४ | **जूलै- २०१७** लेबर | १२०३ | २८३७४ | ६४० | १३७६६ | १८४३ | ४२१४० |
| | सिक्युरीटी | ७५६ | १९६२४ | ७२ | १३६० | ८२८ | २०९८४ |
| ०५ | **ऑगष्ट- २०१७** लेबर | १२०३ | २७८८४ | ६४१ | १३६०४ | १८४४ | ४१४८८ |
| | सिक्युरीटी | ७५६ | १९२१३ | ७२ | १३४३ | ८२८ | २०५५६ |
| ०६ | **सप्टेंबर- २०१७** लेबर | १२०३ | २७८५३ | ६४१ | १३३०३ | १८४४ | ४११५६ |
| | सिक्युरीटी | ७६४ | १९४८९ | ७२ | १२८५ | ८३६ | २०७७४ |
| ०७ | **ऑक्टोंबर- २०१७** लेबर | ११५२ | २७१०८ | ६४१ | १३०७९ | १७९३ | ४०१८७ |
| | सिक्युरीटी | ७६४ | १८९९९ | ७२ | १३९३ | ८३६ | २०३९२ |
| ०८ | **नोव्हेंबर- २०१७** लेबर | ११५२ | २६८०३ | ६४३ | १३१६४ | १७९५ | ३९९६७ |
| | सिक्युरीटी | ७६४ | १८४४८ | ७२ | १३३५ | ८३६ | १९७८३ |
| ०९ | **डिसेंबर- २०१७** लेबर | ११५५ | २७९७५ | ६४१ | १३०६५ | १७९६ | ४१०४० |
| | सिक्युरीटी | ७६४ | १९३४० | ७२ | १४१० | ८३६ | २०७५० |
| १० | **जानेवारी-२०१८** लेबर | ११५६ | २७७७७ | ६४५ | १३६०३ | १८०१ | ४१३८० |
| | सिक्युरीटी | ७६४ | १९००५ | ७२ | १३१३ | ८३६ | २०३१८ |
| ११ | **फेब्रूवारी-२०१८** लेबर | ११५६ | २५०८९ | ६४५ | १२१६८ | १८०१ | ३७२५७ |
| | सिक्युरीटी | ७६४ | १७०७६ | ७२ | १२७७ | ८३६ | १८३५३ |
| १२ | **मार्च-२०१८** लेबर | ११५६ | २८३८५ | ६४५ | १२८८४ | १८०१ | ४१२६९ |
| | सिक्युरीटी | ७६४ | १७३७० | ७२ | १४३६ | ८३६ | १८८०६ |
| | **एकूण संख्या** | **२३२४३** | **५५६५७५** | **८५६६** | **१७५००६** | **३१८०९** | **७३१५८१** |

उपरोक्त नमूद केले प्रमाणे **माहे एप्रिल-२०१७ ते माहे मार्च-२०१८** अखेर या आर्थिक वर्षात दरमहा संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत कुशल, अकुशल व सुरक्षा कामगार आवश्यकतेप्रमाणे लावणेत आलेले आहे. तरी त्याची नोंद घेणेत येवून, त्यास मान्यता असावी.

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे एप्रिल-२०१७ ते माहे मार्च-२०१८ अखेर या आर्थिक वर्षात दरमहा संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत पुरविण्यात आलेल्या कुशल ,अकुशल व सुरक्षा कामगारांचा प्रतिदीन व श्रमदिन संख्येची नोंद घेण्यात येऊन त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-कामगार अधिकारी,कामगार विभाग)**

---

**विषय नं.३२** **श्री साईबाबा संस्थानसाठी नवीन ॲडव्होकेट पॅनल तयार करणे.**

**प्रस्ताव-** मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थान पॅनलवर ॲडव्होकेटची नेमणुक करणेकामीचा प्रस्ताव,मा. व्यवस्थापन समितीचे, दि.१६/०८/२०१६, रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता, त्यावरील निर्णय क्र. ५२१ अन्वये सदरहू ॲडव्होकेट/ कायदा सल्लागाराची नेमणूक करणेकामी दि.०७/१०/१६ रोजीच्या दै. सामना, औरंगाबाद व दै. सार्वमत, अहमदनगर या वृत्तपत्रामध्ये जाहिरात देण्यात आली होती.त्यास अनुसरुन २६ ॲडव्होकेटचे अर्ज प्राप्त झाले होते. तसेच इतर अर्ज असे एकुण ३९ अर्ज केलेल्या ॲडव्होकेटची मुलाखत मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे घेणेकामी, तारीख व वेळ इ. ठरविणेकामी दि. १०/११/२०१६ रोजी टिपणी सादर केली होती, सदरचे टिपणीवर दि. १२/०२/२०१७ रोजी मा. अध्यक्ष साहेब यांनी, विश्वस्तांच्या समितीची नियुक्ती करुन मुलाखती घेण्यात याव्यात अशा सुचना दिल्या होत्या.त्यानुसार मा. कार्यकारी अधिकारी यांनी दि. १४/०२/२०१७ रोजी मा.व्यवस्थापन समितीचा विषय सादर करणेबाबत सुचीत केले होते, त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७, रोजीचे सभेत विषय सादर करण्यात आला होता, त्यावर निर्णय क्र. ४४ अन्वये मा. उच्चन्यायालयमुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे श्री साईबाबा सस्थानचे पॅनलवर ॲडव्होकेट म्हणून नियुक्ती करणेकामी ॲडव्होकेटच्या मुलाखती घेणेसाठी समिती सदस्य तथा जेष्ठ कायदेतज्ञ ॲड मोहन जयकर यांचे अध्यक्षते खाली मा.श्री.चंद्रशेखर कदम, मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे व मा.श्री.सचिन तांबे यांची विधी उपसमिती गठीत करणेत आली. या उपसमितीने उपरोक्त कामी प्राप्त अर्जदारांच्या अर्जांची छाननी करुन, लेखी/तोंडी परिक्षा घ्यावी व त्यानुसार उमेदवारांची निवड करुन अंतीम निर्णयार्थ प्रस्ताव समितीसमोर सादर करावा, असे ठरले होते.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार उपसमितीने प्राप्त अर्जदारांच्या अर्जांची छाननी करुन, लेखी/ तोंडी परिक्षा घेवून, त्यानुसार पात्र उमेदवारांची निवड करुन अंतीम निर्णय घेणेकामी समिती सदस्य तथा जेष्ठ कायदेतज्ञ ॲड मोहन जयकर यांना व व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मा.श्री.चंद्रशेखर कदम तसेच समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, मा.श्री.बिपीन दादा कोल्हे यांना पत्र देवून ॲडव्होकेटच्या मुलाखती घेणेकामी तारीख व वेळ कळविणेबाबत टिपणी सादर केली होती, "सदर टिपणीवर संस्थानसाठी वकील नेमताना त्यांची परिक्षा/ मुलाखत घेणे अपेक्षित नाही, इच्छुक वकिलांचे Profile व अपेक्षीत मानधन मागवून समितीसमोर सादर करावे असे मत आहे",असे निर्देश दिले होते. त्यानुसार दि.३०/०१/२०१८ रोजीच्या मंजूर टिपणी अन्वये औरंगाबाद येथील १४ वकीलांना त्यांचे Profile व अपेक्षीत मानधन कळविणेकामी जा.क्र. एसएसएस वशी-विधी /६५८५/ २०१८ दि. १०/०३/२०१८ रोजीचे पत्राने कळविले होते.

प्रस्तुतचे पत्रानुसार खालील आठ ॲडव्होकेटने त्यांचे Profile व अपेक्षीत मानधन कळविले आहे, त्याचा तक्ता सोबत जोडला आहे.

| Sn | Applicant Name / Address |
|---|---|
| 1 | Shri. Vikram R. Dhorde. |
| 2 | Shri. Ashwin V. Hon. |
| 3 | Madhveshwari D. Thube- Mhase. |
| 4 | Shri. YuvrajSopanraoChoudhari. |
| 5 | Shri. Himmatsinh D. Deshmukh. |
| 6 | Shri. Anil M. Gaikwad. |
| 7 | Shri. Rahul A. Tambe. |

| Sn | Applicant Name / Address |
|---|---|
| 8 | Shri. Shailesh S. Chapalgaonkar. |

आता, मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०४.०४.२०१८ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.२५५ मध्ये संस्थानचे ॲडव्होकेट पॅनेलवर तज्ञ वकीलांची नेमणूक करणेसाठीचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले आहे.

विधी विभागामार्फत कोर्ट केसेससाठी वार्षिक रु.१०,००,०००/- मात्र अंदाजपत्रकीय तरतूद असून ब-याचशा केसेसमध्ये ॲडव्होकेट पॅनलवरील ॲडव्होकेटस् फी घेत नाहीत. सध्या संस्थान ॲडव्होकेट पॅनलवर खालील ॲडव्होकेटस् नियुक्त आहेत.

| अ.नं. | ॲडव्होकेटचे नाव | त्यांचेकडे असलेल्या प्रकरणांची संख्या |
|---|---|---|
| मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे संस्थानचे पॅनलवर ॲडव्होकेटसची नेमणूक केलेली नाही. परंतु खालील ॲडव्होकेटसना कामकाजासाठी नियुक्त केलेले आहे. | | |
| १ | ॲड.श्री.संजय खर्डे, कोल्हार | ०१ |
| मा.उच्च न्यायालय, मुंबई | | |
| २ | ॲड. श्री.कुलदिप एस. पाटील, मुंबई | ०१ |
| ३ | ॲड. श्री.सचिन शानबाग, मुंबई | ०१ |
| ४ | ॲड. श्री.विनोद शहा, मुंबई | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| ५ | ॲड. श्री.आर.आय. जोशी | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद | | |
| ६ | ॲड. श्री.आर.एस. धोर्डे, औरंगाबाद (सिनीयर कौन्सील) | ०६ |
| ७ | ॲड. श्री.अनिल बजाज, औरंगाबाद (सिनीयर कौन्सील) | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| ८ | ॲड. श्री.विनायक होन, औरंगाबाद (सिनीयर कौन्सील) | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| ९ | ॲड. श्री.नितिन भवर, औरंगाबाद | २७ |
| १० | ॲड. श्री.संजय आर. चौकीदार, औरंगाबाद | ०३ |
| ११ | ॲड. श्री.राजेंद्र रघुवंशी, औरंगाबाद<br>(सध्या औरंगाबाद येथे प्रॅक्टीस करत नाही.) | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| १२ | ॲड. श्री.बाबासाहेब वाघ, औरंगाबाद<br>(यांची न्यायाधीश म्हणून नेमणूक झालेली आहे. ) | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| १३ | ॲड. श्री.संदिप एकनाथ गोंदकर, शिर्डी | सध्या संस्थानचे कामकाज दिलेले नाही. |
| मा.जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर | | |
| १४ | ॲड. श्री.अशोक पाटील, अहमदनगर | १५ |
| १५ | ॲड. श्री.ए.आर. गाडेकर, राहुरी | सध्या संस्थानचे कामकाज दिलेले नाही. |
| १६ | ॲड. श्री.प्रसन्न बिंगी, अहमदनगर | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| १७ | ॲड. श्री.संजय सलालकर, अहमदनगर | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| १८ | ॲड. श्री.दत्तात्रय वाय. जंगले, अहमदनगर | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| मा.अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, कोपरगाव | | |
| १९ | ॲड. श्री.एम. पी. गुजराथी, कोपरगाव | ०३ |
| २० | ॲड. श्री.एस.डी. कुलकर्णी, कोपरगाव | १४ |
| २१ | ॲड. श्री.एस.एम.वाघ, कोपरगाव | ०१ |
| २२ | ॲड. श्री.आर. एस. जपे, कोपरगाव | ०३ |
| २३ | ॲड. श्री.रमेशचंद्र ठोळे, कोपरगाव | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| २४ | ॲड. श्री.मच्छिंद्र खिल्लारी, कोपरगाव | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| २५ | ॲड. श्री.आर.के. वाघ, कोपरगाव | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| २६ | ॲड. सौ.नंदा लहाडे, कोपरगाव | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| मा.दिवाणी कनिष्ठ स्तर न्यायालय, राहाता | | |
| २७ | ॲड. श्री.जे.के. गोंदकर, शिर्डी | ०८ |
| २८ | ॲड. श्री.बी.व्ही.कोते, शिर्डी | आजपर्यंत काम दिलेले नाही. |

| अ.नं. | ॲडव्होकेटचे नाव | त्यांचेकडे असलेल्या प्रकरणांची संख्या |
|---|---|---|
| २९ | ॲड. श्री.राजेश व्ही. नाईक, राहाता | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| ३० | ॲड. श्री.पी.बी.बावके, राहाता | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| ३१ | ॲड. श्री.ए.डी. गमे, राहाता | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| ३२ | ॲड. श्री.नितिन विखे, राहाता | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| ३३ | ॲड. श्री.अविनाश जे. बोठे, राहाता | आजपर्यंत काम दिलेले नाही. |

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-**

(१) मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील संस्थानचे ॲडव्होकेट पॅनलवर नेमणूक करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४ निरस्त करणेत येऊन, मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०४.०४.२०१८ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.२५५ मध्ये ठरलेनुसार राहाता, कोपरगाव, अहमदनगर तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई व खंडपीठ औरंगाबाद, त्याचप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली या सर्व ठिकाणी संस्थानचे ॲडव्होकेट पॅनल तयार करणेकामी तेथील वकीलांकडून विहीत पध्दतीने Profile व मानधनाची मागणी करावी.

(२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४ अन्वये देण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन ॲडव्होकेटसकडून प्राप्त झालेल्या अर्जांचा पुढील नेमणूकीकरीता समावेश करणेत यावा.

संस्थानसाठी नवीन ॲडव्होकेट पॅनल नेमणूकीसाठी उपरोक्त बाबींवर निर्णय होणेसाठी सदरहू प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.३७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.ॲड मोहन मोतीराम जयकर,सदस्य यांनी सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयातील केसेस साठी आणखी वकीलांची नावे सुचवावीत, व सदर प्रस्ताव उपसमितीसमोर सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-प्र.विधी अधिकारी,विधी विभाग)**

---

**विषय नं.३३** **महाराष्ट्र शासनाचे महाआयटी विभागाने** Transfer of Funds to Maha IT Corporation for Shirdi Smart City Project **बाबत.**

**प्रसताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद** – सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ मधील ३५५ (घ) साईभक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपयायोजना हाती घेणे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.**–१)दि.०७/०३/२०१८ रोजी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर विषय क्र.२४,निर्णय क्र. १६२

२) दि.०२/०५/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.१६, निर्णय क्र. ३४५.

<u>प्रास्ताविक</u> - श्री साईबाबा संस्थानमध्ये व शिर्डी शहरामध्ये सीसीटीव्ही व Security Surveillance यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत मा.नामदार देवेंद्रजी फडणवीस, मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे दि. ०६/०७/२०१७ रोजी मुंबई येथे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कृती आराखडा समितीचे आढावा बैठकीमध्ये सदरहु विषयावर चर्चा झाली असता, त्यांनी महाराष्ट्रशासनाचे माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत कार्यवाही करावी असे निर्देश दिलेले आहेत. त्यास अनुसरुन संस्थानमध्ये व शिर्डी शहराकरीता सीसीटीव्ही व Security Surveillance यंत्रणा कार्यान्वित करणेकरीता मा. प्रधान सचिव, न्याय व विधी विभागामार्फत मा. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडुन प्रकल्प अहवाल, निवीदा प्रक्रीया व प्रकल्प उभारणी संदर्भात कार्यवाही करणेबाबत अन्वये जा.नं.एसएसएस/सीसीटीव्हीसेल/२४६९/२०१७, दि.२२/०७/२०१७ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आलेले आहे.

दि. २६/०७/२०१७ रोजी मा. श्री विजय गौतम साहेब, प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन,मुंबई यांचे अध्यक्षतेखाली सदरहु विषयावर चर्चा होणेकामी शिर्डी येथे बैठक घेण्यात आलेली आहे.

उपरोक्त बैठकीमध्ये शिर्डी शहराचा पॉईंट टु पॉईंट सर्व्हे होणे, सॅटेलाईट यंत्रणा, जीपीएएस सिस्टीम अशा अधुनिक यंत्रणेचा वापर करणे, सीसीटीव्ही डेटा स्टोरेज वाढविणे व इतर अनुषंगीक माहिती तंत्रज्ञान विभाग, मुंबई यांना निर्देश दिलेले आहेत.

ऑगस्ट २०१७ पासुन माहिती तंत्रज्ञान विभाग, मुंबई यांचे प्रतिनीधी यांनी संस्थान व शिर्डी परिसराचा सर्व्हे केलेला आहे.

दि.१९/०९/२०१७ रोजीचे पत्रान्वये माहिती तंत्रज्ञान विभाग, मुंबई व सीसीटीव्ही विभाग यांचे संस्थानमधील सर्व विभागाने दिलेले सीसीटीव्ही तपासुन अभिप्राय घेण्यात आलेला आहे.

दि. १५/०९/२०१७ रोजी सचिव, महाआयटी, मुंबई व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया व संस्थानचे अधिकारी यांनी याबाबतचा प्राथमिक स्वरुपात आढावा घेतला.

दि. ०३/०१/२०१८ रोजीचे ई-मेलद्वारे माहिती तंत्रज्ञान विभाग, मुंबई विभागाने DPR सादर केलेला आहे.

सदरच्या DPR मध्ये संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभाग, ध्वनीक्षेपण विभाग, Security विभाग व CCTV विभाग या विविध विभागांचा एकत्रित प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर DPR मध्ये माहिती तंत्रज्ञान विभाग, मुंबई यांनी रु.१७७ कोटी खर्च कळविलेला होता. सदर DPR मध्ये कळविलेले साहित्य व त्यासाठी येणारे रु.१७७ कोटी खर्चाचे रक्कमेवर निर्णय होणेकामी सदरचा DPR उपरोक्त दि.०७/०३/२०१८ रोजी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर विषय क्र.२४, निर्णय क्र. १६२ अन्वये सादर करण्यात आला असता, सदर DPR वर सविस्तर चर्चा होवुन "श्री साईबाबा संस्थानमध्ये सीसीटीव्ही व Security Surveillance यंत्रणा कार्यान्वित करणेकरीता माहिती व तंत्रज्ञान विभाग,मंत्रालय, मुंबई यांचेकडुन प्राप्त झालेला DPR सर्व मा. सदस्यांना ई-मेलद्वारे पाठविणेत यावा तसेच माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनीधींना DPR चे **सादरीकरण व चर्चेसाठी सभेसमोर बोलविण्यात यावे"** असा निर्णय घेण्यात आला. परंतु स्मार्ट शिर्डी प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभागाने प्राईस वॉटर्स कुपर्स (PwC), मुंबई यांची कन्सल्टंन्ट म्हणुन नेमणुक केलेली असुन त्यांचे मार्फत संस्थानचे विविध विभागांचा फेर सर्व्हे करण्यात आलेला आहे. त्यानुसार दि.१०/०४/२०१८ रोजीचे ई-मेलद्वारे PwC, मुंबई यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे. दि.०२/०५/२०१८ रोजीचे मा.व्यस्थापन समितीचे सभेपुढे PwC, मुंबई यांनी सदरचे प्रस्तावाचे सादरीकरण केलेले आहे. सदर सादरीकरणात येणा-या बाबी व त्यावर येणारा खर्च खालीलप्रमाणे –

Estimated Commercials for the proposed Shirdi Smart City Project

| # | Item | Estimated Cost | Estimated Cost in Crores |
|---|---|---|---|
| CAPEX | | | |
| A | City Fiber | 12,28,10,000.00 | 12.28 |
| B | Safety and Security- Town | 2,71,00,000.00 | 2.71 |
| C | Safety and Security- SSST | 1,89,28,073.00 | 11.89 |
| D | Smart Utilities | 4,54,49,642.00 | 4.54 |
| E | Other smart elements | 1,36,08,250.00 | 1.36 |
| F | CCC and viewing centers | 4,28,24,811.33 | 4.28 |
| G | Software & Licenses | 2,77,37,216.00 | 2.77 |
| H | One time cost - bandwidth | 70,00,000.00 | 0.70 |
| SUB TOTAL | | | 40.55 |
| OPEX (O&M for 5 years) | | | |
| A | City Fiber | 3,50,00,000.00 | 3.50 |
| B | Safety and Security- Town | 10,840,000.00 | 1.08 |
| C | Safety and Security- SSST | 4,75,71,229.20 | 4.76 |
| D | Smart Utilities | 1,81,79,856.80 | 1.82 |
| E | Other smart elements | 56,03,300.00 | 0.56 |
| F | CCC and viewing centers | 1,71,29,924.53 | 1.71 |
| G | Software & Licenses | 1,10,94,886.40 | 1.11 |
| H | Cloud DC & DR | 7,63,60,434.61 | 7.64 |
| I | Bandwidth | 2,09,93,129.00 | 2.10 |
| J | Tech & Operational manpower (over 5 years) | 7,75,34,770.00 | 7.75 |
| SUB TOTAL | | | 32.03 |
| TOTAL | | | 72.58 |

दि.०२/०५/२०१८ रोजीचे मा.व्यस्थापन समितीचे सभेत आयत्या वेळेचा विषय क्र.१६, निर्णय क्र.३४५ अन्वये प्राईस वॉटर कुपर्स (PwC) यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवुन, " प्राईस वॉटर कुपर्स (PwC) यांनी सादर केलेल्या प्रस्तावास व त्यासाठी येणा-या खर्चास व प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेस " मान्यता देण्यात आली. सदर निर्णयास अनुसरुन सदर प्रस्तावास व त्यासाठी येणारे रक्कम रु.७२.५८ कोटी मात्रचे खर्चास विधी व न्याय विभाग, मुंबई यांची मान्यता घेणेकामी जा.नं.एसएसएसटी/ सीसीटीव्ही सेल / ८०२/२०१८, दि.१७/०५/२०१८ रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. .

सबब, Hon. Chairman & Managing Director, Maharashtra Information & Technology Corpn., महाराष्ट्र शासन यांनी Shirdi Smart City Project कार्यान्वित करणेसाठी रक्कम रु.७२.५८ कोटी मात्र खर्चाची रक्कम कळविलेले असुन सदरची रक्कम त्यांचे विभागाकडे वर्ग करणेबाबत (Transfer of Funds to Maha IT Corporation Ltd.) दि.०७/०५/२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे.

तरी, सदरचे खर्चाची रक्कम रु.७२.५८ कोटी महाआयटी विभाग, मुंबई यांचेकडे वर्ग करणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

**मागणी**– उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे दि.०२/०५/२०१८ रोजीचे मा.व्यस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.१६, निर्णय क्र.३४५ अन्वये प्राईस वॉटर कुपर्स (PwC) यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवुन, " **प्राईस वॉटर कुपर्स (PwC) यांनी सादर केलेल्या प्रस्तावास व त्यासाठी येणा-या खर्चास व प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेस** " मान्यता देण्यात आली. सदर निर्णयास अनुसरुन, सदर प्रस्तावास व त्यासाठी येणारे रक्कम रु.७२.५८ कोटी मात्रचे खर्चास विधी व न्याय विभाग, मुंबई यांची मान्यता घेणेकामी जा.नं.एसएसएसटी/सीसीटीव्हीसेल/८०२/२०१८, दि.१७/०५/२०१८ रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

सबब, Hon. Chairman & Managing Director, Maharashtra Information & Technology Corpn., महाराष्ट्र शासन यांनी Shirdi Smart City Project कार्यान्वित करणेसाठी रक्कम रु.७२.५८ कोटी मात्र खर्चाची रक्कम कळविलेले असुन सदरची रक्कम त्यांचे विभागाकडे वर्ग करणेबाबत (Transfer of Funds to Maha IT Corporation Ltd.) दि.०७/०५/२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे.

तरी, सदरचे खर्चाची रक्कम रु.७२.५८ कोटी महाआयटी विभाग, मुंबई यांचेकडे वर्ग करणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करत आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान -** तांत्रिक व आर्थिक व कायदेशीर.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय** - उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केल्याप्रमाणे दि.०२/०५/२०१८ रोजीचे मा.व्यस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.१६, निर्णय क्र.३४५ अन्वये प्राईस वॉटर कुपर्स (PwC) यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवुन, " **प्राईस वॉटर कुपर्स (PwC) यांनी सादर केलेल्या प्रस्तावास व त्यासाठी येणा-या खर्चास व प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेस** " मान्यता देण्यात आली. सदर निर्णयास अनुसरुन, सदर प्रस्तावास व त्यासाठी येणारे रक्कम रु.७२.५८ कोटी मात्रचे खर्चास विधी व न्याय विभाग, मुंबई यांची मान्यता घेणेकामी जा.नं.एसएसएसटी/सीसीटीव्हीसेल/८०२/२०१८, दि.१७/०५/२०१८ रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

सबब, Hon. Chairman & Managing Director, Maharashtra Information & Technology Corpn., महाराष्ट्र शासन यांनी Shirdi Smart City Project कार्यान्वित करणेसाठी रक्कम रु.७२.५८ कोटी मात्र खर्चाची रक्कम कळविलेले असुन सदरची रक्कम त्यांचे विभागाकडे वर्ग करणेबाबत (Transfer of Funds to Maha IT Corporation Ltd.) दि.०७/०५/२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे.

तरी, सदरचे खर्चाची रक्कम रु.७२.५८ कोटी महाआयटी विभाग, मुंबई यांचेकडे वर्ग करणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.३७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन,** Shirdi Smart City Project **कार्यान्वित करणेसाठी खर्चाची रक्कम रु.७२.५८ कोटी महाआयटी विभाग, मुंबई यांचेकडे शासनाची मान्यता मिळाल्यानंतर कामाशी निगडीत टप्प्या टप्प्याने वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- सीसीटीव्ही विभागप्रमुख)**

---

**विषय नं.३४** **जनसेवा फाउंडेशन, लोणी यांचे Floral Nirmaly Recycing Products ची जाहिरात संस्थानचे Live Darshan करीता बसविण्यात आलेल्या LED TV वर करणेचे प्रस्तावाबाबत.**

**प्रस्ताव-** प्रास्ताविक - श्रीं चे Live Darshan साईभक्तांना सुलभतेने होणेकरीता समाधी मंदिर परिसर, दर्शनरांग व संस्थानचे विविध परिसरात LED TV बसविण्यात आलेले आहे. सदरचे Live Darshan टाटास्कायवर प्रक्षेपण करणेकरीता टाटास्काय कंपनीकडुन संस्थानला उत्पन्न मिळत आहे. सदरचे LED TV वर Live Darshan शिवाय कुठल्याही कंपनीची जाहिरात अद्यापपर्यंत प्रसारीत करण्यात आलेली नाही. यापुर्वीही काही कंपन्यांनी संस्थान परिसरात स्वखर्चाने LED Wall Screen बसवुन त्यावर Live Darshan प्रक्षेपण करुन त्यासोबत त्यांचे कंपनीची जाहिरात करणेस परवानगी मागितली होती. परंतु संस्थानने अशाप्रकारे संस्थान परिसरात जाहिरात करणेस कोणत्याही खाजगी कंपनीस अद्यापपर्यंत परवानगी दिलेली नाही. खाजगी कंपनीस संस्थान परिसरात जाहिरात करणेस परवानगी दिल्यास इतर खाजगी कंपन्याही संस्थान परिसरात त्यांच्या जाहिराती करणेस मागणी करतील. त्यामुळे अशी परवानगी देणे योग्य राहणार नाही.

सबब, मंदिर परिसरात व संस्थानचे विविध परिसरात बसविण्यात आलेल्या LED TV वर प्रक्षेपित करण्यात येणा श्रीं चे Live Darshan सोबत Floral Nirmalya Recycing Products ची जाहिरात प्रक्षेपित करणेबाबत दि.२९/०३/२०१८ रोजीचे पत्रान्वये जनसेवा फाउंडेशन, लोणी यांनी परवानगी मागितलेली आहे.

तरी, उपरोक्त बाबींचा विचार करता, मंदिर परिसरात व संस्थानचे विविध परिसरात बसविण्यात आलेल्या LED TV वर श्रीं चे Live Darshan सोबत जनसेवा फाउंडेशन, लोणी यांना Floral Nirmalya Recycing Products ची जाहिरात प्रक्षेपित करणेचे परवानगीबाबत निर्णयास्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

**मागणी** – उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे श्रीं चे Live Darshan साईभक्तांना सुलभतेने होणेकरीता समाधी मंदिर परिसर, दर्शनरांग व संस्थानचे विविध परिसरात LED TV बसविण्यात आलेले आहे. सदरचे Live Darshan टाटास्कायवर प्रक्षेपण करणेकरीता टाटास्काय कंपनीकडुन संस्थानला उत्पन्न मिळत आहे. सदरचे LED TV वर Live Darshan शिवाय कुठल्याही कंपनीची जाहिरात अद्यापपर्यंत प्रसारीत करण्यात आलेली नाही. यापुर्वीही काही कंपन्यांनी संस्थान परिसरात स्वखर्चाने LED Wall Screen बसवुन त्यावर Live Darshan प्रक्षेपण करुन त्यासोबत त्यांचे कंपनीची जाहिरात करणेस परवानगी मागितली होती. परंतु संस्थानने अशाप्रकारे संस्थान परिसरात जाहिरात करणेस कोणत्याही खाजगी कंपनीस अद्यापपर्यंत परवानगी दिलेली नाही. खाजगी कंपनीस संस्थान परिसरात जाहिरात करणेस परवानगी दिल्यास इतर खाजगी कंपन्याही संस्थान परिसरात त्यांच्या जाहिरात करणेस मागणी करतील. त्यामुळे अशी परवानगी देणे योग्य राहणार नाही.

सबब, मंदिर परिसरात व संस्थानचे विविध परिसरात बसविण्यात आलेल्या LED TV वर प्रक्षेपित करण्यात येणा श्रीं चे Live Darshan सोबत Floral Nirmalya Recycing Products ची जाहिरात प्रक्षेपित करणेबाबत दि.२९/०३/२०१८ रोजीचे पत्रान्वये जनसेवा फाउंडेशन, लोणी यांनी परवानगी मागितलेली आहे.

तरी, उपरोक्त बाबींचा विचार करता, मंदिर परिसरात व संस्थानचे विविध परिसरात बसविण्यात आलेल्या LED TV वर श्रीं चे Live Darshan सोबत जनसेवा फाउंडेशन, लोणी यांना Floral Nirmalya Recycing Products ची जाहिरात प्रक्षेपित करणेचे परवानगीबाबत निर्णयास्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करत आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान - तांत्रिक व आर्थिक.**

विभागाचा स्पष्ट अभिप्राय - उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे श्रीं चे Live Darshan साईभक्तांना सुलभतेने होणेकरीता समाधी मंदिर परिसर, दर्शनरांग व संस्थानचे विविध परिसरात LED TV बसविण्यात आलेले आहे. सदरचे Live Darshan टाटास्कायवर प्रक्षेपण करणेकरीता टाटास्काय कंपनीकडुन संस्थानला उत्पन्न मिळत आहे. सदरचे LED TV वर Live Darshan शिवाय कुठल्याही कंपनीची जाहिरात अद्यापपर्यंत प्रसारीत करण्यात आलेली नाही. यापुर्वीही काही कंपन्यांनी संस्थान परिसरात स्वखर्चाने LED Wall Screen बसवुन त्यावर Live Darshan प्रक्षेपण करुन त्यासोबत त्यांचे कंपनीची जाहिरात करणेस परवानगी मागितली होती. परंतु संस्थानने अशाप्रकारे संस्थान परिसरात जाहिरात करणेस कोणत्याही खाजगी कंपनीस अद्यापपर्यंत परवानगी दिलेली नाही. खाजगी कंपनीस संस्थान परिसरात जाहिरात करणेस परवानगी दिल्यास इतर खाजगी कंपन्याही संस्थान परिसरात त्यांच्या जाहिरात करणेस मागणी करतील. त्यामुळे अशी परवानगी देणे योग्य राहणार नाही.

सबब, मंदिर परिसरात व संस्थानचे विविध परिसरात बसविण्यात आलेल्या LED TV वर प्रक्षेपित करण्यात येणा श्रीं चे Live Darshan सोबत Floral Nirmalya Recycing Products ची जाहिरात प्रक्षेपित करणेबाबत दि.२९/०३/२०१८ रोजीचे पत्रान्वये जनसेवा फाउंडेशन, लोणी यांनी परवानगी मागितलेली आहे.

तरी, उपरोक्त बाबींचा विचार करता, मंदिर परिसरात व संस्थानचे विविध परिसरात बसविण्यात आलेल्या LED TV वर श्रीं चे Live Darshan सोबत जनसेवा फाउंडेशन, लोणी यांना Floral Nirmalya Recycing Products ची जाहिरात प्रक्षेपित करणेचे परवानगीबाबत निर्णयास्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.३८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरात व संस्थानचे विविध परिसरात बसविण्यात आलेल्या LED TV वर श्रीं चे Live Darshan सोबत जनसेवा फाउंडेशन, लोणी यांना Floral Nirmalya Recycing Products ची जाहिरात प्रक्षेपित करणेस परवानगीचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला. (कार्यवाही- सीसीटीव्ही विभागप्रमुख)**

---

**विषय नं.३५** **श्रींचे मंदिर व परिसराचे सुरक्षेच्या दृष्टीने भाडे तत्वावर घेण्यात आलेल्या सुरक्षा साहित्यांस मुदतवाढ देणे.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ व दि.२३/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णयांनुसार श्रींचे दर्शनार्थ येणा-या साईभक्तांची संभाव्य गर्दी लक्षात घेता साईभक्तांचे तसेच मंदिर व परीसराचे सुरक्षेच्या दृष्टिकोनातुन तातडीची गरज म्हणून सुरक्षा साहीत्य भाडेतत्वावर घेणेकामी मान्यता घेण्यात आलेली होती. सदर सुरक्षा साहित्य ०३ महिण्यांकरीता भाडे तत्वावर घेणेकामी दि.२७/०१/२०१८ ते दि.०३/०२/२०१८ अखेर या कालावधीत शासनाचे अधिकृत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा प्रकाशित/अपलोड करण्यात आलेली होती. त्यानुसार सदर ई-निविदा प्रक्रीयेमध्ये प्रथम एकूण ०२ निविदाधारकांनी सहभाग नोंदविला. तथापी, ई-निविदेच्या नियमावलीप्रमाणे किमान ०३ निविदा असणे बंधनकारक असल्याने, सदर ई-निविदा प्रक्रीयेस पुन्हा दि.०४/०२/२०१८ ते दि.१२/०२/२०१८ अखेर ०८ दिवसांची ऑनलाईन मुदतवाढ देण्यात आलेली होती.

तदनंतर एकुण ३ निविदाधारकांनी सदर निविदा प्रक्रीयेमध्ये सहभाग नोंदविल्यामुळे दि.१४/०२/२०१८ रोजी खरेदी समितीचे सदस्य यांचे समक्ष टेक्नीकल बीड उघडण्यात आले आहे. सदर टेक्नीकल बीडमध्ये १.Evolve Technologies Services Pvt. Ltd, Pune, २. Reliance Electronics, D-1/2, M.I.D.C., Ambad, Nashik व ३. Sai Automotive India Pvt.Ltd, Pune. या तीन निविदाधारकांच्या ई-निविदा प्राप्त झालेल्या होत्या. सदर तीन निविदांपैकी अ.नं. ३ Sai Automotive India Pvt.Ltd, Pune. यांची वार्षिक उलाढाल कमी असल्यामुळे, ते अपात्र ठरले . तथापी, महाराष्ट्र शासनाचे उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे दि.०१/१२/२०१६ रोजीचे शासन निर्णयाच्या खरेदी कार्यपध्दती सुधारीत नियमपुस्तीकेतील कलम ४.४.३.१ (ब) नुसार पात्र असणा-या दोन निविदाधारकांच्या दि.१७/०२/२०१८ रोजी खरेदी समितींच्या सदस्यांसमक्ष कमर्शियल बीड उघडण्यात आलेल्या होत्या.

सदर कमर्शियल बीडमध्ये दोनही पात्र निविदाधारकांचे न्युनतम दर असल्याने १) Evolve Technologies Services Pvt. Ltd, Pune यांना ०४ नग बॅगेजेस स्कॅनरकरीता जा.नं.एसएसएसटी/संरक्षण/ ६४६९/२०१८ दि.०५/०३/२०१८ अन्वये तसेच २) Reliance Electronics, D-1/2, M.I.D.C.,Ambad, Nashik यांना ०९ नग डी.एफ.एम.डी. व १५ नग एच.एच.एम.डी या उपकरणांकरीता जा.नं.एसएसएसटी/ संरक्षण/६४७०/२०१८ दि.०५/०३/२०१८ अन्वये दि.२४/०२/२०१८ पासुन ते दि.२३/०५/२०१८ अखेर ०३ महीन्यांकरीता कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदर कार्यादेशानुसार दि.२३/०५/२०१८ रोजी सदरची मुदत संपुष्टात येत आहे. त्याचप्रमाणे शासनाचे माहीती व तंत्रज्ञान विभागामार्फत डी.पी.आर.अंतर्गत स्मार्ट शिर्डी प्रकल्प राबविणे प्रस्तावीत असल्यामुळे श्रींचे मंदिर व परीसराचे सुरक्षेच्या दृष्टिने खरेदी करावयाच्या सुरक्षा साहीत्य ई-निविदा प्रक्रीया स्थगीत ठेवलेली आहे. तसेच मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे आदेशान्वये महाराष्ट्र शासनाचे माहीती व तंत्रज्ञान विभागामार्फत डी.पी.आर. अंतर्गत स्मार्ट शिर्डी प्रकल्प राबविणेकामी शासनाने पी.डब्ल्यु.सी. या कंपनीची नियुक्ती केलेली असुन, सदर कंपनीमार्फत प्रस्तावीत स्मार्ट शिर्डी प्रकल्पाचा अंतिम सर्व्हे करण्यात आलेला आहे. व सदर सर्व्हेचा अंतिम अहवाल कंपनीचे प्रतिनिधींनी संस्थानचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तसेच शासनाचे माहीती व तंत्रज्ञान विभागास सादर केलेला आहे. सदर स्मार्ट शिर्डी प्रकल्प कार्यान्वीत होणेकरीता शासनाची परवानगी व इतर तदनुषंगीक कामांकरीता कार्यवाही होणेस अंदाजे ०१ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी लागण्याची शक्यता आहे.

श्री साईबाबांचे समाधी शताब्दी महोत्सवाकरीता श्रींचे दर्शनार्थ येणा-या भावीकांच्या तसेच मंदिर परीसराचे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून ई-निविदा पध्दतीने भाडे तत्वावर घेण्यात आलेले सुरक्षा साहीत्य कार्यान्वीत ठेवणे गरजेचे असल्याने, ई-निविदेतील अटी-शर्ती तसेच मासिक भाडे दरांप्रमाणे दोनही निविदाधारक यांना किमान दिड महिन्यांचे कालावधीकरीता मुदतवाढ देता येईल असे नम्र मत आहे.

तरी श्रींचे दर्शनार्थ येणा-या साईभक्तांचे तसेच मंदिर परीसराचे सुरक्षेच्या दृष्टिने ई-निविदेतील पात्र निविदाधारक १) Evolve Technologies Services Pvt. Ltd, Pune यांना ०४ नग बॅगेजेस स्कॅनरकरीता तसेच २) Reliance Electronics, D-1/2, M.I.D.C.,Ambad, Nashik यांना ०९ नग डी.एफ.एम.डी. व १५ नग एच.एच.एम.डी या उपकरणांकरीता ई-निविदेतील मंजुर दराप्रमाणे दि. २४/०५/२०१८ ते दि. ०७/०७/२०१८ अखेर दिड महिन्यांच्या कालावधीकरीता भाडे तत्वावर सुरक्षा साहीत्य पुरविणेकामी मुदतवाढ देणेस, तसेच त्याकामी येणा-या खर्च रुपये- ८,३०,०६०/- (अक्षरी- आठ लाख तीस हजार साठ रुपये मात्र) चे खर्चास मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.३८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे दर्शनार्थ येणा-या साईभक्तांचे तसेच मंदिर परीसराचे सुरक्षेच्या दृष्टिने ई-निविदेतील मंजुर दराप्रमाणे दि. २४/०५/२०१८ ते दि. ०७/०७/२०१८ अखेर दिड महिन्यांच्या कालावधीकरीता भाडे तत्वावर सुरक्षा साहीत्य पुरविणेकामी मुदतवाढ देणेस, तसेच त्याकामी येणा-या रक्कम रु.८,३०,०६०/- मात्र (अक्षरी- आठ लाख तीस हजार साठ रुपये मात्र) चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)**

---

**विषय नं.३६** **श्रींचे लाडू व बुंदी प्रसादाचे स्टॅण्डर्डायझेशन व मॅकॅनायझेशन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** “श्रीं”चे लाडु प्रसाद निर्मिती मध्ये स्टॅण्डर्डायझेशन व आधुनिकता आणणेकामी इकडील विभागाचे सहा. अभियंता श्री अमृत जगताप हे प्रशासकीय मान्यतेने दि.१०/१०/२०१७ रोजी ते १४/१०/२०१७ दरम्यान म्हैसुर येथे CFTRI शास्त्रज्ञ यांचेशी प्राथमिक तांत्रिक बाबींवर चर्चा करण्यासाठी गेले होते. त्यानंतर लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाचे दि. ०८/०१/२०१८ चे मंजुर टिपणीन्वये,CFTRI म्हैसुर येथील तीन शास्त्रज्ञांनी दि.२१ ते २४ जानेवारी २०१८ या कालावधीत शिर्डी येथे भेट देऊन लाडु प्रसाद निर्मिती विभागाचे लाडु, बुंदी किचन व पॅकींग कक्ष याची प्रत्यक्ष पाहणी करून प्राथमिक अहवाल सादर केला होता.

तसेच संदर्भ क्र.०४ अन्वये, CFTRI म्हैसुर यांनी लाडु प्रसादाचे स्टॅण्डर्डायझेशन व मॅकॅनायझेशन करणेकामी ई-मेल पत्राद्वारे प्रकल्प प्रस्ताव पाठविला होता. लाडु प्रसादाबाबत प्रमाणीकरणकरून लाडुचे जीवनमान (life) वाढविणेबाबत उपाय योजना करणे, त्याबाबत आवश्यक ते यांत्रिकीकरण करणे, लाडुची गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा उभारणे, गुणवत्तेत सातत्यता राखणेसाठी प्रोसेसर प्रणाली विकसीत करणे इ. गोष्टी कळविल्या होत्या. सदर उपाययोजना राबविण्यासाठी त्यांनी किमान १८ महिन्यांचा कालावधी निर्धारित केलेला असुन, सदर उपाययोजना राबविण्याकरीता रक्कम रू.९,३०,००० + (GST@१८% )१,६७,४०० = १०,९७,४००/- (अक्षरी रूपये- दहा लाख सत्यान्नव हजार चारशे मात्र)प्रकल्प सल्लागार फी कळविलेली होती व सोबत प्रस्तुत प्रस्ताव मॅनेजमेंन्ट CFTRI यांचे मान्यतेच्या अधीन राहुन लागु राहील असे म्हटले होते.

दिवसेंदिवस साईभक्तांची वाढती गर्दी लक्षात घेता लाडु प्रसाद निर्मितीबाबत प्रकल्प विकसीत करणे अत्यंत आवश्यक असल्याने CFTRI म्हैसुर यांची लाडु प्रसादाचे स्टॅण्डर्डायझेशनव मॅकॅनायझेशन करणेकामी प्रकल्प सल्लागार म्हणुन नियुक्ती करणेस व त्याकामाची सल्लागार फी रक्कम रू. ९,३०,००० + (GST@१८% ) १,६७,४०० = १०,९७,४००/-(अक्षरी रूपये- दहा लाख सत्यान्नव हजार चारशे मात्र)अदा करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर करणेसाठी तयार करणेत आला होता.

मात्र दि.०५/०४/२०१८ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांनी लाडु निर्मिती विभागाचे बुंदी किचन व पॅकींग कक्षास प्रत्यक्ष भेट दिली असता, CFTRI म्हैसुर यांचेमार्फत लाडु प्रसादाचे स्टॅण्डर्डायझेशन व मॅकॅनायझेशन करणेऐवजी सदरचे रकमेत संस्थानची स्वताः चे स्वंतत्र युनिट कार्यान्वीत करणेची कार्यवाही करावी असे निर्देश दिलेले आहेत.

सदरचे CFTRI म्हैसुर यांचेकडुन लाडु प्रसादाचे स्टॅण्डर्डायझेशन व मॅकॅनायझेशन प्रकल्प कार्यान्वीत करुन घेणेबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी संमती दर्शविली नसल्याने सदरची फाईल दप्तरी दाखल (बंद) करणेस मान्यता घेण्याबाबत उपरोक्त टिपणी सादर केली होती. परंतु सदर टिपणीवर मा.उपकार्यकारी अधिकारी सो.यांनीश्री पुरकर व श्री जगताप चर्चा करा असे निर्देश दिल्याने उभयतांनी मा. उप कार्यकारी अधिकारी साहेब

यांचे समवेत चर्चा केली असता,नविन लाडु व बुंदी किचन उभारणीबाबत CFTRI– म्हैसुर यांचे Consultancy Scope मध्ये Add करून Project Period 24 Month करून नविन Scope मागवावा. असे निर्देश दिलेले आहेत.

त्यास अनुसरून दि.१७/०४/२०१८ रोजी श्री जगताप सहा. अभियंतामॅकेनिकल विभाग यांनी CFTRI यांना प्रस्तावित नविन लाडु किचन सल्लागार व Project Period २४ महिनेकरणेबाबत E-mail द्वारे कळविले होते.

त्यास अनुसरून आहे त्याच मानधन रक्कमेमध्ये सदरचा Project Period 24 महिनेव लाडु व बुंदी किचन उभारणीबाबत Consultancy Scope Add केलेबाबत CFTRI यांनी दि.१६/०४/२०१८ रोजी मॅकेनिकल विभागास E-mail द्वारे कळविले आहे.

त्यानुसार लाडु प्रसाद निर्मितीबाबत प्रकल्प विकसीत करणे CFTRI म्हैसुर यांची लाडु प्रसादाचे स्टॅण्डर्डायझेशन व मॅकॅनायझेशन करणेकामी २४ महिन्याचा प्रकल्प सल्लागार म्हणुन नियुक्ती करणेस व त्याकामाची सल्लागार फी रक्कम रू. ९,३०,०००+(GST@१८%) १,६७,४००=१०,९७,४००/- (अक्षरी रूपये- दहा लाख सत्यान्नव हजार चारशे मात्र) कळविलेले आहे.

तरी CFTRI -म्हैसुर यांना बुंदी व लाडु प्रसादाचे स्टॅण्डर्डायझेशन व मॅकॅनायझेशन करणेकामी तसेच नविन लाडु किचन विकसीत करणेकामी प्रकल्प सल्लागार म्हणुन नियुक्त करणेस व त्याकामी त्यांनी कळविलेली सल्लागार फी रक्कम रु.१०,९७,४००/- (जीएसटी सह) चे खर्चास मान्यता मिळणेकामीचा सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, CFTRI -म्हैसुर यांना बुंदी व लाडु प्रसादाचे स्टॅण्डर्डायझेशन व मॅकॅनायझेशन करणेकामी तसेच नविन लाडु किचन विकसीत करणेकामी प्रकल्प सल्लागार म्हणुन नियुक्त करणेस व सल्लागार फी रक्कम रु.१०,९७,४००/- मात्र (जीएसटी सह) चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,लाडू प्रसाद निर्मीती विभाग)**

---

**विषय नं.३७** **माहे जुन २०१७ ते मार्च २०१८ अखेर शालेय विद्यार्थ्यांना मोफत बुंदी प्रसाद वाटपाकामी झालेल्या खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद– महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले विनियम मधील १७ (१) मध्ये भक्तंगणाना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करून दयाव्यात अशी तरतुद केलेले आहे.

व्यवस्थापन समिती ठराव क्रं:- दि.२७/०३/२०१७ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.२२४

प्रस्ताविक:- उपरोक्त संदर्भ.क्र.१ ) मा. व्यवस्थापन समितीची दि.२७/०३/२०१७ ची सभेतील निर्णय क्र.२६२ मध्ये सविस्तर चर्चा होऊन,श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल,शिर्डी मधील शालेय विद्यार्थ्यांना संस्थानमार्फत मोफत मध्यान्ह भोजन देणेकामी उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या खर्चाय मान्यता देण्यात आली.

तसेच निर्णय क्र.२६३ मध्ये सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर,शिर्डी मधील शालेय विद्यार्थीनींना संस्थानमार्फत मोफत मध्यान्ह भोजन देणेकामी उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.

२) संदर्भ क्र.२/३ मध्ये लाडू निर्मिती विभागाकडून दैनंदिन माध्यान्ह भोजन व्यवस्थेत ठरविलेल्या दिवशी विद्यार्थ्यानां बुंदी पाकिटे पुरविणेबाबत.कन्या शाळा व इंग्लिश मिडीयत स्कुल यांनी मंजुरी टिपणी द्वारे कळविले आहे.

३) संदर्भ क्र.४ नुसार " मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०४/२०१४ रोजीचे सभेतील विषय नं.०८ निर्णय क्र.५६४ अन्वये, शालेय विद्यार्थ्यानां वाटप केलेला बुंदी प्रसाद खर्चाची मासिक अहवाल मा.कार्यकारी अधिकारी सो.यांची मान्यतेसाठी सादर करणेत यावा व आर्थिक वर्षाचे शेवटी एकत्रित अहवाल मा.व्यवस्थापन समितीसमोर नोंद घेणेकामी सादर करणेत यावा असा निर्णय झालेला आहे."

लाडु प्रसाद निर्मीती विभागामार्फत बुंदी प्रसाद वाटपासाठी झालेल्या खर्चाचा मासिक अहवाल मा.कार्यकारी अधिकारी यांचे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे. मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयात नमुद केले नुसार माहे जुन,२०१७ ते मार्च,२०१८ या आर्थिक वर्षामध्ये शालेय विद्यार्थ्याना देण्यात आलेला बुंदी प्रसादाचा खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.नं | महिना | बुंदी प्रसाद पाकिटे संख्या | झालेला खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | जुन-२०१७ | १४६०० | १,१६,२१६/- |
| ०२ | जुलै-२०१७ | ३०८०० | २,७३,८१२/- |
| ०३ | ऑगस्ट-२०१७ | २२१०० | २,१६,५८०/- |
| ०४ | सप्टेंबर-२०१७ | २५४०० | २,३३,१७२/- |
| ०५ | ऑक्टोबर-२०१७ | १२३०० | १,१२,५४५/- |
| ०६ | नोव्हेंबर-२०१७ | २२७०० | १,९३,६३१/- |
| ०७ | डिसेंबर-२०१७ | १५६०० | १,४०,४००/- |
| ०८ | जानेवारी-२०१८ | ३१९५० | २,६४,५४६/- |
| ०९ | फेब्रुवारी-२०१८ | १७७०० | १,४२,८३९/- |
| १० | मार्च-२०१८ | ९०६५ | ८,१९,४८/- |
| | **एकुण** | **२०२२१५** | **१७,७५,६८९/-** |

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी अनुसार–आर्थिक बाब

विभागाचा अभिप्राय स्पष्ट मत- माहे जुन-२०१७ ते मार्च-२०१८ आथिक वर्षात २०२२१५ इतके बुंदी प्रसाद पाकीटाचे शालेय विद्यार्थ्यांना वाटप केलेले असुन सदरचे आर्थिक वर्षात त्याकामी आलेला एकुण खर्च रु१७,७५,६८९/-(अक्षरी रू – सतरा लाख, पंच्याहत्तर हजार, सहाशे एकोणनव्वद मात्र ) अन्नदान खाती वर्ग केलेली असुन सदरबाबत नोंद घेणे साठीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे जुन-२०१७ ते मार्च-२०१८ अखेर शालेय विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या २०२२१५ बुंदी प्रसाद पाकीटाचे व त्याकामी आलेला एकुण खर्च रक्कम रु.१७,७५,६८९/- मात्र खर्चाचे अवलोकन करण्यात येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,लाडू प्रसाद निर्मीती विभाग )**

---

**विषय नं.३८** **माहे एप्रिल २०१७ ते मार्च २०१८ अखेर दर्शनरांगेत साईभक्तांना मोफत बुंदी प्रसाद वाटपाकामी झालेल्या खर्चाची नोंद घेणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद-** महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापित केलेले विनियम मधिल १७ (१) मध्ये भक्तंगणाना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्द करुन दयाव्यात अशी तरतुद केलेली आहे. मा व्यवस्थापन समितीचे दि. २६/०७/२०१३ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.५३७ मध्ये दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत बुंदी प्रसाद करणे बाबत निर्णय झालेला आहे.

उपरोक्त निर्णयानुसार दि.१५ऑगस्ट२०१३ पासुन दर्शनरांगेतील साईभक्तांना प्रत्येकी १००ग्रॅमचे एक पाकिट या प्रमाणे लाडु प्रसाद पाकिटांचे वाटप करण्यात येत होते. मा. मुख्य लेखाधिकारी सो.यांनी मोफत लाडु वाटपाचे स्वतंत्र रजिस्टर ठेवावे. प्रत्येक दिवशी तयार केलेली लाडु पाकिटे वाटप केलेली पाकिटे व शिल्लक राहिलेली पाकिटे यांचे विवरण दररोज स्वतंत्र ठेवावे. प्रत्येक महिन्यात वाटप केलेले लाडु प्रसाद पाकिटे व त्यासाठी झालेल्या खर्चाचा रक्कम जमा नावे करणेसाठी प्रत्येक महिन्यात खर्चाचा तक्ता तयार करुन लेखाशाखेकडे पाठविण्यात यावा. प्रत्येक महिन्यात प्रसादरुपी वाटप झालेली लाडु प्रसाद पाकिटे व त्यासाठी एकुण निर्धारीत किंमत याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये नोंद घेणेसाठी विषय ठेवण्यात यावा प्रत्येक महिन्याचे मोफत लाडु पाकिटांचे अहवाल अंतर्गत लेखापरीक्षकां मार्फत तपासुन घेण्यात यावे असे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार मा.मुख्य लेखाधिकारी यांचे उपरोक्त निर्देशाप्रमाणे लाडु प्रसाद निर्मिती विभागामार्फत प्रत्येक महिन्यात बुंदी प्रसाद पाकिटांचे वाटप,शिल्लक पाकिटे,मासिक खर्च,जमा नावे करणेची कार्यवाही करण्यात येत आहे.

१) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०६/२०१४ रोजीचे सभेतील विषय नं.८ निर्णय क्रं.५६४ अन्वये दर्शनरांगेतील भक्तांना वाटप केलेला मोफत लाडु प्रसाद खर्चाचा मासिक अहवाल मा.कार्यकारी अधिकारी सो.यांचे मान्यतेसाठी सादर करणेत यावा व आथिक वर्षाचे शेवटी एकत्रित अहवाल मा.व्यवस्थापन समितीसमोर नोंद घेणेसाठी सादर करणेत यावा असा निर्णय झालेला आहे.

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/८/२०१६ रोजीचे सभेतील विषय नं.२८ निर्णय क्र.६०९ अन्वये दर्शन रांगेत दि.३/९/२०१६ पासुन भक्तांना ५०ग्रॅम वजनाचे एक बुंदी प्रसाद पाकिट वाटप करण्यात यावे असा निर्णय झालेला आहे.

लाडु प्रसाद निर्मिती विभागामार्फत दरमहा बुंदी प्रसाद वाटपासाठी झालेल्या खर्चाचा मासिक अहवाल मा.कार्यकारी अधिकारी यांचे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे. माहे/एप्रिल -२०१७ ते मार्च-२०१८ या आर्थिक वर्षामध्ये मोफत बुंदी प्रसाद वाटपासाठी झालेल्या खर्चाची तपशिल खलील प्रमाणे –

| अ.नं | महिना | बुंदी प्रसाद पाकिटे संख्या | झालेला खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | एप्रिल-२०१७ | १३५५८०० | १,२९,२०,७७४.०० |
| ०२ | मे-२०१७ | १५२५००० | १,२९,३२,०००.०० |
| ०३ | जुन-२०१७ | १७२७८०० | १,३७,५३,२८८.०० |
| ०४ | जुलै-२०१७ | १६०६००० | १,४२,७७,३४०.०० |
| ०५ | ऑगस्ट-२०१७ | १४४३६०० | १,४१,४७,२८०.०० |
| ०६ | सप्टेंबर-२०१७ | ११५७४०० | १,०६,२४,९३२.०० |
| ०७ | ऑक्टोबर-२०१७ | १५६७८०० | १,४३,४५,३७०.०० |
| ०८ | नोव्हेंबर-२०१७ | १४१८६०० | १,२१,००,६५८.०० |
| ०९ | डिसेंबर-२०१७ | १९३५००० | १,७४,१५,०००.०० |
| १० | जानेवारी-२०१८ | १९१९८०० | १,५८,९५,९४४.०० |
| ११ | फेब्रुवारी-२०१८ | १२५५८०० | १,०१,३४,३०६.०० |
| १२ | मार्च-२०१८ | १५३०००० | १,३८,३१,२००.०० |
| - | एकुण | **१८४४२६००** | **१६,२३,७८,०९२.००** |

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी अनुसार–आर्थिक बाब

विभागाचा अभिप्राय स्पष्ट मत- माहे/एप्रिल-२०१७ ते मार्च-२०१८ आथिक वर्षात वर्षात१८४४२६०० इतके बुंदी प्रसाद पाकीटांचे दर्शन रांगेत वाटप केलेले असुन सदरचे आर्थिक वर्षात त्याकामी आलेला एकुण खर्च रु.१६,२३,७८,०९२/- (अक्षरी रू.सोळा कोटी, तेविस लाख, आठ्याहत्तर हजार, ब्यान्नव रूपये मात्र) अन्नदान खाती वर्ग केलेली असुन सदरबाबत नोंद घेणे साठीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे एप्रिल २०१७ ते मार्च २०१८ अखेर दर्शनरांगेत साईभक्तांना वाटप करण्यात आलेल्या १८४४२६०० बुंदी प्रसाद पाकीटांचे व त्याकामी आलेला एकुण खर्च रक्कम रु.१६,२३,७८,०९२/- मात्र खर्चाचे अवलोकन करण्यात येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,लाडू प्रसाद निर्मीती विभाग )**

---

**विषय नं.३९** **श्री साई समाधी शताब्दी वर्ष औचित्य साधून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून विधवा महिलेच्या पाल्यांस मोफत शिक्षण योजना सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद– सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक –नवीन प्रस्ताव

प्रास्ताविक – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलीत श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी ही शैक्षणिक संस्था महाराष्ट्र राज्य शासनाचे मान्यतेने कायम विना अनुदानीत तत्वावर चालविण्यात येत आहे. शाळेची स्थापना १९९० पासून झालेली असून आज सन २०१८ अखेर एकूण २६०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळेत पुर्व प्राथमिक विभाग , प्राथमिक विभाग व माध्यमिक विभाग असे तीन स्वतंत्र विभाग असून प्राथमिक विभागासाठी स्वतंत्र मुख्याध्यापिका नेमणूक करण्यात आलेली आहे तसेच माध्यमिक विभागासाठी स्वतंत्रपणे प्राचार्य यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. शाळेकडील अपु-या वर्गखोल्यांमुळे शालेय कामकाजाची सकाळ व दुपार असे दोन सत्रात विभागणी करण्यात आलेले आहे. संस्थानचे वतीने आजअखेर शाळेकडे खालील योजना प्रभावीपणे राबविण्यात येत असून सदर योजनाचे पालकांनी स्वागत केलेले आहे.

१) शासनाचे आर.टी.ई. कायदा २००९ (बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण अधिनियम कायदा ) अन्वये २५ % प्रवेश देणे यामध्ये वंचित गटातील व दुर्बल घटकातील बालकांना प्राथमिक शिक्षणासाठी मोफत

प्रवेश देऊन मोफत शिक्षण दिले जाते. सदरची योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून आपल्या शाळेत लागू करण्यात आलेली असून या योजने अंतर्गत २५ %प्रमाणे प्रत्येक वर्षी ३९ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देण्यात आलेले आहेत.

२) जा. नं. एसएसएस/वशी-०६/६०००/२०१० दि. ०४ डिसेंबर २०१० चा आदेशानुसार ज्या संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतला असेल त्यांच्या पाल्यांना संस्थानचे वतीने विहीत केलेनुसार प्रत्येक वर्षी शैक्षणिक शुल्क परतावा देण्यात आलेला आहे.

३) जा. नं. एसएसएस/साप्रशा/ वशी-०६ / ७३२ /२०१७ दि. ०८ मे २०१७ चे आदेशानुसार संबधित आर्थिक वर्षात किमान २४० दिवस कामावर हजर असलेल्या कंत्राटी कर्मचारी यांना त्यांच्या पाल्यांचा शैक्षणिक फी परतावा देण्यात आलेला आहे.

४) संस्थानचे वतीने शाळेमध्ये माहे जुन सन २०१७ पासून शालेय विद्यार्थ्यांना माध्यान्ह मोफत भोजन व्यवस्था सुरु करण्यात आलेली असून सदर योजनेचा शाळेतील गोरगरीब विद्यार्थ्यांना मोठा फायदा झालेला आहे. तसेच काही महिला पालकांनी संस्थानच्या प्रशासनाची मनोभावे प्रशंसा करुन मा. व्यवस्थापन समिती मंडळाला मनापासून धन्यवाद दिलेले आहेत. माध्यान्ह भोजन व्यवस्थेमुळे शहरातील व ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांचा सकाळचे वेळी भोजनाचा प्रश्न मार्गी लागला असून सकाळचे वेळी विद्यार्थ्यांचे डब्यासाठी माता भगिनींची होणारी धावपळीला मोठा दिलासा मिळाला आहे. शाळेत सकाळ व दुपारचे सत्रात एकूण १८०० ते १९०० विद्यार्थी प्रसाद भोजनाचा दैनंदिन लाभ घेत आहेत.

श्री साईबाबा समाधी शताब्दी औचित्य साधून संस्थानचे वतीने गोरगरीबांसाठी श्री साईनाथ रुग्णालयात मोफत उपचार करण्यात येत आहेत. तसेच श्रींचे दर्शनासाठी आलेल्या सर्व साईभक्तांना दैनंदिन प्रसाद भोजन व्यवस्था मोफत राबविण्यात येत आहे.

**मागणीः-** शासनामार्फत गोरगरीब , शेतकरी, अंध अपंग, निराधार तसेच विधवा महिला यांचेसाठी शासकीय पातळीवर विविध योजना राबविल्या जातात. परंतू श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष औचित्य साधुन शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल शिर्डी मध्ये शिक्षण घेणा-या प्रत्येक विधवा महिलेच्या पाल्यांस संस्थानचे वतीने मोफत शिक्षण योजना सुरु करण्यात आली तर संस्थानचे शैक्षणिक क्षेत्रात मोठे नांव लौकीक होईल असे मत आहे. अशाप्रकारे मोफत शिक्षण योजना महाराष्ट्रातील कुठल्याही इंग्रजी माध्यमाचे शाळेत करण्यात आलेली नाही. आज इंग्रजी शिक्षणाला मोठे महत्व प्राप्त झालेले असून प्रत्येक पालकाची इच्छा असते की, आपल्या मुलांचे चांगले भवितव्य घडावे परंतू इंग्रजी माध्यामाच्या खाजगी शाळांचे शैक्षणिक शुल्क अवाढव्य असून पालक हा खर्च पेलवू शकत नाही. काही पालकांना याबाबतचा अनुभव आलेला असून ते पालक आपल्या शाळेत पाल्यांचे प्रवेशासाठी सतत अग्रही असतात. तसेच इतर शाळांपेक्षा आपली शाळा शिस्तप्रिय असून शिक्षणाचा दर्जा चांगला आहे.

श्री साईबाबा संस्थानचे माध्यमातून आपल्या शाळेत प्रवेश घेतलेल्या सर्व विधवा महिलेच्या पाल्यांस संस्थानचे वतीने मोफत शिक्षण योजना सुरु करण्यात यावी असे मत आहे. एखाद्या महिलेच्या पतीचे अपघाती अथवा इतर कारणाने निधन झाले तर त्या महिलेवर दुःखाचा डोंगर कोसळतो, तीचे दुःख वाटून घेण्यासारखे नसते. पतीच्या आकस्मित निधनानंतर कुटुंबाची सर्वस्वी जबाबदारी संबधित महिलेवर येते. सदर महिलेचे पाल्य मुलगा/ मुलगी हे एखाद्या इंग्रजी माध्यमाचे शाळेत शिक्षण घेत असतील तर आर्थिक अडचणीमुळे ती महिला आपल्या अपत्याचे शैक्षणिक शुल्क भरु शकत नाही तसेच ती महिला इतर खाजगी इंग्रजी माध्यामातील अवाढव्य शालेय शुल्क भरु शकत नसल्याने त्या विद्यार्थ्यांचे पुढील शिक्षण पूर्ण करु शकत नाही. म्हणून नाईलाजाने तीला त्या विद्यार्थ्यांला मराठी माध्यमाचे शाळेत प्रवेश घ्यावा लागतो. यामुळे त्या पाल्याचे शैक्षणिक नुकसान होते. आपल्या शाळेतही काही असे विद्यार्थी आहेत की जे अभ्यासात एकदम हुशार आहेत परंतू त्यांचे डोईवरील पित्याचे छत्र हरपल्याने त्यांची मोठयाप्रमाणावर वाताहात झाल्याचे आढळून आले आहे. काही हुशार विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी, स्कुलबस फी भरणे शक्य होत नाही तसेच काही विद्यार्थ्यांना शाळेचा गणवेश तसेच वही पाठ्यपुस्तके वेळेवर मिळत नाहीत. गेल्या दोन तीन वर्षात काही गरीब विद्यार्थ्यांची काही साईभक्तांनी फी भरल्याचे दिसून आले तर काही गरीब विद्यार्थ्यांना साईभक्तांनी व काही पालकांनी गणवेश व वह्या पुस्तके पुरविली असलेबाबतचे निदर्शनास आले आहे. अशा गरीब विद्यार्थ्यांसाठी संस्थानमार्फत मोफत शिक्षण योजना राबवावी असे वाटते.

ज्या प्रमाणे आर. टी. ई. अंतर्गत २५ % मोफत प्रवेश इयत्ता १ ली पासून सुरु करण्यात आलेले आहेत त्याप्रमाणे आपल्या शाळेतील विधवा महिलेचा पाल्याची इयत्ता १ ली पासून ते १० वी पर्यंतचे शैक्षणिक

शुल्क व स्कुलबस शुल्क माफीबाबत योजना सुरु करण्यात यावी. या योजनेमुळे सदर विद्यार्थ्यांना संस्थानकडून मोठा मदतीचा हातभार लागेल. सदर योजनेत पात्र ठरवितांना खालील बाबींचा विचार व्हावा असे मत आहे.

०१. सदर विधवा महिलेचे वार्षिक उत्पन्न रु. १,००,०००/- पेक्षा जास्त नसावे, याबाबत मा. तहसिलदार यांनी प्रमाणित केलेला दाखला सोबत जोडणे आवश्यक आहे.

०२. सदर विधवा महिलेच्या पतीचा मृत्यु दाखला सोबत जोडणे आवश्यक आहे.

०३. सदर योजनेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना शासनाच्या इतर आर्थिक मदतीबाबतच्या सवलती देण्यात येऊ नयेत.

०४. सदरची मोफत शिक्षण योजना ही फक्त इयत्ता १ ली ते इयत्ता १० वी पर्यंत लागू करण्यात यावी.

०५. सदर योजना ही फक्त आपल्या शाळेपुरती मर्यादीत राहील. सदर विद्यार्थ्यांने इतर शाळेत प्रवेश घेतला तर या योजनेचा लाभ त्यांना देण्यात येऊ नये.

०६. सदर योजनेत पात्र ठरलेल्या विद्यार्थी / विद्यार्थीनीला आर. टी. ई. अंतर्गत मोफत प्रवेश या योजनेत सहभागी करण्यात येऊ नये.

०७. आपल्या शाळेत प्रवेश घेतलेल्या अशा सर्व विद्यार्थ्यांना या योजनेत सामावून घेता येईल व प्रत्येक वर्षी या शुल्क माफीबाबत मा. व्यवस्थापन समितीची मंजुरी घेणे गरजेची राहील.

शैक्षणिक वर्ष २०१८- १९ पासून इयत्ता १ ली ते १० वी वर्गामधून उपरोक्त प्रस्तावीत योजना कार्यान्वीत करावयाची झाल्यास श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी मध्ये इयत्ता १ ली ते १० वी पर्यंत एकूण ३१ विद्यार्थी या योजनेत पात्र ठरत आहेत. या सर्व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क व स्कुलबस शुल्क संस्थानचे वतीने माफ करावयाचे झाल्यास शैक्षणिक शुल्कापोटी अंदाजे एकूण रु. १,५४,१८० /- व स्कुलबस शुल्कापोटी अंदाजे एकूण रु. ६०,८६०/- असा एकूण अंदाजे रु. २,१५,०४० /- (अक्षरी रुपये दोन लाख पंधरा हजार चाळीस मात्र ) इतका आर्थिक खर्चाचा भार संस्थानला सहन करावा लागेल.

| अ.नं | विद्यार्थ्याचे नांव | इयत्ता / तुकडी | स्कुल फी २०१८-१९ | स्कुलबस फी २०१८-१९ | मंजुर करावयाचे एकूण शुल्क रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सालके जान्हवी योगेश | इ. १ ली इ. | ४३६० | ३९६० | ८३२० |
| ०२ | जाधव कल्याणी मंगलसिंग | इ. २ री क | ४३६० | २५६० | ६९२० |
| ०३ | रजपूत देवराज विशालसिंग | इ. ३ री क | ४५१० | Walking | ४५१० |
| ०४ | लिटे आदित्य भिकन | इ. ३ री इ | ४५१० | २५६० | ७०७० |
| ०५ | कोकाटे ऋषीकेश रावसाहेब | इ. ४ थी अ | ४५१० | २५६० | ७०७० |
| ०६ | ओहळ मोहन दिलीप | इ. ४ थी इ | ४५१० | २५६० | ७०७० |
| ०७ | चव्हाण श्रृतीका संतोष | इ. ४ थी इ | ४५१० | २५६० | ७०७० |
| ०८ | कोते प्रज्वल भगवान | इ. ४ थी क | ४५१० | २५६० | ७०७० |
| ०९ | गागरे गायत्री शाम | इ. ५ वी अ | ४८४० | २५६० | ७४०० |
| १० | भोंडे भूपेंद्र संजय | इ.५ वी ड | ४८४० | २८५० | ७६९० |
| ११ | गोंदकर अभिषेक राजेंद्र | इ. ५ वी इ | ४८४० | २५६० | ७४०० |
| १२ | गोंदकर दर्शना प्रविण | इ. ६ वी क | ४८४० | २८५० | ७६९० |
| १३ | थेटे सिद्धी बाळासाहेब | इ. ६ वी क | ४८४० | ३९६० | ८८०० |
| १४ | ओहळ प्रतिक्षा दिलीप | इ. ६ वी इ | ४८४० | २५६० | ७४०० |
| १५ | रजपूत कंगना विशालसिंग | इ. ६ वी फ | ४८४० | Walking | ४८४० |
| १६ | गव्हाळे सायली श्रीरंग | इ. ६ वी क | ४८४० | २८५० | ७६९० |
| १७ | रजपूत यशराज विशालसिंग | इ. ६ वी क | ४८४० | Walking | ४८४० |
| १८ | खोंडे अक्षय बापू | इ. ७ वी ड | ४८४० | Walking | ४८४० |
| १९ | निकम निरज दिनेश | इ. ७ वी इ | ४८४० | २५६० | ७४०० |
| २० | बढे शितल राजेंद्र | इ. ७ वी फ | ४८४० | २५६० | ७४०० |
| २१ | कानडे सायली प्रकाश | इ. ७ वी फ | ४८४० | Walking | ४८४० |
| २२ | काकडे आकाश ज्ञानेश्वर | इ. ७ वी फ | ४८४० | २८५० | ७६९० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३ | कोकाटे केतन रावसाहेब | इ. ७ वी फ | ४८४० | २५६० | ७४०० |
| २४ | तनपुरे सुहानी संजय | इ. ८ वी ब | ५६४० | २५६० | ८२०० |
| २५ | नवगिरे शिवानी रविकांत | इ. ८ वी अ | ५६४० | Walking | ५६४० |
| २६ | वाघचौरे वैष्णवी जालींदर | ९ वी अ | ५६४० | २८५० | ८४९० |
| २७ | बावके अभिषेक नानासाहेब | ९ वी क | ५६४० | २५६० | ८२०० |
| २८ | पवार श्रद्धा मोहिनीराज | १० वी अ | ५८१० | Walking | ५८१० |
| २९ | लोढा व्टिंकल रुपचंद | १० वी ब | ५८१० | २८५० | ८६६० |
| ३० | बढे अपूर्वा सर्जेराव | १० वी ब | ५८१० | Walking | ५८१० |
| ३१ | डोंगरे संकेत प्रकाश | १० वी क | ५८१० | Walking | ५८१० |
| | एकूण रक्कम रुपये | | १५४१८०/- | ६०८६०/- | २१५०४०/- |

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी करुन अनुमानः-आर्थिक खर्चाची बाब असून धोरणात्मक विषय आहे. विधवा महिला पाल्य शैक्षणिक खर्च अधार योजना अंतर्गत योजना राबविणेस हरकत नाही.

विभागाचा अभिप्राय-शैक्षणिक वर्ष २०१८- १९ पासून सदर योजना कार्यान्वीत करावयाचे झालेस आजमितीस सहा. शिक्षकांनी पुरविलेल्या माहितीनुसार इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतचे एकूण ३१ विद्यार्थी/ विद्यार्थीनी या योजनेसाठी पात्र ठरत आहेत. या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क व स्कुलबस शुल्क माफ करावयाचे झालेस आज अखेर एकूण रु. २,१५,०४०/- ( अक्षरी रुपये दोन लाख पंधरा हजार चाळीस मात्र) इतका आर्थिक खर्चाचा भार संस्थानला सहन करावा लागेल. तरी सदर योजना राबविणेकामी निर्णयार्थ सादर,

निर्णय क्र.३८५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई समाधी शताब्दी वर्षाचे औचित्य साधून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या वर्षासाठी विधवा महिलांच्या प्रस्तावात नमुद ३१ पाल्यांचे शैक्षणिक शुल्क व स्कूल बस शुल्क एकूण रु.२,१५,०४०/- एवढे माफ करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच दरवर्षी याबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- प्राचार्य,इंग्लिश मिडीयम स्कुल)**

---

विषय नं.४० **हैद्राबाद येथे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे माहिती व मार्गदर्शन केंद्र सुरु करणे.**

प्रस्ताव- **अधिनियमातील तरतुद**– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादित करील किंवा खरेदी करील,अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव**- हैद्राबाद येथे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे माहिती व मार्गदर्शन केंद्र सुरु करणेबाबत..

**प्रस्तावना**-श्री.के.शिवकुमार,अध्यक्ष,श्री त्रिशक्ती हनुमान देवस्थान ट्रस्ट,मिंट कंपांऊड, खैरताबाद, हैद्राबाद यांनी त्यांचे ट्रस्टचे मंदिर हैद्राबाद शहरात मंत्रालयाच्या शेजारी असलेल्या मध्यवर्ती ठिकाणी आहे. हैद्राबाद शहरातून हजारो साईभक्त दररोज शिर्डी येथे साई दर्शनासाठी येत असतात. त्यासाठी त्यांना श्री साईबाबा संस्थानची माहिती मिळणेकामी तसेच निवास व्यवस्था,दर्शन व्यवस्था,अति महत्वाच्या व्यक्तींचे दर्शनासंबंधीत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. आमचे ट्रस्टचे मंदिर हे मोठया पर्यटनस्थळाजवळ आहे. (उदा.हुसेन सागर लेक,नेकलेस रोड,बिर्ला मंदिर इ.) सदर मंदिराजवळ नेहमीच वर्दळ असून त्या ठिकाणी नागरीकांची मोठया प्रमाणात ये-जा चालू असते. त्यामुळे सदर ठिकाणी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे माहिती व मार्गदर्शन केंद्र सुरु केल्यास उपयुक्त ठरेल. शिवाय चालू वर्ष हे श्री साई समाधी शताब्दी वर्ष असल्याने सदर माहिती व मार्गदर्शन केंद्राचा साईभक्तांना लाभ होईल. त्यासाठी आम्ही आमचे उक्त मंदिर परिसरात श्री साईबाबा संस्थानला माहिती व मार्गदर्शन केंद्र सुरु करणेसाठी अल्प भाडेदरात पुरेशी जागा उपलब्ध करुन देण्यास तयार आहोत. तरी सदर ठिकाणी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे माहिती व मार्गदर्शन केंद्र सुरु करणेकामी पुढील कार्यवाही होणेस विनंती आहे,असेबाबत दि.०४/०७/२०१७ रोजीचे व दि.११/०५/२०१८ रोजीचे पत्रान्वये विनंती केली आहे.

उपरोक्त श्री.के.शिवकुमार यांचे दि.०४/०७/२०१७ रोजीचे पत्र मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे,विश्वस्त,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.नं.४७७२/२०१७ दि.१५/०७/२०१७ अन्वये

संस्थानकडे पाठवून त्यात याबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन मंडळाचे पूढे ठेवण्यात येवून नियमानुसार कार्यवाही करुन संबंधीतास तसे कळविणेत यावे,असेबाबत नमूद केलेले आहे.

यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०३/०६/२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३३५ व दि.१४/१०/२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८४९ अन्वये साईभक्तांच्या सोयी-सुविधेसाठी व माहिती केंद्र व यात्रीनिवास सुरु करणेसाठी सिंकदराबाद येथील खालीलप्रमाणे जागा एस.राधास्वामी फाऊंडेशन,सिकंदराबाद यांचेकडून विनामोबदला पोटभाडेपट्टयाने घेण्यात आलेल्या आहेत.

अ) अंदाजे २०० स्क्वे. फुट जागा

तळमजला,युनिट क्र.२५ दिप्ती हाऊस,वायएमसीए कॉम्प्लेक्स,सरदार पटेल रोड,सिकंदराबाद.

ब) अंदाजे ३००० स्क्वे. फुट जागा

दुसरा मजला, युनिट क्र.२०१ ते २०४, दिप्ती हाऊस,वायएमसीए कॉम्प्लेक्स,सरदार पटेल रोड, सिकंदराबाद.

सदरहू जागा ग्रेटर हैद्राबाद म्युनिसिपल कॉर्पोरेशन यांचे हद्दीत असून त्या वायएमसीए या संस्थेच्या मूळ मालकीच्या आहेत. एस.राधास्वामी फौंडेशन,सिकंदराबाद ही संस्था वायएमसीए ची भाडेकरु आहे. तर संस्थान पोटभाडेकरु आहे. भाडेपट्टयातील करारनाम्यानुसार सदर जागेचा मालमत्ता कर वेळोवेळी संस्थानव्दारे अदा करणेत येत आहे. आता, सदर माहिती केंद्रावरील संस्थान कर्मचारी श्री.चंद्रकांत सुराणा यांनी दि.१/७/२०१७ रोजीचे ई-मेलव्दारे कळविले आहे की, वायएमसीए ही संस्था सदर जागेवर आपला मालकी हक्क सांगत आहे. तसेच त्यांनी संस्थानचे नावाचा बोर्ड काढून जागा खाली करणेस सांगीतले आहे. याबाबत श्रीमती प्रेमलता मॅडम,मॅनेजिंग ट्रस्टी,एस.राधास्वामी फौंडेशन, सिकंदराबाद यांचेशी दूरध्वनीवरुन चर्चा केली असता "याबाबत मी पोलीस स्टेशनमध्ये एफ.आय.आर.दाखल केले असून मा.न्यायालयात याबाबत याचिका दाखल करणार आहे" असेबाबत त्यांनी सांगितलेले आहे.

तसेच सिकंदराबाद येथील माहीती केंद्राचे व्यवस्थापक श्री.चंद्रकांत सुराणा यांनी दि.१७/०५/२०१८ रोजीचे ई-मेलद्वारे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे सिकंदराबाद येथील माहिती केंद्रासाठी वापरात असलेल्या जागेसंबंधात राधास्वामी फौंडेशन आणि वायएमसीए यांचे वाद निर्माण झाले असून कोर्ट केसेस सुरु झालेल्या आहे. जागा मालकाने संस्थानचे नावाचे फलक काढून फेकून दिले असून माहीती केंद्राचा कब्जा मिळणेकामी रोज एनकेनप्रकारे त्रास देत आहेत. सदर माहीती केंद्राच्या कराराची मुदत दि.२४/०१/२०१७ रोजी संपलेली आहे. सदर मिळकती संदर्भात वाद चालू झाल्याने पुढील मुदत वाढविणेत आली नाही. तरी उचित कार्यवाही व्हावी असेबाबत इकडेस कळविले आहे.

प्रस्तुत प्रकरणी उपलब्ध कागदपत्रावरुन,सदरची जागा एस.राधास्वामी फौंडेशन, सिकंदराबाद यांनी वायएमसीए यांचेकडून दि.०९/०९/१९८६ पासून २५ वर्ष कालावधीसाठी कराराने घेतलेली आहे व संस्थानने एस.राधास्वामी फौंडेशन, सिकंदराबाद यांचेकडून दि.२४/०१/२००७ पासून १० वर्ष कालावधीसाठी कराराने घेतलेली आहे. सदर जागा संस्थानने साईभक्तांच्या सोयी-सुविधेसाठी व माहितीकेंद्र व यात्रीनिवास सुरु करणेसाठी १० वर्ष करारावर विनामोबदला घेतलेली असलेचे निदर्शनास येते.सदरच्या कराराची मुदत दि.२३/०१/२०१७ रोजी संपुष्टात आलेली आहे

विभागाचा अभिप्राय- सिकंदराबाद येथील संस्थानचे माहीती केंद्राचे वापरास असलेल्या जागेच्या मालकी हक्काबाबत वाद निर्माण झाल्याने पुढील कालावधीसाठी करारनामा करणेऐवजी माहितीकेंद्र व यात्रीनिवास सुरु करणेसाठी इतर ठिकाणी जागा उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्या दृष्टिकोनातून उपरोक्त श्री.के.शिवकुमार यांनी त्यांचे श्री त्रिशक्ती हनुमान देवस्थान ट्रस्ट,मिंट कंपांऊड, खैरताबाद,हैद्राबादचे परिसरात सुचविलेल्या जागेच्या प्रस्तावाचा विचार करता येईल.

हैद्राबाद येथील उक्त प्रस्तावित जागेची मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व मा.उपजिल्हाधिकारी,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी नुकतीच समक्ष पाहणी केली असून सदर जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे माहिती व मार्गदर्शन केंद्रासाठी यथायोग्य असल्याची निदर्शनास आलेली आहे. यास्तव उपरोक्त श्री त्रिशक्ती हनुमान देवस्थान ट्रस्ट,मिंट कंपांऊड,खैरताबाद,हैद्राबाद परिसरातील उक्त वापरास देवू केलेली जागा लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराने संस्थानचे माहिती व मार्गदर्शन केंद्रासाठी उपलब्ध करुन घेणेसाठीच्या निर्णयार्थ सदरचा प्रस्ताव सादर.

**निर्णय क्र.३८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सिंकदराबाद येथील संस्थानचे माहिती केंद्र बंद करण्यात येऊन, त्याऐवजी श्री त्रिशक्ती हनुमान देवस्थान ट्रस्ट,मिंट कंपांऊड, खैरताबाद, हैद्राबाद यांची हैदराबाद परिसरातील जागा लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराने संस्थानचे माहिती व मार्गदर्शन केंद्रासाठी घेण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.४१** **श्री साईनाथ रुग्णालयात आय बँक सुरु करणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानच्या श्री साईनाथ रुग्णालयात आय बॅक सुरु करणेबाबत दि.०४/०८/२०१७,दि.२३/८/२०१७ रोजी मा.उपकार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशाप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.दि. २५/१०/२०१७ राजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ' चर्चा करा, आय बॅक सुरु करण्याचा धोरणात्मक निर्णय व शासनमान्यता + staff आकृतीबंध मंजुर केल्यानंतर खरेदीच्या पुढील action द्या' असे निर्देश दिलेले आहेत .

तरी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशानूसार सदरचा प्रस्ताव फेरसादर-

अधिनियम २००४ मधील तरतूद- कलम १७ (२) (घ) मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहकार्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

मा.व्यवस्थापन समिती ठराव क्र. नवीन प्रस्ताव

प्रास्ताविक समाजातील तळागाळातील गरीब व गरजू रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळावी या उददेशाने श्री साईबाबांच्या शिकवणूकीस अनुसरुन १९६४ साली श्री साईनाथ रुग्णालय सुरु करण्यात आलेले आहे. या रुग्णालयात रुग्णांच्या सेवेसाठी उत्तम पायाभूत सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. येथे येणा-या प्रत्येक रुग्णास मोफत उपचार पुरविले जात असल्यामुळे गरीब व गरजू रुग्णांसाठी श्री साईनाथ रुग्णालय हे ५३ वर्षांपासून मोठे वरदान ठरले आहे. श्रीसाईनाथ रुग्णालयात सध्या ॲलोपथी, होमिओपथी व आयुर्वेदिक असे विविध उपचार पध्दतीने रुग्णांना उपचार घेण्याची सुविधा उपलब्ध आहे.

तसेच श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा सुपरस्पेशालिटी रुग्णालय (२५० बेड) हे देखील सन २००६ पासून कार्यरतआहे. सदर श्री साईबाबा रुग्णालयात कार्डीओलॉजी, कार्डीयाक सर्जरी, न्युरोसर्जरी यासारखे विभाग कार्यरत आहेत.

श्री साईनाथ रुग्णालयात सन जानेवारी ते डिसेंबर २०१७ मध्ये ओपीडी रुग्णसंख्या ३,१४,८१२ अंतररुग्णांची संख्या १३,५६०पैकी एकुण ९,१८६ रुग्णांवर शस्त्रक्रिया / प्रोसिजर्स करण्यात आलेली आहे. तसेच श्री साईबाबा रुग्णालयात ओपीडी रुग्णसंख्या १,६२,९२७ अंर्तरुग्णांची संख्या १२९५८ पैकी १०,०३४ रुग्णांवर शस्त्रक्रिया / प्रोसिजर्स करण्यात आलेली आहे.

संस्थानचे रुग्णालयात गरीब व गरजू रुग्णांनावरील उपचारांचा व शस्त्रक्रियांचा वेळोवेळी लाभ व्हावा याकरिता संस्थान प्रशासन कायमच प्रयत्नशील आहे. श्री साईनाथ रुग्णालयात होणा-या नेत्ररोगविभागातील दैनंदिन ओपीडी व शस्त्रक्रिया यांची माहिती खालीलप्रमाणे **नेत्र विभागातील ओपीडी व शस्त्रक्रिया**

| **सन जानेवारी ते डिसेंबर** | २०१५ | २०१६ | २०१७ |
|---|---|---|---|
| **ओपीडी** | ३८९९६ | ३४६१३ | ४५३५६ |
| **शस्त्रक्रिया** | २८२६ | २४६० | ४३८७ |

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयात असणारी बाहयरुग्णांची संख्या व अंर्तरुग्ण विभागात होणा’या शस्त्रक्रियांचा विचार करता सदर नेत्रविभाग नवनवीन तंत्रज्ञानाने आधुनिक करणेचा व त्याबरोबरच नेत्रपेढी चालू करणेचा विचार संस्थान स्तरावर सुरु आहे.

त्याअनुषंगाने श्री साईनाथ रुग्णालयात येणा-या नेत्ररोगासंबंधीच्या उपचार व शस्त्रक्रिया कामी महत्वाची भुमिका श्री साईबाबा संस्थानने घेणेचे ठरविले आहे. याकामी संस्थानमार्फत 'आय डोनेशन' व 'आय बॅक' उभारणी करणेचा मानस आहे. आज देशभरात अंधत्वाने हजारो संख्येने लोक त्रस्त आहेत. यापैकी फक्त दहा लाख रुग्णच उपचाराने त्यांची दृष्टी परत मिळवू शकतात. मोतिबिंदू व कॉर्निया आजारामुळे ज्यांची दृष्टी गेलेली आहे त्यांनाच दृष्टी परत मिळू शकते. परंतु इजा झालेला कॉर्निया हा नवीन निरोगी कॉर्नियाने बदली करुन मगच सदर रुग्णास नवीन दृष्टी मिळू शकते. हा नवीन निरोगी कॉर्निया एखादया व्यक्तीकडून दान म्हणून मिळविता येतो. यामुळे नेत्रदानाला आज समाजामध्ये अनन्यसाधारण महत्व आहे. एखादया मृत व्यक्तीच्या डोळयांपासून

दोन अंध लोकांची दृष्टी परत मिळविण्यास मदत होते. दिवसेंदिवस होणारे रस्ते अपघात व त्यामुळे वाढणारी रुग्णसंख्या व मृत्यु यांचे प्रमाणदेखील जास्त आहे. श्री साईनाथ रुग्णालयात एप्रिल २०१७ ते मार्च२०१८ या कालावधीत १९१ व श्री साईबाबा रुग्णालयात एप्रिल २०१७ ते मार्च २०१८ या वर्षात६६५ रुग्ण मृत झालेले आहेत. अचानक होणा-या मृत्युनंतर मृत व्यक्तीचे नातेवाईक अवयवदान व्हावे याकरिता साईभक्त नेहमीच आग्रही आहेत. आज अवयवदानाकामी शासनाने देखील महत्वाची भुमिका घेतली आहे. यामधील महत्वाचा टप्पा नेत्रदानाने सुरु करावाअसा विचार संस्थानचा आहे. याकामी केंद्रशासन देखील 'राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रम' (National Programme For Control Of Blindness) अंतर्गत काम करीत आहे.

श्री साईनाथ रुग्णालयात 'आय डोनेशन' व 'आय बॅंक' उभारणीकामी मा.उपकार्यकारी अधिकारी यांचेअध्यक्षतेखाली दि.३१/५/२०१७ रोजी खालील अधिका-यांची बैठक घेण्यात आली.

१. प्रशासकीय अधिकारी रुग्णालय

२. वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा रुग्णालय

३. वैद्यकीय अधिक्षिका, श्री साईनाथ रुग्णालय

४. जिल्हा नेत्रदान समुपदेशक श्री सतिष अहिरे

बैठकीमध्ये नेत्रदान चळवळ राबविणेविषयी खालील मुदयांवर चर्चा करणेत आली.

१) नेत्रदानाबाबत जनजागृती करणे, याकामी शिर्डीमध्ये साईबाबांच्या दर्शनासाठी येणा-या भक्तांना देण्यात येणा-या टाईम दर्शन सुविधेअंतर्गत मिळणा-या पावतीवर नेत्रदान व रक्तदान याबाबत संदेश देणे.

२) नेत्रपेढी परवाना मिळविणेकामी विहीत नमुना फॉर्म भरुन जिल्हा रुग्णालय अहमदनगर व आरोग्य प्रत्यारोपण अधिकारी, मुंबई यांचेकडे पाठवून परवानगी मिळणेबाबत पाठपुरावा करणे.

३) आय बॅंकसाठी लागणारी जागा,यंत्रसामुग्री व मनुष्यबळ याची पुर्तता करणे.

४) यासाठी नेमण्यात येणा-या कर्मचा-यांना प्रशिक्षणासाठी पाठविणे.

५) इतर नेत्रपेढीशी MOU करुन घेणे.

६) नेत्रदान करु इच्छिणा-या दात्यांची यादी तयार करणेत येवून नवीन वेबसाईट तयार करणे.

विभागाचा अभिप्राय- नेत्रपेढी सुरु करणेकामी शासन नियमानूसार परवानगी मिळणेकामी साधारणपणे ७०० ते ९०० स्कवे. फुट जागा आवश्यक आहे. परंतु श्री साईनाथ रुग्णालयात सद्यस्थितीला साधारणपणे ४४४ स्कवे.फुट इतकीच जागा उपलब्ध आहे. सदर जागेची पाहणी ही जिल्हा रुग्णालयाचे समुपदेशक श्री सतिष आहिरे यांनी प्रत्यक्ष केलेली असून त्यांचेकडून आय बॅंक सुरु करणेकामी सदरची जागा योग्य असलेचे त्यांनी सांगितले आहे. तरी सदरची ४४४ स्कवे. फुट ही जागा याकामी निश्चित करता येईल.तसेच श्री साईबाबा संस्थान हे महाराष्ट्र शासन विधीव न्याय विभाग यांचे अखत्यारीत येत असलेमुळे साईनाथ रुग्णालयात नव्याने नेत्रपेढी सुरु करणेकामी महाराष्ट्र शासन विधीव न्याय विभाग यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने खालील बाबींवर देखील विधी व न्याय विभागाची मान्यता मिळणे आवश्यक आहे.

१. नेत्रपेढीसाठी आवश्यक ते मनुष्यबळ मिळणेकामी – सोबत नेत्रपेढीच्या आकृतीबंधात National Programme for Control of Blindness (NPCB) च्या अंतर्गत Standards Of Eye Banking In India 2009 (Directorate General Of Health Services, Ministery Of Health and Family Welfare Government Of India) ची प्रत जोडलेली आहे.

नेत्रपेढीचे कामकाज ३ विभागांमध्ये चालते.

1.EBTC-Eye Bank Training Center

2.EB-Eye Bank

3.EDC-Eye Donation Center

| Sr.No. | Details | EBTC | EB | EDC |
|---|---|---|---|---|
| 1 | Board Of Directors Or Equivalent Committee | Yes | Yes | No |
| 2 | Medical Director / Eye Bank Incharge | Yes | Yes | No |
| 3 | Executive Director | Yes | Yes | No |
| 4 | Eye Bank Manager | Yes | Yes | No |
| 5 | Eye Bank Technician | Yes | Yes | Yes |
| 6 | Eye Donation Counselor | Yes | Yes | No |
| 7 | Administrative Secretory Cum Telephone Operator | Yes | Yes | No |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8 | Driver | Yes | Yes | No |
| 9 | Panel Of Registered Medical Practioners to enucleate round the clock | Yes | Yes | Yes |

वर नमूद केलेल्या पदांवर खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल्.

१. Board Of Director or Equivalent Committee-सदर कमिटीमध्ये रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक, उपवैद्यकीय संचालक व वैद्यकीय अधिक्षक यांचा समावेश करणेत येईल्.

२. इतर सर्व पदे (२ ते ९) शासनमान्यता आलेनंतर आकृतीबंधाप्रमाणे भरता येतील. विभागांसाठी खालीलप्रमाणे पदे आवश्यक आहेत.

| Sr. No. | Name of Post | No.of posts | Payscale | Qualification |
|---|---|---|---|---|
| 1 | Medical Director | 1 | PB15600-39100-GP 6600 | 1.Age not more than 45 yrs.Age relaxation of 5 yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification & experience<br>2.MBBS<br>3.MS/DNB Ophthalmology with minimum experience of 2 yrs in Ophthalmology OR<br>4.FCPS Ophthalmology with minimum experience of 3 yrs in Ophthalmology Or<br>5.University diploma /CPS diploma in Ophthalmology with minimum experience of 5 yrs in Ophthalmology<br>6.MS-CIT<br>7.MMC/MCI Registration with renewal is mandatory. |
| 2 | Executive Director | 1 | PB15600-39100-GP6600 | 1.Age not more than 45 yrs.Age relaxation of 5 yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification and experience<br>2.MBBS<br>3.MMC/MCI Registration with renewal is mandatory<br>4.MS-CIT |
| 3 | Registred Medical Officer | 2 | PB15600-39100-GP5400 | 1.Age not more than 45 yrs.Age relaxation of 5 yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification and experience<br>2.MBBS<br>3.MMC/MCI Registration with renewal is mandatory<br>4.MS-CIT |
| 4 | Eye Donation Counselor | 1 | PB9300-34800-GP4200 | 1.Age not more than 38 for open & 43 for reserved Category.<br>2.BSW/MSW from any recognized university<br>3.Experience minimum of 2 yrs in hospital as a counselor<br>4.MSCIT |
| | Eye Bank Technician | 3 | PB5200-20200-GP1900 | 1.Age not more than 38 for open & 43 for reserved category.<br>2.Higher Secondary examination passed with Diploma / |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | Certificate Course in O.T. Technician from any recognized University / Board<br>3.Experience minimum 2 yrs as a junior O.T.assistant /Technician<br>4.MSCIT |
| | Administrative Secretory / Cum Telephone Operator, Clerk | 1 | 5200-20200-1900 | 1.Age not more than 38 for open & 43 for reserved category.<br>2.Graduate +Typing Marathi -30, English -40<br>3.MSCIT |

विभागाचे मत:- श्री साईनाथ रुग्णालयात नव्याने नेत्रपेढी सुरु करणेस व त्यासाठी लागणा-या आवश्यक त्या शासनमान्य नेत्रपेढीच्या आकृतीबंधास मान्यता मिळणेस, सदर मनुष्यबळासाठी लागणा-या पगारापोटी येणा'या अंदाजे वार्षिक आर्थिक खर्चास् ४५३७७२/-(रु.)मान्यता मिळणेस, वेळोवेळी सदरच्या खर्चात झालेल्या कमी जास्त बदलास देखील मान्यता मिळणेस विनंती.

तरी सदरच्या प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेनंतर शासनमान्यतेसाठी पाठविता येईल. शासमान्यता आलेनंतर कायम / कंत्राटी पध्दतीने प्रस्तावित केलेप्रमाणे मनुष्यबळ भरणेस मान्यता असावी. तसेच नेत्रपेढी चालू करणेकामी शासन मन्यता व मनुष्यबळ मान्यता आलेनंतर आवश्यक ते नेत्रपेढी रजिस्ट्रेशन मशिनरी व कर्मचा-यांना प्रशिक्षण व इतर अनुषंगिक कार्यवाही करणेस देखील सविस्तर मान्यता घेणेत येईल.

तरी श्री साईनाथ रुग्णालयात नव्याने नेत्रपेढी सुरु करणेकामी विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांची परवानगी घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीपुढे निर्णयार्थ सादर करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.३८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयात नव्याने नेत्रपेढी सुरु करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ४,५३,७७२/-मात्रचे वार्षीक खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदर प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- वैद्यकीय अधिक्षीका,साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.४२** **रक्तपेढीना द्यावयाचे अनुदानाच्या नियमावलीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद - कलम १७ (१) व १७ (२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपतीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समिती ठराव क्र.- १) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २३-२४/०५/२०१७ रोजीच्या सभेतील विषय नं. ४६ निर्णय क्र. ४०२ व २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०२/०२/२०१८ रोजीच्या सभेतील विषय नं. १९ निर्णय क्र. १२५

प्रास्ताविक - उपरोक्त संदर्भानुसार थॅलॅसेमिया, हिमोफेलिया व सिकलसेल ॲनिमिया या आजारांच्या रुग्णांना मोफत किंवा सवलतीच्या दराने रक्तपुरवठा करणा-या रक्तपेढ्यांना आर्थिक अनुदान देता येईल. मात्र सदर अर्थिक अनुदान देण्यासाठी अभ्यासपुर्वक सविस्तर नियमावली तयार करण्यात येऊन शासनाच्या या संदर्भातील धोरणासहीत सदर विषय समितीसमोर सादर करण्यात यावा तसेच प्रस्तावीत रक्तपेढया व इतर रक्तपेढयांकडुन ही वैद्यकिय बाबींचा सविस्तर अहवालीची (जसे रक्तपिशव्याचा खर्च, वाटप, दर, शासकिय अनुदान मिळते काय?) मागणी करण्यात यावे असे ठरले.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान- मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २३-२४/०५/२०१७ रोजीच्या सभेतील विषय नं. ४६ निर्णय क्र. ४०२ निर्णयानुसार नियमावली तयार करणेबाबत तसेच लेखाशाखा विभागाकडील जा.नं.एसएसएसटी/वशी-लेखा-अनुदान/२८९४/२०१७, दि. ०८/१०/२०१७ चे पत्रान्वये सदरचा प्रस्ताव मा. छाननी समितीचे सभेसमोर सादर करावयाचा असल्याने रक्तपेढयांना द्यावयाच्या अनुदानासंबंधी नियमावली तयार करुन मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर तात्काळ सादर करणेस कळविलेले आहे. सदर प्रस्तावावर मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०२/०२/२०१८ रोजीच्या सभेतील विषय नं. १९ निर्णय क्र. १२५ अन्वये रक्तपेढींना द्यावयाचे अनुदानाबाबतची प्रस्तावित नियमावली समिती सदस्य मा. विश्वस्त श्री. प्रताप भोसले साहेब यांना दाखवुन यांचे अभिप्रायासह नियमावली फेर सादर.

**नियमावलीतील मुद्दे खालील प्रमाणे -**

१) रक्तपेढी ही धर्मादाय आयुक्त नोंदणीकृत असणे बंधनकारक असेल.
२) नफ्यात असणा-या रक्तपेढीस अनुदान देय होणार नाही.
३) रक्तपेढीने मागील ०३ वर्षांचा ऑडीट रिपोर्ट सादर करणे बंधनकारक असेल.
४) रक्तपेढीचा कारभार पारदर्शक असणे बंधनकारक असेल.
५) रक्तपेढीमध्ये पुर्णवेळ रक्तसंक्रमन अधिकारी (बी.टी.ओ.) उपस्थित असणे बंधनकारक असेल.
६) रक्तपेढीचे विश्वस्तांची नियुक्ती लोकशाही पध्दतीने झालेली असावी.
७) रक्तपेढीने आयकराचे 80 G प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.
८) ऑडीट वर्ग "ब" श्रेणी किंवा त्यावरील असणे बंधनकारक असेल.
९) प्रत्येक वर्षी ऑडीट अहवाल सादर करणे बंधनकारक असेल.
१०) अनुदान मागणीकामी रक्तपेढींचे विश्वस्तांचा सर्वानुमते ठराव असणे बंधनकारक असेल.
११) रक्तपेढीस जास्तीत जास्त वार्षिक रुपये ५ लाखापर्यंत अनुदान मिळेल.
१२) श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष असल्यामुळे श्री साईबाबा संस्थानमार्फत आर्थिक अनुदान एका रक्तपेढीला एकदाच दिले जाईल.
१३) थॅलॅसेमिया रुग्णांना थॅलॅसेमिया कार्ड व हयातीचा दाखला असणे बंधनकारक असेल.
१४) थॅलॅसेमिया रुग्णाकडे थॅलॅसेमिया कार्ड नसल्यास चालु तारखेचा डायग्नोसिस रिपोर्ट असणे बंधनकारक असेल.
१५) श्री साईबाबा संस्थानचे मा. विश्वस्त मंडाळातील सदस्य यांना रक्तपेढींची पहाणी व पडताळणी करणेचा अधिकार असेल.
१६) श्री साईबाबा संस्थानला रक्तपेढीचे विशेष ऑडीट करण्याचे अधिकार असतील.
१७) रक्तपेढीने रुग्णांची शासनास सादर केलेल्या माहितीचे एक प्रत श्री साईबाबा संस्थानकडे सादर करणे बंधनकारक असेल.
१८) श्री साईबाबा संस्थाने दिलेल्या अनुदानाचा वापर केल्याचे चार्टर्ड अकाऊँटंटचे प्रमाणपत्र संस्थानला सादर करावे लागेल.
१९) रक्तपेढीत काही गैरप्रकार आढळुन आल्यास त्यांना देण्यात आलेले अनुदान व्याजासह परत मागण्याचा अधिकार संस्थानला असेल.
२०) संस्थानचे सर्व नियम ज्या रक्तपेढयांना मान्य असतील व ते स्टॅम्प पेपरवर अधिकृत स्वाक्षरीनिशी देतील त्याच रक्तपेढयांना अनुदान देण्याबाबत संस्थान विचार करेल.
२१) शासनाकडुन रक्तपेढयांना रु. १००/- प्रती पिशवी याप्रमाणे अनुदान मिळते, तेवढाच हिस्सा संस्थानने रक्तपेढयांना द्यावा.
२२) ज्या रक्तपेढया मागील तीन वर्षामध्ये किमान दोन वर्षे नफ्यात आहेत त्यांना अनुदान देणेत येऊ नये.

विभागाचा अभिप्राय:- मा.संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई यांनी शासन निर्णय क्र.एमआयएस-१०९९/१९३०/साआर-२५६/९९/प्रशासन-२, वैद्यकीय अधिक्षण व औषधी द्रव्य विभाग, मंत्रालय, मुंबई दि. ५ जानेवारी २००० मध्ये सर्व शासकीय, निमशासकीय, धर्मदाय संचलित रक्तपेढयांना राज्यातील थॅलेसेमिया आणि हिमोफेलिया रुग्णांना मोफत रक्तपुरवठा करणेबाबत कळविणेत आलेले आहे. त्यानुसार या कार्यालयाने राज्यातील सर्व वर उल्लेखित संस्थाना विषयांकित रक्तपुरवठा करणेबाबत बंधन घातले आहे. राज्य रक्त संक्रमण परिषदेमार्फत या बाबत रु.१००/- प्रती पिशवी अनुदान देण्यात येते, असे राज्य रक्त संक्रमण परिषद महाराष्ट्र राज्य यांनी क्र.रा.र.सं.प/थै.हि.मो.र.पु/२०१६/५००, दि. २१/०७/२०१६ रोजीच्या पत्राने रक्तपेढी प्रमुख धर्मादाय संस्थान संचलित रक्तपेढी, रेडक्रॉस संचलित रक्तपेढी यांना कळविलेल्या पत्रात म्हटले आहे.

मा.विश्वस्त श्री. प्रताप भोसले साहेब यांचा अभिप्राय– वरिल नियमावलीत अ.नं.११ मधील अनुदान मर्यादा ५ लाखाऐवजी १० लाख करावे तसेच नियमावलीतील अ.नं.१२, २१ व २२ हे रद्द करावे.

तरी सदरची नियमावली मा.विश्वस्त श्री. प्रताप भोसले साहेब यांचे अभिप्रायासह मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर. तसेच सदरची नियमावली मा. व्यवस्थापन समितीच्या मान्यतेनंतर छाननी समितीच्या मान्यतेने शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात येईल, त्यावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३८८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावातील रक्तपेढीना द्यावयाचे अनुदानाच्या नियमावलीतील अ.नं.२,२१ व २२ हे मुद्दे वगळण्यात यावेत, अ.नं.११ मध्ये रक्तपेढीस जास्तीत जास्त १० लाखापर्यंत अनुदान एकदाच देण्यात यावे. याबदलांसह प्रस्तावित नियमावलीस मान्यता देण्यात आली. तसेच सदर नियमावली छाननी समितीच्या मान्यतेने शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच सदर नियमावलीस शासनाची मान्यता मिळाल्यानंतर संस्थानकडे प्राप्त झालेल्या १२ रक्तपेढयांना मंजुर नियमावलीनुसार अनुदान देण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन समिती समोर सादर करावा.तसेच राज्यातील आदीवासी भागात सेवा देण्याऱ्या रक्तपेढयांकडून प्रस्ताव मागविण्यात येऊन त्यांना अनुदान देण्याचे प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावे, असे ठरले.

तसेच सदर योजनेसाठी एकूण अनुदानाची रक्कम रु.२ कोटी मात्र एवढी मर्यादा निश्चीत करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,साईनाथ रुग्णालय)

---

विषय नं.४३ संस्थान कर्मचारी किंवा त्यांचेवर अवलंबीत नातेवाईकांवर वैद्यकिय उपचारासाठी करण्यात आलेल्या जादा वैद्यकीय बिलाचा परतावा अदा करणेस मंजुरी मिळणे.

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद –

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –१) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१२/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक– खालील संस्थान कर्मचा-यांची रु.२०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

मागणी– पुढील तक्त्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले | | | | | | | |
| १ | रुकसाना साजिद खान<br>विभाग- साईनाथ हॉस्पिटल<br>हुददा – परिचारिका | स्वतः | CVD | डॉ. मनोहर शिंदे | साईबाबा हॉस्पिटल | ६९६३.०० | ६९६३.०० | |
| २ | श्री. गोंदकर प्रशांत भानुदास<br>विभाग- आरोग्य<br>हुददा – मदतनीस | पत्नी व वडील | Lab test /Diabeties | डॉ. मिलन संजलिया वाघुळदे | साईबाबा हॉस्पिटल | ५६९२.०० | ५३४१.०० | |
| ३ | डॉ . कविता शंतनु सरवार<br>विभाग – साईबाबा हॉस्पिटल<br>हुददा- हिस्टोपॅथोलॉजिस्ट | पति व वडील | Lab test Blood Pressure | डॉ. जाधवर | साईबाबा हॉस्पिटल | ५५४७.०० | ५४९०.०० | औषधे बाहेरुन विकत घेतलली आहे. |
| ४ | श्री स्वप्निल बाबासाहेब गायकवाड<br>विभाग - बांधकाम<br>हुददा- ज्यु . इंजिनियर | वडील | Ortho Surgery | डॉ.प्रशांत काळे | साईबाबा हॉस्पिटल | ५९३०.०० | ५९३०.०० | |
| ५ | शकुंतला शंकर मोहिते<br>विभाग- साईनाथ रुग्णालय<br>हुददा – परिचारिका | आई | Ca | डॉ.बो-हाडे | साईबाबा हॉस्पिटल | ५६२५.०० | ५१४०.०० | |
| ६. | प्रदिप विश्वनाथ त्रिभुवन<br>विभाग- साईनाथ | स्वतः व पत्नी | Skin Treatment | डॉ. पोरवाल | साईनाथ हॉस्पिटल | ४६३२.०० | ४६३२.०० | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | हॉस्पिटल<br>हुददा –मदतनीस | | / Diabeties | | | | | |
| ७ | वर्पे संगिता चांगदेव<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुददा- परिचारिका | आई | Diabeties | डॉ. इंगळे | साईबाबा हॉस्पिटल | ३९५८.०० | ३१५९.०० | |
| ८. | श्री ज्योतिलाल भिका जाधव<br>विभाग- आय टी आय<br>हुददा - स.भंडारपाल | स्वतः | Diabeties | डॉ. पोरवाल | साईनाथ हॉस्पिटल | ९७६८.०० | ९७६८.०० | |
| ९ | श्री अभयकुमार शांताराम दुनाखे<br>विभाग- औ.प्र. सं.<br>हुददा – निर्देशक | स्वतः | HTN | डॉ. जाधवर | साईबाबा हॉस्पिटल | २१२५६.०० | २०९६६.०० | औषधे बाहेरुन विकत घेतलली आहे. |
| १० | श्री दिपक सुर्यकांत लोखंडे<br>विभाग –लेखाशाखा<br>हुददा –लिपिक | आई | Blood Pressure | डॉ. जाधवर | साईबाबा हॉस्पिटल | ३६११.०० | २४६८.०० | |
| ११ | श्री सचिन अंबादास डावरे<br>विभाग - सी. सी . टीव्ही<br>हुददा – मदतनिस | स्वतः/ मुलगा/ वडिल | Ca Blood Pressure | डॉ. शेळके डॉ. आव्हाड डॉ. जाधवर | साईबाबा व साईनाथ हॉस्पिटल | १५९८.०० | १५९८.०० | |
| १२. | ॲलिस स्टीफन आवारे<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुददा- स्टाफ नर्स | पती | Lab Test | डॉ. शिंदे | साईबाबा हॉस्पिटल | २१७९०.०० | १७४३२.०० | |
| १३ | रविंद्र बापु गावडे<br>विभाग- पाणीपुरवठा<br>हुददा - तारतंत्री | वडील | UTI | डॉ. मुंदडा | साईबाबा हॉस्पिटल | २७८५४.०० | २७६८९.०० | |
| १४ | कैलास तात्याबा डांगे<br>विभाग - प्रशासन<br>हुददा - मदतनिस | आई | Arthrits | डॉ. काळे | साईबाबा हॉस्पिटल | ११२३.०० | ७४७.०० | |
| १५ | डॉ. न्यायाधिश अशोक अनंत<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुददा - पॅथॉलॉजिस्ट | स्वतः | Blood Pressure | डॉ. जाधवर | साईबाबा हॉस्पिटल | ६५६६.०० | ६३२८.०० | |
| | | | | | **एकूण रक्कम** | **१३१९१३.००** | **१२३६५१.००** | |
| | **ब. संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते.** | | | | | | | |
| १६ | श्री महेश मोहनीराज शेळके<br>हुददा - जोडारी<br>विभाग- मॅकेनिक्स | पत्नी | Ca | डॉ. राम नाईक | रुबी हॉल क्लीनीक,पुणे | ६३४५०.०० | ६०६३८.०० | |
| १७ | श्री सुभाष सुकदेव चौधरी<br>हुददा - विजतंत्री निर्देशक | पत्नी | Hypothyriodism with | डॉ. महेंद्र | प्रवरा मेडीकल लोणी | २७५१८.०० | २६०९०.०० | १७ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | विभाग- आय टी आय | | HTN Antipsychitric | नेमनाथ | | | | |
| १८ | परसराम सोमाजी भालेराव<br>हुददा - पहारेकरी<br>विभाग - संरक्षण | पत्नी | Dengue Encephalitis | डॉ. काटे | रुबी हॉल क्लीनीक,पुणे | ९४०२.०० | ९४०२.०० | १८ |
| १९ | हमिद झुंबर शेख<br>हुददा - मदतनिस<br>विभाग- बांधकाम | स्वतः | Hypertensive Nephropathy | डॉ. जाधवर | सहयाद्री हॉस्पिटल नाशिक | १६९३०५.०० | १३८५२३.०० | |
| २० | श्री सिताराम बापु वैद्य<br>हुददा - मदतनिस<br>विभाग - सा.भ नि. | स्वतः | Anterior wall myocardiac Infraction | डॉ. सुशांत महाले | आनंदऋषीजी हॉस्पिटल अहमदनगर | २२६८११.०० | १७६८११.०० | |
| २१ | श्री अभयकुमार शांताराम दुनाखे<br>हुददा – निर्देशक<br>विभाग- औ.प्र. सं. | पत्नी | Ca | डॉ. बो-हाडे | श्री गुरुजी रुग्णालय नासिक | ६६६५०.०० | ६६६५०.०० | |
| | | | | | **एकूण रक्कम** | **५६३१३६.००** | **४७८११४.००** | |
| | **क. संस्थान मान्य यादीतील नसलेले व रेफर नसलेले हॉस्पिटल** | | | | | | | |
| २२ | श्री. तांबे सुनिल सखाराम<br>हुददा - निर्देशक<br>विभाग- आय टी आय | वडील | Paralysis | आदित्य महामनकर | आदित्य नर्सिंग होम महाड | ७७३१.०० | ४८००.०० | रुग्णाचे वास्तव्य बाहेरगावी असल्यामुळे ८०% रक्कम द्यावी असे मत आहे. |
| | | | | | **क - एकूण रक्कम** | **७७३१.००** | **४८००.००** | |
| | | | | | **अ+ब +क - एकूण रक्कम** | **७०२७८०.००** | **६०६५६५.००** | |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.६,०६,५६५/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत** –नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व उपचार घेतले. सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीची पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.३८९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन- १९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहीलेली असल्यामुळे, उपरोक्त तक्त्यामधील २२ कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम रु. ६,०६,५६५/- त्यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)**

---

विषय नं.४४ **श्री साईबाबा संस्थान रुग्णालयात व्हिजीटींग पध्दतीने तसेच विनामुल्य सेवा देणेस इच्छुक तज्ञ वैद्यकीय अधिका-यांची नेमणूक करणेसाठी नियमावली निश्चीत करणे.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ तदतुद-** कलम १३(४) नुसार समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरीक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजाररूपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजुर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही.

आकृतीबंधातील अटी-शती क्र ३- सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी तसेच अट शर्तअ नं ८ मध्ये समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी जेणेकरून व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही असे नमुद आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र-**

१) दि. ०३/०६/२००६ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र ३२८ (२). कॅथलॅब व हृदय शस्त्रक्रियेकरीता खालीलप्रमाणे दर निश्चीत होऊन वैद्यकीय अधिका-यांना द्यावयाचे चार्जेस व संस्थानचे चार्जेस निश्चित करणेत आले.

| Services | Proposed | | Sanctioned by Sub Committee | |
|---|---|---|---|---|
| CATH LAB | Sansthan | Doctors Charges | Sansthan | Doctors Charges |
| Coronary Angiography | 6000 | 1000 | 6000 | 1000 |
| Coronary Angioplasty | 50000-75000 | 8000 | 50000-75000 | 8000 |
| Renal & Peripheral Angiogr. | 6000 | 1000 | 7500 | 750 |
| Renal & Peripheral Angioplasty. | 50000 | 8000 | 50000 | 8000 |
| BMV | 25000 | 7500 | 25000 | 7500 |
| Permanent Pacemaker Charges | 125000-200000 | 2000 | 125000-200000 | 2000 |
| Temporary Pacing | 4000 | 500 | 4000 | 500 |
| CVTS | | | | |
| CABG | 80000 | 8000 | 60000 | 8000 |
| Single Valve Replacement | 100000 | 12000 | 100000 | 12000 |
| Double Valve Replacement | 150000 | 18000 | 150000 | 18000 |
| ASD/VSD/TOF | 110000 | 12000 | 100000 | 12000 |
| BT shunt | 25000 | 2500 | 25000 | 2500 |
| PDA Ligation | 25000 | 5000 | 25000 | 5000 |

Note:1. Anaesthist's share-30% of the Surgeon's Charges 2. Assistant Surgeon 10% of the Surgeon's Charges.

सर्जिकल ऑपरेटीव्ह चार्जेस पॅकेजमध्ये ३०% रूग्णालय आकार गृहीत धरलेला आहे. सदर आकाराच्या ५०% हिस्सा सर्जनला देण्यात यावा. तसेच भूलतज्ञ यांना नफ्याच्या १५% हिस्सा त्यांचे वेतनानंतरच्या रकमेवर द्यावा.

२) दि. २२/०९/२००७ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र ७७०.

पूर्वीच्या दरपत्रकात कन्सलटेशनवर लागू असलेल्या ७०% दर ६०% वर, जनरल सर्जरीवर डॉक्टर ५५.५५%, भुलतज्ञ १६.६६% वरुन डॉक्टर ४५%, भुलतज्ञ १३%, पूर्वी कन्सलटेशनचे दर वॉर्डप्रमाणे वाढत जात होते ते सर्व वॉर्डमध्ये जनरल वॉर्डप्रमाणे कमी राहतील. डिलक्सचे रुमचा दर रु. ८००/- वरुन रु. ५००/- व हृदय शस्त्रक्रिया विभागात अॅन्जीओग्राफी रु. ६,०००/- वरुन रु. ५,०००/- तर परफ्युजनिस्ट व कॅथलॅब ऑपरेटरला प्रतिकेसनुसार मसिक वेतनाव्यतिरीक्त मोबदला, इंन्सेटीव्हीस्ट यांना मासिक रु. २०,०००/- ऐवजी प्रति केस नुसार मोबदला, पॅथॉलॉजिस्ट यांना २% वरुन ५% वाढ असे ठळक बदल करण्यात आलेले आहेत.

३) दि. १२/०४/२०१४ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र २७५.

मा मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशानुसार प्रस्तावीत केलेप्रमाणे इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट या पदावर ०६ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने व व्हिजीटींग पध्दतीने देण्यात आलेल्या तात्पुरत्या नेमणूकास मान्यता देण्यात आली.

तसेच, कॅथलॅब विभागामध्ये कार्यरत असलेल्या सर्व डॉक्टरांना दि. ०१/०४/२०१४ पासून प्रति एन्जीओग्राफीसाठी रू. ३००/-, अॅन्जीओप्लास्टी व इतर समकक्ष प्रोसिजरसाठी रू. ३०००/- आणि ओपीडी, टीएमटी, २-डी इको इ. साठी सध्या लागू असलेला इंन्सेंटीव्ह देणेत यावा, असे ठरले.

४) मा व्यवस्थापन समिती दि. ०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३७५(५).

संस्थान रूग्णालयामध्ये व्हिजीटींग पध्दतीने सेवा करण्याची संधी मिळावी, यासाठी बरेचसे तज्ञ डॉक्टर्स संस्थानकडे अर्ज करतात व ते अर्ज सभेसमोर सादर करणेत येऊन त्यांना परवानगी देण्यामध्ये बराचसा कालावधी जातो. याकरीता यापुढे व्हिजीटींग पध्दतीने सेवा करण्याची ईच्छा व्यक्त करणारे अर्ज आल्यास यावर निर्णय घेण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांनी प्रदान करण्यात आले.

५) मा व्यवस्थापन समिती दि. १५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४९३.

श्री साईबाबा संस्थान रूग्णालयासाठी व्हिजीटींग डॉक्टरांची शैक्षणिक पात्रता व स्पेशियालीटी याचा विचार करून तयार करणेत आलेल्या प्रस्तावित नियमावलीस मान्यता देण्यात यावी. परंतु सदरहू नियमावलीची अंमलबजावणी करणेपुर्वी त्यास विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी. तसेच शासन मान्यता प्राप्त होईपर्यंत व्हिजीटींग डॉक्टरांना त्यांच्या पुर्वीच्या नेमणूक आदेशाप्रमाणे मानधन / प्रोत्साहन भत्ता अदा करणेत यावा.

याचबरोबर संस्थान रूग्णालये चालविणेसाठी कन्सल्टंन्सी कंपनीची नेमणूक करणेसाठीचा अभ्यासपुर्वक प्रस्ताव व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

प्रस्ताविक- मा व्यवस्थापन समिती दि. १५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४९३ नुसार दि. १८/११/२०१७ रोजी संस्थान रूग्णालयात व्हिजीटींग पध्दतीने कार्यरत वैद्यकीय अधिका-यांना अदा करावयाचे खालीलप्रमाणे मानधन व प्रोत्साहन भत्ताबाबत नियमावलीस मंजुरी मिळणेकामीचा प्रस्ताव मा प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पाठविला होता.

| अ.नं. | स्पेशियालिटी | प्रति व्हिजीट (पूर्ण दिवस) मानधन |
|---|---|---|
| ०१. | एमबीबीएस+डीप्लोमाधारक | ४००० |
| ०२. | एमबीबीएस+एमडी/डीएनबी/एफसीपीएस (फिजीशियन ब्रांचेस) | ५००० + संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| ०३. | एमबीबीएस+एमएस/डीएनबी/एफसीपीएस (सर्जिकल ब्रॅचेस उदा. गायनॅक आर्थो, जन.सर्जरी, फेसिअल सर्जरी) | संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| ०४. | एमबीबीएस+एमडी/डीएनबी/एफसीपीएस+डीएम/डीएनबी (सुपर स्पेशियालीटी फिजीशियन, न्युरो, नेफ्रो, गॅस्ट्रो, आन्को) | ५००० + संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| ०५. | एमबीबीएस+डीएम/डीएनबी कार्डीओलॉजी | संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| ०६. | एमबीबीएस+एमएस/डीएनबी/एफसीपीएस+एमसीएच/डीएनबी (सुपरसर्जिकल ब्रांचेस उदा, न्युरोसर्जन, आन्कोसर्जन, युरोसर्जन, सीव्हीटीएस, प्लास्टिक सर्जरी) | संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| ०७. | एमबीबीएस+डीग्री / डीप्लोमाधारक | श्री साईनाथ रुग्णालय<br>पदविकाधारक रु. ४,००० मानधन<br>पदविधारक रु. ५,००० मानधन |

उपरोक्त मानधन नियमावलीस विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र सासंवि/१०१७/ १९६७/प्र.क्र.२२४/का.१६ दि. १३/०४/२०१८ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.

श्री साईबाबा संस्थान रूग्णालयात तज्ञ व्हिजीटींग वैद्यकीय अधिका-यांना नेमणूक देणेसाठी खालीलप्रमाणे नियमावली निश्चित करता येतील.

१. नविन व्हिजीटींग वैद्यकीय अधिकारी नेमतांना वयोमर्यादा ६० वर्षापेक्षा जास्त नसावी.

२. एम बी बी एस + पोस्ट ग्रॅज्युएट (डीप्लोमा / डीग्री/ सुपरस्पेशालिटी) ही पात्रता असणे आवश्यक राहील.

३. फिजिशियन वैद्यकीय अधिकारी पदावर एम डी (मेडिसीन) ही पात्रता असलेले पुर्णवेळ तज्ञ वैद्यकीय अधिकारी मिळत नसल्याने तात्पुरत्या स्वरूपात व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक करावयाच्या वैद्यकीय अधिका-यांसाठी एम बी बी एस, एम डी (मेडिसीन) या पात्रतेऐवजी एम बी बी एस + एमडी (पलमोनरी मेडिसीन) किंवा एम बी बी एस + डी टी सी डी किंवा एम बी बी एस, एम डी (चेस्ट) किंवा एम बी बी एस, डी एन बी (चेस्ट) ही शैक्षणिक पात्रता आवश्यक राहील.

४. शासन निर्णय क्र सासंवि/१०१७/ १९६७/प्र.क्र.२२४/का.१६ दि. १३/०४/२०१८ नुसार मानधन देय राहील.

५. ज्या वैद्यकीय अधिका-यांकडे एम सी आय / एम एम सी रजिस्ट्रेशन आहे अशाच वैद्यकीय अधिका-यांना नेमणूक देण्यात यावी.

६. आकृतीबंधानुसार रिक्त असलेल्या जागीच १ पद मंजुर असल्यास १ पुर्णवेळ अथवा २ व्हिजीटींग तसेच २ पद मंजुर असल्यास २ पुर्णवेळ अथवा ३ व्हिजीटींग वैद्यकीय अधिकारी नेमणुक करता येईल.

७. आर एम ओ, सी एम ओ, डेंटिस्ट, फिजिओथेरपिस्ट, बीटीओ ह्या पदावर व्हिजीटींग पध्दतीने नेमणुक देता येणार नाही.

८. संस्थान नोकरीतुन गैरशिस्त कारणास्तव नाव कमी केलेल्या अथवा गैरशिस्त कारणास्तव राजीनामा मंजुर केलेल्या उमेदवारांस व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक देण्यात येणार नाही.

९. नेमणुक केलेल्या व्हिजिटींग वैद्यकीय अधिकारी यांना दोन्ही रूग्णालयांचे वेळेनुसार काम करणे बंधनकारक राहील.

१०. पोस्ट ॲडमिशन / पोस्ट ऑपरेटीव्ह केअर संबंधीत पेशंटची सर्व जबाबदारी सदर व्हिजीटींग वैद्यकीय अधिका-यांची राहील.

११. संस्थान रूग्णालयात तपासलेले रूग्ण हि पुढील उपचारासाठी स्वताच्या खाजगी किंवा सलग्न हॉस्पिटलमध्ये पाठविल्याचे आढळल्यास संबंधीत व्हिजीटींग वैद्यकीय अधिका-यांची नेमणूक संपुष्टात आणणेत येईल.

१२. वैद्यकीय संचालक यांचे सुचनेनुसार व आवश्यकतेनुसार साईनाथ किंवा साईबाबा रूग्णालयात काम करावे लागेल.

१३. रविवारी आठवडा सुट्टी असल्याने कोणत्याही व्हिजीटींग वैद्यकीय अधिका-यांना नियमित, ओपीडी, ऑपरेटीव्ह थिएटरचे दिवस देण्यात येणार नाही.

१४. वैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षीका इत्यादी वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कामे करावीत.

१५. व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक ही पुढील आदेश होईपावेतो देण्यात यावी. सदर नेमणूक कधीही काही कारण न देता संपुष्टात आणण्याचे अधिकार व्यवस्थापणास / प्रशासनास राहतील.

१६. व्हिजीटींग वैद्यकीय अधिकारी तसेच विनामुल्य / सेवाभावी सेवा देणेस इच्छुक वैद्यकीय अधिकारी यांची उपरोक्त नियमावलीनुसार नेमणुक करण्यात यावी.

१७. संस्थान रूग्णालयामध्ये व्हिजीटींग पध्दतीने सेवा करण्याची संधी मिळावी, यासाठी बरेचसे तज्ञ डॉक्टर्स संस्थानकडे अर्ज करतात व ते अर्ज सभेसमोर सादर करणेत येऊन त्यांना परवानगी देण्यामध्ये बराचसा कालावधी जातो. याकरीता यापुढे व्हिजीटींग पध्दतीने सेवा करण्याची ईच्छा व्यक्त करणारे अर्ज आल्यास यावर उपरोक्त नियमावलीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घेऊन नेमणूका करव्यात.

१८. आठवड्यातून एक दिवस किंवा महिन्यातील ३ ते ४ दिवस पुर्णवेळ सेवा देणे आवश्यक राहील.

१९. वैद्यकीय संचालक यांचे पुर्व परवानगीशिवाय गैरहजर राहील्यास नेमणूक संपुष्टात आणणेत येईल.

तरी, श्री साईबाबा संस्थानचे रूग्णालयात व्हिजीटींग पध्दतीने वैद्यकीय अधिकारी तसेच विनामुल्य / सेवाभावी सेवा देणेस इच्छुक वैद्यकीय अधिकारी यांचे नेमणूक करणेसाठी उपरोक्त प्रमाणे नियमावली निश्चित करता येईल.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.३९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे रूग्णालयात व्हिजीटींग पध्दतीने वैद्यकीय अधिकारी तसेच विनामुल्य / सेवाभावी सेवा देणेस इच्छुक वैद्यकीय अधिकारी यांचे नेमणूक करणेसाठी प्रस्तावीत नियमावलीस मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)**

---

**आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

आयत्या वेळेचा

विषय नं.०१ **शासन निर्णय व परिपत्रके यांचे वाचन.**

प्रस्ताव- महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कामकाजा संबंधीत शासन निर्णय, परिपत्रके व इतर पत्र प्राप्त होतात. सदर पत्रांची एकत्रित रित्या मागासवर्ग कक्षाकडे नोंद घेऊन सदर पत्रावर उचित कार्यवाहीसाठी संबंधीत विभागाकडे पाठविण्यात येते. सदर शासन पत्रावर संबंधीत विभागाने काय कार्यवाही केली आहे त्याबाबतचा अहवाल प्रत्येक महिन्यास वरिष्ठांकडे सादर करण्यात येतो.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०५/२०१८ चे सभेत आयत्या वेळचा विषय क्र.१७, निर्णय क्र.३४६ "संस्थानचे कामकाजासंबंधी शासनाचे निर्णय, परिपत्रके वेळोवेळी समितीचे बैठकीत सर्व समिती सदस्यांना बैठकीच्या अजेंडयासोबत देण्यात यावी व सदर शासन निर्णय, परिपत्रके यांचे वाचन असा विषय अजेंडयामध्ये समाविष्ट करण्यात यावा . " असा झालेला आहे.

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दि.०१/०५/२०१८ ते दि. ३०/०५/२०१८ अखेर या कालावधीत महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कामकाजासंदर्भात प्राप्त झालेली पत्रे वाचन करणेकामी सोबत परिशिष्ट "अ" मा.व्यवस्थापन समितीचे अवलोकनार्थ सादर.

निर्णय क्र.३९१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाचे विधी व न्याय विभागाकडून संस्थान कामकाजासंबधी प्राप्त झालेले खालील शासन निर्णय व परिपत्रक यांचे वाचन करुन नोंद घेण्यात आली.**

| अ.क्र. | शासन पत्र क्र. व दिनांक | प्राप्त दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| ०१ | क्र.संकिर्ण-२०१८/८१८/प्र.क्र.७३/ का. १६ विधी व न्याय विभाग दि.०५/०५/२०१८ | २४/०५/२०१८ | राज्य शासनाच्या बाजार हस्तक्षेप योजने अंतर्गत खरेदी केलेल्या तुरीचा भरडाई करुन प्राप्त तुरदाळ पुरवठयाचे नियतन मिळण्याबाबत |
| ०२ | क्र.सासंवि-१०१८/८१७/प्र.क्र.७२ का.१६ विधी व न्याय विभाग दि.२५/०५/२०१८ | ३१/०५/२०१८ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद या रुग्णालयाकरीता ३ टेसला एम.आर.आय.स्कॅनर मशिन खरेदी करण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून अर्थसहाय्य करण्याबाबत |
| ०३ | शासन निर्णय क्र. सासंवि-१०१८/१९६३/ प्र.क्र.३७/का. १६ विधी व न्याय विभाग दि.२९/०५/२०१८ | ३०/०५/२०१८ | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील सेवानिवृत्त/मयत झालेल्या/ राजीनामा दिलेल्या कर्मचा-यांना सन २०१२-२०१५ या कालावधीमधील दिपावली सानुग्रह अनुदान अदा करण्यास मान्यता देण्याबाबत. |

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,सामान्य प्रशासन विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०२ **साठा संपुष्टात आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने पुनर्मुद्रण करणेस विहित पध्दतीने ई-निविदा मागणी करुन भक्तांना उपलब्ध करुन देणेकामी ई-निविदेतील तांत्रिक बीडमध्ये पात्र निविदाकार यांचे व्यावसायिक बीड उघडले असता, निम्नतम दर देऊ केलेल्या निविदाकारांना कार्यादेश पारित करणेबाबत.**

प्रस्ताव- **महाराष्ट्रअधिनियम २००५ मधील तरतूद-**

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

‘श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य,त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार- प्रसार करील आणि श्री साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील’

**प्रस्ताविकः-** मा. व्यवस्थापन समिती दि.०७.०३.२०१८ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. १८५ अन्वये साठा संपत आलेली श्री साईसच्चरित मराठी व साईसच्चरित इंग्रजी ही पुस्तके पुर्नमुर्द्रण करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागणी करुन येणा-या अंदाजे रु.९०,९०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आलेली होती.

मंजूर प्रस्ताव ई-निविदा सूचना संस्थान संकेतस्थळावर, इकडील विभागातील प्रेसधारक यादीतील सर्व प्रिंटीग प्रेस यांना ई-मेलव्दारे व जनसंपर्क विभागामार्फत शासकीय दराने मुंबई,ठाणे,पुणे,सोलापूर,कोल्हापूर, अहमदनगर,औरंगाबाद,नागपूर येथील वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्दकरणेकामी कळविणेत आले प्रमाणे जाहीरात

प्रसिध्दी करण्यात आलेली आहे. निविदाधारकांना ई-निविदा अपलोडींगसाठी दि.०७.०५.२०१८ ते दि.१८.०५.२०१८ पर्यंत असा १२ दिवसांचा कालावधी देण्यात आलेला होता.

मा.खरेदी समिती दि.२९.०५.२०१८ रोजीचे सभेतील ई-निविदेतील ०६ निविदाधारकांचे तांत्रिक बीड उघडून, निविदेतील अटी-शर्तीनुसार पूर्वपात्रतेविषयक कागदपत्रांची छानणी केली असता, त्याचा अहवाल खालीलप्रमाणे सादर केला आहे.

| अ.नं. | निविदाकारांचे नाव | पात्र /अपात्र |
|---|---|---|
| ०१ | Atharva Print Creation ,Tilak Rd, Pune. | अपात्र (वार्षिक उलाढाल कमी असलेने) |
| ०२ | Neat Prints pvt.Ltd,<br>Industrial Area, Ahmednagar | पात्र |
| ०३ | Orient Press Ltd,<br>Tarapur Industrial Area,Boisar,Palghar | पात्र |
| ०४ | Print Plus Pvt.Ltd.,<br>Pimplas, Tal:-Bhivandi, Thane. | पात्र |
| ०५ | Sap Print Solution Pvt.Ltd. Lower Parel, (W) Mumbai | पात्र |
| ०६ | Wikas Printing and Carries Pvt.Ltd.<br>Aundh,Pune. 411 007 | पात्र |

**प्रस्ताव**:-मागील वर्षीचे सन-२०१७ चे श्री साईचरित्र मराठी व इंग्रजीचे दर व आज रोजीची शिल्लक पुस्तके खालीलप्रमाणे सादर करत आहे-

| **अ.नं.** | **पुस्तकाचा तपशिल** | **मागील सन-२०१८ चे ई-निविदेतील मंजूर दर (जीएसटीसह )** | **आज रोजीचा शिल्लक साठा** |
|---|---|---|---|
| ०१ | श्री साईचरित्र मराठी | ८४.०० | २५,००० |
| ०२ | श्री साईचरित्र इंग्रजी | ३५.०० | ०० |

ई-निविदेतील तांत्रिक बीडमध्ये ०५ पात्र निविदाधारक यांचे मा. खरेदी समिती दि.२९.०५.२०१८ रोजीची सभेतील ई-निविदेतील व्यवसायिक बीड उघडलेबाबतचा निविदाधारकांनी जीएसटी विरहीत दिलेल्या दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणेआहे.

| अं. नं. | छपाई तपशिल | प्रस्तावित छपाई संख्या | Neat Prints pvt.Ltd, Industrial Area, Ahmednagar | Orient Press Ltd,Tarapur Industrial Area,Boisar, Palghar | Print Plus Pvt.Ltd., Pimplas, Tal:-Bhivandi, Thane. | Sap Print Solution Pvt.Ltd. Lower Parel, (W) Mumbai | Wikas Printing and Carries Pvt.Ltd. Aundh,Pune. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री साई सतचरित्र- मराठी आवृत्ती क्र. ३६ | ५१,००० | ८५.४० | ९०.०० | ७८.०० | ७८.३० | ९७.७५ |
| २ | श्री साई सतचरित्र- इंग्रजी आवृत्ती क्र. २७ | १,००,००० | ३४.१० | ४५.०० | ३७.०० | **३३.३०** | ४४.३० |

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः-** साठा संपत आलेले संस्थान प्रकाशित उपरोक्त तक्त्यातील श्रीसाईचरित्र मराठी व श्री साईचरित्र इंग्रजी पुर्नमुद्रण छपाई करुन भक्तांना उपलब्ध करुन देणेकामी ई-निविदेतील पात्र ०५ निविदाधारक यांचे व्यवसायिक बीड (Commercial Bid) उघडले असता, निम्नत्तम दर देऊ केलेल्याउक्त दरपत्रकांचा तुलनात्मक तक्त्यात अधोरेखीत व गडद केलेले निम्नत्तम दर दर्शविण्यात आले

असून,त्यानुसार श्री साई सतचरित्र मराठी करिता ५१,०००प्रति x ७८.०० दर = ३९,७८,०००/- व श्री साई सतचरित्र इंग्रजी करिता १,००,००० प्रति x ३३.३० दर = ३३,३०,०००/- याप्रमाणे (३९,७८,०००/- + ३३,३०,०००/-) =७३,०८,.०००/- (अक्षरी रूपये त्र्याहत्तर लाख आठ हजार मात्र) जी.एस.टी व्यतिरिक्त चे खर्चास मान्यता असावी. तसेच उक्तप्रमाणे निम्नत्तम दर देऊ केलेल्या निविदाधारकांना, पुस्तके छपाई करुन पुरवठाकामाचे कार्यादेश पारित करणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साठा संपुष्टात आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने पुनर्मुद्रण करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील श्री साई सतचरित्र- मराठी छपाईकरीता Print Plus Pvt.Ltd.,Pimplas, Tal:-Bhivandi, Thane यांचे निम्नतम दर रु. ७८/- मात्र व श्री साई सतचरित्र- इंग्रजी छपाईकरीता Sap Print Solution Pvt.Ltd. Lower Parel, (W) Mumbai यांचे निम्नतम दर रु.३३.३० मात्र स्विकारणेत येऊन त्यांना पुस्तके छपाईचा कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक,प्रकाशने विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **हाऊसकिपींग व स्वच्छता व पेस्टकंट्रोलचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेबाबत तसेच दररोज ५० वाढपी कामगार आऊटसोर्सिंग पध्दतीने पुरविणे याकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे श्री साई प्रसादालयाचे हाऊसकिंपीग ,स्वच्छता व पेस्टकंट्रोलचे कामे व ५० वाढपी कामगार आऊटसोर्सिग पध्दतीने पुरविणे कामी ई-निविदा प्रक्रिया राबिवणेत आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | हाऊसकिपींग व स्वच्छता व पेस्टकंट्रोलचे काम आऊसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेबाबत तसेच दररोज ५० वाढपी कामगार आऊसोर्सिग पध्दतीने पुरविणे |
| ०२ | मागणी | हाऊसकिपींग,स्वच्छतेची ,पेस्टकंट्रोल व ५० वाढपी कर्मचारी पुरविणे |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | २७.०४.२०१८ ते १६.०५.२०१८ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट, ई-मेल व पुरवठाधारकांना दुरध्वनीव्दारे. |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | संस्थानकडे उपलब्ध असलेल्या ०७ ई-मेल आय डी वर |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दिनांक – २७.०४.२०१८<br>टेक्निकल बीड – २३.०५.२०१८<br>कमर्शियल बीड – २९.०५.२०१८ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०६ (सहा) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०४ (चार) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | - |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का. | होय. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का. | -- |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर – | |

| अ.नं. | निविदाकाराचे नाव | कामगाराचा वार्षिक खर्च (BOQ-1) | प्रशासकीयखर्च सानुग्रह अनुदान व इतर एकुण वार्षिक खर्च (BOQ-2) | एकुण रक्कम (BOQ-1+BOQ-2) | प्रति महिना (GST वगळून) इतर सर्व करांसहीत एकुण रक्कम रुपये | स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **मे.स्पीक-एन-स्पॅन सर्व्हीसेस,मुंबई** | २,४५,५५,६००.०० | ४१,८२,१४०.०० | २,८७,३७,७४०.०० | २३,९४,८१२.०० | L1 |
| २ | मे.राजदीप एन्टरप्राईज,गांधीनगर,गजरात | २,४५,१३,५६६.४० | ६८,१०,४९०.३६ | ३,१३,२४,०५६.७६ | २६,१०,३३८.०० | L2 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३ | मे.बी.व्ही.जी.इंडीया लि.पुणे | २,१५,४९,२५४.४० | १,०३,०२,३६०.०१ | ३,१८,५१,६१४.४१ | २६,५४,३०१.०० | L3 |
| | ४ | मे.जगदंबा सर्व्हीस सोल्युशन प्रा.लि.मुंबई | २,७२,३६,७३६.०० | ८७,३७,७२७.०० | ३,५९,७४,४६३.०० | २९,९७,८७२.०० | L4 |

| | |
|---|---|
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर – |

| अ.नं. | वर्ष | परिमाण | दर प्रति महा रु. |
|---|---|---|---|
| १ | श्री साई प्रसादालय हाऊसकिपींग व पेस्टकंट्रोल व ५० वाढपी कर्मचारी पुरविणे . | १२ महिने | १८,९८,०००.०० |

| | |
|---|---|
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल – |

| अ.नं. | वर्ष | खर्च परिमाण |
|---|---|---|
| -- | - | - |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | - |
| १६ | मागील खरेदी दर | १८,९८,०००.०० |
| १७ | मागील पुरवठादार | मे.एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्डअसोसिएटेड लि.पुणे |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | रू. **२३,९४,८१२.०० प्रति महिना** |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | **मे.स्पीक-एन-स्पॅन सर्व्हीसेस,मुंबई** |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का. | होय. |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी, मा. उपकार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील- - | |

| | मागील प्रति महिना दर | सध्याचे प्रति महिना दर | फरक | % ने कमी/जास्त |
|---|---|---|---|---|
| २३ | रु. १८,९८,०००.०० | रु. -२३,९४,८१२.०० +GST | रु - ४,९६,८१२.०० +GST | २०.५०% जास्त+GST |

२४. संक्षिप्त टीप –श्री साई प्रसादालय विभागांचे मागणीप्रमाणे श्री साई प्रसादालय हाऊसकिपींग ,स्वच्छता , पेस्टकंट्रोल व ५० वाढपी कर्मचारी पुरविणेकामी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. याकामी पी.बीड मिटींग घेऊन तदनंतर खरेदी समितीत टेक्निकल स्पेसिफिकेशन तयार करण्यात आले होते.

सदर ई-निविदेमध्ये ६ निविदाधारकांनी भाग घेतला होता याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या चार निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा दि. २९.०५.२०१८ रोजी खरेदी समितीत उघडण्यात आल्या होत्या. यामध्ये **मे.स्पीक-एन-स्पॅन सर्व्हीसेस,मुंबई** यांचे दर न्युनतम आहेत.

तरी न्युनतम निविदाधारक मे. **मे.स्पीक-एन-स्पॅन सर्व्हीसेस,मुंबई** यांचेशी निविदेत दिलेल्या न्युनतम दरांबाबत निर्णय होवून त्यांना निविदेतील अटी /शर्तीनुसार कार्यादेश देणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे समोर निर्यणार्थ सादर ,

**निर्णय क्र.३९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय विभागांचे मागणीप्रमाणे श्री साई प्रसादालय हाऊसकिपींग, स्वच्छता , पेस्टकंट्रोल व ५० वाढपी कर्मचारी पुरविणेकामी ई-निविदेतील निम्नतम दरधारक मे.स्पीक-एन-स्पॅन सर्व्हीसेस,मुंबई यांचे प्रति महिना निम्नतम दर रू.२३,९४,८१२/-+GST स्विकारणेत येऊन त्यांना दि.०२.०६.२०१८ पासून ते दि.३१.०५.२०१९ अखेर एक वर्षासाठी कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,प्रसादालय विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **शिर्डी नगरपंचायत मालकीच्या शिर्डी हद्दीत नगरपंचायत मालकीचे स.नं.१०३ पै.मध्ये इनडोर गेम हॉल, ऑडीटोरीअम, स्विमिंगपुल विकसीत करणेसाठी निधी उपलब्ध होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :** अधिनियम कलम २१(२) (दोन) अन्वये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

“...(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डीनगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी.”

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय** *:*

१. दिनांक ०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२७०.

२. दिनांक ०२/०५/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३३९.

**प्रस्तावना**:- मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील दिनांक २७/०३/२०१८ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

*“*. शिर्डी नगरपंचायत हद्दीमध्ये नगरपंचायत मालकीचे सर्व्हे नं.१०३ पै. मध्ये मंजूर रेखांकनात ॲमिनीटी स्पेस (सुविधा क्षेत्र) क्षेत्र ४१.३३ आर. व ओपन स्पेस (खुला भुखंड) क्षेत्र- ३२.४५ आर व ८.८८ आर क्षेत्र नगरपंचायतीकडे वर्ग करण्यात आलेले आहेत. सदर जागेचा ७/१२ उता-यावर नगरपंचायतीची मालकी हक्क सदरी नोंद झालेली आहे. नगरपंचायत मालकीच्या या जागेमध्ये शिर्डी शहरात येणा-या साईभक्तांना व येथील स्थानिक नागरीकांना अत्याधुनिक सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीकोणतून योगा हॉल, बॅडमिन्टन कोर्ट, टेबल टेनिस हॉल, अत्याधुनिक चेस व कॅरम हॉल या क्रीडा सुविधांनी सुसज्ज असे अद्यावत इनडोअर गेम स्टेडीअम तसेच यामध्ये ७०० नागरीक बसू शकतील असे ऑडीटोरीअम यासह खुल्या भुखंडामध्ये स्विमींगपुल व गार्डन विकासीत करणेबाबत शिर्डी नगरपंचायतीचे नियोजन आहे. सदर प्रस्तावित कामाचे नगरपंचायत द्वारे आराखडे व खालीलप्रमाणे ब्लॉक इस्टीमेट तयार करण्यात आलेले आहेत.

१. योगा हॉल, बॅडमिन्टन कोर्ट, टेबल टेनिस हॉल, अत्याधुनिक चेस व कॅरम हॉल या क्रिडा सुविधांनी सुसज्ज असे अद्यावत इनडोर गेम स्टेडीअम तसेच यामध्ये ७०० नागरीक बसु शकतील असे ऑडीटोरीअम

:- रु.८,९६,१०,८४६/-

२. स्विमिंगपूल व गार्डन :- रु.३,१२,७२,८२८/-

**कामाची एकुण किंमत :- रु.१२,०८,८३,६७४/-**

सदरच्या कामासाठी लागणारा खर्च अंदाजीत रक्कम रु.१२,०८,८३,६७४/- इतका असून, नगरपंचायतीस सदर निधी उभारणे शक्य होणार नाही. सबब याकामासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून निधी अनुदान स्वरुपात उपलब्ध होणे आवश्यक आहे. सदरची सुविधा कामे पुर्ण झालेनंतर येथील साईभक्तांना त्याचा लाभ घेता येणार आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून सदरच्या प्रस्तावास मंजूरी मिळाल्यानंतर याकामाचे सविस्तर अंदाजपत्रके तयार करुन तांत्रीक मंजूरीसह आपणाकडे सादर करण्यात येतील. तरी प्रस्तावित कामासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ नुसार रक्कम रु.१२,०८,८३,६७४/- इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यास विनंती आहे.*”*

वरीलप्रमाणे शिर्डी नगरपंचायतीचे उपरोक्त प्रस्तावानुसार रु.१२,०८,८३,६७४/- मात्र इतके अनुदान उपलब्ध करुन देणेकामी सदरचे प्रस्तावावर निर्णय होणेसाठीचा प्रस्ताव दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.२७० अन्वये *“*यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.*”*

त्यानंतर दिनांक ०२/०५/२०१८ रोजीचे सभेत मा. सौ. योगिता अभय शेळकेपाटील, सदस्या तथा नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत यांनी मा. अध्यक्ष महोदय व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या पत्रान्वये शिर्डी नगरपंचायतीच्या विविध विकास कामाचे प्रस्ताव व्यवस्थापन समिती व छाननी समितीचे शिफारशीसह शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेस विनंती केली. त्यामधील अ. नं.०२ (इनडोर गेमहॉल, ऑडीटोरीअम, स्विमिंग पुल बांधणे बाबत) निर्णय क्र.३३९ अन्वये सभेमध्ये चर्चा होऊन, घेण्यात आलेला निर्णय खालीलप्रमाणे आहे.

‘इनडोर गेमहॉल, ऑडीटोरीअम, स्विमिंग पुल उभारणेचे संपुर्ण काम शिर्डी नगरपंचायत यांनी पुढील देखभालीसह करावे. या अटीवर निधी देणेबाबत सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा.*”*

तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना आवश्यकतेनुसार विनामुल्य व प्रथम प्राधान्याने द्यावे या अटीचा समावेश निर्णयामध्ये करणेत यावा असे मत आहे.

प्रस्ताव*:*- तरी शिर्डी नगरपंचायतीस उपरोक्त प्रस्तावानुसार रु.१२,०८,८३,६७४/- मात्र इतके अनुदान उपलब्ध करुन देणेकामी निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३९४ यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत मालकीच्या शिर्डी हद्दीतील स.नं.१०३ पैकी या जागेमध्ये इनडोर गेम हॉल, ऑडीटोरीअम, स्विमिंगपुल विकसीत करणेसाठी रक्कम रु. .१२,०८,८३,६७४/- मात्र इतके अनुदान शिर्डी नगरपंचायतीस उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली. सदर प्रस्तावीत प्रकल्प उभारणीचे संपुर्ण काम शिर्डी नगरपंचायतीने करावे, तसेच प्रकल्पाच्या पुढील देखभालीची जबाबदारी देखील शिर्डी नगरपंचायतीची राहील. त्याचप्रमाणे विकसीत करण्यात आलेल्या सदर प्रकल्पातील सोई-सुविधा श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांना आवश्यकतेनुसार विनामुल्य व प्रथम प्राधान्याने उपलब्ध करुन देण्याच्या अटीस अधिन राहुन सदर निधी उपलब्ध करुन द्यावा, असे ठरले.

यावाबत मा.छाननी समितीची मान्यता घेऊन प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी सादर करावा, असे ठरले.

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०५ साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा इमारतीस देगणीदार श्री.के.व्ही.रमणी यांचे नावाचा देगणीबाबतचा पितळी अक्षरातील फलक लावणेबाबत.

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे संयुक्त विद्यमाने साईआश्रम भाग-०१ (साईआश्रम भक्तनिवास) व साईआश्रम भाग-०२ (साई धर्मशाळा) या भक्तनिवास प्रकल्पांचे इमारतींचे बांधकाम व इतर अनुषंगीक कामे पूर्ण करण्यात आली आहेत. सदर प्रकल्पातील इमारतींचे बांधकाम शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत देणगीदाखल करणेत आले आहे.

दि.०२/०२/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्या वेळेचा निर्णय क्र.१३७ अन्वये साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा इमारतीचे देणगीदार श्री.के.व्ही.रमणी यांचे बंधु श्री.भास्करन यांनी या देणगीबाबतचा फलक सदरहू इमारतीचे परीसराममध्ये लावणेत यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली असलेचे समिती सदस्यांनी निदर्शनास आणून दिली. याबाबतचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

त्यानुसार दि.०७/०३/२०१८ रोजीचे मा.व्य.स. सभेत समिती सदस्य मा.श्री.बिपीनदादा कोल्हे यांनी, साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा इमारतीचे देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.रमणी हे साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या इमारतींच्या देणगीबाबतचा पितळी अक्षरातील फलक स्वखर्चाने तयार करुन देणार आहेत, अशी माहिती दिली. यावर चर्चा होऊन, साईभक्त श्री.के.व्ही.रमणी यांचेकडून साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या इमारतींच्या देणगीबाबतचा पितळी अक्षरातील फलक स्विकारणेत येऊन, सदरहू इमारतींच्या परीसरामध्ये दर्शनी भागात लावणेत यावा, असे ठरले.

त्याअनुषंगाने देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.रमणी यांचे बंधु श्री.भास्करन यांनी दि.०५/०५/२०१८ रोजी साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा येथे लावावयाचा फलकाचा नमुना ई-मेल व्दारे इकडील कार्यालयास कळविला आहे. सदरहू कळविलेलया नमुना फलकामध्ये खालीलप्रमाणे बदल करणे अपेक्षित आहे, असे नम्र मत आहे.

| श्री.भास्करन यांनी ई-मेलव्दारे सादर केलेला नमुना फलक | नमुना फलकामध्ये करावयाचा बदल |
|---|---|
| SAI ASHRAM PROJECT<br>BUILT AND DONATION BY<br>SHRI. K.V.RAMANI<br>SHIRDI SAI TRUST, CHENNAI<br>TO SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI | SAI ASHRAM **BHAKTANIWAS** PROJECT<br>**BUILDINGS** BUILT AND DONATED BY<br>SHRI. K.V.RAMANI<br>SHIRDI SAI TRUST, CHENNAI<br>TO SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI |
| SAI DHARAMSHALA PROJECT<br>BUILT AND DONATION BY<br>SHRI. K.V.RAMANI<br>SHIRDI SAI TRUST, CHENNAI<br>TO SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI | SAI DHARMSHALA PROJECT<br>**BUILDINGS** BUILT AND DONATED BY<br>SHRI. K.V.RAMANI<br>SHIRDI SAI TRUST, CHENNAI<br>TO SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI |

तरी साईभक्त श्री.के.व्ही.रमणी यांचेकडून साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या इमारतींच्या देणगीबाबतचा पितळी अक्षरातील फलकाचे प्राप्त नमुन्यामध्ये उपरोक्त तक्त्यात दर्शविलेनुसार बदल करुन सदरहू इमारतींचे दर्शनी भागात लावावयाचा फलकाचा नमुना देणगीदार यांचे बंधु श्री.भास्करण यांना पुढील कार्यवाहीसाठी कळविण्यास मान्यता असावी, ही विनंती.

निर्णय क्र.३९५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्त श्री.के.व्ही.रमणी यांचेकडून साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या इमारतींच्या देणगीबाबतचा पितळी अक्षरातील फलकाचे प्राप्त नमुन्यामध्ये उपरोक्त तक्त्यात दर्शविलेनुसार बदल करुन साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या इमारतींचे दर्शनी भागात लावणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०६ **साईनिवास अतिथीगृह इमारतीमधील टॉयलेटचे नुतनीकरण व इतर दुरुस्ती करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तवयवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुद**

महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ चे कलम २१(१)(क) विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग या तरतूदीचे अंतर्गत मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे.

**प्रस्तावनाः–** श्री साईबाबा संस्थानची साईनिवास अतिथीगृह इमारीतचे बांधकाम सन २००० मध्ये पूर्ण झालेले आहे. सदर इमारतीमध्ये एकूण २४ वातूनीकुलीत सुट्स आहेत. या सुट्समध्ये वेळोवेळी संस्थानचे मा.अध्यक्ष महोदय, मा.उपाध्यक्ष महोदय तसेच मा.विश्वस्त यांची निवासव्यवस्था तसेच जनसंपर्क कार्यालयाच्या यादीप्रमाणे येणारे संस्थान मान्यवर व व्ही.आय.पी. यांची निवासाची व्यवस्था केली जाते. याकरीता साईनिवास अतिथी गृहातील सर्व सुट्स व्यवस्थीत असणे गरजेचे आहे. सदर इमारताचे बांधकाम पूर्ण होऊन १८ वर्ष झालेली आहेत. दिर्घ कालावधीतील वापरामुळे सुट्सचे टॉयलेटमधील टाईल्स खराब झालेल्या आहेत. तसेच सुट्सचे दरवाज्यांचे लॉक्स, हॅन्डल, कन्सील्ड डोअर क्लोझर, आरसे खराब झालेले असून ते बदलण्याची आवश्यकता आहे. दि.२९/०५/२०१८ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी व्ही.आय.पी सुट्सची पाहणी केली असता टॉयलेट ब्लॉक, फ्लोरींग व डॅडोचे टाईल्स बदलणे, प्लंबींग पाईप्स व फीक्सचर्स बदलणे, दरवाज्यांचे लॉक, हॅन्डल, डोअर क्लोझर नविन बसविणेबाबत निर्देश दिले आहेत.

सुट्समधील टॉयलेट ब्लॉकचे नुतनीकरण व इतर दुरुस्ती करणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

अ- **मटेरिअल खर्च** –

| अ.नं | मटेरिअल तपशिल | परिणाम / एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | फ्लोरिंग टाईल्स – ६०० x ६०० एम.एम | १४२० चौ.फूट | ४१.५० | ५८,९३०.०० |
| २ | डॅडोकरीता व्हेट्रीफाईड टाईल्स – १२२० x ६०० | ६८५० चौ.फूट | ४४.५० | ३,०४,८२५.०० |
| ३ | सिमेंट | १०० गोणी | २५०.०० | २५,०००.०० |
| ४ | अॅडेझीव्ह सिमेंट | २७४ गोणी | ४५०.०० | १,२३,३००.०० |
| ५ | वाळू | ५ ब्रास | २,५००.०० | १२,५००.०० |
| ६ | कन्सील्ड डोअर क्लोझर | ५२ नग | ३,६००.०० | १,८७,२००.०० |
| ७ | मुख्य दरवाजा – लॉक हॅन्डलसह | २७ नग | ३,५००.०० | ९४,५००.०० |
| ८ | बेडरुम दरवाजा – लॉक हॅन्डलसह | २५ नग | १,५००.०० | ३७,५००.०० |
| ९ | टॉयलेट दरवाजा– लॉक हॅन्डलसह | २७ नग | १,५००.०० | ४०,५००.०० |
| १० | आरसा काच ४ एम.एम जाडी | ३०० चौ. फुट | ८०.०० | २४,०००.०० |
| ११ | स्टॉपर | ५२ नग | २००.०० | १०,४००.०० |
| | | | एकूण | ९,१८,६५५.०० |

ब – **मजूरी खर्च**

| अ.नं | कामाचा तपशिल | परिणाम / एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | टॉयलेट फ्लोरींगला व्हेट्रीफाईड टाईल्स बसविणे. | १४२० चौ.फूट | १६.०० | २२,७२०.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | टॉयलेटमध्ये भिंतीचे डॅडोकरीता केमीकल (Adhesive) वापरुन योग्य त्या साईजमध्ये कटींग करुन व्हेट्रीफाईड टाईल्स बसविणे. | ६८५० चौ.फूट | १६.०० | १,०९,६००.०० |
| ३ | डॅडो व फ्लोरींग जुना टाईल्स काढून तोडफोडीचे मटेरिअलची वाहतूक करणे. | ८२७० चौ.फूट | १५.०० | १,२४,०५०.०० |
| ४ | तोडफोड केलेल्या भागात प्लास्टर करणे | ६८५० | १०.०० | ६८,५००.०० |
| | | | एकूण | ३,२४,८७०.०० |

| | | |
|---|---|---|
| ०१ | मटेरियल खर्च ( अ ) | रु. ९,१८,६५५.०० |
| ०२ | मजुरी खर्च ( ब ) | रु. ३,२४,८७०.०० |
| | एकुण रु. | रु. १२,४३,५२५.०० |
| ०३ | अधिक ५ % कंटेन्जन्सी | रु. ६२,१७६.०० |
| | **एकूण** | **रु. १३,०५,७०१.००** |
| | **पुर्णांकित** | **रु. १३,१०,०००.००** |

उपरोक्त प्रमाणे साईनिवास अतिथीगृह इमारतीचे सुट्समधील टॉयलेटचे नुतनीकरणाचे काम विभागामार्फत करणेसाठी एकूण रक्कम रु. **१३,१०,०००/-** मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरहू कामाकरीता डॅडो व फ्लोरींगकरीता देणगीदाखल प्राप्त झालेल्या टाईल्स वापरता येतिल. उर्वरीत मटेरीयल कोटेशन मागवून खरेदी करता येईल. तसेच फ्लोरींग व डॅडोकरीता टाईल्स बसविणेचे काम मजुरीदराने कोटेशन मागवून करता येईल.

तरी साईनिवास अतिथीगृह इमारतीचे सुट्समधील टॉयलेटचे नुतनीकरण व इतर दुरुस्ती कामासाठी येणारे रक्कम रु.**१३,१०,०००/-** मात्रचे खर्चास व आवश्यक मटेरीयल खरेदीसाठी कोटेशन्स मागविणेकरीता मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.३९६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनिवास अतिथीगृह इमारतीचे सुट्समधील टॉयलेटचे नुतनीकरण व इतर दुरुस्ती कामासाठी येणारे रक्कम रु.१३,१०,०००/- मात्रचे खर्चास व आवश्यक मटेरीयल विहीत पध्दतीने खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच या इमारतीमधील सर्व बाथरुम/टॉयलेट मधील खराब झालेले शॉवर, नळ, पाईप्स लिकेज व इतर अनुशंगीक कामे करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.७,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग/पाणी पुरवठा विभागप्रमुख)**

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०७ **श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचालित शैक्षणिक संकुलामधील श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती निता बबनराव चव्हाणके या दि.३१.१२.२०१५ रोजी विहित वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या होत्या. श्रीमती चव्हाणके यांचे सेवानिवृत्तीनंतर पदोन्नतीने मुख्याध्यापक पद मिळणेबाबत ०४ सहा.शिक्षक, यांनी अर्ज केलेले होते.

श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेकामी कामगार विभागामार्फत संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड. अशोकराव पाटील, अहमदनगर यांचेकडून कामगार विभागामार्फत कायदेशीर अभिप्राय मागविण्यात आला होता. ॲड. अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला होता.

With reference to your letter dt.06/10/2015 seeking my opinion for appointment of Head of Shri Saibaba Kanya Vidya Mandir I would like to invite your attention to rule No.3 (4) of MEPS Rules 1981 which provides that. In the case of girls Secondary School or Junior College of Education for women, the senior most lady teacher fulfilling the conditions laid down in clause (b) of sub rule (1) and having satisfactory record of service, shall be appointed as the Head of that school irrespective of her seniority vis-a-vis the male teachers.

Therefore in my opinion Smt.Mirajkar though she is junior to male candidate needs to be promoted on the post of Head of Shri Saibaba Kanya Vidya Mandir.
If required, it is also advisable to clarify the position by visiting the office of Deputy Director of Education.

उपरोक्त अभिप्रायामध्ये त्यांनी महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम ३ (४) मधील तरतुदीकडे लक्ष वेधून, सदर तरतुदीनुसार श्रीमती मिरजकर यांना पदोन्नतीने मुख्याध्यापक नेमणेस हरकत नाही, असे कळविलेले आहे, मात्र गरज असल्यास मा.शिक्षण उपसंचालक यांचा अभिप्राय घेणेबाबत सुचित केलेले होते.

मात्र दरम्यानचे काळात इकडील कार्यालयाकडील दि.२४.१२.२०१५ रोजीचे टिपणीवरील मान्यतेनुसार जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/आस्था/३६९८/२०१५ दि.३० डिसेंबर, २०१५ चे आदेशान्वये श्रीमती जहाँआरा शहाबुद्दीन मिरजकर यांचेकडे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला. ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी सुचित केलेनुसार शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचेशी पत्रव्यवहार करुन, त्यांना सर्व वस्तुस्थिती कळविण्यात येऊन, (कनिष्ठ महाविद्यालयामध्ये मुले व मुली सहशिक्षण घेत असलेबाबत) श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेकामी सेवाज्येष्ठ शिक्षकाची नेमणूक करावी अगर जेष्ठतम महिला शिक्षिकेची नेमणूक करावी याबाबत अभिप्राय मागविण्यात आला होता. त्यानुसार मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांनी त्यांचेकडील दि.०२.०७.२०१६ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला होता.

"महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम-३(४) मधील तरतुदीनुसार मुलींच्या माध्यमिक शाळेच्या बाबतीत किंवा महिला विद्यालयाच्या बाबतीत पोटनियम-१ खंड (ब) मध्ये ठरवून दिलेल्या शर्ती पुर्ण करणा-या व समाधानकारक सेवा विषयक पुर्ववत असलेल्या जेष्ठतम शिक्षकेस पुरुष शिक्षकाच्या तुलनेने संबधित महिला कर्मचा-याची सेवाजेष्ठता लक्षात घेऊन शाळेची/विद्यालयाची मुख्याध्यापक/प्राचार्य म्हणून नियुक्ती करता येईल.

माध्यमिक शाळा संहिता नुसार माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक हेच उच्च माध्यमिक शाळेचे/कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून काम करत असतात. उच्च माध्यमिक विभागाकडील प्राचार्यांच्या कामासाठी संबधित मुख्याध्यापकाच्या वेतनच्या ग्रेड पे मध्ये १००/- (रु.शंभर) वाढ त्यांना दिलेली असते. त्यामुळे आपल्या संस्थेच्या श्री साईबाबा कन्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी वरील सर्व नियमांच्या अधीन राहुन सेवाजेष्ठता यादीतील सेवाजेष्ठ महिलेची नियुक्ती मुख्याध्यापक/प्राचार्य म्हणून करता येईल" असे नमुद केलेले आहे.

श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाकडील सेवाजेष्ठता, गोपनीय अहवालाची प्रतवारी, ॲड.अशोकराव पाटील, अहमदगनर यांचा अभिप्राय तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचा अभिप्राय या सर्व बाबींचे अवलोकन करुन महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम ३ (४) मधील तरतुदीनुसार व मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.७५५ पुढीलप्रमाणे पारित झालेला आहे. "मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२.१२.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.९१८ अन्वये श्रीमती जहाँआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३६३२/२०१६ दि.०७ जानेवारी, २०१७ अन्वये श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी पदोन्नतीने ९३००-३४८०० + ग्रेड पे रु.४८००/- या वेतनश्रेणीत मुळवेतन रु.१९,०६०/- + ग्रेड पे रु.४८००/- प्रमाणे एक वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसह नेमणूक करण्यात आलेली आहे. श्रीमती मिरजकर यांचा परिविक्षाधीन कालावधी दि.०६ जानेवारी, २०१८ रोजी सपलेला आहे.

मात्र श्रीमती मिरजकर यांचे कामकाजाबाबत शिक्षक, विद्यार्थींनी, ग्रामस्थ यांनी विविध तक्रारी केलेल्या आहेत. श्रीमती मिरजकर या प्र.मुख्याध्यापिका असतांना किंवा परिविक्षाधीन कालावधीमध्ये असतांना त्यांचे कार्यपद्धतीबाबत शिक्षक, विद्यार्थींनी तसेच ग्रामस्थांनी वेळोवेळी तक्रार अर्ज केलेले आहेत. त्यांचे काही तक्रार अर्जांबाबत अद्याप कार्यवाही चालु आहे. तसेच काही तक्रारींबाबत विविध विभागांकडून अभिप्राय येणे बाकी आहे.

दरम्यान श्री.गंगाधर विश्वनाथ वरघुडे, सहा.शिक्षक श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर यांनी त्यांचे दि.०६.०७.२०१७ रोजीचे अर्जान्वये श्री साईबाबा संस्थानच्या कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी नेमणूक करतांना सेवाज्येष्ठता डावलून कनिष्ठ शिक्षिकेला देण्यात आलेली नेमणूक रद्द करावी आणि माझ्यावर झालेला अन्याय दुर करुन माझी मुख्याध्यापक पदी नेमणूक करणेबाबत विनंती केलेली आहे. सदर अर्जामध्ये त्यांनी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय ही शाळा फक्त मुलींची/महिलांची नसून मुलामुलींची (Co-Education) शाळा असल्याचे नमुद केलेले आहे. तसेच त्यांनी अर्जासोबत श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे सन २०१४-१५, २०१५-१६ व सन २०१६-१७ चे स्कुल रिपोर्ट कार्ड सादर केलेले आहे, सदर रिपोर्टकार्डमध्ये Type of School – Co-Educational असे नमुद केलेले आहे. तसेच सदरचे रिपोर्ट कार्ड हे इ.०५ ते इ.१२ वी.असे एकत्रित आहे. मुख्याध्यापक नेमणूकीचे वेळी अथवा आस्थापना विभागाकडे कागदपत्रे सादर करतांना श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर अथवा कनिष्ठ महाविद्यालयाकडून शाळेचे रिपोर्ट कार्डचे पेपर इकडील कार्यालयाकडे सादर केलेले नव्हते. त्यामुळे त्याचा उल्लेख यापुर्वीच्या टिपण्यांमध्ये झालेल्या नाही, ही वस्तुस्थिती आहे. मात्र कनिष्ठ महाविद्यालयाकडे मुले व मुली सहशिक्षण घेत असलेबाबत सर्व टिपण्यांमध्ये तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांना दिलेल्या पत्रामध्ये स्पष्ट नमुद केलेले आहे. तसेच श्री.गंगाधर विश्वनाथ वरघुडे, सहा.शिक्षक श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी शालेय न्यायाधिकरण,पुणे विभाग– सोलापूर येथे पदोन्नोतीने मुख्याध्यापक पद मिळणेबाबत दावा दाखल केलेले आहे.

श्री.गंगाधर विश्वनाथ वरघुडे, सहा.शिक्षक यांनी केलेल्या अर्जानुसार श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील मुख्याध्यापक हे पद पदोन्नतीने नेमणेबाबत जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/ ३२१२/२०१७ दि. १८ सप्टेबर २०१७ रोजीचे पत्रान्वये मा.शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे यांचेकडून लेखी मार्गदर्शन व अभिप्राय मिळणेबाबत विनंती करण्यात आलेली होती.

तसेच इकडील कार्यालयाकडील दि.२४.०१.२०१७ रोजीचे टिपणीवर "कन्या शाळेत महिला मुख्याध्यापक असावा या तरतुदीचा आधार घेत श्रीमती मिरजकर या सेवाज्येष्ठता यादीमध्ये अ.क्र.३ वर असतांनाही ज्येष्ठता डावलुन त्यांची मुख्याध्यापक पदी नियुक्ती झाली आहे. मात्र श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय या शाळेचा दर्जा "मुलींची शाळा" असा नसून **"सह-शिक्षण"** असा आहे. त्यामुळे शाळा संहितेनुसार "सह-शिक्षण" दर्जा असलेल्या शाळेत महिला मुख्याध्यापक असावी अशी तरतुद नाही. त्यामुळे श्रीमती मिरजकर यांची नियुक्ती रद्द करुन, सेवाज्येष्ठतेनुसार मुख्याध्यापक नियुक्ती करावी, तसेच ज्या तक्रारींबाबत विविध विभागांच्या अभिप्राय येणे बाकी आहे, त्या तक्रारी गंभीर स्वरुपाच्या असल्याने त्यामध्ये तथ्य असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे त्यामुळे उत्तराची वाट पाहणे गरजेचे नाही" असे निर्देश दिलेले आहेत.

उपरोक्त वस्तुस्थितीचा विचार करता श्रीमती जहाँआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची नियुक्ती रद्द करुन श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील सेवाज्येष्ठतेनुसार मुख्याध्यापक नियुक्ती करणे संयुक्तिक आहे.

श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील सेवाज्येष्ठता सुची पाहाता श्री.बाजीराव कणलाल वाणी, सहा.शिक्षक हे सेवाज्येष्ठतेमध्ये प्रथम क्रमांकावर आहेत. शासनाने दि.१३ जून, २००५ चे शासन निर्णयानुसार २००४-०५ पासून नियुक्त होणा-या मुख्याध्यापकांसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा "शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम" (डी.एस.एम.) बंधनकारक केलेला आहे. मात्र श्री.वाणी यांनी सदरचा अभ्यासक्रम पुर्ण केलेला नाही. तसेच श्री.बाजीराव कणलाल वाणी यांचेवर अनेक गंभीर आरोप झालेले असून सद्यस्थितीमध्ये त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे

श्री.गंगाधर विश्वनाथ वरघुडे, सहा.शिक्षक हे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील सेवाज्येष्ठता सुचीमध्ये दुस-या क्रमांवर असून मुख्याध्यापक पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता त्यांनी प्राप्त केलेली आहे. तसेच त्यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा "शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम" (डी.एस.एम.) पुर्ण केलेला आहे. त्यांचे वैयक्तिक धारणी व सेवापुस्तकाची पडताळणी केली असता, त्यांचे विरुद्ध कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा गैरशिस्त वर्तन रिपोर्ट झालेला नाही. तसेच त्यांना आजपावेतो एकही कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली नाही.

उपरोक्त वस्तुस्थितीचे अवलोकन करता श्रीमती जहाँआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची मुख्याध्यापक पदी केलेली नियुक्ती रद्दकरुन,शाळा संहितेमधील निकष,शैक्षणिक पात्रता व सेवाज्येष्ठता या सर्व बाबींचा विचार करता

श्री.गंगाधर विश्वनाथ वरघुडे, सहा.शिक्षक यांची श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी नियुक्ती करणेबाबतचे विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर केला असता, मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.०२.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.११२ अन्वये "श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेकामी मा.शिक्षण उपसंचालक यांचा अभिप्राय घेण्यात येऊन, सदरहु प्रस्ताव फेरसादर करणेत यावा" असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.०२.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.११२ नुसार इकडील जा.क्र.जा.क्र.एसएसएस/साप्रशा-आस्था/६२५९/२०१८ दि.२१ फेब्रवारी, २०१८ अन्वये मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग यांना पत्र देऊन श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डीचे मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेकामी लेखी मार्गदर्शन/अभिप्राय मागविण्यात आलेले होते.

त्यानुसार मा.विभागीय शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे यांनी त्यांचेकडील जाक्र/शिउसं/पुवि/माध्य./४०२/उमा/२०१८/ २३८० दि.३१ मार्च, २०१८ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय या शाळेस सन २००५-०६ पासून मुले व मुली सहशिक्षण (Co-Education) प्रवेश देण्यास मान्यता दिलेली आहे. त्यामुळे सदरील शाळा सहशिक्षणाची असल्यामुळे सेवाजेष्ठतेनूसार प्राचार्यपदी नियुक्ती करण्यास हरकत नाही, असा अभिप्राय दिलेला आहे.

त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०४.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.२८२ अन्वये " मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचे दि.३१ मार्च, २०१८ रोजीचे अभिप्रायानुसार श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक पदी केलेली नियुक्ती रद्द करुन, शाळा संहितेमधील निकष, शैक्षणिक पात्रता व सेवाज्येष्ठता या सर्व बाबींचा विचार करता, श्री.गंगाधर विश्वनाथ वरघुडे, सहा.शिक्षक यांची श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०४.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.२८२ नुसार जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/४९८/२०१८ दि.२६ एप्रिल, २०१८ अन्वये श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची मुख्याध्यापक पदी केलेली नियुक्ती रद्द करुन, त्यांची त्यांचे मुळ सहा.शिक्षक या पदावर पदस्थापना करण्यात आली. तसेच जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/४९९/ २०१८ दि.२६ एप्रिल, २०१८ अन्वये श्री.गंगाधर विश्वनाथ वरघुडे यांची श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक पदी ९३००-३४८०० + ग्रेड पे ४८०० या वेतनश्रेणीमध्ये मुळवेतन रु.१९,०६०/- + ग्रेड पे ४८०० देऊन एक वर्ष परिविक्षाधीन कालावधी देऊन नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच त्यांनी शाळा न्यायाधिकरण,पुणे विभाग – सोलापूर येथे पदोन्नोतीने मुख्याध्यापक पद मिळणेबाबत दाखल केलेले अपिल ०७ दिवसांचे आत विनाशर्त काढून घेणेबाबत आदेशीत केलेले होते. मात्र शाळा न्यायधिकरण, पुणे विभाग – सोलापूर यांना सध्या उन्हाळी सुट्टी असल्याने त्यांचे कामकाज बंद आहे. त्यामुळे श्री.वरघुडे यांनी कोर्टाचे कामकाज चालु झाल्याबरोबर दाखल केलेले अपिल विनाशर्त काढून घेईल, असे लेखी पत्र संस्थानकडे सादर केलेले आहे.

दरम्यान मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे यांचे कार्यालयाकडील जा.क्र.शिउसं/उमावि-२/पुवि/ मुख्याध्यापक/२०१६/३०८० दि. २१/०४/२०१८ चे पत्रान्वये जा.क्र.शिउसं / पुवि / माध्य./उमा/४०१/२०१८/२३८० दि.३१/०३/२०१८ रोजीचे पत्र रद्द करण्यात येत असून यापुर्वीचे जा.क्र. शिउसं /उमावि-२/पुवि/२०१६/१५६३९ दि.०२/०७/२०१६ रोजीचे पत्रान्वये मुख्याध्यापक नेमणूकीबाबत कार्यवाही करण्यात यावी,असे कळण्यिात आलेले होते.

श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक नेमणूकीबाबत मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडून वेळोवेळी वेगवेगळे प्रकारचे अभिप्राय प्राप्त झालेले होते. त्यामुळे त्यामळे इकडील जा.क्र.एसएसएस/साप्रशा-आस्था/६४२/२०१८ दि.०८ मे, २०१८ अन्वये मा.शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक नेमणूकीबाबत अभिप्राय मागविण्यात आलेले होते.

मा. शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाकडील जा.क्र.आशिका/१७-१८/शि.ह.मंच/आस्था क-१०६-प्राथ/ २५६९ दि.१० मे, २०१८ रोजीचे पत्रान्वये "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संस्था सन १९९० पासून कन्या विद्या मंदिर ही मुलींची शाळा चालवित असल्याचे आपण संदर्भांकित पत्रामध्ये नमुद केलेले आहे. याबाबत संबंधित शाळेत इयत्ता ५ वी ते १० वीच्या स्तरावर केवळ मुलींचाच पट असल्याचे School Report Card आपण सादर केलेले आहे. अशा परिस्थितीत इयत्ता

०५ वी ते इयत्ता १० वीचा शैक्षणिक स्तर हा पुर्णतः मुलींसाठी असल्याचे स्पष्ट होत आहे. तसेच शाळेस जुलै २००५ मध्ये सन २००५-०६ पासून उच्च माध्यमिक स्तरावरील मुलां-मुलींसाठी इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वीचे वर्ग सुरु करण्यास सहशिक्षणाची अनुमती प्राप्त झाल्याचे आपण नमुद केलेले असल्याने, सदर इयत्ता ५ वी ते इयत्ता १० वीची शाळा ही कन्या शाळा असल्यामुळे या शाळेतील मुख्याध्यापकाची अर्हता व नेमणुकीबाबत आपले लक्ष महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ च्या नियम क्रमांक ३ (४) कडे वेधण्यात येत असून, या नियमातील तरतुदीनुसार यथनियम कार्यवाही करण्यात यावी" असा अभिप्राय दिलेला आहे. मा.शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांचे पत्रामध्ये संदर्भीय पत्र म्हणून इकडील कार्यालयाकडील जा.क्र.एसएसएस/साप्रशा-आस्था/३२१२/२०१७ दि.१८.०९.२०१७ रोजीचे मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांना अग्रेषित केलेल्या पत्राचा उल्लेख केलेला आहे.

महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ च्या नियम क्रमांक ३ मुख्याध्यापकाची अर्हता व नेमणूक मधील कलम (४) मध्ये मुलींच्या माध्यमिक शाळेच्या बाबतीत किंवा महिला अध्यापक विद्यालयाच्या बाबतीत पोट नियम (१), खंड (ब) मध्ये ठरवून दिलेल्या शर्ती पुर्ण करणा-या व समाधानकारक सेवा विषयक पूर्ववृत्त असणा-या ज्येष्ठतम शिक्षिकेस, पुरुष शिक्षकांच्या तुलनेने तिची ज्येष्ठता लक्षात न घेता, त्या शाळेची/विद्यालयाची मुख्याध्यापिका/प्राचार्य म्हणून नेमण्यात येईल, असे नमुद केलेले आहे.

मा.शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील दि.१० मे, २०१८ रोजीचे पत्रातील अभिप्रायानुसार श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक पदी सेवाज्येष्ठ महिला शिक्षिकेची नेमणूक करावी लागेल. श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील सेवाज्येष्ठता यादीचे अवलोकन करता श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर या सेवाज्येष्ठ महिला शिक्षिका असल्याने त्यांची श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक पदी नेमणूक करावी लागेल, असे नम्र मत आहे.

मात्र श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर या मुख्याध्यापक पदी कार्यरत असतांना त्यांचे कामकाजाबाबत शिक्षक, विद्यार्थीनी, ग्रामस्थ यांनी विविध तक्रारी केलेल्या आहेत. त्यांचे काही तक्रार अर्जांबाबत अद्याप कार्यवाही चालु आहे. तसेच श्रीमती मिरजकर यांचे एम.एड. अभ्यासक्रमाबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेमार्फत चौकशी चालु आहे. तसेच श्री.गंगाधर विश्वनाथ वरघुडे, यांनी शाळा न्यायाधिकरण, पुणे विभाग – सोलापूर येथे पदोन्नोतीने मुख्याध्यापक पद मिळणेबाबत दाखल केलेले अपिल अद्याप मागे घेतलेले नाही.

तरी मा.शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील दि.१० मे, २०१८ रोजीचे पत्रातील अभिप्राय व उपरोक्त सद्यस्थितीचे अवलोकन करता श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर, सेवाज्येष्ठ महिला शिक्षिका यांची श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक पदी नियुक्ती करणेबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक पदी नियुक्ती करण्याचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **नविन वरिष्ठ महाविद्यालयाकरीता संगणक प्रणाली देणगीने स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३-२४.०५.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.४४४ अन्वये संस्थानचे कला, वाणिज्य, विज्ञान शाखेचे वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेस तसेच त्यासाठी राहाता तालुक्याचा बृह्द आराखडयात समावेश करणेकामी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडे पाठपुरावा करण्यात येऊन, पुढील शैक्षणिक वर्षामध्ये शासन मान्यता मिळवून वरिष्ठ महाविद्यालय सुरु करता येईल, अशी कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश दिलेले आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०९.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.८४६ नुसार महाविद्यालयाचे नाव श्री साईबाबा कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय असे ठरविणेत आले. सदर प्रस्तावीत महाविद्यालयासाठी इमारत/जागा म्हणून तात्पुरत्या स्वरुपात साई धर्मशाळा येथील २ इमारती नमुद करणेत याव्यात तसेच प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे व शासन निर्णय क्र.१५.०९.२०१७ नुसार कार्यवाही करणेकामी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना

अधिकार प्रदान करणेत येऊन, वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेसाठी आवश्यक असलेल्या आकृतीबंधाबाबतचा सविस्तर प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.०२.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.१११ नुसार वरिष्ठ महाविद्यालयासाठी आवश्यक प्रयोगशाळा, फर्निचर, संगणक, क्रिडा साहित्य खरेदीस मान्यता मिळालेली असून, त्यानुसार खरेदीची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. सदर मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार संगणक व अनुषंगिक साहित्य खरेदीस अंदाजे रु.२५,९०,०००/- मात्र खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संगणक व संगणकीय साहित्याची खरेदी सुरु असून, सदरची खरेदी ही अंतिम टप्प्यात आलेली आहे.

राज्यातील बहुतांशी वरिष्ठ महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रिया ही ऑनलाईन पद्धतीने होत असते. तसेच वरिष्ठ महाविद्यालयाचे नॅक संलग्नतेकरिता मोठ्या प्रमाणात कागदपत्रांची पुर्तता करावी लागते. या सर्व बाबी लक्षात घेता संस्थानचे प्रस्तावित वरिष्ठ महाविद्यालयासाठी अशी संगणक प्रणाली असणे गरजेचे आहे. याकरिता शिर्डीचे जवळपासच्या वरिष्ठ महाविद्यालयांना भेट देऊन, तेथील संगणक प्रणालीची माहिती घेतली असता, सर्व महाविद्यालय हे मे.वृद्धी सॉफ्टवेअर सोल्युशन प्रा.लि., मालेगांव यांचेकडील संगणक प्रणाली वापरत असलेबाबत माहिती मिळाली.

त्यामुळे मे.वृद्धी सॉफ्टवेअर सोल्युशन प्रा.लि., मालेगांव यांचेशी दुरध्वनीद्वारे चर्चा करुन, त्यांना सदर संगणक प्रणालीचे Demo सादर करणेकामी दि.२६.०५.२०१८ रोजी शिर्डी येथे बोलविले होते. तसेच सदर संगणक प्रणालीचा Demo पाहणेसाठी संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागाकडील तांत्रिक सहाय्यक यांना देखील उपस्थित राहणेकामी निर्देश दिलेले होते.

त्यानुसार दि.२६.०५.२०१८ रोजी दुपारी ०३.०० वा. मे.वृद्धी सॉफ्टवेअर सोल्युशन प्रा.लि., मालेगांव यांचे प्रतिनिधींनी श्री.ए.आर.औटी, प्रशासकीय अधिकारी शैक्षणिक संकुल, श्री.आर.सी.पुजारी, तांत्रिक सहाय्यक, माहिती तंत्रज्ञान विभाग, श्री.विकास शिवगजे, सहा.शिक्षक, व श्री.भाऊसाहेब शिंदे, ग्रंथपाल श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांचे उपस्थितीत सदर संगणक प्रणालीचा Demo सादर केला.

सदरच्या संगणक प्रणालीमध्ये खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध आहेत.

१. नॅक संलग्नतेकरिता आवश्यक सर्व प्रकारचे रिपोर्ट उपलब्ध आहेत.
२. ऑनलाईन ॲडमिशन फॉर्म सबमीशन, ऑनलाईन मेरिट फॉर्म सबमीशन
३. आरक्षणाबाबतचे सर्व नियमांचे पालन करुन पहिली, दुसरी, तिसरी, चौथी गुणवत्ता यादी तयार करणे.
४. ऑनलाईन फि पेमेंट (महाविद्यालयास कोणतेही अतिरिक्त शुल्क न घेता पेमेंट गेटवे दिला जातो.)
५. विद्यार्थ्यास ऑनलाईन फि भरतांना फिच्या रकमेत हप्ते करुन घेण्याची सोय मिळते. ऑनलाईन बॅंक चलान तयार करणे.
६. ऑनलाईन पेडींग फि समरी व पेडींग फि कलेक्शन, ऑनलाईन स्टुडंट फि लेजर, पालकांसाठी ऑनलाईन अटेंडस समरी
७. विद्यार्थ्यास कस्टमाईझ आय.डी.कार्ड प्रवेश पावती सोबतच देणे शक्य आहे.
८. ऑनलाईन लर्निंग मॅनेजमेंट, ऑनलाईन टिचर डायरी, ऑनलाईन ॲकडमीक प्लानिंग, ऑनलाईन टिचींग लर्निंग प्लान
९. शिक्षकांनी दिलेल्या नोटस, प्रेझेंटेशन, व्हिडीओ लेक्चर विद्यार्थ्यांस ऑनलाईन उपलब्ध करुन देणे.
१०. नवीन क्रेडीट सिस्टम, सेमीस्टर सिस्टम, ॲन्युअल पॅटर्न अभ्यासक्रम तसेच सेमीस्टर व ॲन्युअल पॅटर्न असे दोन्ही पॅटर्नचा समावेश असलेल्या अभ्यासक्रमांचा निकाल तयार करणे.
११. ए.टी.के.टी.चे नियम सबंधीत विद्यापीठाच्या नियमावली प्रमाणे लागू करण्याचे संपुर्ण स्वातंत्र्य
१२. निकाल तयार करतांना ऑर्डीनन्स व ग्रेस् मार्कचे नियम लागू करण्याचे संपुर्ण स्वातंत्र्य,
१३. टि.सी., एल.सी., बोनाफाईड सर्टीफिकेट तयार करणे. परिक्षेचे हॉल तिकीट ऑनलाईन उपलब्ध करुन देणे.
१४. शिक्षण संचालक व विद्यापीठाने मागवलेल्या स्वरुपात माहिती वेळोवेळी उपलब्ध करुन देणे.
१५. पालक, विद्यार्थी व शिक्षक यांच्यात ऑनलाईन माहितीची देवाण घेवाण करणे.
१६. महाविद्यालयातील संगणक प्रणालीमध्ये नोंदवलेली उपस्थिती ऑनलाईन पालकांपर्यंत पोहचवणे.
१७. विद्यार्थ्यांची भरलेली फी व आजपर्यंत शिल्लक फि याची पालकांना ऑनलाईन माहिती देणे.
१८. विद्यार्थ्यांचा परिक्षेतील प्रोग्रेस रिपोर्ट पालकांना हवा तेव्हा ऑनलाईन उपलब्ध करुन देणे.

१९.	विद्यार्थ्यास व पालकांना शिक्षकांबद्दलच्या फिडबॅक ऑनलाईन भरण्याची सोय.
२०.	महाविद्यालयात प्रवेशीत विद्यार्थ्यांना एस.एम.एस.द्वारे सुचना व माहिती उपलब्ध करुन देणे.
२१.	विविध स्कॉलरशिप बाबत सर्व रिपोर्ट सुविधा, तसेच विद्यापीठास, जिल्हा परिषदेस माहिती पाठविणेची सुविधा.
२२.	विद्यापीठामार्फत अथवा शासनामार्फत वेळोवेळी पारित केले जाणारे सर्व परिपत्रके, आदेश, शासन निर्णय लगेच Upadate करण्याची सुविधा.

या बरोबरच इतरही अनेक सुविधा सदरच संगणक प्रणालीमध्ये उपलब्ध आहे. तसेच एम.आय.सी. विभाग (परिक्षा नियंत्रक) पुणे विद्यापीठ यांचेकडील दि.०९.०५.२०१२ रोजीचे पत्रान्वये सर्व महाविद्यालयांना प्रवेशाचा संगणकीय डेटा उपलब्ध करुन देणेबाबत निर्देश दिलेले आहेत. तसेच सदर पत्रामध्ये विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार प्रथम वर्ष प्रवेशाचे व परिक्षेचे महाविद्यालयाचे कामकाज वृद्धी सॉफ्टवेअर मधून करावयाचे ठरविलेले असलेबाबत कळविलेले आहे.

सदर संगणक प्रणालीमधील सर्व सोई सुविधांचे अवलोकन करता, सदरची संगणक प्रणाली नवीन वरिष्ठ महाविद्यालयासाठी अतिशय उपयुक्त असून, त्यामुळे वेळेची व मनुष्यबळाची बचत होऊन, सर्व महाविद्यालयीन कामकाज सोपे व वेळेत होईल, असे नम्र मत आहे.

त्यामुळे मे.वृद्धी सॉफ्टेवेअर सोल्युशन प्रा.लि., मालेगांव यांचे प्रतिनिधींशी संगणक प्रणालीचे दरांबाबत चर्चा केली असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर कळविले.

| Sr.No. | Product offered | Quantity per School or per College | Cost | AMC per School or per College |
|---|---|---|---|---|
| 01. | VRIDDHI software for campus Management- campus product for internal administration of your school or college | 01 | देणगी | Applicable |
| 02 | VRIDDHI Online Software which includes all features | 01 | Rs.55/- per year per student | NA |

मे.वृद्धी सॉफ्टेवेअर सोल्युशन प्रा.लि., मालेगांव यांचे प्रतिनिधींनी श्री साईबाबा संस्थानचे वरिष्ठ महाविद्यालयासाठी सदरची संगणक प्रणाली मोफत देणेत येईल. फक्त ऑनलाईन सुविधांसाठी प्रति विद्यार्थी प्रति वर्ष रु.५५/- मात्र शुल्क सबंधीत कंपनीस आदा करावे लागतील, असे सांगितले.

त्यामुळे मे.वृद्धी सॉफ्टेवेअर सोल्युशन प्रा.लि., मालेगांव यांना ऑनलाईन सुविधांसाठी प्रति विद्यार्थी, प्रति वर्षी रु.५५/- मात्र शुल्क आदा करावे लागेल. सदरचे शुल्क प्रत्येक विद्यार्थ्यांकडून प्रवेशाची वेळी स्विकारता येईल, त्यामुळे संस्थानवर कोणत्याही स्वरुपाची आर्थिक भार पडणार नाही.

तरी संस्थानचे नवीन वरिष्ठ महाविद्यालयाचे कामकाज संगणकीकृत होणेसाठी व विद्यापीठाशी समन्वय राहणेसाठी मे.वृद्धी सॉफ्टेवेअर सोल्युशन प्रा.लि., मालेगांव यांचेकडील संगणक प्रणाली मोफत स्विकारणेस तसेच ऑनलाईन सुविधांसाठी प्रति विद्यार्थी चालु वर्षी रु.५५/- मात्र शुल्क स्विकारणेस तसेच त्यानंतर प्रतिवर्षी सदर शुल्कामध्ये होणारे वाढीनुसार शुल्क स्विकारणेस मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३९८**	**यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.वृद्धी सॉफ्टेवेअर सोल्युशन प्रा.लि., मालेगांव यांचेकडील संगणक प्रणाली मोफत स्विकारणेस मान्यता देण्यात आली. व ऑनलाईन सुविधांसाठी प्रति विद्यार्थी शुल्क स्विकारणेस मान्यता देण्यात आली. तथापी सदर प्रति विद्यार्थी शुल्काबाबत संबधीत कंपनीशी चर्चा करुन रु.५५/- पेक्षा कमी करण्याचा प्रयत्न करावा, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक,सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **श्री साईबाबा संस्थान पाणी पुरवठा योजनेसाठी मौजे निमगाव कोऱ्हाळे येथील गट नं.२४५ क्षेत्र ३ हे १९ आर क्षेत्रात नविन साठवण तलाव निर्मिती देणगीदार श्री.रमेश जी संहेता यांचेकडून देणगी स्वरुपात करुन स्विकारणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. रमेश जी. संहेता, मुंबई यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता नविन वाढीव साठवण तलाव निर्मीतीसाठी देणगी स्वरुपात आर्थिक मदत देणेची तयारी दर्शविलेवरुन यासाठी संस्थानकडुन जागा उपलब्ध करुन देवून साठवण तलावाची निर्मीती करणेबाबतची कार्यवाही बांधकाम विभागामार्फत करणे व श्री. रमेश जी. संहेता, मुंबई यांचेकडुन नविन साठवण तलाव निर्मीतीसाठी देणगी स्वरुपात आर्थिक मदत स्विकारणेबाबतचे प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीचे ०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रं.७६२ खालीलप्रमाणे पारित करणेत आलेला आहे.

"...यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, श्री. रमेश जी.संहेता, मुंबई यांचेकडुन नविन साठवण तलाव निर्मितीसाठी देणगी स्वरुपात आर्थिक मदत स्विकारणेस व वाढीव साठवण तलावाची निर्मिती करणेस मान्यता देण्यात आली."

नविन साठवण तलावाची निर्मीती करणेचे काम तातडीने सुरु करणे गरजेचे असलेने यासाठी करावयाच्या कार्यवाहीची रुपरेषा ठरविणे, साठवण तलावासाठी आवश्यक जागेची निश्चिती करणेबाबत मा.प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दि.२४/११/२०१७ व दि.०२/१२/२०१७ रोजी बैठक पार पडली. सदरहू बैठकित दिलेल्या निर्देशास अनुसरुन वाढीव साठवण तलावाकरीता आवश्यक जागेची निश्चिती करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कोपरगांव, बांधकाम विभाग, मालमत्ता विभाग व पाणी पुरवठा विभाग यांचे प्रतिनिधी यांचेकडुन संयुक्त पाहणी करण्यात आली.

वाढीव साठवण तलावाची निर्मिती करणेचे काम करणेसाठी व नियोजित फिल्टर प्लॅन्ट करीता क्षेत्र निश्चित करुन वाढीव साठवण तलावाचे एस्टिमेट तयार करुन मिळणेसाठी उपअभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, कोपरगांव यांना इकडील विभागाकडील जा.नं.एसएसएसटी/वशी/पाणी पुरवठा/५१८०/२०१७, दि.२९/१२/२०१७ अन्वये पत्र देण्यात आलेले होते.

याविषयी उपअभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, कोपरगांव यांचेकडुन जा.क्रं./तांशा/२५/२०१८, दि.११/०१/२०१८ रोजीचे पत्रान्वये नविन साठवण तलावाचे संकल्पन व अंदाजपत्रके हे प्रामुख्याने जलसंपदा विभाग (लघु पाटबंधारे विभाग) यांचेमार्फत केले जातात. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाकडे अपुरे मनुष्यबळ असल्याने सदरचे साठवण तलावाचे काम जलसंपदा विभाग (लघु पाटबंधारे विभाग) अथवा खाजगी तांत्रिक सल्लागाराकडुन तयार करुन घेणेबाबत कळविणेत आले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडुन सदरहू काम करणेस असमर्थतता दर्शविणेत आल्याने, याविषयी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना औपचारिक विनंती करण्यात आली. यावर त्यांचेकडुन पाहणी करणेत येवून, संस्थानचे मौजे निमगांव-को-हाळे, ता.राहाता येथील गट नं.२२१ पैकीचे क्षेत्र नियोजित फिल्टर प्लॅन्ट व इतर कामासाठी नियोजित करुन त्यालगतचे मौजे निमगांव-को-हाळे, ता.राहाता येथील गट नं.२४५ पैकीचे (लांबी-२१० मिटर x २१६मिटर, रुंदी-१५४ मिटर x १५५ मिटर) ३ हे १९ आर क्षेत्रात नविन वाढीव साठवण तलावाची निर्मीती करणेस सुचविले आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडुन मौजे निमगांव-को-हाळे, ता.राहाता येथील गट नं.२४५ पैकीचे क्षेत्रात (२०२ मिटर x १४१ मिटर) या मापाचे १२१ द.ल.लिटर (एम.एल.) क्षमतेचे नविन वाढीव साठवण तलाव तयार करणेचे कामाचे अंदाजे रु.४,४१,३३,०२१/- मात्रचे रकमेचे औपचारिक अंदाजपत्रक सादर केलेले आहे.

**प्रस्ताव**:- तरी सदरहू संस्थानचे मौजे निमगांव-को-हाळे, ता.राहाता येथील गट नं.२४५ पैकीचे ३ हे १९ आर क्षेत्रात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सुचविलेवरुन या क्षेत्रात (२०२ मिटर x १४१ मिटर) या मापाचे १२१ द.ल.लिटर (एम.एल.) क्षमतेचे नविन वाढीव साठवण तलाव निर्मिती देणगीदार श्री रमेश जी संहेता यांचेकडुन यात देणगी स्वरुपात करुन स्विकारणेस मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे निमगांव-को-हाळे, ता.राहाता येथील गट नं.२४५ पैकीचे ३ हे १९ आर क्षेत्रात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सुचविलेवरुन (२०२ मिटर x १४१ मिटर) या मापाचे १२१ द.ल.लिटर (एम.एल.) क्षमतेचे नविन वाढीव साठवण तलाव निर्मिती देणगीदार श्री रमेश जी संहेता यांचेकडुन देणगी स्वरुपात करुन घेणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- पाणीपुरवठा विभागप्रमुख)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१० **श्री साईबाबा महासमाधी शताब्दी निमित्ताने मिटींग रुमचे परिसरात (जनसंपर्क कार्यालयाजवळ) तसेच लेंडीबागेतील कमळाचे कुंडीमध्ये डान्सींग म्युझीकल फाऊंटन SAI DHAM FOUNDATION, MUMBAI यांचेकडून देणगी स्वरुपात करुन घेणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्‍वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधिल तरतूद :- अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-(१) अन्वये समितीकडुन विश्‍वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करणेबाबत तरतूद आहे.त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनासाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समितीचा निर्णयः- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ रोजीचे सेभेतील निर्णय क्र.२३.

प्रास्ताविकः-मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ रोजीचे सेभेतील निर्णय क्र.२३ अन्वये लेंडीबागेत व मिटींग रुमचे परिसरात डान्सींगम्युझीकल फाऊंटन कार्यान्वित करणेकामीचे प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित दोन्ही जागांवरील म्युझीकल फाऊंटनचे सादरीकरण सभेसमोर सादर करणेत यावे व सदरहु सादरीकरण पाहिल्यानंतर म्युझीकल फाऊंटनसाठीची जागा निश्चित करण्यात येईल,असे ठरले.

सदरकामीND'S ART WORLD PRIVATE LIMITED,MUMBAI या कंपनीचे प्रतिनिधींनी समक्ष पाहणी करुन त्यांचे दि.२१/०५/२०१८ रोजीचे प्रस्तावात नमुद केलेल्या साहित्याचे तपशिलानुसार मिटींगरुमचे परिसरात (जनसंपर्क कार्यालयाजवळील) डान्सींग म्युझीकलफाऊंटनची नव्याने उभारणी करुन कार्यान्वित करणेकरीता एकुण रक्कम रुपये ५६,८४,०००/-+टॅक्स तसेच लेंडिबागेतील कमळाचे कुंडामध्ये फाऊंटनची नव्याने उभारणी करुन कार्यान्वित करणेकरीता एकुण रक्कम रुपये ६,००,०००/-(सर्व करांसह) इतका खर्च अपक्षित असल्याचे कळविले आहे. सदर कामासाठी लागणारे बांधकाम, एकुण १५ माणसांची राहण्याची व भोजनाची व्यवस्था तसेच सदरकामी लागणारा विद्युत पुरवठा इत्यादी कामे संस्थानला करावी लागणार असल्याचे त्यांनी त्यांचे प्रस्तावात नमुद केले आहे.

अ) त्यानुसार ND'S ART WORLD PRIVATE LIMITED, MUMBAI या कंपनीने त्यांचे दि.२१/०५/२०१८ रोजीचे प्रस्तावात मिटींगरुमचे परिसरात (जनसंपर्क कार्यालयाजवळ) डान्सींग म्युझीकल फाऊंटन कार्यान्वित करणेकामीनमुद केलेल्या साहित्याचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणेः-

| Sr. No. | Item | Item Description | Quantity | Amount |
|---|---|---|---|---|
| 01. | Sky Jet | MOC:Gun Meta,1.5"BSP inlet,19mm Orifice fitted with in-built ball joint, with sand blast finish/Dimension 200mm x101mm | 01 No | LS |
| 02. | Sun rays Jet | Moc:Brass,3/8",BSP inlet,4.75mm Orifice fitted with Ball Joint.Diamension 58mm x19mm | 02set | |
| 03. | Spin mesh Jet | MOC:Brass,1.25",BSP inlet Fitted with gun metal busing, Teflon o-ring,spin adjustments Dimension 305mm x465mm | 02 Set | |
| 04. | Pyramid Jets | Fitted with:-MOC: Brass,3/8", BSP inlet,4.75mm Orifice Fitted with in- built ball joint. Diamension of each nozzle 58mm x19mm,with 2"GI base pipe | 04 Sets(12 Nozzles each) | |
| 05. | Diamond Jets | Gun Metal,1",BSP inlet,4mm Orifice, Fitted with in-built ball joint.Diamension 140mm x100mm x40mm | 02Nos. | |
| 06. | Smoke roto jets | MOC:Gun Metal,1/2",BSP inlet,5.60mm Orifice,Fitted with in-built ball joint. Dimension 8mm x35mm | 04 Set | |
| 07. | Chasseing Jet | Fitted with MOC:Brass,3/8",BSP inlet,4.75mm Orifice, Fitted with in-built ball joint.Diamension 58mm x19mm,with 2"GI base pipe | 01 Set | |
| 08 | LED RGB Lighting | MOC: S.S.316, IP68, Silicon gasket, S.S.gland, Toughened glass,S.S.316 Fixtures. | 48 Nos. | |
| 09. | RGB Driver | Micro Controlled Programmed RGB Mixing Driver Fitted with SMPS,220 VAC/12VDC/20AMPS | 01Nos. | |
| 10. | Header | Fitted with MOC:6"GI Pipe with required outlets with Duco coating | 01 Set | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 11. | Water Switch | S.S.304 25mm*25mm fitted with IP68 coil Operating Voltage:AC:24V,48V,110V,230V,50Hz/60 Hz, Power Consumption:AC:5.5W,7.5W,8.5W,9.5W,10W,11.5W,12W, Diaphragm:Nitrate(NBR),Optional VITON(FKM),EPDM,Coil Housing: Epoxy Square Coil, Metallic Round Enclosure,IP-68 Whether Proof Enclosure. | 20 Nos-1"<br>20 Nos-1/2" | |
| 12. | Open well submersible pump | **Features** Stainless Steel Shaft-No Corrosion Thrust Bearing-Carbon v/s Stainless Steel Efficient Motor Design-Optimum Output with Low Power Consumption Stamping Lamination-High Permeability Steel with Long Life & Increased Efficiency Motor Body: Cast Iron Bush:Bronze Water Filled Motor/Three Phase DOL | 5hp-03Nos. | |
| 13. | Pump Suction | Pump Suction Covered with S.S.304 net with each Pump | 03Nos. | |
| 14. | Connecting Pipes | GI "B"class pipes with required fabrication. All pipes will be Duco coating. | 01 Job | |
| 15. | Control Valves | All water pressure control valves will be Bronze/Gunmetal as required BSP inlet 25mm x25mm(Reputed) | 01 Job | |
| 16. | Connecting Flexi Pipes | Wired flexi pipes for connection between header and nozzle base pipes | 01 Job | |
| 17. | Operating Panel | With three phase indicator, Single phasing preventer, switch gyres,relays,AMPS/VOLT mtr.,Bus Bar,MCB,Air breaker main switching,VSS,AMPS Selector etc.Musical switching System with all controls, Lighting controls | 01 Job | |
| 18. | High Power relay module with fast and delay output as per frequency input. | 08 Channel high power Programmed frequency operated relay module with delay and pump switch and pump switch on/off attachment. | 01 No. | |
| 19. | Chasing System | Chasing sequential with SCR Switching (Micro Controlled based and chasing control)AC 220 Output/10AMPS with speed modulation | 01 set | |
| 20. | Amplifier | Model | 01 Nos. | |
| 21. | Specters | Speaker type:-2-Way,Bass-refles Cabinet MOC:-ABS Water Proof:IP35 Frequency range(-10db):-62Hz-20kHz(Installation will be in Outdoor box) | 02 Nos. | |
| Grand Total | | | 56,84,000/-(Exclusive of GST) | |

**Rupees Fifty Six Lakhs Eighty Four Thousand (Exclusive of GST)**

ब) तसेच ND'S ART WORLD PRIVATE LIMITED, MUMBAI या कंपनीने त्यांचे प्रस्तावात लेंडिबागेतील कमळाचे कुंडातील फाऊंटनची नव्याने उभारणी करुन कार्यान्वित करणेकामी नमुद केलेल्या साहित्याचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे:-

| Sr. No. | ITEMS | ITEM DESCRITION | QNTY | AMOUNT |
|---|---|---|---|---|
| 01 | Sculpture jet | Suitable for 27feet dia water body, made with bronze having 26 Nos. heavy outlets and 01Nos.1.5" BSP inlets | 01 No | |
| 02 | LED RGBLighting | KPR 24R,MOC:S.S.316, IP68, Silicon gasket, S.S.gland, Toughened glass, S.S.316, Fixtures. | 06 Nos. | |
| 03 | RGBDriver | Micro Controlled programmed RGB Maxing driverfitted with SNOS,220VAC/12VDC/20AMPS | 01 Nos. | |
| 04 | Open well submersible pump | **Features**: Stainless Steel Shaft-No Corrosion Thrust Bearing –Carbon v/s Stainless Steel, | 2hp-01 Nos. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | Efficient Motor Design-Optimum Output with Low Power Consumption Stamping Lamination – High Permeability Steel with Long Life & Increased Efficiency Motor Body: Cast Iron Bush:Bronze Water Filled Motor/Three phase DOL/Single phase | | |
| 05 | Pump Suction | Pump Suction covered with S.S.304 mesh with each pump | 01 Nos. | |
| 06 | Control valves | All water pressure control valves will be in Bronze /Gunmetal as required. BSP inlet 25mm x 25mm(Reputed make ) | 01 Job | |
| 07 | Operating panel | With three phase indicator, single phasing preventer, switch gyres, relays, AMPS/VOLT mtr.,MCB, main switching VSS,AMPS selector, etc.Musical switching system with all controls Lighting controls | 01 Job | |
| Grand Total | | | | 6,00,000/- (Inclusive of GST) |

Rupees Six Lakhs/-(Inclusive of GST)

तसेच दि.०२/०४/२०१८ रोजी साई धाम फाऊंडेशन,मुंबई यांचेकडुन पत्र प्राप्त झाले असून, त्यांनी त्यांचे पत्रात SAI DHAM FOUNDATION is keen to contribute our bit towards the society and wish to install Musical Water Fountain at LendiBagh besides PRO Office. The whole & sole responsibility for the installation & maintenance of all such system will be ours. Already we had donated two commercial RO Water Filter Plants to your SAI BABA SANSTHAN TRUST, SHIRDI असे नमुद केले आहे.

तरी, उपरोक्त **"अ"** व **"ब"**प्रस्तावातीलतपशिलात नमुद केलेनुसार सदर साहित्यतसेच ऐनवेळेस होणा-या अनुषंगीक बदलामुळे साहित्यामध्ये वाढ झाल्यास सदरचे साहित्य देणगी स्वरुपातSAI DHAM FOUNDATION,MUMBAI या संस्थेकडुन घेणेस व सदरचे काम ND'S ART WORLD PRIVATE LIMITED, MUMBAI याकंपनीकडुन करुन घेणेकामी प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

**मागणी:-** उपरोक्त प्रास्ताविकेतील "अ" व "ब" नमुद केलेनुसार मिटींगरुमचे परिसरात (जनसंपर्क कार्यालयाजवळ) तसेच लेंडिबागेतील कमळाचे तळयामध्ये डान्सींग म्युझीकल फाऊंटन कार्यान्वितकरणेकामी लागणारे साहित्यतसेच ऐनवेळेस होणा-या अनुषंगीक बदलामुळे साहित्यामध्ये वाढ झाल्यास सदरचे साहित्य देणगी स्वरुपातSAI DHAM FOUNDATION,MUMBAI या संस्थेकडुन घेणेस व सदरचे काम ND'S ART WORLD PRIVATE LIMITED, MUMBAI याकंपनीकडुन करुन घेणेकामी प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढेसादर करता येईल,असे नम्र मत आहे.

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी,शासन निर्देश,तांत्रिक,व कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ.छाननीकरुन अनुमान:- तांत्रिक,आर्थिक व प्रशासकीय

विभागाचा अभिप्राय :-उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे मिटींगरुमचे परिसरात (जनसंपर्क कार्यालयाजवळ) तसेच लेंडिबागेतील कमळाचे तळयामध्ये डान्सींग म्युझीकल फाऊंटन कार्यान्वित करणेकामी लागणारे प्रस्तावित व इतर सर्व आवश्यक ते अनुषंगीक साहित्य देणगी स्वरुपात SAI DHAM FOUNDATION,MUMBAI या संस्थेकडुन घेणेस व सदरचे काम ND'S ART WORLD PRIVATE LIMITED, MUMBAI याकंपनीकडुन करुन घेणेकामी प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढेसविनय सादर.

**निर्णय क्र.४००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावातील अ व ब येथे नमुद केल्याप्रमाणे मिटींग रुमचे परिसरात (जनसंपर्क कार्यालयाजवळ) तसेच लेंडीबागेतील कमळाचे तळयामध्ये डान्सींग म्युझीकल फाऊंटन SAI DHAM FOUNDATION, MUMBAI यांचेकडून देणगी स्वरुपात कार्यान्वीत करुन घेण्यास मान्यता**

देण्यात आली. तसेच सदर संस्था उपरोक्त डान्सींग म्युझीकल फाऊंटनचे काम ND'S ART WORLD PRIVATE LIMITED, MUMBAI या कंपनीकडून करुन घेणार आहे. त्यास मान्यता देण्यात आली.

सदर कामासाठी लागणारे बांधकाम, एकुण १५ माणसांची राहण्याची व भोजनाची व्यवस्था तसेच सदरकामी लागणारा विद्युत पुरवठा इत्यादी संस्थानमार्फत करणेत यावे, असे ठरले.

(कार्यवाही- ध्वनिक्षेपन व टेलिफोन विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील नादुरुस्त जुना म्युझीकल कारंजा (Buy Back) करुन नविन म्युझीकल कारंजा खरेदी करणेकामी व्दितीय वेळेस ई-निविदा मागवुन प्रतिसाद न मिळाल्याने सदर काम देणगी स्वरुपा त करुन घेणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधिल तरतूद:- अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-(१) अन्वये समितीकडुन विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करणेबाबत तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनासाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

प्रास्ताविक:- मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीच्या सभेतील विषय क्र.१०४ निर्णय क्र.६२४ अन्वये श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील नादुरुस्त जुना म्युझीकल कारंजा (Buy Back) करुन नविन म्युझीकल कारंजा खरेदी करणेकामीचे प्रस्तावास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.०८/११/२०१७ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये ई-निविदा महाराष्ट्र शासनाचे www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर दि.०६/०१/२०१८ ते दि.२७/०१/२०१८ अखेर प्रसिध्द करणेत आली होती. परंतु, निविदा सादर करण्याचे अंतीम दि.२७/०१/२०१८ अखेर फक्त दोनच ई-निविदा प्राप्त झालेल्या असल्यानेसदर ई-निविदा प्रक्रीयेस दि.२९/०१/२०१८ रोजीचे पत्रान्वये दि.०५/२/२०१८ अखेर मुदतवाढ देणेत आली होती. त्यानुसार सदरकामी प्रथम वेळेस तीन ई-निविदा प्राप्त होऊन सदरच्या निविदा दि.०९/०२/२०१८ रोजीचे खरेदी समितीसमोर उघडुन त्यातील एकच पुरवठाधारक पात्र झाल्याने दि.०९/०२/२०१८ रोजीचे Technical Evaluation Chart वरील प्राप्त निर्देशानुसार पुनश्च ई-निविदा करणेबाबत निर्देश देण्यात आले आहे.

त्यानुसार सर्व पुरवठाधारकांची अनामत रक्कम त्यांना परत करुन पुनश्च दि.१२/०३/२०१८ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये व्दितीय वेळेस ई-निविदा महाराष्ट्र शासनाचे www.mahatender.gov.inया संकेतस्थळावर दि.१०/०४/२०१८ ते दि.२७/०४/२०१८ अखेर प्रसिध्द करणेत येऊन दि.१७/०४/२०१८ रोजी सदरकामी एकुण १६ पुरवठाधारकांना ई-मेलव्दारे कळवुन देखील एकही निविदाधारक प्रि-बिड मिटींगला उपस्थित राहिले नाहीत. सदरकामी दि.२७/०४/२०१८ अखेर एकुण ०४ ई-निविदा प्राप्त होऊन सदरच्या निविदा दि.०५/०५/२०१८ रोजीचे खरेदी समितीसमोर उघडुन त्यातील दि.०८/०५/२०१८ चे Technical Evaluation Chart नुसार दोनच पुरवठाधारक पात्र झाले आहे.

तरी,उपरोक्त नमुद केलेनुसार तृतिय वेळेस ई-निविदा महाराष्ट्र शासनाचे www.mahatender.gov.inया संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकामी दि.११/०५/२०१८ रोजीचे टिपणी अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. परंतु, सदर प्रस्तावावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनीविषयांकीत कामी म्युझीकल कारंजा देणगी स्वरुपात करण्याचा प्रयत्न करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार दि.१८/०५/२०१८ रोजी ND'S ART WORLD PRIVATE LIMITED,MUMBAI या कंपनीचे प्रतिनिधींनी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील सध्यस्थितीत कार्यरत असलेल्या म्युझीकल कारंजाची प्रत्यक्ष पाहणी करुन सदरहु कारंजाचे सिव्हिल वर्क (पाण्याचा हौद) मध्ये बदल करुन त्यामध्ये नविन कारंजा बसविण्यासाठीखालील तपशिलातील साहित्य खरेदी करणे आवश्यक असून, त्याकरीता अंदाजे रक्कम रुपये ५५,८०,०००/- (सर्व करांसहीत) खर्च अपेक्षित असल्याचे दि.२१/०५/२०१८ रोजीचे प्रस्तावात त्यांनी कळविले आहे. तसेच सदर कामासाठी लागणारे बांधकाम, एकुण १५ माणसांची राहण्याची व भोजनाची व्यवस्था तसेच सदरकामी लागणारा विद्युत पुरवठा इत्यादी कामे संस्थानला करावी लागणारअसल्याचे देखील त्यांचे प्रस्तावात त्यांनी नमुद केले आहे.

| Sr.No. | Item | Item Description | Quantity | Amount |
|---|---|---|---|---|
| 01. | Sky Jet | MOC:Gun Metal,1.5"BSP inlet,19mm Orifice fitted with in-built ball joint, with sand blast finish/Dimension | 01 No | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 200mm x101mm | | |
| 02. | Sun rays Jet | MOC:-Aluminium base+Brass Outlet,(09 Jets in one nozzle) | 04set | |
| 03. | Spin mesh Jet | MOC: Aluminium base+Brass Outlets,1.25",BSP inlet Fitted with gun metal busing, Teflon o-ring, spin adjustments Dimension 305mm x465mm | 04 Set | |
| 04. | Three Stage scuipture jets | MOC:Gun Metal,1",BSP inlet,in-built 43 Nos.smallangular.Diamension 87mm x114mm x40mm | 04 Nos. | |
| 05. | Chasseing Pyramid Jets | Fitted with MOC:Brass,3/8",BSP inlet,4.75mm Orifice, Fitted with in-built ball joint.Diamension of each nozzle 58mm x19mm,with 2"GI base pipe | 01 Sets (08 Nozzles in one arm) | |
| 06. | Crown Jet (8'Dia ring)Out words drop) | MOC: Gun Metal,1/2",BSP inlet,5.60mm Orifice, Fitted with in-built ball joint.Diamension 8mm x35mm | 01 Set (fitted with 50Nos. of 3/8 clear water stream jets) | LS |
| 07 | LED RGB Lighting | MOC: S.S.316, IP68, Silicon gasket, S.S.gland, Toughened glass,S.S.316 Fixtures.Make:- | 48 Nos. | |
| 08. | LED RGB Lighting | MOC: S.S.316, IP68, Silicon gasket, S.S.gland, Toughened glass, S.S.316 Fixtures. Make (With Cree LED) | 04Nos. | |
| 09. | RGB Driver | Micro Controlled Programmed RGB Mixing Driver Fitted with SMPS,220 VAC/12VDC/20AMPS | 04 Nos. | |
| 10. | Header | KFHD01 MOC:8"GI Pipe with required outlets with Duco coating | 01 Set | |
| 11. | Water Switch | S.S.304 25mm x25mm fitted with IP68 coil Operating Voltage:AC:24V,48V,110V,230V,50Hz/60 Hz, Power Consumption:AC:5.5W,7.5W,8.5W,9.5W,10W,11.5W,12W, Diaphragm:Nitrate(NBR),Optional VITON(FKM),EPDM,Coil Housing: Epoxy Square Coil, Metallic Round Enclosure,IP-68 Whether Proof Enclosure. | 20 Nos-1"<br>16 Nos-1/2" | |
| 12. | Open well submersible pump | Features Stainless Steel Shaft-No Corrosion Thrust Bearing-Carbon v/s Stainless Steel Efficient Motor Design-Optimum Output with Low Power Consumption Stamping Lamination-High Permeability Steel with Long Life & Increased Efficiency Motor Body: Cast Iron Bush:Bronze Water Filled Motor/Three Phase DOL | 5hp-03Nos. | |
| 13. | Pump Suction | Pump Suction Covered with S.S.304 net with each Pump | 03Nos. | |
| 14. | Control Valves | All water pressure control valves will be Bronze/Gunmetal as required BSP inlet 25mm x25mm(Reputed) | 01 Job | |
| 15. | Connecting Flexi Pipes | Wiried flexi pipes for connection between header and nozzle base pipes | 01 Job | |
| 16. | Operating Panel | With three phase indicator, Single phasing preventer, switch gyres,relays,AMPS/VOLT mtr.,MCB,mainswitching,VSS,AMPS Selector etc.Musical switching System with all controls, Lighting controls | 01 Job | |
| 17. | High Power relay module with fast and delay output as per | 08 Channel high power Programmed frequency operated relay module with delay and pump switch on/off attachment. | 01 No. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | frequency input. | | | |
| 18. | Chasing System | Chasing sequential with SCR Switching (Micro Controlled based and chasing control)AC 220 Output/10AMPS with speed modulation | 01 set | |
| 19. | Amplifier | Model JBL libra 250 | 01 Nos. | |
| 20. | Specters Make | Speaker type:-2-Way,Bass-refles Cabinet MOC:-ABS Water Proof:IP35 Frequency range(-10db):-62Hz-20kHz(Installation will be in Powder Coated Outdoor Box) | 02 Nos. | |
| Grand Total | | | 55,80,000/-(Inclusive of GST) | |

Rupees Fifty Five Lakhs Eighty Thousand (Inclusive of GST)

तरी, उपरोक्त तपशिलातील नमुद केलेनुसार सदर साहित्य देणगी स्वरुपात घेऊन सदरचे काम ND'S ART WORLD PRIVATE LIMITED,MUMBAI यांचेकडुन करुन घेण्यास व यासाठी येणा-या खर्चास देणगीदार प्राप्त झाल्यास,सदर प्रस्तावित तसेच इतर अनुषंगीक साहित्य देणगीस्वरुपात घेणेकामीचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल

**मागणी** :-उपरोक्त प्रस्ताविकेत नमुद केलेनुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीच्या सभेतील विषय क्र.१०४ निर्णय क्र.६२४ अन्वये श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील नादुरुस्त जुना म्युझीकल कारंजा (Buy Back) करुन नविन म्युझीकल कारंजा खरेदी करणेकामी व्दितीय वेळेस निविदा मागवुन प्रतिसाद न मिळाल्याने सदर साहित्य देणगी स्वरुपात घेऊन सदरचे काम ND'S ART WORLD PRIVATE LIMITED,MUMBAI यांचेकडुन करुन घेण्यास व यासाठी येणा-या खर्चास देणगीदार प्राप्त झाल्यास,सदर प्रस्तावित तसेच इतर अनुषंगीक साहित्य देणगीस्वरुपात घेणेकामीचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी,शासन निर्देश,तांत्रिक,व कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान**:-तांत्रिक,आर्थिक व प्रशासकीय

**विभागाचा अभिप्राय** :-उपरोक्तप्रस्तावात व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील नादुरुस्त जुना म्युझीकल कारंजा (Buy Back) करुन नविन म्युझीकल कारंजा खरेदी करणेकामी व्दितीय वेळेस निविदा मागवुन प्रतिसाद न मिळाल्याने सदर साहित्य देणगी स्वरुपात घेऊन सदरचे काम ND'S ART WORLD PRIVATE LIMITED,MUMBAI यांचेकडुन करुन घेण्यास व यासाठी येणा-या खर्चास देणगीदार प्राप्त झाल्यास, सदर प्रस्तावित तसेच इतर अनुषंगीक साहित्य देणगीस्वरुपात घेणेकामीचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.४०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील नादुरुस्त जुना म्युझीकल कारंजा Buy Back करुन विभागाने प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे अंदाजे रु.५५,८०,०००/- मात्र किंमतीचा नविन म्युझीकल कारंजा देणगी स्वरुपात करुन घेण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी देगणीदार उपलब्ध झाल्यानंतर सदरचे काम ND'S ART WORLD PRIVATE LIMITED,MUMBAI यांचेकडुन करुन घेणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- ध्वनिक्षेपन व टेलिफोन विभागप्रमुख)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **साईआश्रम भक्तनिवास येथे उभारण्यात आलेल्या टेन्साईल फॅब्रीक शेडचे विद्युतीकरणाचे काम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **प्रस्तावना**:- अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

शासन निर्णय परिच्छेद क्र.४.१ खरेदी किंमत रु. ३ लाखापेक्षा अधिक असेल तेव्हा ई-निविदा प्रणालीचा वापर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव :-** साईआश्रम भक्तनिवास येथे टेन्साईल फॅब्रीक शेड उभारणीचे कामाचा कार्यादेश मे. सुभाष कन्सट्रक्शन्स कंपनी, डोंबिवली (E), ठाणे यांना बांधकाम विभागामार्फत देण्यात आलेला आहे. साईआश्रम भक्तनिवास येथे उभारण्यात येत असलेल्या टेन्साईल फॅब्रीक शेडचे कामामध्ये विद्युतीकरणाच्या कामाचा समावेश करण्यात आलेला नसल्याने बांधकाम विभागाने कळविले आहे.

आता या शेडमध्ये तात्पुरत्या स्वरुपात ओपन ओव्हरहेड वायरींग करुन लाईटव्यवस्था करण्यात येणार आहे. परंतू काही कालावधीनंतर या वायरींगवर वातावरणाचा तसेच ऊन, वारा व पावसाचा परिणाम होऊन वायरिंगचे इन्शुलेशन कव्हर खराब होण्यास सुरुवात होऊन तसेच त्याची इन्शुलेशन क्षमता कमी होऊन शॉर्ट सर्कीट, होण्याचा धोका संभवतो. तसेच सदर वायरींगमध्ये ब-याच ठिकाणी जॉईंट येत असल्यामुळे या वायरींगमध्ये शॉर्टसर्कीट होऊन आग लागण्याचा धोका संभवतो. शिवाय जॉईंटमध्ये लिकेज होऊन मंडपामध्ये करंट उतरुन प्राणहानी होण्याचा धोका संभवतो. यासाठी मंडपामध्ये कायमस्वरुपी विद्युतीकरण करणे आवश्यक आहे. त्यासाठी लाईट पॉईंट, फॅन पॉईंट, कुलरसाठी पॉवर पॉईंट, स्टॅण्ड फॅनसाठी पॉईंट, स्टेज लाईटसाठी पॉईंट काढणे गरजेचे आहे. त्यासाठी वायरींगचे काम हे सुरक्षिततेच्या दृष्टीने एम.एस.कॉन्डयुट पाईप मधून करणे आवश्यक आहे. त्यासाठी कॉन्डयुट पाईप, पी.व्ही.सी.इन्सुलेटेड वायर, मेन सप्लाय केबल, सिलींग फॅन, एल.ई.डी.लाईट फिटींग, स्विचेस, डिस्ट्रीब्युशन बोर्ड, एम.सी.बी., आर.सी.सी.बी., कंट्रोल बॉक्स, फॅन व लाईट टांगणेसाठी एम.एस.रॉडचा वापर करावा लागणार आहे.

साईआश्रम भक्तनिवास येथे उभारण्यात आलेल्या टेन्साईल फॅब्रीक शेडचे विद्युतीकरणाचे काम बाहेरील ठेकेदार यांचेकडून करुन घेणेकामी **खर्चाचा अहवाल महाराष्ट्र शासनमान्य सी.एस.आर.सन २०१७-२०१८ नुसार** तयार केलेला आहे. अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | C.S.R.No. | Description | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 1-1-5 | Supplying & laying ISI mark Rigid Steel conduit 16 SWG - 25 mm. dia. with necessary accessories in RCC work/false ceiling/false flooring as per specification No: WG-MA/CC, parano. 1.2.3 | 900 Mtr. | 270.90 | 2,43,810.00 |
| 02) | 1-3-14 | Supplying & erecting mains with 3x2.5 sq.mm F.R. L.S copper PVC insulated wire laid in provided conduit / trunking / inside pole / Bus bars or any other places as per specification No: WGMA/ BW | 600 Mtr | 81.00 | 0,48,600.00 |
| 03) | 1-3-4 | Supplying & erecting mains with 2x1.5 sq.mm F.R.L.S copper PVC insulated wire laid in provided conduit / trunking / inside pole / Bus bars or any other places as per specification No: WGMA/BW | 800 Mtr | 37.80 | 0,30,240.00 |
| 04) | 1-3-4 Note | Supplying & erecting mains with 1x1.5 sq.mm F.R.L.S copper PVC insulated wire laid in provided conduit / trunking / inside pole / Bus bars or any other places as per specification No: WGMA/BW (Please refer bottom note in Chapter of CSR Section No.1.3 (Bunch of Wires) on Page no. 06.) | 1800 Mtr | 18.90 | 0,34,020.00 |
| 05) | 1-3-10 | Supplying & erecting mains with 2x6 sq.mm F.R L.S copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places. as per specification No: WGMA/BW | 800 Mtrs. | 111.30 | 0,89,040.00 |
| 06) | 1-3-8 Note | Supplying & erecting mains with 1x4 sq.mm F.R L.S copper PVC insulated wire laid in provided conduit / trunking / inside pole/Bus bars or any other places as per specification No: WGMA/BW (Please refer bottom note in Chapter of CSR Section No.1.3 (Bunch of Wires) on Page no. 06). | 800 Mtrs | 39.375 | 0,31,500.00 |
| 07) | 1-7-7 | Supplying and erecting ISI mark Ceiling rose / Batten Holder erected on Filled polypropylene ISI marked (IS:14772-2000) board or polished double wooden block/ ISI mark PVC/MS junction box. | 128 Nos. | 31.50 | 0,04,032.00 |
| 08) | 2-12-3 | Supplying and erecting fan clamp of 30 x 5 mm. M.S. flat of required length and 10 mm. M.S. bolt and nuts erected with necessary hook of 10 mm. M.S. round bar and painted. | 128 Nos. | 161.70 | 0,20,697.60 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 09) | 2-12-6 | Supplying and erecting 'B' grade G.I.pipe / M.S. pipe down rod duly painted for fan complete erected with PVC two core flexible cable 24/0.2 mm copper PVC wire. | 400 Mtr. | 179.55 | 0,71,820.00 |
| 10) | 2-13-4 | Supplying and erecting regular/ standard model Ceiling fan of 1400 mm. sweep complete erected in position as per specifcation no. FG | 45 Nos | 1684.20 | 0,75,789.00 |
| 11) | 1-8-29 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 3 module duly erected in an approved manner. | 45 Nos. | 153.30 | 0,06,898.50 |
| 12) | 1-8-6 | Supplying and erecting modular type switch one way 16 / 20 A, ISI mark, approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete with neon indicator. | 45 Nos. | 132.30 | 0,05,953.50 |
| 13) | 1-8-11 | Supplying and erecting modular type 3 pin 6 / 16A multi socket with safety shutter ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 45 Nos. | 156.45 | 0,07,040.25 |
| 14) | 5-6-1 | Providing, erecting & commissioning RCCB only of electro magnetic type with 30/100/300 mA sensitivity and having capacity of 16/25 A. 2 pole complete as per specification No. SW-RCCB/RCCB | 16 Nos. | 1863.75 | 0,29,820.00 |
| 15) | 5-6-6 | Providing, erecting & commissioning RCCB of electro magnetic type with 30/100/300 mA sensitivity and having capacity of 63A. 4 pole complete as per specification No. SWRCCB/RCCB | 04 Nos. | 2785.65 | 0,11,142.60 |
| 16) | 5-3-19 | Supplying, erecting & marking TPN MCB 40A to 63A, C Series in provided distribution board as per specification No. SW-SWR/MCB | 05 Nos. | 1195.95 | 0,05,979.75 |
| 17) | 5-3-2 | Supplying, erecting & marking SPMCB 6A to 32A, C-series (for motor/power) in provided distribution board as per specification No. SW-SWR/MCB | 160 Nos. | 159.60 | 0,25,536.00 |
| 18) | 5-4-19 | Supplying and erecting single pole and neutral distribution board (SPNDB) with door surface/flush mounted with 2 ways for incoming and 12 ways for outgoing SP MCB's on iron frame/wooden board as per specification No. SWSWR/ MCBDB | 16 Nos. | 1462.65 | 0,23,402.40 |
| 19) | 5-1-17 | Supplying and erecting Triple pole metal/ iron clad HRC fuse switch 415/ 500V 100A with neutral link with ISI marked HRC fuses on angle iron frame as per specification No.SW-SWR/TPHRC | 02 No. | 6255.90 | 0,12,511.80 |
| 20) | 5-1-18 | Supplying and erecting Triple pole metal/ iron clad HRC fuse switch 415/ 500V 250A with neutral link with ISI marked HRC fuses on angle iron frame as per specification No.SW-SWR/TPHRC | 01 No. | 8579.55 | 0,08,579.55 |
| 21) | 9-1-5 | Supply, Installation, Testing and commissioning of UL Certified / CPRI Tested Maintenance Free Earthing comprising of Electrode of 17.2 mm diameter Low Carbon Steel with 250 micron Molecular Copper Bonded Earthing Rod of Length 3m along with 25 kg Carbon Based environment friendly back fill Ground Enhancing compound required to fill up the excavated earth with required quantity as per specification no EA-MOBI | 03 Nos. | 13157.55 | 0,39,472.65 |
| 22) | 9-2-2 | Supplying and erecting copper strip of required size used for earthing on wall and/or any other purpose with necessary copper clamps fixed on wall painted with bituminous paint in an approved manner with joints required. as per specification No (EA-EP). | 20 Kgs. | 703.50 | 0,14,070.00 |
| 23) | 2-10-06 New | Supplying and erecting highbay LED fitting IP 65 with lamp 120W, PF >0.95 of approved make and duly connecting complete as per specification no. FG-ODF/LED | 48 Nos. | 13027.35 | 6,25,312.80 |
| 24) | 6-3-3 | Supplying & erecting Static energy meter 440V, 50 cycles AC supply 3 phase 4 wire 10/20/25/30 A Class I accuracy I.S.I. marked with metal/polycarbonate enclosure. Meter with LCD/ LED display complete erected on polished T.W. board duly wired with required size of weather proof PVC wires duly tested for class II accuracy by electric supply company. | 01 No. | 4566.45 | 0,04,566.45 |
| 25) | 5-1-1 | Supplying and erecting Insulated D.P. switch surface type/flush type 32A 250V with indicator lamp & fuse as per specification No. SW-SWR/BDP | 10 Nos. | 171.15 | 0,01,711.50 |
| 26) | Non C.S.R. | Supplying & erecting original 1.25 mm CRCA sheet metal enclosures with Door and locking system of 1200mm x 1200mm x 450mm size with fully water proof Box. | 01 No. | 8000.00 | 0,08,000.00 |
| | | | | Total Rs.:- | 14,79,546.35 |
| | | | | Less 20 % | 02,95,909.27 |
| | | | | Total Amount Rs.:- | 11,83,637.08 |
| | | | | **Round Up Rs.:-** | **11,83,637.00** |

**मागणी:-** उपरोक्तप्रमाणे साईआश्रम भक्तनिवास येथे उभारण्यात आलेल्या टेन्साईल फॅब्रीक शेडचे विद्युतीकरणाचे काम करणेकामी **महाराष्ट्र शासनमान्य सी.एस.आर.सन २०१७-२०१८ नुसार** रक्कम रुपये ११,८३,६३७/- मात्र इतका खर्च येणे अपेक्षित असून सदरील खर्चास व बाहेरील ठेकेदार यांचेकडून ई-निविदा मागविणेकामी मराठीतील, व इंग्रजीतील जादा खपाच्या वृत्तपत्रांच्या मुंबई-पुणे येथील आवृत्तीत जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई- निविदा बोलविणेस तसेच ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा खरेदी समितीसमोर उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी स्थानिक उपसमितीसमोर सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.४०२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास येथे उभारण्यात आलेल्या टेन्साईल फॅब्रीक शेडचे विद्युतीकरणाचे काम करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु. ११,८३,६३७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- उपकार्यकारी अभियंता,विद्युत विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

विषय नं.१३ **सन २०१८-१९ या एक वर्षासाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान, व्दारावती निवासस्थान विभागात करावयाचे पेस्ट कंट्रोल कामाबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयी दि.०९.१०.२०१६ व दि.२५.०२.२०१७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमधील निर्णयानुसार तथा दि.१२.१२.२०१७ रोजीचे टिपणी अन्वये दि.१६.०१.२०१८ रोजीचे सार्वमत या स्थानिक वृत्तपत्रात पेस्ट कंट्रोलचे कामासाठी चौथ्यांदा जाहिरात प्रसिध्द करुन ई निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. तपशीलवार विवरण खालीलप्रमाणे.

| अं.नं. | तपशील | शेरा |
|---|---|---|
| १ | प्रस्तुतकामी चौथ्यांदा जाहिरात प्रसिध्द करण्यास मंजुरी मागणी | दि.१२.१२.२०१७ |
| २ | जाहिरात प्रसिध्द | दि.१६.०१.२०१८ |
| ३ | ई निविदा भरण्याची मुदत | दि.१५.०१.२०१८ सकाळी १०.०० पासुन ते दि.२३.०१.२०१८ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत. |
| ४ | मुदतीअखेर प्राप्त ई निविदा | चार - १. मे. आर्या हायजिन पेस्ट मॅनेजमेंट सर्विसेस, पुणे .<br>२. मे.आय.पी.एम. ॲन्ड फ्युमीगेशन इंडीया, मुंबई<br>३. मे. महालक्ष्मी पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस, भोपाळ (म.प्र)<br>४. मे.पेस्ट कंट्रोल एम.वॉल्श, मुंबई |
| ५ | तांत्रिक लिफाफा उघडल्याचा दिनांक | दि.०९.०२.२०१८ रोजी सकाळी मा. खरेदी समिती समोर.<br>तुलनात्मक तक्ता तयार पात्र निविदाकार फक्त एक- मे.आय.पी.एम. ॲन्ड फ्युमीगेशन इंडीया, मुंबई |

तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता, १) पात्र निविदाकार फक्त०१ ठरला आहे. २) यापुर्वी सदरकामी अनुक्रमे दि.०२.१२.२०१६, दि.३०.०६.२०१७ व १८.११.२०१७ अशा तीन वेळा वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. प्रथम प्रयत्नात निविदेमधील विविध अटी-शर्तीचा फेरविचार करुन, दुस-यांदा वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यावेळी फक्त ०१ निविदाकार पात्र ठरल्याने, शासकीय खरेदी नियमावली प्र.क्र.४.४.३.१ अन्वये किमान तीन पात्र दर तुलनेसाठी आवश्यक असणे गरजेचे असल्याने, पुन्हा तिस-यांदा सदरकामी जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविण्यात आल्या, तिस-या प्रयत्नात मागविण्यात आलेल्या ई-निविदांचे तांत्रिक लिफाफे (Technical Bid) दि.०४.१२.२०१७ रोजी मा.खरेदी समिती समोर उघडण्यात आले त्यामध्ये सर्व निविदाकार अपात्र ठरल्याने **पुन्हा चौथ्यांदा दि.१६.०१.२०१८ रोजीचे प्रसिध्द जाहिरातीनुसार** ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या त्यामध्ये फक्त एकच अ.नं.०२ मे.आय.पी.एम.ॲन्ड फ्युमीगेशन इंडीया, मुंबई यांची निविदा

पात्र ठरली आहे. चौथ्या प्रयत्नात प्राप्त ०४ निविदांपैकी फक्त ०१ निविदा (अ.नं.०२) पात्र ठरल्याने त्याच निविदाकाराचा आर्थीक लिफाफा (BOQ) शासकीय खरेदी नियमावलीतील तरतुद क्रं- ४.४.३.१ मध्ये कामाची पुर्तता वेळेवर करण्यास महत्व देण्यात आले तर खरेदी अधिकारी (दोन वेळा मुदतवाढ दिले नंतर देखील) तीन निविदापेक्षा कमी प्रतिसाद मिळाला तरी त्यासह पुढे जाण्याचा निर्णय घेऊ शकेल व त्यासाठी सुसाध्य कारणे नमुद करेल. अशा प्रसंगी किमंतीच्या वाजवी पणाची खात्री करण्यासाठी खरेदी समितीला अतिरिक्त

काळजी घ्यावी लागेल असे नमुद असल्याने खालील कारणास्तव एक पात्र निविदा उघडुन त्यावर निर्णय घेण्यात आला. प्रस्ततुचे काम साईभक्तांसंबधी तथा अतिसंवेदनशिल असल्याने विभागामार्फत किटनाशक औषध फवारणी करण्यात आलेली होती परंतु त्यास फारसा प्रतिसाद मिळालेला नाही कारण फवारणीकामी आवश्यक प्रशिक्षित कर्मचारी वर्ग आपलेकडे उपलब्ध नाही. शासकीय नियमाप्रमाणे यापुर्वी ०३ वेळा आणि शेवटी ०१ वेळा जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

२) प्रत्येकवेळी ०३ पात्र निविदाकार प्राप्त न झाल्याने शासकीय खरेदी नियमावलीनुसार शेवटच्या प्रयत्नात (चौथ्या प्रयत्नात) पात्र ठरलेले मे.आय.पी.एम.ॲन्ड फ्युमीगेशन इंडीया, मुंबई या निविदाकाराचा आर्थीक लिफाफा (BOQ) दि.१४.०२.२०१८ रोजी मा.खरेदी समितीसमोर उघडणेत आला. त्यांनी दिलेल्या दराचे अवलोकन करण्यात आले त्यांचा तपशील खालीलप्रमाणे.

साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान या इमारतीमध्ये व परीसरात खोल्या/हॉल (भुभाग,छत,भिंती) त्यातील फर्निचर, संडास, बाथरुम, गादया, कॉट इ. मध्ये भक्तांना ढेकुण, झुरळे इ.किटकांचा त्रास होऊ नये म्हणुन पेस्ट कंट्रोल करणेकामी एक वर्षाकरीता (वर्षातुन ६ फवारण्या) प्रति चौरसफुटाचा दिलेला दर.

| अ.नं | विभाग | खोल्या संख्या | हॉल संख्या | लॉकर्स | खोल्या व हॉल मिळवून एकूण क्षेत्रफळ (चौरसफुटामध्ये) | फवारणीचा चौ.फुट वार्षिक दर सर्व करासह (सहा फवारणी) रुपये | पैसे | एकुण रक्कम रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | साईबाबा भक्तनिवासस्थान | ५०९ | १५ | --- | १,७३,२६८.०० | ०३ | ०० | ५,१९,८०४.०० |
| २) | साईप्रसाद निवासस्थान | १३४ | १४ | ९९ | ४६,५५४.११ | ०३ | ०० | १,३९,६६२.३३ |
| ३) | व्दारावती निवासस्थान | ३३० | --- | --- | २,०५,११७.०० | ०३ | ०० | ६,१५,३५१.०० |
| | **एकूण** | ९७३ | २९ | ९९ | ४,२४,९३९.११ | -- | -- | १२,७४,८१७.३३ |

(अक्षरी रुपये - बारा लाख,चौ-याहत्तर हजार, आठशे, सतरा मात्र)

मंजुर निर्णयामध्ये त्यावेळी प्रचलित असलेल्या दराचा विचार करुन (००.६३ पैसे प्रति चौ.फुट दराप्रमाणे ) रुपये ४,००,०००/- ( अक्षरी रुपये चार लाख मात्र) साठी मंजुरी प्राप्त आहे. मात्र सध्या याच कामाचा दर रुपये ०३.०० प्रति चौरस फुटा प्रमाणे आला आहे. म्हणजेच रु १२,७४,८१७/- वजा- रु ४,००,०००/- बरोबर रु ८,७४,८१७/- इतका जादा खर्च प्रस्तुत कामी येणार आहे. म्हणजेच चौथ्या प्रयत्नात एकल पात्र निविदाधारक मे.आय.पी.एम. ॲन्उ फ्युमिगेशन इंडिया प्रा.लि, मुंबई यांचे निविदेची किंमत १२,७४,८१७.३३ इतकी आली आहे. खरेदी नियमावलीतील तरतुद क्र. ४-४-३-१ मध्ये नमुदप्रमाणे सदरहु दर + १०/-२० मध्ये बसत नाही त्यामुळे सदरहु प्रक्रीया रद्द करुन पुन्हा नव्याने ई-निविदा मागविणे दि.१७.०२.२०१८ रोजीचे टिपणी क्र.०९/३८१ वर आदेशीत असल्याने प्रस्तुतकामी येणा-या खर्चात वाढ करावी लागणार आहे.

दि.२९/०५/२०१८ रोजी मा. उप जिल्हाधिकारी यांचे कक्षात निविदेतील अटी / शर्ती अंतीम करणेबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा विभागातील इमारती व परिसरात पेस्ट कंट्रोल करणेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-साई धर्मशाळा / ८१८/२०१८, दि. १८/०५/२०१८ अन्वये मे. पेस्ट कंट्रोल वॉल्श, मुंबई यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कार्यादेशातील पेस्ट कंट्रोलचा प्रती चौ. फुट दर रु. १.६० पैसे असा आहे. व सदरचे दर जीएसटी वगळुन आहेत. सदरचे दराप्रमाणे साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवाससथान व व्दारावती निवासस्थान या इमारतीमध्ये पेस्ट कंट्रोलकामी एक वर्षाकरीता (वर्षातुन ६ फवारण्या) करणेकामी खर्चाची रक्कम (इन्स्टीमेटेड कॉस्ट) खालीलप्रमाणे होत आहे.

| अ.नं | विभाग | खोल्या संख्या | हॉल संख्या | लॉकर्स | खोल्या व हॉल मिळवून एकूण क्षेत्रफळ (चौरसफुटामध्ये) | फवारणीचा चौ.फुट वार्षिक दर सर्व करासह (सहा फवारणी) (जीएसटी वगळुन) रुपये | पैसे | एकुण रक्कम (जीएसटी वगळुन) रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | साईबाबा भक्तनिवासस्थान | ५०९ | १५ | --- | १,७३,२६८.०० | ०१ | ६० | २,७७,२२८.८० |
| २) | साईप्रसाद निवासस्थान | १३४ | १४ | ९९ | ४६,५५४.११ | ०१ | ६० | ७४४८६.५७ |
| ३) | व्दारावती निवासस्थान | ३३० | --- | --- | २,०५,११७.०० | ०१ | ६० | ३२८१८७.२० |
| | **एकूण** | ९७३ | २९ | ९९ | ४,२४,९३९.११ | -- | -- | ६,७९,९०२.५७ |

उपरोक्तकामी एकुण अंदाजे रुपये ६,७९,९०३/- अधिक जीएसटी रक्कम १८ टक्के प्रमाणे रुपये १,२२,३८२/- असे एकुण रुपये ८,०२,२८५/- (अक्षरी रुपये आठ लाख दोन हजार दोनशे पंच्याऐंशी ) खर्च अपेक्षित आहे.

१. मागिल दि.०९.१०.२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमधील विषय नं.३४ व निर्णय क्र.७२१ अन्वये मंजुर रक्कम रु.४,००,००० + सध्याचे अंदाजित दराचे परीगणती नुसारची वाढीव रक्कम रु.४,०२,२८५ एकुण ८,०२,२८५/- (अक्षरी रुपये आठ लाख दोन हजार दोनशे पंच्याऐंशी रुपये मात्र) खर्चास तथा याकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेकामी मंजुरीसाठी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर .

निर्णय क्र.४०३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ या एक वर्षासाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान, व्दारावती निवासस्थान विभागात करावयाचे पेस्ट कंट्रोल कामासाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेमधील विषय नं.३४ व निर्णय क्र.७२१ अन्वये मंजुर रक्कम रु.४,००,००० + सध्याचे अंदाजित दराचे परीगणती नुसारची वाढीव रक्कम रु.४,०२,२८५ असे एकुण ८,०२,२८५/- (अक्षरी रुपये आठ लाख दोन हजार दोनशे पंच्याऐंशी रुपये मात्र) खर्चास मान्यता देण्यात आली, तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,साईबाबा भक्तनिवास,साईप्रसाद निवासस्थान, व्दारावती निवासस्थान)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१४ **वनवासी कल्याण आश्रम,महाराष्ट्र यांचेमार्फत दि.३०.०९.२०१८ ते ०२.१०.२०१८ या ०३ दिवसांच्या कालावधीत आयोजित होणाऱ्या भारतातील आदिवासी प्रतिनिधींचे निवासी संमेलनाकरीता संस्थानमार्फत व्यवस्था करणे.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :

१) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ढ) अन्वये, सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ण) अन्वये, मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :-

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५०

प्रस्तावना-श्री साईबाबा यांच्या महासमाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये साजरे केले जात आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

**प्रस्तावः** संदर्भीय दि.२२/०३/२०१८ व दि.०७/०५/२०१८ अन्वये मा.अध्यक्ष महोदय यांना अग्रेषित केलेल्या पत्रामध्ये वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र यांनी अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रम ही स्वयंसेवी संस्था संपूर्ण भारतातील आदिवासी, जनजातींमध्ये त्यांची अस्मिता व अस्तित्वासाठी काम करते. शिक्षण, छात्रावास, आरोग्यसेवा, ग्रामविकास, आर्थिक विकास, कृषिविकास, कौशल्यविकास, प्रतिभा विकास, खेलकुद, श्रध्दाजागरण-धर्म-संस्कृती-परंपरा-उत्सव-पुजापध्दती-संरक्षण, लोककला, जनजाति हितरक्षा-Protection of tribal rights, नागरीय कार्य, महिला कार्य (S H G)स्वयंसहायता समूह इत्यादी अनेक पैलूंसह त्यांनी त्यांचा विकास करण्याचे ध्येय समोर ठेवून हजारो कार्यकर्ते तनमनधनाने कार्यरत आहेत. त्यासाठी १४००० पेक्षा अधिक ठिकाणी २०००० पेक्षा अधिक प्रकल्प चालू आहेत. वरील संमेलनासाठी सुदूर अंदमान, अरुणाचल, नागाल्यांड, हिमाचल, उडीसा, केरळ, तमिळनाडू आणि देशभरातील २५०० कार्यकर्ते १५० महिला कार्यकर्त्या उपस्थित राहणार आहेत.

साईबाबांच्या शिकवणीनुसार धर्म, जात,पंथ, निरपेक्ष दीनदुबळ्या, दुःखित, अप्रगत व दुर्गम भागातील जनजातीमध्ये कार्य करणा-या कार्यकर्त्यांसाठी खालील बाबींची पूर्तता आपल्या संस्थानमार्फत अपेक्षित आहे.

२६५० कार्यकर्त्यांची निवास व्यवस्था (साईआश्रम-२ मधील (A B E F & R Block) पूर्ण )

पाणी, चहा, कॉफी, नाष्टा व भोजन

| दिनांक | सकाळ नाष्टा (संख्या) वेळ ८ वा. | दुपार भोजन (संख्या) वेळ १२.३० वा. | सायं. नाष्टा (संख्या) वेळ ४.३० वा. | रात्री भोजन (संख्या) वेळ ८.३० वा. | निवासव्यवस्था साईआश्रम २ भक्त निवास |
|---|---|---|---|---|---|
| २६/०९/२०१८ | ७५ | ७५ | ७५ | ७५ | A तळमजला (८ हॉल) |
| २७/०९/२०१८ | ७५ | ७५ | १२५ | १२५ | A तळमजला (८ हॉल) |
| २८/०९/२०१८ | १२५ | १२५ | १२५ | ३०० | A तळमजला (८ हॉल) |
| २९/०९/२०१८ | ५०० | ५०० | ६०० | २००० | R,A,B,E,F Block पूर्ण |
| ३०/०९/२०१८ | २५०० | २५०० | २५०० | २५०० | R,A,B,E,F Block पूर्ण |
| ०१/१०/२०१८ | २५०० | २५०० | २५०० | २५०० | R,A,B,E,F Block पूर्ण |
| ०२/१०/२०१८ | २५०० | २५०० | ४००० | २५०० | R,A,B,E,F Block पूर्ण |
| ०३/१०/२०१८ | १५०० | १००० | ७०० | ५०० | A तळमजला (८ हॉल) |
| ०४/१०/२०१८ | ५०० | ५०० | ३०० | ३०० | A तळमजला (८ हॉल) |
| ०५/१०/२०१८ | २०० | २०० | २०० | २०० | A तळमजला (८ हॉल) |
| ०६/१०/२०१८ | १०० | १०० | ५० | ५० | A तळमजला (८ हॉल) |

संमेलनातील चर्चासत्रासाठी मंडप, खुर्च्या, स्टेज, माईकव्यवस्था व लाईटव्यवस्था

१० स्वतंत्र खोल्या विशेष निमंत्रितांसाठी

प्रबंधक व्यवस्था व विश्रांती कक्ष

प्रदर्शनासाठी मंडप

स्वच्छता व तदनुषंगिक व्यवस्था

सदर संमेलनासाठी उपरोक्त बाबी तसेच खालील बाबींची पूर्तता श्री साईबाबा संस्थानमार्फत व्हावी असे कळविले आहे.

संमेलनासाठी आवश्यक असणा-या वाटरप्रुफ मंडपाचे मोजमाप खालील प्रमाणे –

स्टेजसह मुख्य चर्चा सत्र मंडप -३८०'x१३५' आणि १०३'x ८०' फुट स्टेज-४०' x ३०'

भोजन कक्ष३७४' x १३३'

प्रदर्शन कक्ष १०८' x १०६'

स्वागत कक्ष ९९' x ९९'

गट चर्चा सत्र १९३’x१४३’ आणि भोजन कक्ष५७’ x९३’

<u>आवश्यक बाबी</u>

साऊंड सिस्टीम ३ ठिकाणी मोठ्या स्वरुपात

खुर्च्या ३००० नग

मॅटींग

सोफासेट २० नग

भोजनासाठी ३०० टेबल

मंडपात २ नग मोठे स्क्रीन एलईडी वॉल

श्री साईबाबांचे छोटे स्मृतिचिन्ह (उपलब्ध असलेला फोटो)

मंडपामध्ये लाईट, फॅन, कुलर इ. (जनरेटर ब्रेकअपसह)

पोडीयम- २ डेक्स

**विभागाचा अभिप्राय-** वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र यांचे २६५० संमेलनार्थीचे दि.३०/०९/२०१८ ते ०२/१०/२०१८ असे तीन दिवसीय निवासी संमेलन आयोजित करणेकामी खालीलबाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. साईआश्रम निवासस्थानमध्ये नव्याने होत असलेल्या साईआश्रम समाधी मंडपात या कालावधीत दुसरा कार्यक्रम आयोजीत करणेत आलेला असलेने साईआश्रम धर्मशाळा येथे आयोजित करणेस परवानगी देता येईल.

२. निवास- व्दारावती निवासस्थानात चार दिवस विशेष निमंत्रितांसाठी १० खोल्या व उर्वरित संमेलनार्थीसाठी साईआश्रम धर्मशाळेत त्यांचे विनंतीप्रमाणे सशुल्क व्यवस्था करता येईल. (साईआश्रम धर्मशाळा हॉल संख्या -९६,एका हॉलमध्ये व्यक्तींची सोय- २५)

३. भोजन -संमेलनार्थीची भोजनाची व्यवस्था श्री साईप्रसादालयात मोफत करता येईल.

४. चहा, नाष्टा- सदरहू व्यवस्था सशुल्क करता येईल.

५. मंडप व व्यासपीठ- (स्टेज, भोजन कक्ष, प्रदर्शन कक्ष, स्वागत कक्ष, गट चर्चा सत्र,) सोफासेट, भोजनासाठी टेबल, पोडीयम व खुर्च्या, विजपुरवठा (जनरेटरसह) संस्थानच्या बांधकाम विभागामार्फत विहीत पध्दतीने निविदा मागवून करता येईल.

६. कुलर- संस्थानमार्फत व्यवस्था करता येईल.

७. ध्वनीक्षेपण व्यवस्था- संस्थानमार्फत विहीत पध्दतीने निविदा मागवून करता येईल.

८. पिण्याचे पाणी- संस्थानमार्फत पिण्याचे पाण्याची व्यवस्था करता येईल.

९. एलईडी स्क्रीन –संस्थानमार्फत विहीत पध्दतीने निविदा मागवून करता येईल.

तरी संमेलनार्थीकरीता लागणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशील | कालावधी | एकुण |
|---|---|---|---|
| १ | वॉटरप्रुफ मंडप मॅटींगसह -३८०’x१३५’ आणि १०३’x८०’ | ३ दिवस | १२,५०,३४०/- |
| | स्टेजसह मुख्य चर्चा सत्र-४०’ x ३०’ | ३ दिवस | ८२,८००/- |
| | भोजन कक्ष३७४’ x १३३’ | ३ दिवस | १०,४४,५८२/- |
| | प्रदर्शन कक्ष १०८’ x १०६’ | ३ दिवस | २,४०,४०८/- |
| | स्वागत कक्ष ९९’ x ९९’ | ३ दिवस | २,०५,८२१/- |
| | गट चर्चा सत्र १९३’x१४३’ आणि भोजन कक्ष५७’ x९३’ | ३ दिवस | ६,९०,९००/- |
| २. | पोडीयम- २ डेक्स | ३ दिवस | ६,०००/- |
| ३. | खुर्च्या ३००० नग | ३ दिवस | ९०,०००/- |
| ४ | सोफासेट २० नग | ३ दिवस | २१,०००/- |
| ५. | भोजनासाठी ३०० टेबल | ३ दिवस | १८,०००/- |
| ६. | साऊंड सिस्टीम ३ ठिकाणी मोठ्या स्वरुपात | ३ दिवस | २,६५,५००/- |
| ७. | मंडपात २ नग मोठे स्क्रीन एलईडी वॉल | ३ दिवस | १,८०,०००/- |
| ८. | मंडपामध्ये लाईट, फॅन इ. (जनरेटर ब्रेकअपसह) | ३ दिवस | २,४३,६३०/- |
| ९. | पिण्याचे पाणी | ३ दिवस | २५०००/- |
| | | **एकुण रक्कम रु.-** | ४३,६३,९८१/- |

वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र यांचेमार्फत दि.३०/०९/२०१८ ते ०२/१०/२०१८ असे ०३ दिवसांच्या आयोजित होणा-या भारतातील आदिवासी प्रतिनिधींचे निवासी संमेलनाकरीता संस्थानमार्फत व्यवस्था केल्यास रक्कम रु.४३,६३,९८१/- (अक्षरी- त्रेचाळीस लाख त्रेसष्ट हजार नऊशे ऐक्यांऐंशी) मात्र इतका खर्च येणार आहे.

तरी संस्थानमार्फत व्यवस्था होणेकामी खालील बाबींवर निर्णय होणे आवश्यक आहे.

(१) वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र यांचेमार्फत आयोजित होणा-या आदिवासी, जनजाती व दुर्गम लोकवस्तीमध्ये त्यांची अस्तिमा व अस्तित्वासाठी काम करणा-या कार्यकत्यांचे व जनजाती प्रतिनिधींचे ०३ दिवसांचे निवासी संमेलन आयोजित करणेस परवानगी द्यावी किंवा कसे ? याबाबत निश्चिती करणे.

(२) निवासी संम्मेलनार्थीची (२६५० व्यक्ती) साईआश्रम धर्मशाळा-२ मधील हॉलमध्ये (A B E F & R Block) पूर्ण ) व व्दारावती निवासस्थानात विशेष निमंत्रितांसाठी चार दिवस १० खोल्या अशी निवासव्यवस्था त्यांचे विनंतीप्रमाणे सशुल्क व्यवस्था करुन देणेबाबत.

(३) संमेलनार्थीची भोजनाची व्यवस्था श्री साईप्रसादालयात मोफत उपलब्ध करुन देणेबाबत.

(४) चहा, नाष्टा इत्यादिची व्यवस्था सशुल्कउपलब्ध करुन देणेबाबत..

(५) संस्थानमार्फत मंडप व व्यासपीठ, (स्टेज, भोजन कक्ष, प्रदर्शन कक्ष, स्वागत कक्ष, गट चर्चा सत्र) सोफासेट, भोजनासाठी टेबल, पोडीयम व खुर्च्या, विजपुरवठा (जनरेटरसह) इ.सुविधा मोफत उपलब्ध करुन द्याव्या किंवा कसे? याबाबत निश्चिती करणे.

(६) संस्थानमार्फत कुलरची व्यवस्था मोफत उपलब्ध करुन देणेबाबत.

(७) संस्थानमार्फत ध्वनीक्षेपण व्यवस्था मोफत उपलब्ध करुन द्यावी किंवा कसे? याबाबत निश्चिती करणे.

(८) संस्थानमार्फत पिण्याचे पाण्याची व्यवस्था मोफत उपलब्ध करुन देणेबाबत.

(९) एलईडी स्क्रीन संस्थानमार्फत मोफत उपलब्ध करुन द्यावी किंवा कसे? याबाबत निश्चिती करणे.

तसेच समाधी शताब्दी समारोप काळात शिर्डीमध्ये साईभक्तांची जास्त गर्दी होण्याची शक्यता असल्याने या गर्दीचे कालावधीत सदर निवासी संमेलन कार्यक्रमासाठी परवानगी देणे व संस्थानमार्फत उपरोक्त व्यवस्था करावयाची झाल्यास सुमारे रक्कम रु.४३,६३,९८१/- मात्र इतका खर्च करणे उचित ठरणार नाही.

तरी संपूर्ण भारत वर्षातील आदिवासी, जनजाती व दुर्गम लोकवस्तीच्या अस्तिमा व अस्तित्वासाठी काम करणा-या कार्यकत्यांचे व जनजाती प्रतिनिधींचे (वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र) दि.३०/०९/२०१८ ते ०२/१०/२०१८ असे ०३ दिवसांचे निवासी संमेलन शताब्दी समारोपाचे गर्दीचे कालावधीत आयोजित करणेसाठी परवानगी द्यावी किंवा कसे? तसेच सदर समेंलन आयोजित करण्यासाठी परवानगी दिल्यास संस्थानमार्फत उपरोक्त व्यवस्था पुरविणेकामी सुमारे रक्कम रु.४३,६३,९८१/-(अक्षरी- त्रेचाळीस लाख त्रेसष्ट हजार नऊशे ऐक्यांऐंशी) मात्र इतक्या खर्चासाठी मंजूरी देणेस व उपरोक्त नमूद १ ते ९ मुद्यांबाबत निर्णय होणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.४०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संपूर्ण भारत वर्षातील आदिवासी, जनजाती व दुर्गम लोकवस्तीच्या अस्मिता व अस्तित्वासाठी काम करणा-या कार्यकत्यांचे व जनजाती प्रतिनिधींचे (वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र) दि.३०/०९/२०१८ ते ०२/१०/२०१८ असे ०३ दिवसांचे निवासी संमेलन (२६५० व्यक्ती) साईआश्रम-१ येथील मंडपात आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली.**

**प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे सदरचा कार्यक्रम साईआश्रम धर्मशाळा येथे वॉटप्रुफ मंडप व इतर अनुशंगीक सोयी-सुविधा गृहीत धरुन रु.४२,६३,९८१/- मात्र खर्च येईल असे नमुद केलेले आहे. तथापी सदरचा कार्यक्रम साईआश्रम-१ येथील समाधी शताब्दी मंडपात आयोजीत करावयाचा असल्याने प्रस्तावात नमुद केलेला खर्च होणार नाही. या कार्यक्रमाकरीता सभामंडपात पोडीयम, २ डेक्स, खुर्च्या, सोफासेट, साऊंड सिस्टिम, लाईट व फॅन, जनरेटर व इतर अनुशंगीक सुविधांकरीता रक्कम रु.१२ लाख खर्च अपेक्षीत आहे. त्यास मान्यता देण्यात आली.**

**सदर निवासी संमेलनाकरीता उपस्थित राहाणाऱ्या प्रतिनिधींची निवासव्यवस्था साईआश्रम धर्मशाळेतील हॉलमध्ये व भोजनव्यवस्था साईप्रसादालय जनरल हॉल येथे निशुल्क करावी. तसेच चहा नाष्टयाची मोफत व्यवस्था करावी. मात्र LED स्क्रीनसाठी संस्थानने खर्च करु नये, असे ठरले.**

**तसेच याच कालावधीत साई आश्रम-१ येथील मंडपात आयोजित करण्यात आलेला ॐ श्री साई स्वाध्याय समिती, कराड यांचा ॐ कार साधना संमेलन कार्यक्रम १६ गुंठे येथील शताब्दी मंडपात आयोजित करावा, असे ठरले.** **(कार्यवाही-शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

आयत्या वेळेचा

विषय नं.१५, निर्णय क्र.४०५ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१६ ऑगस्ट, २०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६५ अन्वये गठीत करणेत आलेल्या स्थानिक उपसमितीमध्ये समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांचा सदस्य म्हणून समावेश करणेत यावा, असे ठरले.

(कार्यवाही-प्र.अधिक्षक, सभाकामकाज विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१६, निर्णय क्र.४०६ शिर्डी परिसरातील गरीब विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून ज्यु.के.जी.ॲडमिशनसाठी मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी प्रत्येकी ४० विद्यार्थ्यांच्या ५ तुकडया कराव्यात. १५० विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पुर्ण झालेली असून उर्वरीत प्रवेशासाठी प्रतिक्षा यादीमधील शिर्डी नगरपंचायत हद्दीतील ५० विद्यार्थ्यांना सोडत पध्दतीने प्रवेश देण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१७, निर्णय क्र.४०७ आषाढी एकादशी निमीत्त शिर्डी ते पंढरपुर पायी जाणाऱ्या दिंडीस आवश्यकतेनुसार संस्थानचे प्रसादालयातुन शिधा उपलब्ध करुन देण्यात यावा. तसेच याबाबतचा प्रस्ताव छाननी समितीचे मान्यतेने शासन मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१८, निर्णय क्र.४०८ शिर्डी नगरपंचायत हद्दीमधील विकास आराखडयातील रस्त्यांचे भुसंपादनाची रक्कम उपविभागीय अधिकारी,शिर्डी यांचेकडे जमा केली होती. परंतु सदर भुसंपादन शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेमार्फत झालेले असल्याने सदरची रक्कम उपविभागीय अधिकारी यांनी संस्थानकडे परत केलेली आहे. भुसंपादन संस्था शिर्डी नगरपंचायत असल्याने सदर भुसंपादनाची रक्कम शिर्डी नगरपंचायतीकडे वर्ग करण्यात यावी, असे उपविभागीय अधिकारी,शिर्डी यांनी कळविले असल्याने सदरची रक्कम शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग/प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१९, निर्णय क्र.४०९ मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०७.०३.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२१५ नुसार मौजे रुई, ता.राहाता येथील राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांचेकडून दानपत्राद्वारे प्राप्त झालेल्या गट नं.२९३ मधील क्षेत्र ७ हेक्टर ३२ आर या जागेमध्ये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालये तसेच प्रस्तावित कॅन्सर हॉस्पिटलसाठी एकत्रित ‘वैद्यकिय संकुल’ उभारण्यासाठी आर्किटेक्टची नियुक्ती करणेबाबत निविदा प्रक्रिया सुरु करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२०, निर्णय क्र.४१० श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता आकृतीबंध तयार करणेसाठी या क्षेत्रात काम करण्याऱ्या संस्थेची नियुक्तीकरणेबाबत निविदाप्रक्रिया सुरु करण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२१, निर्णय क्र.४११ सध्या हॉस्पिटलमध्ये ठेकेदारामार्फत नियुक्त केलेल्या BAMS डॉक्टरांना दरमहा रु.१६,२००/- मात्र इतके एकत्रित मानधन देण्यात येते. सदरचे देण्यात येणारे मानधन खुपच कमी आहे. असे सर्व समिती सदस्यांचे मत झाले.

मात्र BAMS डॉक्टर्सची पदे आकृतीबंधात मंजूर नाहीत. सदर प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. मात्र त्यास मंजूरी मिळालेली नाही. मंजूरी मिळाल्यानंतर त्यांच्या वेतनवाढीबाबत निर्णय घेणे उचीत राहील. असे मुख्य कार्यकारी अधिकारी नमूद केले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, या सर्व BAMS डॉक्टरांना दि.०१.०६.२०१८ पासून रु.३५,०००/-मात्र मानधन लागु करावे, असे ठरले. हॉस्पिटलकडील BAMS डॉक्टरांना आकृतीबंधात मान्यता नसल्याने यासाठी शासनाची मान्यता घ्यावी, शासनाची मान्यता मिळाल्यानंतर BAMS डॉक्टरांना दि.०१.०६.२०१८ पासून वाढीव मानधन देण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२२, निर्णय क्र.४१२ दि.०४.०४.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२२६ अनवये लखनौ येथील अविष्का ग्रुप लि.यांना यांना दि.२६.०६.२०१८ व दि.२७.०६.२०१८ या दिवशी पादुका दर्शन सोहळयासाठी उपलब्ध करुन द्याव्यात असे ठरले होते. तथापी लखनौ येथील अविष्का ग्रुप लि. यांचे विनंती नुसार त्यांना दि.२६.०६.२०१८ व दि.२७.०६.२०१८ ऐवजी दि.०३.०७.२०१८ व दि.०४.०७.२०१८ रोजी पादुका उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२३, निर्णय क्र.४१३ दि.०२.०५.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२३९ कायम करतांना 'वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगाव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर योजनेच्या निविदेचे मसुद्याचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मंजुरी देण्यात आली व तात्काळ निविदा प्रसिध्द करणेत यावी. टप्पा १ चा निविदा कालावधी २५ दिवस ठेवण्यात यावा. व टप्पा २ चा निविदा कालावधी ७५ कार्यरत दिवस (Working day) ऐवजी ९० दिवस (सर्व दिवस धरुन) करण्यात यावा,' असे ठरले होते.

तथापी महाटेंडर प्रणालीमध्ये एकदा निविदेचे वेळापत्रक प्रसिध्द केल्यानंतर निवीदा सादर करावयाच्या अंतीम मुदतीत वाढ करता येते, परंतु ती मुदत कमी करता येत नाही. सदर तांत्रिक बाब विचारात घेता सदर निविदेसाठी यापुर्वी प्रकाशीत केल्याप्रमाणे दि.१६.०७.२०१८ ही निविदा सादर करण्याची अंतीम तारीख कायम ठेवावी, असे ठरले. (पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२४, निर्णय क्र.४१४ दि.०२.०५.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२४७ नुसार अपारंपारीक ऊर्जा अंतर्गत संस्थानकरीता १० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणीकामी निविदा प्रक्रिया राबवितांना निविदाधारकांचे तांत्रिक मुल्यमापन करतांना कामाची क्षमता, आर्थिक उलाढाल याबाबत प्रस्तावीत करण्यात आलेल्या गुणांकन पध्दतीचा निविदा प्रक्रियेमध्ये समावेश करु नये, असे ठरले. त्याऐवजी निविदा पुर्व अर्हतेच्या अटी पुर्ण करणाऱ्या सर्व निविदाधारकांना वाणिज्यीक निविदा उघडण्यासाठी पात्र समजण्यात यावे, असे ठरले.

तथापी याबाबत केंन्द्रीय दक्षता आयोग व महालेखापाल यांच्या निविदा प्रक्रियेशी संबधीत मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करणे योग्य राहील असे समिती सदस्यांचे मत झाले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, १० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेमध्ये पुढील प्रमाणे गुणांकन पध्दती समाविष्ट करणेस मान्यता देण्यात आली.

**A. Bid Evaluation Methodology:- Section IV- Clause No. 4.1 (a) & (b), Page No. 45 to 49**

a. **Technical Bid Evaluation Criteria**

| **Sr. No.** | **Criteria** | **Maximum Points (Quality Points – Qp)** | **Criteria for assigning Points** |
|---|---|---|---|
| **A** | **Over allExperience** | **100** | |
| 1 | **Technical Eligibility Criteria** | | |
| | a) The bidder should have designed, supplied, erected and commissioned on turnkey basis of Solar Photo Voltaic (SPV) based grid connected solar power plant(s) of **10 MW** or **2** X **5 MW** or **5** X **2 MW** or **10** X **1 MW (10 MW cumulative)** or above installed capacity in India in any **two** calendar years or two financial years in the **last five** years from the | 25 | ≥10 MW < 20 MW –20 Marks<br><br>> 20 MW –25 Marks |

| | | | |
|---|---|---|---|
| | bid due date.<br>b) The reference solar PV plant of **10 MW** or **2** X **5 MW** or **5** X **2 MW** or **10** X **1 MW (10 MW Cumulative)** or above capacity must have been in successful operation for at least 12 months up to the bid due date. | | |
| 1 | **Technical Eligibility Criteria** | | |
| | c) The bidder should be presently in the business of Operation & Maintenance (O&M) of solar PV plants and should have experience of successful operation and maintenance of solar PV plant of 10 MW or 2X5 MW or 5X2 MW or 10 X 1 MW **(10 MW Cumulative)** or above capacity in India for a period at least of **2 years** up to the bid due date. | | ≥10 MW ≤ 20 MW –20 Marks<br>> 20 MW –25 Marks |
| **2** | **Financial Eligibility Criteria (FEC)** | **25** | |
| | a) The minimum average annual turnover of the Bidder in the preceding 3 (Three) financial years as on bid issue date should be at least INR 50 crores (Indian Rupees Fifty Crores only). The turnover should be gradually increasing or same in average, not decreasing. | 25 | ≥ 50 Cr ≤ 100 Cr – 20 Marks<br>>100 Cr – 25 Marks |
| **3** | **Qualified Technical Staff For EPC and O & M** | **10** | |
| | **i. Team Leader (CivilEngg) -1 No.**<br>Years of experience in installation & Commissioning of project | 5 | ≥ 10 Yrs ≤ 15 - 3<br>≥ 15 Yrs - 5 |
| | **ii. Project Manager (ElectricalEngg) – 1 No.**<br>Years of experience in installation & Commissioning of project | 5 | ≥ 10 Yrs ≥≤ 15 - 3<br>≥ 15 Yrs - 5 |
| **4** | **Technical Experts** | **10** | |
| | **i. Technical Experts in Designing and Engineering (Civil Engg) - 1 No.**<br>Years of experience in Designing &Engineering of solar project | 5 | ≥ 7 Yrs ≤ 10 - 3<br>> 10 Yrs - 5 |
| | **ii. Technical Experts in Designing and Engineering (Electrical Engg) - 1 No.**<br>Years of experience in Designing & Engineering of solar project | 5 | ≥ 7 Yrs ≤ 10 - 3<br>≥ 10 Yrs - 5 |
| **5** | **Softwares for Design and Engineering** | **5** | |
| | 1. Solar Data Analysis Software (Meteonorm, Solar GIS or any other software having high accuracy in solar data analysis)<br>2. Solar Plant Designing Software (PV Syst)<br>3. Shadow Analysis Software (Sketch Up)<br>4. STADD Pro<br>**5.** AUTO CAD | 5 | 1 Point- For each software |

**(कार्यवाही- उपकार्यकारी अभियंता, विद्युत विभाग)**

---

वरील निर्णय क्र.३४७ ते ४१४ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर सायंकाळी ०६.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| मुख्यकार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**